याच प्रमाणे $\sqrt{2} \times \sqrt{8} = \sqrt{16} = 4$ तर $\sqrt{2}$ आणि $\sqrt{8}$ हे एकमेकांचे परिमेयीकारक अवयव आहे. आणखी $\sqrt{2} \times \sqrt{18} = \sqrt{36} = 6$, इत्यादी, या मध्ये $\sqrt{2}$ हे $\sqrt{2}$ चे साधे परिमेयीकारक अवयव आहे.

जर दोन अपरिमेय संख्याचा गुणाकार परिमेय संख्या असेल तर दोन पैकी एक दुसऱ्याचे परिमेयकरण अवयव (R.F) असते. याची नोंद घ्या. तसेच दिलेल्या अपरिमेय संख्याचे (R.F) हे विलक्षण नसते याची पण नोंद घ्या. दिलेल्या अपरिमेय संख्याचे (R.F) चा वापर सोयी प्रमाणे करता येते.

## हे करा



छेदाचे परिमेयीकारक अवयव माहित करा. (i) $\frac{1}{2\sqrt{3}}$ (ii) $\frac{3}{\sqrt{5}}$ (iii) $\frac{1}{\sqrt{8}}$.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

उदाहरण-18: $\frac{1}{4+\sqrt{5}}$ च्या छेदाचे परिमेयीकरण करा.

सोडवणुक: आपल्याला माहित आहे. $(a+\sqrt{b})(a-\sqrt{b}) = a^2 - b$

$\frac{1}{4+\sqrt{5}}$ च्या अंशाला आणि छेदाला $4-\sqrt{5}$ ने गुणुन

$$\frac{1}{4+\sqrt{5}} \times \frac{4-\sqrt{5}}{4-\sqrt{5}} = \frac{4-\sqrt{5}}{4^2-\left(\sqrt{5}\right)^2} = \frac{4-\sqrt{5}}{16-5} = \frac{4-\sqrt{5}}{11}$$

उदाहरण-19: जर $x = 7+4\sqrt{3}$ तर $x+\frac{1}{x}$ चे मूल्य काढा.

देण्यात आलेले $x = 7+4\sqrt{3}$

आता $$\frac{1}{x} = \frac{1}{7+4\sqrt{3}} \times \frac{7-4\sqrt{3}}{7-4\sqrt{3}} = \frac{7-4\sqrt{3}}{7^2-(4\sqrt{3})^2} = \frac{7-4\sqrt{3}}{49-16\times 3} = \frac{7-4\sqrt{3}}{49-48} = 7-4\sqrt{3}$$

$$\therefore x+\frac{1}{x} = 7+4\sqrt{3}+7-4\sqrt{3} = 14$$

उदाहरण-20: सरळ रुप द्या $\frac{1}{7+4\sqrt{3}}+\frac{1}{2+\sqrt{5}}$

सोडवणुक: $7+4\sqrt{3}$ चे परिमेयक अवयव $7-4\sqrt{3}$ आहे. आणि $2+\sqrt{5}$ चे परिमेयक अवयव $2-\sqrt{5}$ आहे.

$$= \frac{1}{7+4\sqrt{3}}+\frac{1}{2+\sqrt{5}}$$

$$= \frac{1}{7+4\sqrt{3}} \times \frac{7-4\sqrt{3}}{7-4\sqrt{3}} + \frac{1}{2+\sqrt{5}} \times \frac{2-\sqrt{5}}{2-\sqrt{5}}$$

$$= \frac{7-4\sqrt{3}}{7^2-(4\sqrt{3})^2} + \frac{2-\sqrt{5}}{2^2-(\sqrt{5})^2}$$

$$= \frac{7-4\sqrt{3}}{49-48} + \frac{2-\sqrt{5}}{(4-5)}$$

$$= \frac{7-4\sqrt{3}}{1} + \frac{2-\sqrt{5}}{(-1)}$$

$$= 7-4\sqrt{3} - 2+\sqrt{5} = 5-4\sqrt{3}+\sqrt{5}$$





SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



### 1.5.2 वास्तविक संख्यासाठी घातांकाचा नियम

घातांकाच्या नियमांची उजळणी करु या.

i) $a^m.a^n = a^{m+n}$ ii) $(a^m)^n = a^{mn}$ iii) $\frac{a^m}{a^n} = \begin{cases} a^{m-n} & \text{जर } m > n \\ 1 & \text{जर } m = n \\ \frac{1}{a^{n-m}} & \text{जर } m < n \end{cases}$

iv) $a^m b^m = (ab)^m$ v) $\frac{1}{a^n} = a^{-n}$ vi) $a^0 = 1\ (a \neq 0)$

येथे 'a', 'm' आणि 'n' हे पुर्णांक आहेत आणि $a \neq 0$. 'a' ला पाया m, n ला घातांक म्हणतात. उदा.

i) $7^3.7^{-3} = 7^{3+(-3)} = 7^0 = 1$ ii) $(2^3)^{-7} = 2^{-21} = \frac{1}{2^{21}}$

iii) $\frac{23^{-7}}{23^4} = 23^{-7-4} = 23^{-11}$ iv) $(7)^{-13}.(3)^{-13} = (7\times3)^{-13} = (21)^{-13}$

खालील गणना आपण करु या.

i) $2^{\frac{2}{3}}.2^{\frac{1}{3}}$ ii) $\left(5^{\frac{1}{7}}\right)^4$ iii) $\frac{3^{\frac{1}{5}}}{3^{\frac{1}{3}}}$ iv) $7^{\frac{1}{17}}.11^{\frac{1}{17}}$

आपण कसे सोडवु? वरील उदाहरणात पाया आणि घातांक या परिमेय संख्या आहेत. अशा प्रकारे तेथे धन वास्तविक संख्याच्या घातांकाचा नियम लागु करण्याची आवश्यकता आहे आणि घातांक हे परिमेय संख्या म्हणुन, हा नियम सांगण्याच्या अगोदार, वास्तविक संख्याचे n वे मुळ कोणते आहे. हे समजणे आपल्याला आवश्यक आहे.

आपल्याला माहित आहे जर $3^2 = 9$ तर $\sqrt{9} = 3$ ( 9 चे वर्गमुळ 3 )

म्हणजेच $\sqrt[2]{9} = 3$

जर $5^2 = 25$ तर $\sqrt{25} = 5$ म्हणजेच $\sqrt[2]{25} = 5$ जेव्हा जेव्हा $\sqrt[2]{25} = (25)^{\frac{1}{2}} = (5^2)^{\frac{1}{2}} = 5^{2\times\frac{1}{2}} = 5$

खालील चे निरिक्षण करा.

जर $2^3 = 8$ तर $\sqrt[3]{8} = 2$ ( 8 चा घनमुळ 2 आहे) $\sqrt[3]{8} = 8^{\frac{1}{3}} = (2^3)^{\frac{1}{3}} = 2$

$2^4 = 16$ तर $\sqrt[4]{16} = 2$ (16 चे 4 थे मुळ 2 आहे. $\sqrt[4]{16} = (16)^{\frac{1}{4}} = (2^4)^{\frac{1}{4}} = 2$



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

$2^5 = 32$ तर $\sqrt[5]{32} = 2$ ( 32 चे 5 वे मुळ 2 आहे) $\sqrt[5]{32} = (32)^{\frac{1}{5}} = \left(2^5\right)^{\frac{1}{5}} = 2$

$2^6 = 64$ तर $\sqrt[6]{64} = 2$ ( 64 चे 6 वे मुळ 2 आहे.) $\sqrt[6]{64} = (64)^{\frac{1}{6}} = \left(2^6\right)^{\frac{1}{6}} = 2$

.................................................................................................................

या प्रमाणे जर $\mathbf{a^n = b}$ तर $\sqrt[n]{\mathbf{b}} = \mathbf{a}$ ($b$चे $n$ वे मुळ $a$आहे ); $\sqrt[n]{b} = (b)^{\frac{1}{n}} = \left(a^n\right)^{\frac{1}{n}} = a$

$\mathbf{a} > 0$ हे वास्तविक संख्या आणि **'n'** हे धन पुर्णांक समजु

जर $\mathbf{b^n = a}$, काही धन वास्तविक संख्या **'b'**, साठी, तर **b** ला **'a'** चे **n** वे मुळ म्हणतात. आणि याला $\sqrt[n]{\mathbf{a}} = \mathbf{b}$. असे लिहतात. पुर्वीच्या चर्चेत घातांकाचे नियमाची व्याख्या पुर्णांकांसाठी करण्यात आली. धन वास्तव संख्या आणि परिमेय घातांकाचे नियम लागु करु या.

$a > 0$ हे वास्तविक संख्या आणि p आणि q हे परिमेय संख्या समजु

i) $a^p.a^q = a^{p+q}$ ii) $(a^p)^q = a^{pq}$

iii) $\dfrac{a^p}{a^q} = a^{p-q}$ iv) $a^p.b^p = (ab)^p$ v) $\sqrt[n]{a} = a^{\frac{1}{n}}$

अगोदार विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे माहित करण्यासाठी आता आपण या नियमाचा वापर करु शकतो.

उदाहरण -19: सरळ रुप द्या.

i) $2^{\frac{2}{3}}.2^{\frac{1}{3}}$ ii) $\left(5^{\frac{1}{7}}\right)^4$ iii) $\dfrac{3^{\frac{1}{5}}}{3^{\frac{1}{3}}}$ iv) $7^{\frac{1}{17}}.11^{\frac{1}{17}}$

सोडवणुक: i) $2^{\frac{2}{3}}.2^{\frac{1}{3}} = 2^{\left(\frac{2}{3}+\frac{1}{3}\right)} = 2^{\frac{3}{3}} = 2^1 = 2$

ii) $\left(5^{\frac{1}{7}}\right)^4 = 5^{\frac{4}{7}}$

iii) $\dfrac{3^{\frac{1}{5}}}{3^{\frac{1}{3}}} = 3^{\left(\frac{1}{5}-\frac{1}{3}\right)} = 3^{\frac{3-5}{15}} = 3^{\frac{-2}{15}} = \dfrac{1}{3^{2/15}}$

iv) $7^{\frac{1}{17}}.11^{\frac{1}{17}} = (7\times 11)^{\frac{1}{17}} = 77^{\frac{1}{17}}$

**हे करा**



सरळ रुप द्या.

i. $(16)^{\frac{1}{2}}$ ii. $(128)^{\frac{1}{7}}$

iii. $(343)^{\frac{1}{5}}$

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



## करणी

जर '**n**' हा 1 पेक्षा मोठा धनपुर्णांक आणि '**a**' ही धन परिमेय संख्या आहे. पण कोणत्याही परिमेय संख्याचे $\mathbf{n}^{th}$ घात नसेल तर $\sqrt[n]{\mathbf{a}}$ किंवा $\mathbf{a}^{1/n}$ ला **n** व्या क्रमाचे करणी म्हणतात. साधारणपणे आपण '**a**' च्या धन '**n**' व्या मुळाला करणी किंवा रॅडीकल म्हणतो. येथे '**a**' ला रॅडीकॅल (radical) आणि $\sqrt[n]{\ }$ ला रॅडीकल चिन्ह म्हणतो. '**n**' ला रॅडीकलचा घात असे म्हणतात.

करणीचे येथे काही उदाहरणे दिलेली आहेत.

$\sqrt{2}, \sqrt{3}, \sqrt[3]{9}, .....$ etc

> **करणी चे रुप**
>
> घातांक रुप $a^{\frac{1}{n}}$
>
> रॅडीकल रुप $\sqrt[n]{a}$

$\sqrt{7}$ ही एक वास्तविक संख्या आहे. याला $7^{\frac{1}{2}}$ पण लिहीतात. 7 हे कोणत्याही परिमेय संख्येचा वर्ग नसल्यामुळे $\sqrt{7}$ हे करणी आहे.

$\sqrt[3]{8}$ ही एक वास्तविक संख्या आहे. 8 हे 2 या परिमेय संख्येचा घन असल्यामुळे $\sqrt[3]{8}$ हे करणी नाही आहे.

$\sqrt{\sqrt{2}} = \left(2^{\frac{1}{2}}\right)^{\frac{1}{2}} = 2^{\frac{1}{4}} = \sqrt[4]{2}$ म्हणुन हे करणी आहे.

### हे करा



1. खालील करणी ना घातांकाच्या रुपात लिहा.

   i. $\sqrt{2}$ ii. $\sqrt[3]{9}$ iii. $\sqrt[5]{20}$ iv $\sqrt[17]{19}$

2. खालील करणी ना रॅडीकल रुपात लिहा.

   i. $5^{\frac{1}{7}}$ ii. $17^{\frac{1}{6}}$ iii. $5^{\frac{2}{5}}$ iv $142^{\frac{1}{2}}$

### अभ्यास 1.4



1. खालील पदावलीना सरळ रुप द्या.

   i) $\left(5+\sqrt{7}\right)\left(2+\sqrt{5}\right)$ ii) $\left(5+\sqrt{5}\right)\left(5-\sqrt{5}\right)$

   iii) $\left(\sqrt{3}+\sqrt{7}\right)^2$ iv) $\left(\sqrt{11}-\sqrt{7}\right)\left(\sqrt{11}+\sqrt{7}\right)$

2. खालील संख्यांना परिमेय किंवा अपरिमेय मध्ये वर्गीकरण करा.

   i) $5-\sqrt{3}$ ii) $\sqrt{3}+\sqrt{2}$ iii) $\left(\sqrt{2}-2\right)^2$



SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

iv) $\frac{2\sqrt{7}}{7\sqrt{7}}$ v) $2\pi$ vi) $\frac{1}{\sqrt{3}}$ vii) $(2+\sqrt{2})(2-\sqrt{2})$

3. खालील समीकरणात x, y, z इत्यादी चल, परिमेय किंवा अपरिमेय दर्शवितात का? माहित करा.

i) $x^2 = 7$ ii) $y^2 = 16$ iii) $z^2 = 0.02$

iv) $u^2 = \frac{17}{4}$ v) $w^2 = 27$ vi) $t^4 = 256$

4. वर्तुळाचे परिघ आणि व्यासाचे गुणोत्तर $\frac{c}{d}$ हे $\pi$ ने दर्शवितात. पण आपण असे म्हणतो की $\pi$ हे अपरिमेय संख्या आहे. का?

5. खालील छेदाचे परिमेयीकरण करा.

i) $\frac{1}{3+\sqrt{2}}$ ii) $\frac{1}{\sqrt{7}-\sqrt{6}}$ iii) $\frac{1}{\sqrt{7}}$ iv) $\frac{\sqrt{6}}{\sqrt{3}-\sqrt{2}}$

6. छेदाचे परिमेयीकरण करुन प्रत्येकाला सरळ रुप द्या.

i) $\frac{6-4\sqrt{2}}{6+4\sqrt{2}}$ ii) $\frac{\sqrt{7}-\sqrt{5}}{\sqrt{7}+\sqrt{5}}$ iii) $\frac{1}{3\sqrt{2}-2\sqrt{3}}$ iv) $\frac{3\sqrt{5}-\sqrt{7}}{3\sqrt{3}+\sqrt{2}}$

7. $\frac{\sqrt{10}-\sqrt{15}}{2\sqrt{2}}$ ची किंमत तीन दशांश स्थळापर्यंत माहित करा. ($\sqrt{2}=1.414$ $\sqrt{3}=1.732$ आणि $\sqrt{5}=2.236$)

8. माहित करा.

i) $64^{\frac{1}{6}}$ ii) $32^{\frac{1}{5}}$ iii) $625^{\frac{1}{4}}$

iv) $16^{\frac{3}{2}}$ v) $243^{\frac{2}{5}}$ vi) $(46656)^{\frac{-1}{6}}$

9. सरळ रुप द्या. $\sqrt[4]{81} - 8\sqrt[3]{343} + 15\sqrt[5]{32} + \sqrt{225}$

10. जर '$a$' आणि '$b$' परिमेय संख्या असेल तर प्रत्येक समीकरणातील $a$ आणि $b$ ची किंमत माहित करा.

i) $\frac{\sqrt{3}+\sqrt{2}}{\sqrt{3}-\sqrt{2}} = a+b\sqrt{6}$ ii) $\frac{\sqrt{5}+\sqrt{3}}{2\sqrt{5}-3\sqrt{3}} = a-b\sqrt{15}$



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



## आपण काय चर्चा केली?



या धड्यातील आपण चर्चा केलेले अंश

1. ज्या संख्येला $\frac{p}{q}$ च्या रुपात लिहिता येते त्या संख्येला परिमेय संख्या म्हणतात.(येथे p आणि q पुर्णांक आहेत आणि $q \neq 0$ )
2. ज्या संख्येला $\frac{p}{q}$ च्या रुपात लिहु शकत नाही त्या संख्येला अपरिमेय संख्या म्हणतात. (येथे pआणि q पुर्णांक आहेत आणि $q \neq 0$ )
3. परिमेय संख्याचा दशांश विस्तार एकतर आवृत्ती असते नाही तर अनावृत्ती असते.
4. अपरिमेय संख्याचा दशांश विस्तार अंत न होणारे आणि आवृत्ती आहे.
5. सर्व परिमेय आणि अपरिमेय संख्याच्या समुहाला वास्तविक संख्या म्हणतात.
6. संख्या रेषेवरील प्रत्येक बिंदु विलक्षण वास्तविक संख्या सुचित करते. तसेच संख्या रेषेवर प्रत्येक वास्तविक संख्या विलक्षण बिंदुला सुचित करते.
7. जर q हे परिमेय आणि s हे अपरिमेय असेल तर q+s, q-s, qs आणि $\frac{q}{s}$ हे अपरिमेय असते.
8. जर n हे पुर्ण वर्गाच्या व्यतिरिक्त नैसर्गिक संख्या असेल तर $\sqrt{n}$ हे अपरिमेय संख्या असते.
9. a आणि b हे कोणत्याही दोन धन वास्तविक संख्या असेल तर

   i) $\sqrt{ab} = \sqrt{a}\sqrt{b}$ ii) $\sqrt{\frac{a}{b}} = \frac{\sqrt{a}}{\sqrt{b}}$ $(b \neq 0)$

   iii) $(\sqrt{a}+\sqrt{b})(\sqrt{a}-\sqrt{b}) = a - b$ iv) $(a+\sqrt{b})(a-\sqrt{b}) = a^2 - b$

   v) $(\sqrt{a}+\sqrt{b})^2 = a + 2\sqrt{ab} + b$
10. $\frac{1}{\sqrt{a}+b}$ च्या छेदाचे परिमेयीकरण करण्यासाठी आपल्याला $\frac{\sqrt{a}-b}{\sqrt{a}-b}$ ने गुणावे लागेल. येथे a, b हे पुर्णांक आहेत.
11. समजा $a > 0, b > 0$ वास्तविक संख्या आणि p आणि q परिमेय संख्या समजु तर,

    i) $a^p . a^q = a^{p+q}$ ii) $(a^p)^q = a^{pq}$ iii) $\frac{a^p}{a^q} = a^{p-q}$

    iv) $a^p . b^p = (ab)^p$
12. जर 'n' हे 1 पेक्षा मोठी धन पुर्णांक असेल आणि 'a' धन परिमेय संख्या आहे. पण कोणत्याही परिमेय संख्याचे $n^{th}$ मुळ नाही तर $\sqrt[n]{a}$ किंवा $a^{\frac{1}{n}}$ ला n व्या क्रमाचे करणी म्हणतात.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# बहुपदी आणि अवयव पाडणे

02

## 2.1 प्रस्तावना

एका बगीच्यात 6 रांगा आहेत. प्रत्येक रांगेत सहा रोपटे आहेत. तेथे एकुण किती रोपटे आहेत? समजा तेथे '$x$' रोपटे आहेत त्यास '$x$' रांगेत लावले असता, त्या बगीच्यात किती रोपटे राहतात? स्पष्टपणे ते $x^2$ म्हणुन माहित आहे.



एक कि.ग्र. कांद्याची किंमत 10 रुपये आहे. इंदरने p कि.ग्रॅ. कांदे विकत घेतले. राजुने q कि.ग्रॅ. विकत घेतले आणि हानिफने $r$ कि.ग्रॅ. विकत घेतले. प्रत्येकाला किती रुपये द्यावे लागते? त्यांनी दिलेले रुपये अनुक्रमे 10p, 10q आणि 10r आहेत. ही सर्व उदाहरणे बैजिक पदावलीचा वापर दाखविते.

अशा प्रकारे आपण बैजिक पदावली '$s^2$' ला चौरसाचे क्षेत्रफळ काढण्यासाठी '$lb$' ला आयताचे आणि '$lbh$' ला आयतज घनफळ काढण्यासाठी वापरतो. आपण उपयोग करणाऱ्या इतर बैजिक पदावल्या कोणत्या आहेत?

बैजिक पदावली जसे $3xy$, $x^2+2x$, $x^3 - x^2 + 4x + 3$, $\pi r^2$, $ax + b$ इत्यादींना बहुपदी असे म्हणतात. लक्षात घ्या की, आपण आतापर्यंत घेतलेल्या बैजिक पदावलीत ऋणात्मक नसलेले पुर्णांक चलाचे सहगुणक आहेत.

खाली दिलेल्या पदावलीतील बहुपदीला माहित करु शकता का?

$$x^2, \quad x^{\frac{1}{2}} + 3, \quad 2x^2 - \frac{3}{x} + 5; \quad x^2 + xy + y^2$$

वरील पैकी $x^{\frac{1}{2}} + 3$ ही बहुपदी नाही कारण $x^{\frac{1}{2}}$ या पदात घातांक हा ऋणरहीत पुर्णांक नाही.(म्हणजे $\frac{1}{2}$) आणि $2x^2 - \frac{3}{x} + 5$ ही सुध्दा बहुपदी नाही कारण त्यास $2x^2 - 3x^{-1} + 5$ असेही लिहीता येते. जेथे दुसरे पद $(3x^{-1})$ यास घातांक ऋण संख्या (म्हणजेच $-1$)आहे. ज्या बैजिक पदावलीत असलेल्या घातांक फक्त ऋणरहीत पुर्णांक संख्या असते. त्यास बहुपदी असे म्हणतात.

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



### विचार करा आणि चर्चा करा आणि लिहा



खालील पैकी कोणती पदावली बहुपदी आहे? कोणती नाही? कारणे द्या.


(i) $4x^2 + 5x - 2$ (ii) $y^2 - 8$ (iii) $5$ (iv) $2x^2 + \frac{3}{x} - 5$

(v) $\sqrt{3}x^2 + 5y$ (vi) $\frac{1}{x+1}$ (vii) $\sqrt{x}$ (viii) $3\ xyz$

विविध रुपात असलेल्या बहुपदीचा अभ्यास करु या. या धड्यात शेषसिध्दांताच्या साहाय्याने आणि अवयवाच्या सिध्दांतानुसार त्यांचा बहुपदीच्या अवयवात झालेला उपयोगावरुन बहुपदीचे अवयव पाडणे शिकुन घेऊ या.

## 2.2 एकचलीय बहुपदी

प्रत्येक चलराशी एका चिन्हाने(अक्षर) दर्शविते.जी कोणतीही वास्तविक किंमत घेते. याची उजळणी करु. आपण $x, y, z$ इत्यादी अक्षरांचा वापर चलास दर्शविण्यासाठी करतो.




जसे $2x, 3x, -x, \frac{3}{4}x$ .... पदावलीमध्ये सर्वात एकच चल $x$ आहेत. ही पदावली (स्थिर) × (चलाचा काही घातांक) या रुपात आहे. आता समजा आपणास चौरसाची परिमीती काढायची आहे. आपण $P = 4s$ हे सुत्र वापरतो.

येथे '4' ही स्थिरांक आणि 's' ही चल आहेत जी चौरसाची बाजु दर्शविते. विविध चौरसासाठी बाजु बदलत असते.

खालील तक्ता पहा.

| चौरसाची बाजु | परिमीती |
|---|---|
| (s) | (4s) |
| 4 से.मी. | P = 4 × 4 = 16 से.मी. |
| 5 से.मी. | P = 4 × 5 = 20 से.मी. |
| 10 से.मी. | P = 4 × 10 = 40 से.मी. |

या पुर्ण संदर्भात स्थिरकांची किंमत 4 ही सारखीच म्हणजे दिलेल्या प्रश्नात स्थिरांकाची किंमत बदलत नाही. परंतु चलाची (s) किंमत बदलते.

समजा पदावलीला (स्थिरांक) (चलराशी) या रुपात लिहायचे असल्यास आणि आपणास स्थिरांक कोणता आहे हे नसल्यास आपण त्यास $a, b, c$ ... इत्यादी लिहितो.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



म्हणुन साधारणता ही पदावली$ax, by, cz, ....$ इत्यादी अशी असते. येथे $a, b, c ...$ हे निश्चीत स्थिरांक आहेत. आणि इतर पदावली जसे $x^2, x^2+2x+1,\ x^3+3x^2-4x+5$. ही सर्व पदावली एकचलीय बहुपदी आहेत.

### हे करा



- 'x' चल असलेली दोन बहुपदी लिहा.
- 'y' चल असलेली तिन बहुपदी लिहा.
- $2x^2 + 3xy + 5y^2$ ही बहुपदी एकचलीय आहे काय?
- निरनिराळ्या घन आकाराच्या क्षेत्रफळाचे आणि घनफळाची सुत्रे लिहा. त्यामधील चले आणि स्थिरांक काढा.

## 2.3 बहुपदीचा कोटी

बहुपदीतील प्रत्येक पद हे स्थिरांक आणि शुन्येतर पुर्णाकांचा घातांकाचा गुणाकार आहे. यालाच सहगुणक असे म्हणतात. पदाचा कोटी म्हणजे त्या चलातील घातांकाची बेरीज होय. आणि बहुपदीचा कोटी हा त्या पदातील चलांचा महत्तम घातांक होय.

खालील बहुपदीत पद, त्याचा सहगुणक आणि कोटी माहित करु.

(i) $3x^2 + 7x + 5$ (ii) $3x^2y^2 + 4xy + 7$

$3x^2 + 7x + 5$, या बहुपदीमध्ये $3x^2$, $7x$ आणि 5 ही पदावलीतील पदे आहेत. बहुपदीतील प्रत्येक पदास सहगुणक असतो. म्हणुन $3x^2+7x+5$, मध्ये $x^2$ चा सहगुणक 3 आहे. $x$ चा सहगुणक 7 आहे आणि $x^0$ चा सहगुणक 5 आहे (लक्षात ठेवा $x^0=1$)

तुम्हाला माहित आहे की, बहुपदीचा कोटी हा पदातील चलांचा महत्तम घातांक आहे.

दिलेल्या पदावलीत सर्व पदांमध्ये $3x^2$ या पदाचा घातांक मोठा आहे. म्हणुन अशा प्रकारे $3x^2 + 7x + 5$ चा कोटी '2' आहे.

आता, तुम्ही $3x^2y^3 + 4xy + 7$ चा कोटी माहित करु शकतो काय?

$x^2y^3$ चा सहगुणक 3 आहे आणि $xy$ चा4 आहे. आणि $x^0y^0$ चा 7 आहे. $3x^2y^3$ या पदातील चलाच्या घातांकाची बेरीज $2+3=5$ आहे. ती दुसऱ्या पदांच्या घातांकाच्या बेरजेपेक्षा मोठा आहे. म्हणुन $3x^2y^3+4xy+7$ चा बहुपदीचा कोटी 5 आहे.

आता स्थिरांकाचा कोटी काय आहे. विचार करा? स्थिरांकात चले नसल्यामुळे त्यास $x^0$ च्या गुणाकारासारखे लिहु शकतो. उदाहरणार्थ 5 चा कोटी शुन्य आहे. त्यास $5x^0$ असे लिहिता येते. कोटी 1, कोटी 2, किंवा कोटी 3 असलेल्या बहुपदी कशा दिसतात तुम्ही पाहिले.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



कोणत्याही नैसर्गिक संख्या $n$ साठी कोटी असलेली एकचलातील बहुपदी तुम्ही $n$ लिहु शकता का? $x$ एकचलीय $n$ कोटी असणाऱ्या बहुपदीचे रुप

$$a_nx^n + a_{n-1}x^{n-1} + . . . + a_1x + a_0$$

येथे $a_0, a_1, a_2, . . ., a_n$ स्थिरांक आहेत आणि $a_n \neq 0$.

विषेशता जर $a_0 = a_1 = a_2 = a_3 = . . . = a_n = 0$ (म्हणजे सर्व सहगुणक शुन्य आहेत) आपणास बहुपदीचा शुन्य मिळतो ज्याला '0' ने दर्शवितात.

कोटी शुन्य म्हणु शकता का? याला घातांकाच्या रुपात न लिहिता आल्यामुळे त्याची व्याख्या करता येत नाही.

## हे करा



1. खालील प्रत्येक बहुपदीचा कोटी लिहा.
   (i) $7x^3 + 5x^2 + 2x - 6$ (ii) $7 - x + 3x^2$
   (iii) $5p - \sqrt{3}$ (iv) 2 (v) $-5xy^2$
2. खालील प्रत्येक $x^2$ चा सहगुणक लिहा.
   (i) $15 - 3x + 2x^2$ (ii) $1 - x^2$ (iii) $\pi x^2 - 3x + 5$ (iv) $\sqrt{2}x^2 + 5x - 1$

खालील तक्त्याचे निरिक्षण करा आणि रिकाम्या जागा भरा.

(i) कोटीवरुन बहुपदीचे प्रकार

| बहुपदीचा कोटी | बहुपदीचे नाव | उदाहरण |
|---|---|---|
| व्याख्या करता येत नाही | शुन्य बहुपदी | 0 |
| शुन्य | स्थिर बहुपदी | $-12; 5; \frac{3}{4}$ इत्यादी |
| 1 | ..................................... | $x - 12; -7x + 8; ax + b$ इत्यादी |
| 2 | वर्ग बहुपदी | ..................................... |
| 3 | घन बहुपदी | $3x^3 - 2x^2 + 5x + 7$ |

साधारणता बहुपदीचा कोटी '$n$' असल्यास $n$ वे कोटी असलेला बहुपदी म्हणतात.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



(ii) पदांच्या एकुण संख्येवरुन बहुपदीचे प्रकार

| शुन्येतर पदांची संख्या | बहुपदीचे नाव | उदाहरण | पदे |
|---|---|---|---|
| 1 | एकपदी | $-3x$ | $-3x$ |
| 2 | व्दिपदी | $3x + 5$ | $3x,\ 5$ |
| 3 | त्रिपदी | $2x^2 + 5x + 1$ | ..................... |
| 3 पेक्ष जास्त | अनेक पदी | ........................ | $3x^3,\ 2x^2,\ -7x,\ 5$ |

सुचना: एक बहुपदी अनेक पदी होऊ शकते परंतु प्रत्येक अनेकपदी बहुपदी होत नाही

एक चलअसणारी रेषीय बहुपदी एकपदी किंवा व्दिपदी होऊ शकते.

उदाहरण : $3x$ किंवा $2x - 5$

## विचार करा, चर्चा करा आणि लिहा.



एक चलीय घन (कोटी3)बहुपदीत किंती पदे असतात? उदाहरणे द्या.

जर बहुपदीतील चल $x$, असल्यास बहुपदीला $p(x)$, $q(x)$ किंवा $r(x)$ इत्यादीने दर्शविती. उदाहरणात

$p(x) = 3x^2 + 2x + 1$

$q(x) = x^3 - 5x^2 + x - 7$

$r(y) = y^4 - 1$

$t(z) = z^2 + 5z + 3$

बहुपदी मध्ये कितीही पदे असु शकते.

## प्रयत्न करा.



1. $x$ या चल असलेली बहुपदी दोन पदात लिहा.
2. $p$ चल असलेल्या बहुपदीला 15 पदात कसे लिहिता?

आतापर्यंत बहुतेक आपण एकाच चलातील बहुपदीची चर्चा केली एका चलापेक्षा जास्त चलात सुध्दा बहुपदी असतात. उदाहरणात$x + y$, $x^2 + 2xy + y^2$, $x^2 - y^2$ हे $x$ अणि $y$ या दोन चलातील बहुपदी आहे. अशारीतीने $x^2 + y^2 + z^2$, $x^3 + y^3 + z^3$ हे तिन चले असणारी बहुपदी आहेत. अशा बहुपदीना सविस्तरपणे नंतर शिकणार आहोत.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



## अभ्यास - 2.1



1. खाली दिलेल्या प्रत्येक बहुपदीची कोटी काढा.

(i) $x^5 - x^4 + 3$ (ii) $x^2 + x - 5$ (iii) $5$

(iv) $3x^6 + 6y^3 - 7$ (v) $4 - y^2$ (vi) $5t - \sqrt{3}$

2. खाली दिलेल्या पदावलीत एकचलीय बहुपदी कोणत्या आहेत आणि कोणत्या नाहीत? तुमच्या उत्तरासाठी कारणे द्या.

(i) $3x^2 - 2x + 5$ (ii) $x^2 + \sqrt{2}$ (iii) $p^2 - 3p + q$ (iv) $y + \frac{2}{y}$

(v) $5\sqrt{x} + x\sqrt{5}\ (x > 0)$ (vi) $x^{100} + y^{100}$

3. खालील प्रत्येक बहुपदीतील $x^3$ चा सहगुणक लिहा.

(i) $x^3 + x + 1$ (ii) $2 - x^3 + x^2$ (iii) $\sqrt{2}x^3 + 5$ (iv) $2x^3 + 5$

(v) $\frac{\pi}{2}x^3 + x$ (vi) $-\frac{2}{3}x^3$ (vii) $2x^2 + 5$ (viii) $4$

4. खाली दिलेल्या पदावलींना रेषीय, वर्गीय आणि घन बहुपदी मध्ये वर्गीकरण करा.

(i) $5x^2 + x - 7$ (ii) $x - x^3$ (iii) $x^2 + x + 4$ (iv) $x - 1$

(v) $3p$ (vi) $\pi r^2$

5. खालील विधाने सत्य किंवा असत्य लिहा? तुमचे उत्तर सिध्द करा.

(i) व्दिपदीत बहुतेक दोन पदे असतात.
(ii) प्रत्येक बहुपदी ही व्दिपदी आहे.
(iii) व्दिपदीचा कोटी 3 असु शकतो.
(iv) शुन्य बहुपदीचा कोटी असतो.
(v) $x^2 + 2xy + y^2$ चा कोटी 2 आहे.
(vi) $\pi r^2$ ही एकपदी आहे.

6. कोटी 10 असणाऱ्या एकपदी आणि त्रीपदीची प्रत्येक एक उदाहरण द्या.

## 2.4(अ) बहुपदीचा शुन्य

- समजा बहुपदी $p(x) = x^2 + 5x + 4.$

$x = 1$ साठी $p(x)$ ची किंमत किती होते.

यासाठी आपणास $p(x)$ मध्ये प्रत्येक $x$ च्या ऐवजी 1 मांडावे लागतो.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



असे केले असता $p(1) = (1)^2 + 5(1) + 4$,

$= 1 + 5 + 4 = 10$ मिळते.

म्हणुन आपण म्हणु शकतो की, $x = 1$ असताना $p(x) = 10$ येते.

अशारीतीने $x = 0$ आणि $x = -1$ साठी $p(x)$ माहित करा

$$p(0) = (0)^2 + 5(0) + 4 = 0 + 0 + 4 = 4$$

$$p(-1) = (-1)^2 + 5(-1) + 4 = 1 - 5 + 4 = 0$$

$p(-4)$ ची किंमत काढु शकता काय?

- दुसरी बहुपदी घ्या.

$$s(y) = 4y^4 - 5y^3 - y^2 + 6$$

$$\begin{aligned} s(1) &= 4(1)^4 - 5(1)^3 - (1)^2 + 6 \\ &= 4(1) - 5(1) - 1 + 6 \\ &= 4 - 5 - 1 + 6 \\ &= 10 - 6 \\ &= 4 \end{aligned}$$

$s(-1)$ ची किंमत काढु शकता का?

## हे करा



खाली दिलेल्या प्रत्येक बहुपदीची चलाच्या निर्देशित किंमती वरुन किंमत काढा.

(i) $p(x) = 4x^2 - 3x + 7$ at $x = 1$

(ii) $q(y) = 2y^3 - 4y + \sqrt{11}$ at $y = 1$

(iii) $r(t) = 4t^4 + 3t^3 - t^2 + 6$ at $t = p$, $t \in R$

(iv) $s(z) = z^3 - 1$ at $z = 1$

(v) $p(x) = 3x^2 + 5x - 7$ at $x = 1$

(vi) $q(z) = 5z^3 - 4z + \sqrt{2}$ at $z = 2$

- अजुन एक बहुपदी घ्या $r(t) = t - 1$

$r(1)$ काय आहे $r(1) = 1 - 1 = 0$ आहे का?

$r(1) = 0$, असल्यास $r(t)$ या बहुपदीचा शुन्य 1 आहे. असे आपण म्हणुन शकतो.

साधारणता, $p(x)$ या बहुपदीचा शुन्य ही $x$ ची किंमत आहे ज्यासाठी $p(x) = 0$.



SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



या किंमतीला बहुपदी $p(x)$ चे मुळ सुध्दा म्हणतात.

$f(x) = x + 1$ या बहुपदीचा शुन्य काय आहे?

तुम्ही निरिक्षण केले असता, $x + 1 = 0$. बहुपदीचा शुन्य हा त्याला 0 शी समान केल्यास येतो. म्हणजे $x + 1 = 0$, यावरुन $x = -1$येते $f$ याही $(x)$ मधील बहुपदी असल्यास $f(x) = 0$ $x$ मधील बहुपदीचे समीकरण म्हणतात.आपणास दिसुन येते की, वरील उदाहरणात -1 हे बहुपदी $f(x)$ चे मुळ आहे. म्हणुन आपण म्हणु शकतो की, $x + 1$ बहुपदीचा शुन्य -1 आहे किंवा $x + 1 = 0$ या बहुपदीस समीकरणाचे मुळ आहे.

- आता स्थिर बहुपदी 3 घ्या. याची शुन्य किंमत सांगु शकता का? नाही $3 = 3x^0$ च्या कोणत्याही वास्तविक किंमतीसाठी $3x^0$ येत नाही अशातऱ्हेने स्थिर बहुपदीला शुन्य किंमत नसते.

**प्रयत्न करा**



खालील बहुपदीची शुन्य किंमत माहित करा

1. $2x - 3$
2. $x^2 - 5x + 6$
3. $x + 5$

उदाहरण-1: $p(x) = x + 2$. तर $p(1)$, $p(2)$, $p(-1)$ आणि $p(-2)$ ची किंमत काढा. यापैकी कोणत्या किमतीला बहुपदीची किंमत शुन्य येईल.

सोडवणुक: समजा $p(x) = x + 2$

$x$ च्या ऐवजी 1 ठेवल्यास

$p(1) = 1 + 2 = 3$

$x$ च्या ऐवजी 2 ठेवल्यास

$p(2) = 2 + 2 = 4$

$x$ च्या ऐवजी -1 ठेवल्यास

$p(-1) = -1 + 2 = 1$

$x$ च्या ऐवजी -2 ठेवल्यास

$p(-2) = -2 + 2 = 0$

म्हणुन 1, 2, $-1$ हे $x + 2$ बहुपदीचे शुन्य नाहीत. परंतु -2 ही बहुपदीचा शुन्य आहे.

उदाहरण:2 $p(x) = 3x + 1$ या बहुपदीचा शुन्य माहित करा.

सोडवणुक: $p(x)$ चा शुन्य माहित करणे समीकरण सोडविल्यासारखे आहे.

$$p(x) = 0$$

म्हणजे
$$3x + 1 = 0$$
$$3x = -1$$
$$x = -\frac{1}{3}$$





Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com



म्हणुन $-\frac{1}{3}$ हा $3x + 1$ बहुपदीचा शुन्य आहे.

उदाहरण-3: $2x - 1$ बहुपदीची शुन्य किंमत काढा.

सोडवणुक: $p(x)$ ची शुन्य किंमत काढणे आणि $p(x) = 0$ समीकरण सोडविणे सारखेच आहे.

$2x - 1 = 0$

$x = \frac{1}{2}$ (कसे?)

$P\left(\frac{1}{2}\right)$ ची किंमत काढुन तपासुन पहा.

## 2.4(ब) एक चलराशीतील रेषीय बहुपदीचे शुन्य

आता जर $p(x) = ax + b$, $a \neq 0$, रेषीय बहुपदी असेल तर $p(x)$ ची शुन्य किंमत कसे काढाल?

$p(x)$ बहुपदीची शुन्य किंमत माहित करणे आपण पाहिले असल्यामुळे आपणास $p(x) = 0$ समीकरण सोडविण्याची गरज आहे.

याचा अर्थ $ax + b = 0$, $a \neq 0$ म्हणुन $ax = -b$

म्हणजेच $x = \frac{-b}{a}$ म्हणुन $x = \frac{-b}{a}$ हा फक्त $p(x) = ax + b$ या बहुपदीचा शुन्य आहे म्हणजे एका चलातील रेषीय बहुपदीस एकच शुन्य किंमत असते.

### हे करा



रिकाम्या जागा भरा

| रेषीय बहुपदी | बहुपदीची शुन्य किंमत |
|---|---|
| $x + a$ | $-a$ |
| $x - a$ | ------------- |
| $ax + b$ | ------------- |
| $ax - b$ | $\frac{b}{a}$ |

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



उदाहरण-4: $x^2 - 3x + 2$ या बहुपदीची शुन्य किंमत 2 आणि 1 आहे का पडताळा करुन पहा.

सोडवणुक: समजा $p(x) = x^2 - 3x + 2$

$x$ च्या एवेजी 2 ठेवल्यास

$p(2) = (2)^2 - 3(2) + 2$

$= 4 - 6 + 2 = 0$

$x$ च्या एवेजी 1 ठेवल्यास

$p(1) = (1)^2 - 3(1) + 2$

$= 1 - 3 + 2$

$= 0$



म्हणुन $x^2 - 3x + 2$ बहुपदीचे 2 आणि 1 हे दोन्ही शुन्य किंमती आहेत.

याच्या पडताळण्याची आणखी दुसरी पध्दत आहे का?

$x^2 - 3x + 2$ बहुपदीचा कोटी काय आहे? ही रेषीय बहुपदी आहे का? नाही, ही वर्ग बहुपदी आहे. म्हणुन वर्ग बहुपदीमध्ये दोन शुन्य किंमती असतात.

उदाहरण-5: जर $x^2 + 2x - a$. या बहुपदीची शुन्य किंमत 3 असल्यास $a$ माहित करा?

सोडवणुक: समजा $p(x) = x^2 + 2x - a$

बहुपदीचा शुन्य 3 आहे, आपणास माहित आहे $p(3) = 0$.

$x^2 + 2x - a = 0$

$x = 3$ ठेवल्यास $(3)^2 + 2(3) - a = 0$

$9 + 6 - a = 0$

$15 - a = 0$

$-a = -15$

किंवा $a = 15$

## विचार करा आणि चर्चा करा



1. $x^2 + 1$ यास शुन्य किंमत नाही का?
2. '$n$' कोटी असल्यास बहुपदीच्या एकुण शुन्य किंमती किती आहे तुम्ही सांगु शकता का?

## अभ्यास - 2.2



**1.** $4x^2 - 5x + 3$ या बहुपदीची शुन्य किंमत काढा जेव्हा,

(i) $x = 0$ (ii) $x = -1$ (iii) $x = 2$ (iv) $x = \frac{1}{2}$



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



2. खालील प्रत्येक बहुपदीसाठी $p(0)$, $p(1)$ आणि $p(2)$ ची किंमत काढा.
   (i) $p(x) = x^2 - x + 1$ (ii) $p(y) = 2 + y + 2y^2 - y^3$
   (iii) $p(z) = z^3$ (iv) $p(t) = (t - 1)(t + 1)$
   (v) $p(x) = x^2 - 3x + 2$
3. खालील मध्ये प्रत्येक संदर्भात $x$ च्या दिलेल्या किंमती बहुपदीच्या शुन्य किंमत होतात का नाही ? पडताळणी करा.
   (i) $p(x) = 2x + 1;\ x = -\frac{1}{2}$ (ii) $p(x) = 5x - \pi;\ x = \frac{-3}{2}$
   (iii) $p(x) = x^2 - 1;\ x = \pm 1$ (iv) $p(x) = (x - 1)(x + 2);\ x = -1, -2$
   (v) $p(y) = y^2;\ y = 0$ (vi) $p(x) = ax + b;\ x = -\frac{b}{a}$
   (vii) $f(x) = 3x^2 - 1;\ x = -\frac{1}{\sqrt{3}}, \frac{2}{\sqrt{3}}$ (viii) $f(x) = 2x - 1,\ x = \frac{1}{2}, \frac{-1}{2}$
4. खाली दिलेल्या प्रत्येक संदर्भात बहुपदीचा शुन्य माहित करा.
   (i) $f(x) = x + 2$ (ii) $f(x) = x - 2$ (iii) $f(x) = 2x + 3$
   (iv) $f(x) = 2x - 3$ (v) $f(x) = x^2$ (vi) $f(x) = px,\ p \neq 0$
   (vii) $f(x) = px + q,\ p \neq 0,\ p\ q$ या वास्तविक संख्या आहेत.
5. जर $p(x) = 2x^2 - 3x + 7a$ बहुपदीची शुन्य किंमत असल्यास $a$ ची किंमत काढा.
6. जर $f(x) = 2x^3 - 3x^2 + ax + b$, बहुपदीची शुन्य किंमत 0 आणि 1 असल्यास $a$ आणि $b$ च्या किंमती काढा.

## 2.5 बहुपदीचा भागाकार करणे

खालील उदाहरणे पहा.

(i) 25 आणि 3 या दोन संख्या घ्या. 25 ला 3 ने भागा. आपणास भागाकार 8 आणि बाकी 1 येतो.

भाज्य = (भाजक × भागाकार) + बाकी

म्हणुन, $25 = (8 \times 3) + 1$

अशारितीने 20 ला 5 ने भागा आपणास $20 = (4 \times 5) + 0$ येतो.

येथे बाकी 0 आहे. या संदर्भात आपण म्हणु शकतो की, 5 हा 20 चा अवयव आहे. किंवा 20 हा 5 चा गुणक आहे.

जसे आपण एका संख्येला दुसऱ्या शुन्येत्तर संख्येने भाग देतो. आपण बहुपदीला दुसऱ्या बहुपदीने सुध्दा भाग देऊ शकतो? चला पाहु या.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



(ii) $3x^3 + x^2 + x$ या बहुपदीला $x$ या एकपदीने भागाकार करा.

आपणास $(3x^3 + x^2 + x) \div x = \frac{3x^3}{x} + \frac{x^2}{x} + \frac{x}{x}$

$= 3x^2 + x + 1$

वास्तविकपणे $x$ हा $3x^3 + x^2 + x$ या प्रत्येक पदाचा सामान्य अवयव आहे. म्हणुन $3x^3 + x^2 + x$ यास $x(3x^2 + x + 1)$ असे लिहितो

$3x^3 + x^2 + x$ चे अवयव काय आहेत?

(iii) दुसऱ्या उदाहरणात $(2x^2 + x + 1) \div x$

इथे $(2x^2 + x + 1) \div x = \frac{2x^2}{x} + \frac{x}{x} + \frac{1}{x}$

$= 2x + 1 + \frac{1}{x}$

$$
\begin{array}{r|l}
 & \quad 2x+1 \\
\hline
x & 2x^2 + x + 1 \\
 & -2x^2 \\
\hline
 & \quad x + 1 \\
 & \quad -x \\
\hline
 & \quad\quad 1 \\
\end{array}
$$

ही बहुपदी आहे का?

$\frac{1}{x}$ या पदास ऋण घातांक असल्यामुळे (म्हणजेच $\frac{1}{x} = x^{-1}$)

$\therefore$ $2x + 1 + \frac{1}{x}$ ही बहुपदी नाही.

आपण त्यास $(2x^2 + x + 1) = [x \times (2x + 1)] + 1$ असे लिहितो.

1 ला बाहेर काढले असता इतर बहुपदीला दोन बहुपदीच्या गुणाकाराच्या रुपात लिहिता येते.

इथे आपण म्हणु शकतो की, $(2x + 1)$ हा भागाकार $x$ या भाजक आणि 1 हा बाकी आहे. आपण लक्षात ठेवले पाहिजे की, बाकी 0 नसल्यामुळे '$x$' चा $2x^2 + x + 1$चा अवयव हाते नाही

### हे करा



1. $3y^3 + 2y^2 + y$ ला '$y$' ने भागा आणि भागाकाराची वास्तविकता लिहा.
2. $4p^2 + 2p + 2$ ला '$2p$' ने भागा आणि भागाकाराची वास्तविकता लिहा.

उदाहरण-6: $3x^2 + x - 1$ ला $x + 1$ ने भागाकार करा.

सोडवणुक : समजा $p(x) = 3x^2 + x - 1$ आणि $q(x) = x + 1$.

$p(x)$ ला $q(x)$ ने भागा. मागील वर्गात शिकलेल्या भागाकाराच्या पध्दतीची आठवण करा.

पायरी :1 भागा $\frac{3x^2}{x} = 3x$, पहिले भागाकाराचे पद होते.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



पायरी:2 गुणाकार करा $(x + 1)\ 3x = 3x^2 + 3x$

$3x^2 + 3x$ ला $3x^2 + x$ मधुन वजा केल्यास $-2x$ येते.

पायरी :3 भागा $\frac{-2x}{x} = -2$, भागाकराचे दुसरे पद

पायरी :4 गुणा $(x + 1)(-2) = -2x - 2$,

त्यास $-2x - 1$ मधुन वजा केल्यास '1' येते.

पायरी:5 बाकी 1 आले. इथे थांबले पाहिजे.

$$
\begin{array}{r}
3x - 2 \\
x+1\overline{)3x^2 + x - 1} \\
3x^2 + 3x \\
- \quad - \\
\hline
-2x - 1 \\
-2x - 2 \\
+ \quad + \\
\hline
+1 \\
\hline
\end{array}
$$

(स्थिरांकाला बहुपदीने का भागता येत नाही तुम्ही सांगु शकता का?)

यावरुन आपणास भागाकार $(3x - 2)$ आणि बाकी $(+1)$ येतो.

सुचना : भागाकाराची क्रिया पुर्ण होते जेव्हा बाकी 0 येते कींवा बाकीची कोटी हा भाजकाच्या कोटी पेक्षा लहान असतो.

या भागाकराच्या वास्तविकतेस

$3x^2 + x - 1 = (x + 1)(3x - 2) + 1$ असे लिहु शकतो.

म्हणजेच भाज्य = (भाजक × भागाकार) + बाकी

$p(x)$ मध्ये $x$ च्या ऐवजी -1 ठेवुन पाहु या

$p(x) = 3x^2 + x - 1$

ची किंमत $p(-1)$

$p(-1) = 3(-1)^2 + (-1) - 1$

$= 3(+1) + (-1) - 1 = 1.$

आढळुन आले की, $p(-1)$ किंमत बाकीच्या बरोबर आहे म्हणजे 1 आहे

$p(x) = 3x^2 + x - 1$ ला $(x + 1)$ या भागाकाराने आलेली बाकी $p(-1)$ सारखीच राहते जेथे -1 हा $x + 1$ ची शुन्य किंमत म्हणजे $x = -1$ आहे

अजुन काही उदाहरणे घेऊ या.

उदाहरण-7: $2x^4 - 4x^3 - 3x - 1$ ला $(x - 1)$ ने भागाकार करा आणि 0 भागाकारास भाजकाशी पडताळा करुन पहा.

सोडवणुक: समजा $f(x) = 2x^4 - 4x^3 - 3x - 1$

पहिले पहा $2x^4$ हा $x$ च्या किती पट आहेत.

$$\frac{2x^4}{x} = 2x^3$$

आता गुणा $(x - 1)(2x^3) = 2x^4 - 2x^3$

गुणा नंतर बाकींचे

पहिले पद $-2x^3$ आहे. असेच करत जा.

$$
\begin{array}{r}
2x^3 - 2x^2 - 2x - 5 \\
x-1\overline{)2x^4 - 4x^3 - 3x - 1} \\
2x^4 - 2x^3 \qquad\qquad \\
- \quad + \qquad\qquad \\
\hline
-2x^3 - 3x - 1 \\
-2x^3 + 2x^2 \qquad \\
+ \quad - \qquad \\
\hline
-2x^2 - 3x - 1 \\
-2x^2 + 2x \quad \\
+ \quad - \quad \\
\hline
-5x - 1 \\
-5x + 5 \\
+ \quad - \\
\hline
-6 \\
\hline
\end{array}
$$



SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



इथे भागाकार $2x^3 - 2x^2 - 2x - 5$ आणि बाकी $-6$ आहे.

आता $(x - 1)$ बहुपदीची शुन्य 1 आहे.

$x = 1$, $f(x)$ मध्ये ठेवल्यास $f(x) = 2x^4 - 4x^3 - 3x - 1$

$$f(1) = 2(1)^4 - 4(1)^3 - 3(1) - 1$$
$$= 2(1) - 4(1) - 3(1) - 1$$
$$= 2 - 4 - 3 - 1$$
$$= -6$$

$(x - 1)$ च्या शुन्यावर बहुपदी $f(x)$ ची किंमत बाकी सारखी आहे का? वरील उदाहरणावरुन आपण सांगु शकतो का, वास्तविकता खालील सिध्दतांचे रुप आहे. त्यामुळे आपणास एकचल रेषीय समीकरणाने बहुपदीला वास्तविक भागाकार न करता बाकी येते.

**शेष सिध्दांत**

समजा $\boldsymbol{p(x)}$ ही एक किंवा त्यापेक्षा जास्त कोटी असलेली बहुपदी आहे. आणि '$\boldsymbol{a}$' ही कोणतीही वास्तविक संख्या असल्यास जर $\boldsymbol{p(x)}$ ही रेषीय बहुपदी $\boldsymbol{(x - a)}$ ने भागल्या गेली असता बाकी $\boldsymbol{p(a)}$ येते.

आता या सिध्दांताच्या सिध्दतेकडे पाहु या.

सिध्दता: समजा $p(x)$ ही एक किंवा त्यापेक्षा जास्त कोटी असलेली कोणतीही बहुपदी आहे. समजा जेव्हा $p(x)$ ही रेषीय बहुपदी $g(x) = (x - a)$ नी भागली जाते तेव्हा भागाकार $q(x)$ येते आणि बाकी $r(x)$ येते. दुसऱ्या शब्दात $p(x)$ आणि $g(x)$ अशा बहुपदी आहेत की, $p(x) \geq$ चा कोटी आणि $g(x)$ चा कोटी आणि $g(x) \neq 0$ तर आपणास $q(x)$ आणि $r(x)$ अशा रितीने येते की, जेथे $r(x) = 0$ किंवा $r(x) <$ च्या कोटी $g(x)$ चा कोटी

भागाकारावरुन

$p(x) = g(x) \,.\, q(x) + r(x)$

$\therefore\ p(x) = (x - a) \,.\, q(x) + r(x)$ $\qquad \because\ g(x) = (x - a)$

$(x - a)$ चा कोटी आणि $r(x)$ चा कोटी हा $(x - a)$ च्या कोटीच्या लहान असल्यामुळे

$\therefore\ r(x)$ चा कोटी $= 0$ म्हणजे $r(x)$ हा स्थिरांक K आहे.

$r(x) = \mathrm{K}$ $x$,च्या प्रत्येक वास्तविक किंमती साठी

म्हणुन

$$p(x) = (x - a)\ q(x) + \mathrm{K}$$

जर $x = a$, तर $p(a) = (a - a)\ q(a) + \mathrm{K}$

$$= 0 + \mathrm{K}$$
$$= \mathrm{K}$$



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



हे सिध्द झाले.

बहुपदीने बहुपदीला वास्तविक भागाकार न करता या पध्दीतीचा उपयोग करुन बाकी माहित करु शकतो.

उदाहरण-8: जेव्हा $x^3 + 1$ ला $(x + 1)$ नी भागता बाकी माहित करा.

सोडवणुक: येथे $p(x) = x^3 + 1$

$x + 1$ रेषीय बहुपदीचा शुन्य $-1$ आहे. $[x + 1 = 0 \Rightarrow x = -1]$

म्हणुन $x$ च्या ऐवजी $-1$ ठेवल्यास

$$p(-1) = (-1)^3 + 1$$
$$= -1 + 1$$
$$= 0$$

म्हणुन शेष सिध्दांतानुसार आपणास माहित होते की, $(x^3 + 1)$ ला $(x + 1)$ ने भागले असता बाकी 0 येते.

यास तुम्ही वास्तविक भागाकाराने तपासुन पाहु शकता. $x^3 + 1$ ला $x + 1$ भागा

$(x + 1)$ हा $(x^3 + 1)$ चा अवयव आहे तुम्ही सांगु शकता का?

उदाहरण-9: $(x - 2)$ हा $x^3 - 2x^2 - 5x + 4$ चा अवयव आहे का? तपासणी करा.

सोडवणुक: समजा $p(x) = x^3 - 2x^2 - 5x + 4$

रेषीय बहुपदी $(x - 2)$ हा दिलेल्या बहुपदीचा अवयव आहे हे

तपासणीसाठी $x$, च्या ऐवजी $(x - 2)$ चा शुन्य म्हणजे $x - 2 = 0 \Rightarrow x = 2$ घेणे.

$$p(2) = (2)^3 - 2(2)^2 - 5(2) + 4$$
$$= 8 - 2(4) - 10 + 4$$
$$= 8 - 8 - 10 + 4$$
$$= -6.$$

बाकी शुन्य नसल्यामुळे $(x - 2)$ ही बहुपदी $x^3 - 2x^2 - 5x + 4$ चा बहुपदीचा अवयतव नाही

उदाहरण-10: $p(y) = 4y^3 + 4y^2 - y - 1$ ही बहुपदी $(2y + 1)$ चा गुणक आहे का सांगा.

सोडवणुक: तुम्हाला माहित आहे $p(y)$ हा $(2y + 1)$ चा गुणक होते. जर फक्त $(2y + 1)$ ही $p(y)$ ला पुर्णपणे भागल्यास

पहिल्यांदा आपण $2y + 1$ भाजकाचा शुन्य काढु म्हणजे $y = \frac{-1}{2}$,



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



$y$ च्या ऐवजी $\frac{-1}{2}$ ठेवले असता $p(y)$



$$p\left(\frac{-1}{2}\right) = 4\left(\frac{-1}{2}\right)^3 + 4\left(\frac{-1}{2}\right)^2 - \left(\frac{-1}{2}\right) - 1$$

$$= 4\left(\frac{-1}{8}\right) + 4\left(\frac{1}{4}\right) + \frac{1}{2} - 1$$

$$= \frac{-1}{2} + 1 + \frac{1}{2} - 1$$

$$= 0$$

म्हणुन $(2y + 1)$ हा $p(y)$ चा अवयव होतो. म्हणजे $p(y)$ हा $(2y + 1)$ चा गुणक होतो.

**उदाहरण-11:** $ax^3 + 3x^2 - 13$ आणि $2x^3 - 5x + a$ या बहुपदीला $(x - 2)$ नी भागल्यास बाकी सारखे राहते. तर $a$ ची किंमत काढा.

**सोडवणुक:** समजा $p(x) = ax^3 + 3x^2 - 13$ आणि $q(x) = 2x^3 - 5x + a$

$\because$ $p(x)$ आणि $q(x)$ ला $x - 2$ ने भागले असता बाकी सारखी राहते.

$\therefore$ $p(2) = q(2)$

$a(2)^3 + 3(2)^2 - 13 = 2(2)^3 - 5(2) + a$

$8a + 12 - 13 = 16 - 10 + a$

$8a - 1 = a + 6$

$8a - a = 6 + 1$

$7a = 7$

$a = 1$

## अभ्यास - 2.3



1. $x^3 + 3x^2 + 3x + 1$ ला खालील रेषीय बहुपदीने भागले असता बाकी माहित करा.

   (i) $x + 1$ (ii) $x - \frac{1}{2}$ (iii) $x$ (iv) $x + \pi$

   (v) $5 + 2x$

2. $x^3 - px^2 + 6x - p$ ला $x - p$ नी भागले असता बाकी माहित करा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



3. $2x^2 - 3x + 5$ ला $2x - 3$ भागल्यास बाकी किती येते काढा. ते बहुपदीला पुर्णपणे भागते का ? कारण सांगा.

4. $9x^3 - 3x^2 + x - 5$ ला $x - \frac{2}{3}$ ने भाग दिला असता बाकी काढा.

5. जर $2x^3 + ax^2 + 3x - 5$ आणि $x^3 + x^2 - 4x + a$ ला $x - 2$ ने भागले असता बाकी सारखी येते, तर $a$ ची किंमत काढा.

6. जर $x^3 + ax^2 + 5$ आणि $x^3 - 2x^2 + a$ ला $(x + 2)$ नेभागल्यास बाकी सारखी येते तर $a$ ची किंमत काढा.

7. जर $f(x) = x^4 - 3x^2 + 4$ ला $g(x) = x - 2$ ने भागले असता बाकी काय राहते आणि आलेल्या उत्तराची वास्तविक भागाकाराने पडताळणी करुन पहा.

8. जर $p(x) = x^3 - 6x^2 + 14x - 3$ ला $g(x) = 1 - 2x$ ने भाग दिल्या असता, बाकी काय येते उत्तराची भागाकाराने पडताळणी करा.

9. जर $2x^3 + 3x^2 + ax + b$ ला $(x - 2)$ ने भागले असता बाकी 2 आणि $(x + 2)$ भागले असता बाकी –2 तर $a$ आणि $b$ च्या किंमती काढा,

## 2.6 बहुपदीचे अवयव पाडणे

आपण आधिच अभ्यास केला कि $q(x)$ ही बहुपदी $p(x)$ या बहुपदीने पुर्णपणे भागल्या गेली असे म्हणतो जर बाकी शुन्य असेल तर या संदर्भात $q(x)$ हा $p(x)$ चा अवयव आहे.
उदाहरणार्थ जेव्हा $p(x) = 4x^3 + 4x^2 - x - 1$ ला $g(x) = 2x + 1$ ने भागले असता तर बाकी शुन्य आल्यास त्याची पडताळणी करा.

तर $4x^3 + 4x^2 - x - 1 = q(x)\ (2x + 1) + 0$

म्हणुन $p(x) = q(x)\ (2x + 1)$

म्हणुन $g(x) = 2x + 1$ हा $p(x)$ चा अवयव आहे.

शेषसिध्दतांच्या मदतीने दिलेल्या बहुपदीचे अवयव काढणारी पध्दत तुम्ही सांगु शकता का ?

> अवयव पध्दती : जर $p(x)$ ही कोटी $n \geq 1$ असलेल्या आणि 'a' ही वास्तविक संख्या असलेली बहुपदी असेल तर (i) $x - a$ हा $p(x)$, चा घटक होते जर $p(a) = 0$ (ii) आणि त्या विरुध्द जर $(x - a)$ हा $p(x)$ बहुपदीचा अवयव असल्यास $p(a) = 0$.
> चला या सिध्दतेला पाहुया.

**सिध्दता:** शेष सिध्दतांवरुन

$p(x) = (x - a)\ q(x) + p(a)$

(i) जर $p(a) = 0$, तर $p(x) = (x - a)\ q(x) + 0$.

$= (x - a)\ q(x)$



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



$(x-a)$ हा $p(x)$ चा अवयव आहे हे दर्शविते.

म्हणुन हे सिध्द झाले.

$(x-a)$ हा $p(x)$ चा अवयव असल्यामुळे $p(x) = (x-a)\,q(x)$ काही बहुपदी $q(x)$ साठी $\therefore\ p(a) = (a-a)\,q(a)$

$= 0$

$\therefore$ म्हणुन $p(a) = 0$ जर $(x-a)$ $p(x)$ चा अवयव आहे.

चला काही उदाहरणे घेऊ या.

समजा $p(x)=ax^3+bx^2+cx+d$ $(a \neq 0)$ आणि $(x-1)$हा $p(x)$ $\Rightarrow$ $p(1) = 0$ $\Rightarrow$ $a+b+c+d=0$ चा अवयव आहे.म्हणजेच एक बहुपदीच्या सहगुणकांची बेरीज ही शुन्य असेल तर $(x-1)$ अवयव असतो.

समान

उदाहरण-12: $x + 2$ हा $x^3 + 2x^2 + 3x + 6$ चा अवयव आहे का परिक्षण करा.

सोडवणुक: समजा $p(x) = x^3 + 2x^2 + 3x + 6$ आणि $g(x) = x + 2$

$g(x)$ ची शुन्य किंमत $-2$ आहे.

तर $\quad p(-2) = (-2)^3 + 2(-2)^2 + 3(-2) + 6$

$= -8 + 2(4) - 6 + 6$

$= -8 + 8 - 6 + 6$

$= 0$

समजा $p(x)=ax^3+bx^2+cx+d$ $(a \neq 0)$ आणि $(x+1)$हा $p(x)$ $\Rightarrow$ $p(1) = 0$ $\Rightarrow$ $a+b+c+d=0$ चा अवयव आहे.म्हणजेच एक बहुपदीच्या सहगुणकांची बेरीज ही समान असेल तर $(x+1)$ बहुपदीचा अवयव असतो.

या अवयव पध्दतीवरुन $x + 2$ हा $x^3 + 2x^2 + 3x + 6$ चा अवयव आहे.

उदाहरण-13: जर $2x - 3$ हा $2x^3 - 9x^2 + x + K$ चा अवयव असल्यास K ची किंमत काढा.

सोडवणुक : $(2x - 3)$ हा $p(x) = 2x^3 - 9x^2 + x + K$ चा अवयव आहे.

जर $2x - 3 = 0$ तर $x = \dfrac{3}{2}$

$\therefore$ $(2x - 3)$ ची शुन्य किंवा $\dfrac{3}{2}$ आहे.

जर $(2x - 3)$ हा$p(x)$ चा अवयव असल्यास $p\left(\dfrac{3}{2}\right) = 0$

$p(x) = 2x^3 - 9x^2 + x + K,$

$$\Rightarrow p\left(\frac{3}{2}\right) = 2\left(\frac{3}{2}\right)^3 - 9\left(\frac{3}{2}\right)^2 + \frac{3}{2} + K = 0$$

$$\Rightarrow 2\left(\frac{27}{8}\right) - 9\left(\frac{9}{4}\right) + \frac{3}{2} + K = 0$$

$$\Rightarrow \left(\frac{27}{4} - \frac{81}{4} + \frac{3}{2} + K = 0\right) \times 4$$

$27 - 81 + 6 + 4K = 0$





Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com



$$-48 + 4K = 0$$
$$4K = 48$$
म्हुणन $K = 12$

उदाहरण-14: $(x - 1)$ हा $x^{10} - 1$ चा आणि $x^{11} - 1$ चा सुध्दा अवयव आहे.

सोडवणुक: समजा $p(x) = x^{10} - 1$ आणि $g(x) = x^{11} - 1$

$(x - 1)$ हा $p(x)$ आणि $g(x)$ चाअवयव आहे हे दाखविण्यासाठी $p(1) = 0$ आणि $g(1) = 0$ दाखविणे पुरेसे आहे.

आता

$p(x) = x^{10} - 1$ आणि $g(x) = x^{11} - 1$

$p(1) = (1)^{10} - 1$ आणि $g(1) = (1)^{11} - 1$

$= 1 - 1$ $\quad$ $= 1 - 1$

$= 0$ $\quad$ $= 0$

अवयव पध्दतीनुसार

**प्रयत्न करा**



$(x - 1)$ हा $x^n - 1$चा अवयव आहे सिध्द करा.

$(x - 1)$हा $p(x)$ आणि $g(x)$ चा अवयव आहे. आत ... ( $a \neq 0$ आणि $a, b, c$ स्थिर संख्या आहेत) अवयव पाडण्याचा प्रयत्न करु या.

समजा त्याचे अवयव $(px + q)$ आणि $(rx + s)$.

तर $ax^2 + bx + c = (px + q)\ (rx + s)$

$$= prx^2 + (ps + qr)x + qs$$

$x^2$, $x$ आणि स्थिरांकाच्या सहगुणकाची तुलना करुन

आपणास $a = pr$

$b = ps + qr$

$c = qs$

यावरुन दिसुन येते की, $b$ ही $ps$ आणि $qr$ ची बेरीज आहे.

ज्यांना गुणाकार $(ps)\ (qr) = (pr)(qs)$

$= ac$

म्हुणन $ax^2 + bx + c$ चे अवयव पाडण्यासाठी $b$ ला दोन संख्येच्या बेरजेच्या रुपात लिहिले पाहिजे ज्यांचा गुणाकार $ac$.आहे

उदाहरण-15: $3x^2 + 11x + 6$ चे अवयव काढा.



SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



सोडवणुक: आपण $p$ आणि $q$ दोन संख्या अशाप्रकारे माहित करु की, $p + q = 11$ आणि $pq = 3 \times 6 = 18$, नंतर आपणास अवयव येते.

म्हणुन 18 च्या अवयवाची जोड्या पाहुन

(1, 18), (2, 9), (3, 6) पैकी 2 आणि 9 ही $p + q = 11$ या समीकरणाचे समाधान करते.

म्हुणन $3x^2 + 11x + 6 = 3x^2 + 2x + 9x + 6$

$= x(3x + 2) + 3(3x + 2)$

$= (3x + 2)\ (x + 3)$.

## हे करा



खालील अवयव पाडा

1. $6x^2 + 19x + 15$ 2. $10m^2 - 31m - 132$ 3. $12x^2 + 11x + 2$

आता एक उदाहरण घ्या.

उदाहरण-16: $2x^4 - 6x^3 + 3x^2 + 3x - 2$ ला $x^2 - 3x + 2$ ने भाग जातो किंवा नाही पडताळुन पहा. अवयव पध्दतीचा मदतीने तुम्ही पडताळणी कसे कराल?

सोडवणुक: भाजक ही रेषीय बहुपदी नाही ही वर्ग बहुपदी आहे. वर्ग बहुपदीचे अवयव पाडतांना मधल्या पदाचे भाग करुन अवयव पाडणे तुम्ही शिकलात.

$x^2 - 3x + 2 = x^2 - 2x - x + 2$

$= x(x - 2) - 1(x - 2)$

$= (x - 2)\ (x - 1)$.

$x^2 - 3x + 2$ हा $2x^4 - 6x^3 + 3x^2 + 3x - 2$, या बहुपदीचा अवयव आहे. हे दाखविण्यासाठी आपणास $(x - 2)$ आणि $(x - 1)$ हे $2x^4 - 6x^3 + 3x^2 + 3x - 2$.

समजा $p(x) = 2x^4 - 6x^3 + 3x^2 + 3x - 2$

तर $p(2) = 2(2)^4 - 6(2)^3 + 3(2)^2 + 3(2) - 2$

$= 2(16) - 6(8) + 3(4) + 6 - 2$

$= 32 - 48 + 12 + 6 - 2$

$= 50 - 50$

$= 0$

$p(2) = 0$, $(x - 2)$ हा $p(x)$ चा अवयव आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com



तर $p(1) = 2(1)^4 - 6(1)^3 + 3(1)^2 + 3(1) - 2$

$= 2(1) - 6(1) + 3(1) + 3 - 2$

$= 2 - 6 + 3 + 3 - 2$

$= 8 - 8$

$= 0$



जसे $p(1) = 0, (x - 1)$ हा $p(x)$ चा अवयव आहे.

$(x - 2)$ आणि $(x - 1)$ हे दोन्ही $p(x)$ चे अवयव असल्यामुळे $x^2 - 3x + 2$ चा गुणाकार हा $p(x) = 2x^4 - 6x^3 + 3x^2 + 3x - 2$ चा अवयव होतो.

उदाहरण-17: $x^3 - 23x^2 + 142x - 120$ चे अवयव पाडा.

सोडवणुक: समजा $p(x) = x^3 - 23x^2 + 142x - 120$

सरावाने आपणास $p(1) = 0$. येते (पडताळा करा)

म्हणुन $(x - 1)$ हा $p(x)$ चा अवयव आहे.

जेव्हा आपण $p(x)$ ला $(x - 1)$ ने भागतो आपणास $x^2 - 22x + 120$ येते.

- $(x - y) \mid (x^n - y^n)$, सर्वांसाठी $n \in N$
- $(x + y) \mid (x^n - y^n)$, जिथे $n$ समसंख्या
- $(x + y) \mid (x^n + y^n)$, जिथे $n$ is विषमसंख्या
- $(x - y) \nmid (x^n + y^n)$, सर्वांसाठी $n \in N$

हे करण्याची पर्यायी पध्दत

$x^3 - 23x^2 + 142x - 120 = x^3 - x^2 - 22x^2 + 22x + 120x - 120$

$= x^2(x - 1) - 22x(x - 1) + 120(x - 1)$ (का?)

$= (x - 1)(x^2 - 22x + 120)$

आता $x^2 - 22x + 120$ ही वर्ग बहुपदी आहे आणि त्याचे अवयव मधल्या पदाचे भाग पाडुन माहित करतो.

$x^2 - 22x + 120 = x^2 - 12x - 10x + 120$

$= x(x - 12) - 10(x - 12)$

$= (x - 12)(x - 10)$

म्हणुन $x^3 - 23x^2 + 142x - 120 = (x - 1)(x - 10)(x - 12)$.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



## अभ्यास - 2.4



1. खालील बहुपदीमधील कोणत्या बहुपदीचा $(x+1)$ हा अवयव आहे निश्चीत करा.
   (i) $x^3 - x^2 - x + 1$ (ii) $x^4 - x^3 + x^2 - x + 1$
   (iii) $x^4 + 2x^3 + 2x^2 + x + 1$ (iv) $x^3 - x^2 - (3 - \sqrt{3})\,x + \sqrt{3}$
2. खालील संदर्भात g(x) हा $f(x)$ चा अवयव आहे का नाही हे अवयव पध्दतीचा उपयोगाने निश्चित करा.
   (i) $f(x) = 5x^3 + x^2 - 5x - 1, \quad g(x) = x + 1$
   (ii) $f(x) = x^3 + 3x^2 + 3x + 1, \quad g(x) = x + 1$
   (iii) $f(x) = x^3 - 4x^2 + x + 6, \quad g(x) = x - 2$
   (iv) $f(x) = 3x^3 + x^2 - 20x + 12, \quad g(x) = 3x - 2$
   (v) $f(x) = 4x^3 + 20x^2 + 33x + 18, \quad g(x) = 2x + 3$
3. सिध्द करा $(x - 2), (x + 3)$ आणि $(x - 4)$ हे $x^3 - 3x^2 - 10x + 24$ चे अवयव आहे.
4. सिध्द करा. $(x + 4), (x - 3)$ आणि $(x - 7)$ हे $x^3 - 6x^2 - 19x + 84$ चे अवयव आहे.
5. जर $(x - 2)$ आणि $\left(x - \frac{1}{2}\right)$ हे दोन $px^2 + 5x + r$ चे अवयव असल्यास सिध्द करा
   $p = r$.
6. जर $(x^2 - 1)$ हा $ax^4 + bx^3 + cx^2 + dx + e$, चा अवयव असल्यास सिध्द करा. $a + c + e = b + d = 0$
7. अवयव पाडा (i) $x^3 - 2x^2 - x + 2$ (ii) $x^3 - 3x^2 - 9x - 5$
   (iii) $x^3 + 13x^2 + 32x + 20$ (iv) $y^3 + y^2 - y - 1$
8. जर $ax^2 + bx + c$ आणि $bx^2 + ax + c$ चा $x + 1$ हा सामान्य अवयव असल्यास सिध्द करा $c = 0$ आणि $a = b$.
9. जर $x^2 - x - 6$ आणि $x^2 + 3x - 18$ चा सामान्य अवयव $(x - a)$असल्यास $a$ ची किंमत काढा.
10. जर $(y - 3)$ हा $y^3 - 2y^2 - 9y + 18$ चा अवयव आहे तर इतर दोन अवयव काढा.

## 2.6 बैजिक समानता:

बैजिक समानता हे बैजिक समीकरण आहे. जे त्यामधील येणाऱ्या चलाच्या सर्व किंमतीसाठी सत्य ठरते. मागील वर्गात तुम्ही या बैजिक समानेतबद्दल शिकलात .

**समानता I :** $(x + y)^2 \equiv x^2 + 2xy + y^2$

**समानता II :** $(x - y)^2 \equiv x^2 - 2xy + y^2$

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com



**समानता III :** $(x + y)(x - y) \equiv x^2 - y^2$

**समानता IV :** $(x + a)(x + b) \equiv x^2 + (a + b)x + ab.$

**भुमीतीय सिध्दता:**




**समानता** $(x - y)^2$ साठी

पायरी-1 $x$ ची बाजु असलेला चौरस काढा

पायरी-II लांबी $y$ ला $x$ मधुन वजा करा.

पायरी-III $(x - y)^2$ ची किंमत काढा.

$= x^2 - [(x - y)y + (x - y)y + y^2$

$= x^2 - xy + y^2 - xy + y^2 - y^2$

$= x^2 - 2xy + y^2$

## प्रयत्न करा



इतर समानतेसाठी भुमितीय आकृत्या काढण्याचा प्रयत्न करा.

(i) $(x+y)^2 \equiv x^2 + 2xy + y^2$ (ii) $(x+y)(x-y) \equiv x^2 - y^2$

(iii) $(x+a)(x+b) \equiv x^2 + (a+b)x + ab$

## हे करा



योग्य समानतेचा वापर करुन खालील गुणाकार करा.

(i) $(x + 5)(x + 5)$ (ii) $(p - 3)(p + 3)$ (iii) $(y - 1)(y - 1)$

(iv) $(t + 2)(t + 4)$ (v) $102 \times 98$

बैजिक राशीचे अवयव पाडण्यासाठी समानतेचा उपयोग होतो. काही उदारहणे पाहु या.

उदाहरण-18: अवयव पाडा

(i) $x^2 + 5x + 4$ (ii) $9x^2 - 25$

(iii) $25a^2 + 40ab + 16b^2$ (iv) $49x^2 - 112xy + 64y^2$

सोडवणुक:

(i) येथे $x^2 + 5x + 4 = x^2 + (4 + 1)x + (4)(1)$

याची तुलना $(x + a)(x + b) \equiv x^2 + (a + b)x + ab$ च्या

समानतेशी केली तर आपणास $(x + 4)(x + 1)$ येते.

(ii) $9x^2 - 25 = (3x)^2 - (5)^2$

आता याची तुलना समानता III, $x^2 - y^2 \equiv (x + y)(x - y)$, शी केली असता

$\therefore 9x^2 - 25 = (3x + 5)(3x - 5)$.आपणास येते.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com





(iii) येथे तुम्ही पाहु शकता की,

$25a^2 + 40ab + 16b^2 = (5a)^2 + 2(5a)(4b) + (4b)^2$

या बैजिक राशीची तुलना $x^2 + 2xy + y^2$,शी केल्यास

आपणास दिसुन येते की, $x = 5a$ आणि $y = 4b$

समानता I चा वापर करुन $(x + y)^2 \equiv x^2 + 2xy + y^2$

आपणास $25a^2 + 40ab + 16b^2 = (5a + 4b)^2$

$= (5a + 4b)(5a + 4b)$ येते.

(iv) येथे $49x^2 - 112xy + 64y^2$ आपणा पाहातो की,

$49x^2 = (7x)^2$, $64y^2 = (8y)^2$ आणि

$112\,xy = 2(7x)(8y)$

अशाप्रकारे समानता II $(x - y)^2 \equiv x^2 - 2xy + y^2$, शी तुलना

केल्यास आपणास $49x^2 - 112xy + 64y^2 = (7x)^2 - 2(7x)(8y) + (8y)^2$

$= (7x - 8y)^2$

$= (7x - 8y)(7x - 8y)$.येते.

## हे करा



योग्य समानतेचा वापर करुन खालील अवयव पाडा.

(i) $49a^2 + 70ab + 25b^2$ (ii) $\frac{9}{16}x^2 - \frac{y^2}{9}$

(iii) $t^2 - 2t + 1$ (iv) $x^2 + 3x + 2$

आतापर्यंत सर्व समानतेचा समावेश व्दिपदीत होता आता आपण समानता I चा विस्तार करुन त्रिपदी $x + y + z$ पर्यत वाढवु. आपण $(x + y + z)^2$ माहित केले पाहिजे.

समजा $x + y = t$, तर $(x + y + z)^2 = (t + z)^2$

$= t^2 + 2tz + z^2$ (समानता 1 नुसार)

$= (x + y)^2 + 2(x + y)z + z^2$ ( ‘t’ ची किंमत ठेवल्या)

$= x^2 + 2xy + y^2 + 2xz + 2yz + z^2$

पदांना क्रमाने लिहिल्यास $x^2 + y^2 + z^2 + 2xy + 2yz + 2zx$ मिळतो.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



**पर्यायी पध्दत**

तुम्ही $(x + y + z)^2$ ची किंमत पदांचे गट पाडुन सुध्दा काढु शकता.

$[(x + y) + z]^2 = (x + y)^2 + 2(x + y)(z) + (z)^2$

$= x^2 + 2xy + y^2 + 2xz + 2yz + z^2$ [समानता (1)वरुन ]

$= x^2 + y^2 + z^2 + 2xy + 2yz + 2xz$

इतर कोणत्या दुसऱ्या पध्दतीने गट पाडुन विस्तार करु शकता का? तुम्हाला सारखेच उत्तर येते का?

**समानता: V : $(x + y + z)^2 \equiv x^2 + y^2 + z^2 + 2xy + 2yz + 2zx$**

उदाहरण-19: समानतेचा वापर करुन $(2a + 3b + 5)^2$ चा विस्तार करा.

सोडवणुक: दिलेल्या समीकरणाची $(x + y + z)^2$ या बैजिक राशीशी तुलना

केल्यास आपणास $x = 2a$, $y = 3b$ आणि $z = 5$ मिळते

म्हणुन समानता V चा उपयोग केल्यास आपणास

$(2a + 3b + 5)^2 = (2a)^2 + (3b)^2 + (5)^2 + 2(2a)(3b) + 2(3b)(5) + 2(5)(2a)$

$= 4a^2 + 9b^2 + 25 + 12ab + 30b + 20a$.येते.

उदाहरण-20: $(5x - y + z)(5x - y + z)$ चा गुणाकार काढा

सोडवणुक: येथे $(5x - y + z)(5x - y + z) = (5x - y + z)^2$

$= [5x + (-y) + z]^2$

म्हणुन समानता V वरुन $(x + y + z)^2 \equiv x^2 + y^2 + z^2 + 2xy + 2yz + 2zx$, we get

$(5x + (-y) + z)^2 = (5x)^2 + (-y)^2 + (z)^2 + 2(5x)(-y) + 2(-y)(z) + 2(z)(5x)$

$= 25x^2 + y^2 + z^2 - 10xy - 2yz + 10zx$.

उदाहरण-21: $4x^2 + 9y^2 + 25z^2 - 12xy - 30yz + 20zx$ चे अवयव पाडा.

सोडवणुक: आपणास माहित आहे.

$4x^2 + 9y^2 + 25z^2 - 12xy - 30yz + 20zx$

$= [(2x)^2 + (-3y)^2 + (5z)^2 + 2(2x)(-3y) + 2(-3y)(5z) + 2(5z)(2x)]$



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



समानता V शी तुलना केल्यास

$(x+y+z)^2 \equiv x^2+y^2+z^2+2xy+2yz+2zx$, मिळते.

$$= (2x-3y+5z)^2$$

$$= (2x-3y+5z)\,(2x-3y+5z).$$

## हे करा



(i) $(p+2q+r)^2$ विस्ताराच्या रुपात लिहा

(ii) समानतेचा वापर करुन $(4x-2y-3z)^2$ चा विस्तार करा.

(iii) समानतेचा उपयोग करुन $4a^2+b^2+c^2-4ab+2bc-4ca$ चा विस्तार करा.

आता पर्यंत आपण कोटी दोन असलेल्या पदाच्या समानते बद्दल शिकलोत. आता समानता I वरुन $(x+y)^3$ माहित करु.

आपणास

$$\begin{aligned}(x+y)^3 &= (x+y)^2\,(x+y)\\ &= (x^2+2xy+y^2)\,(x+y)\\ &= x(x^2+2xy+y^2)+y(x^2+2xy+y^2)\\ &= x^3+2x^2y+xy^2+x^2y+2xy^2+y^3\\ &= x^3+3x^2y+3xy^2+y^3\\ &= x^3+3xy\,(x+y)+y^3\\ &= x^3+y^3+3xy(x+y).\end{aligned}$$

अशाप्रकारे आपणास खालील समानता येतात.

**समानता VI : $(x+y)^3 \equiv x^3+y^3+3xy\,(x+y)$.**

## प्रयत्न करा.



प्रत्यक्ष गुणाकार न करता $(x-y)^3$ माहित करा. प्रत्यक्ष गुणाकारासोबत पडताळणी करा.

दुसरी समानता मिळते.

**समसनता: VII : $(x-y)^3 \equiv x^3-y^3-3xy\,(x-y)$.**

$$\equiv x^3-3x^2y+3xy^2-y^3$$

या समानतेचा उपयोग केलेली काही उदाहरणे पाहु या.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



उदाहरण-22: खालील घनास विस्तारणाच्या रुपात लिहा.

(i) $(2a+3b)^3$ (ii) $(2p-5)^3$

सोडवणुक: (i) दिलेली बैजिक राशीची $(x+y)^3$ शी तुलना करा, आपणास $x = 2a$ आणि $y = 3b$

म्हणुन समानता VI प्रमाणे

$$(2a+3b)^3 = (2a)^3 + (3b)^3 + 3(2a)(3b)\,(2a+3b)$$
$$= 8a^3 + 27b^3 + 18ab\,(2a+3b)$$
$$= 8a^3 + 27b^3 + 36a^2b + 54\,ab^2$$
$$= 8a^3 + 36a^2b + 54ab^2 + 27b^3.$$

(ii) दिलेली बैजिक राशीची $(x-y)^3$ शी तुलना केल्यास आपणास $x = 2p$ आणि $y = 5$ येते.

म्हुणन समातनता VII प्रमाणे

$$(2p-5)^3 = (2p)^3 - (5)^3 - 3(2p)(5)\,(2p-5)$$
$$= 8p^3 - 125 - 30p\,(2p-5)$$
$$= 8p^3 - 125 - 60p^2 + 150p$$
$$= 8p^3 - 60p^2 + 150p - 125.$$

उदाहरण-23: योग्य समानतेचा उपयोग करुन खालील किंमती काढा.

(i) $(103)^3$ (ii) $(99)^3$

सोडवणुक (i) आपणास

$$(103)^3 = (100+3)^3$$

$(x+y)^3 \equiv x^3 + y^3 + 3xy(x+y)$ शी तुलना केल्यास आपणास

$$= (100)^3 + (3)^3 + 3(100)\,(3)\,(100+3)$$
$$= 1000000 + 27 + 900(103)$$
SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



3. खालील विधानांना दोन चलराशीतील रेषीय समीकरणात व्यक्त करा.
   (i) दोन संख्याची बेरीज 34 आहे.
   (ii) बॉलपेन ची किंमत शाईच्या पेनच्या किमतीच्या अर्ध्यापेक्षा 5 ने कमी आहे.
   (iii) सिंधुच्या गुणाच्या दुपटीपेक्षा 10 ने जास्त गुण भार्गवीने मिळाल्या.
   (iv) एका पेन्सीलची किंमत 2 रुपये आहे आणि एकाबॉलपेनची किंमत 15 रुपये आहे. शिला ने खरेदी केलेल्या पेन्सील आणि पेनीसाठी 100 रुपये चुकते केले.
   (v) प्रधानमंत्री साह्यनिधि साठी 9 व्या वर्गातील यामीनी आणि फातीमा दोघीनी मिळुन 200 रुपये दिले.
   (vi) एका संख्येतील अंकाची अदला बदल केली असता त्या संख्याची बेरीज 121 होते ( जर एकम स्थानचा अंक ‘x’ आणि दहम स्थानाचा अंक ‘y’ )

## 6.3 दोन चलराशीतील रेषीय समीकरणाचे सोडवणुक

एक चलराशीतील रेषीय समीकरणाचे अद्वितीय उकल असते. हे तुम्हाला माहित आहे.

$3x - 4 = 8$ या समीकरणाचे उकल काय आहे ?

$3x - 2y = 5$ हे समीकरण विचारात घेऊ

दोन चलराशीतील या रेषीय समीकरणाच्या बाबतीत आपण काय सांगु शकतो ? सोडवणुका मध्ये आपल्याला फक्त एकच किमत मिळते. का किंवा अनेक मिळतात का ? चला स्पष्ट करु.

या समीकरणाचे सोडवणुक $x = 3$ असे तुम्ही म्हणु शकता का ?

चला तपासणी करु या. जर समीकरणात $x = 3$ आपण प्रतिक्षेपीत केलो.

$$3(3) - 2y = 5$$

$$9 - 2y = 5$$

म्हणजेच दिलेल्या समीकरणाचे उकल अजुन आपण माहित केलेले नाही. म्हणुन उकल माहित करण्यासाठी ‘x’ च्या किंमती बरोबर आपल्याला ‘y’ च्या किंमतीची पण गरज आहे. वरील समीकरणावरुन आपण y ची किंमत माहित करु शकतो. $9 - 2y = 5$. $\Rightarrow 2y = 4$ किंवा $y = 2$

$x = 3$ आणि $y = 2$ या ‘x’ आणि y च्या किंमती $3x - 2y = 5$ या समीकरणाला पुर्ण करतात. अशाप्रकारे दोन चलाराशीतील समीकरण पुर्ण करण्यासाठी आपल्याला दोन किमतीची आवश्यकता आहे. एक ‘x’ ची किंमत आणि दुसरी y ची किंमत.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



म्हणुन दोन चलराशीतील रेषीय समीकरणाला पुर्ण करण्यासाठी 'x' आणि 'y' च्या किंमतीच्या कोणत्याही जोडीला त्या समीकरणाची सोडवणुक म्हणतात.

$3x - 2y = 5$ ची उकल $x = 3, y = 2$ आहे हे आपल्या निरिक्षणात आले आहे. या सोडवणुकीला जोडीच्या क्रमात $(3, 2)$ असे लिहिले जाते. सुरुवातील 'x' ची किंमत आणि नंतर 'y' ची किंमत लिहिल्या जाते. समीकरणासाठी आणखी इतर कोणते तरी उकल आहे का? तुमच्या आवडीने एक किंमत घ्या. समजा $x = 4$ घ्या. आणि ती किंमत $3x - 2y = 5$ या समीकरणात प्रतिक्षेपीत करा. तर समीकरण $12 - 2y = 5$ असे बनते. जे एका चला राशीतील समीकरण आहे. याला सोडविल्या नंतर

$y = \frac{12-5}{2} = \frac{7}{2}$, म्हणुन $\left(4, \frac{7}{2}\right)$ हे $3x - 2y = 5$ चे इतर उकल आहे.

$3x - 2y = 5$ साठी तुम्ही आणखी काही उकल माहित करु शकता का? तपासणी करा. $(1, -1)$ हे उकल आहे का?

अशा प्रकारे दोन चल राशीतील रेषीय समीकरणासाठी आपण अनेक उकल माहित करु शकतो.

सुचना: दोन उकल मिळविण्याचा सोपा प्रकार म्हणजे $x = 0$ ठेवा आणि संबंधीत 'y' ची किंमत मिळवा. याच प्रमाणे $y = 0$ ठेवुन संबंधीत 'x' ची किंमत माहित करु शकतो.

**प्रयत्न करा**



वरील समीकरणासाठी उकलच्या किमतींच्या 5 जोड्या माहित करा

उदाहरण 6: $4x + y = 9$ च्या चार वेगवेगळ्या उकल माहित करा(तक्ता पुर्ण करा)

उकल :

| क्र.स | x किंवा y चला साठी निवडलेली किंमत | दुसऱ्या चलराशीची किंमत | उकल |
|---|---|---|---|
| 1. | $x = 0$ | $4x + y = 9 \Rightarrow 4 \times 0 + y = 9 \Rightarrow y = 9$ | (0,9) |
| 2. | $y = 0$ | $4x + y = 9 \Rightarrow 4x + 0 = 9 \Rightarrow 4x = 9 \Rightarrow x = 9/4$ | $\left(\frac{9}{4}, 0\right)$ |
| 3. | $x = 1$ | $4x + y = 9 \Rightarrow 4 \times 1 + y = 9 \Rightarrow 4 + y = 9 \Rightarrow y = 5$ | —— |
| 4. | $x = -1$ | —— | $(-1, 13)$ |

$\therefore$ वरील समीकरणासाठी $(0, 9)$, $\left(\frac{9}{4}, 0\right)$, $(1, 5)$ आणि $(-1, 13)$ हे काही उकल आहेत.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



उदाहरण-7: $x + 2y = 4$ या समीकरणाचे खालील पैकी कोणते उकल आहे याची तपासणी करा (तक्ता पुर्ण करा)

i) (0, 2)   ii) (2, 0)   iii) (4, 0)   (iv) $(\sqrt{2}, -3\sqrt{2})$

v) (1, 1)   vi) (– 2, 3)

सोडवणुक: जेव्हा आपण दिलेल्या समीकरणात किमतीची जोडी प्रतिक्षपीत केलो आणि जर आपल्याला LHS = RHS मिळाले ते उकल असते.

$x + 2y = 4$ हे दिलेले समीकरण आहे.

| क्र.स. | किमतीची जोडी | LHS ची किंमत | RHS ची किंमत | LHS आणि RHS मधील संबंध | उकल आहे/नाही |
|---|---|---|---|---|---|
| 1. | (0, 2) | $x + 2y = 0 + (2 \times 2)$ <br> $= 0 + 4 = 4$ | 4 | ∴ LHS=RHS | ∴ (0, 2) हे उकल आहे. |
| 2. | (2, 0) | $x + 2y = 2 + (2 \times 0)$ <br> $= 2 + 0 = 2$ | 4 | ...... | (0, 2) हे उकल नाही |
| 3. | (4, 0) | $x + 2y = 4 + (2 \times 0)$ <br> $= 4 + 0 = 4$ | 4 | LHS = RHS | ___ |
| 4. | $(\sqrt{2}, -3\sqrt{2})$ | $x + 2y = \sqrt{2} + 2(-3\sqrt{2})$ <br> $= \sqrt{2} - 6\sqrt{2}$ <br> $= -5\sqrt{2}$ | ___ | LHS ≠ RHS | $(\sqrt{2}, -3\sqrt{2})$ हे उकल नाही |
| 5. | (1, 1) | ___ | 4 | LHS ≠ RHS | (1, 1) हे उकल नाही |
| 6. | ___ | $x + 2y = -2 + (2 \times 3)$ <br> $= -2 + 6 = 4$ | 4 | LHS = RHS | (–2, 3)हे उकल आहे |

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



उदाहरण-8: जर $5x - 7y = k$, या समीकरणाची उकल $x = 3, y = 2$ तर k ची किंमत माहित करा आणि परिणामी समीकरण लिहा.



सोडवणुक: जर $x = 3, y = 2$ हे $5x - 7y = k$

समीकरणाचे उकल असेल तर $5 \times 3 - 7 \times 2 = k$

$\Rightarrow 15 - 14 = k$

$\Rightarrow 1 = k$

$\therefore k = 1$

$5x - 7y = 1$ हा परिणामी समीकरण आहे.

उदाहरण-9: जर $5x + 3y - 7 = 0$ या समीकरणाची उकल $x = 2k + 1$ आणि $y = k$ असेल तर k ची किंमत माहित करा.

सोडवणुक: $5x + 3y - 7 = 0$ या समीकरणाची उकल $x = 2k + 1$ आणि $y = k$ दिलेली आहे. तर x आणि y च्या किंमती समीकरणात प्रतिक्षेतीत करुन

$\Rightarrow 5(2k + 1) + 3k - 7 = 0$

$\Rightarrow 10k + 5 + 3k - 7 = 0$

$\Rightarrow 13k - 2 = 0$ (हे एका चलराशीतील रेषीय समीकरण आहे)

$\Rightarrow 13k = 2$

$\therefore k = \frac{2}{13}$

## अभ्यास - 6.2



1. खालील प्रत्येक समीकरणाचे तिन वेगवेगळे उकल माहित करा?
   i) $3x + 4y = 7$  ii) $y = 6x$  iii) $2x - y = 7$
   iv) $13x - 12y = 25$  v) $10x + 11y = 21$  vi) $x + y = 0$
2. खालील रेषीय समीकरणाचे जर (0, a) आणि (b, 0) उकल असेल तर 'a' आणि 'b' ची किंमत माहित करा.
   i) $8x - y = 34$  ii) $3x = 7y - 21$  iii) $5x - 2y + 3 = 0$
3. $2x - 5y = 10$ या समीकरणाचे खालील पैकी कोणते उकल आहे. तपासणी करा.
   i) $(0, 2)$  ii) $(0, -2)$  iii) $(5, 0)$  iv) $(2\sqrt{3}, -\sqrt{3})$  v) $\left(\frac{1}{2}, 2\right)$
4. $2x + 3y = k$ या समीकरणाची उकल जर $x = 2, y = 1$ असेल तर k ची किंमत माहित करा. आणि परिणामी समीकरणाचे दोन उकल माहित करा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com



5. $3x - 2y + 6 = 0$ या समीरकणात उकल जर $x = 2 - \alpha$ आणि $y = 2 + \alpha$ असेल तर '$\alpha$'ची किंमत माहित करा आणि परिणामी समीकरणाचे तिन उकल माहित करा.
6. $3x + ay = 6$ या समीकरणाची उकल जर $x = 1, y = 1$ असेल तर 'a' ची किंमत माहित करा.
7. दोन चल राशीतील वेगवेगळे पाच रेषीय समीकरणे लिहा. आणि त्या प्रत्येकासाठी तीन -तीन उकल माहित करा.


## 6.4 दोन चलराशीतील रेषीय समीकरणाचे आलेख

दोन चलराशीतील प्रत्येक समीकरणाला बरेचशे उकल असतात हे आपण शिकले आहोत. रेषीय समीकरणाचे जर आपण संभाव्य सोडवणुक घेतल्या तर त्यांना आपण आलेखा वर दर्शवु शकतो का? उकलची प्रत्येक जोडी वास्तविक संख्या आहे आणि आलेखावर त्याला एक बिंदु म्हणुन व्यक्त करु शकतो. हे आपल्याला माहित आहे

$4 = 2x + y$ या दोन चलराशीतील रेषीय समीकरण विचारात घेऊ याला. $y = 4 - 2x$. म्हणुन सुध्दा व्यक्त करु शकतो. या समीकरणासाठी $x$ च्या विशिष्ठ किमती साठी 'y' ची किंमत आपण माहित करु शकतो. उदा. जर $x = 2$ तर $y = 0$. म्हणुन $(2, 0)$ हे उकल आहे. याप्रकारे आपण बरेचशे उकल माहित करु शकतो. x च्या किंमती च्याखाली त्यांच्या संबंधीत 'y'ची किंमत लिहत सर्व उकल खालील तक्त्यात लिहा

**उकलाचा तक्ता**

| x | $y = 4 - 2x$ | (x, y) |
|---|---|---|
| 0 | $y = 4 - 2(0) = 4$ | (0, 4) |
| 2 | $y = 4 - 2(2) = 0$ | (2, 0) |
| 1 | $y = 4 - 2(1) = 2$ | (1, 2) |
| 3 | $y = 4 - 2(3) = -2$ | (3, –2) |




x च्या प्रत्येक किंमतीसाठी तिथे y ची एक किंमत आहे हे आपण पाहिलो. x- अक्षावर X ची किंमत आणि y-किंमतY अक्षावर घेउ या. आलेखावर (0, 4), (2, 0), (1, 2) आणि (3, -2) हे बिंदु स्थापु या. यापैकी जर कोणत्याही दोन बिंदुला आपण जोडलो तर आपल्याला एक सरळ रेषा AD मिळते.

जर $x = 0$;
$y = 4 - 2x = 4 - 2(0) = 4$
जर $x = 2$
$y = 4 - 2(2) = 0$

इतर सर्व उकल रेषा AB वर आहेत का?
(4,– 4) हा रेषेवरचा इतर बिंदु घेऊ. हे उकल आहे का?



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



AD वरचे कोणतेही बिंदु घ्या आणि तपासणी करा की त्याचे निर्देशांक समीकरणाला पुर्ण करतात की नाहीत?

आता, रेषा AD वरचे (1, 1) बिंदु घ्या. हे समीकरणाला पुर्ण करतात का?

AD वर तुम्ही असे बिंदु माहित करु शकता का जे समीकरणाला पुर्ण करत नाही.

**आपल्या निरिक्षणाची यादी करु या.**

1. रेषीय समीकरणाची प्रत्येक उकल त्या समीकरणाच्या रेषेवरचे बिंदु असतात.
2. या रेषेवरचे प्रत्येक बिंदु रेषीय समीकरणाची उकल आहे.
3. समीकरणाची उकल न करणारे कोणतेही बिंदु या रेषेवर नसतात.
4. समीकरणाच्या उकलच्या बिंदुच्या समुह म्हणजे आलेख होय



दोन चलराशीतील रेषीय समीकरणाचे आलेखाव्दारे दर्शवणुक एका सरळ रेषा असते हे आपल्या लक्षात आले असेल अशाप्रकारे $ax + by + c = 0$(a आणि b शुन्य नसतात.) ला दोन चल राशीतील रेषीय समीकरण म्हणतात.

### 6.4.1 रेषीय समीकरणाचे आलेख कसे काढावे?

**पायऱ्या :**

1. रेषीय समीकरण लिहा.
2. दिलेल्या समीकरणात $x = 0$ ठेवा आणि त्याच्या संबंधीत y ची किंमत माहित करा.
3. दिलेल्या समीकरणात $y = 0$ ठेवा आणि त्यांच्या संबंधीत 'x' ची किंमत माहित करा.
4. x च्या किंमती लिहा आणि त्याच्या संबधीत y च्या किंमती लिहा. x आणि y चे निर्देशांक (x, y) च्या रुपात लिहा.
5. आलेख कागदावर बिंदु स्थापा.
6. या बिंदुना जोडा.

अशा प्रकारे दोन चल राशी मधील रेषीय समीरकणाचे आलेखावर काढलेली रेषा असते.काढलेली रेषा बरोबर आहे की, नाही याची तपासणी साठी दोन बिंदु च्या जोड्यापेक्षा जास्त बिदुंच्या जोड्या घेतल्यातर चांगले राहते. दिलेल्या समीकरणाचे इतर उकल माहित करण्यासाठी 'x' वेगवेगळ्या किंमती प्रतेक्षेपीत करा आणि'y' संबंधीत किंमत माहित करा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



SCERT TELANGANA

### प्रयत्न करा.



एक आलेखाचा कागद घ्या. त्यावर (2,4) बिंदु स्थापा आणि त्यामधुन जाणारी एक रेषा काढा. आता खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

1. (2, 4) बिंदुतुन जाणारी अजुन काही रेषा तुम्ही काढु शकता का?
2. अशा किती रेषा तुम्ही काढु शकता?
3. (2, 4) या उकलसाठी दोन चलराशीतील किती रेषीय समीकरणे अस्तीत्वात आहेत?

उदाहरण-10: $y - 2x = 4$ या समीकरणाचे आलेख काढा आणि खालील प्रश्नांचे उत्तरे द्या.

(i) रेषेवर (2, 8) हे बिंदु आहेत का? (2, 8) हे समीकरणाची उकल आहे का? समीकरणात (2, 8) प्रतिक्षेपीत करुन तपासणी करा.

(ii) रेषेवर (4, 2) हे बिंदु आहेत का?(4, 2) हे समीरकणाची उकल आहे का? बैजिक पध्दतीने सुध्दा तपासणी करा.

(iii) आलेखावरुन समीकरणाचे आणखी तीन उकल माहित करा आणि असे तिन उकल माहित करा जे नाही आहे.

सोडवणुक: दिलेले $y - 2x = 4 \Rightarrow y = 2x + 4$

उकलचा तक्ता

| x | y = 2x + 4 | (x, y) | बिंदु |
|---|---|---|---|
| 0 | $y = 2(0) + 4 = 4$ | (0, 4) | A(0, 4) |
| -2 | $y = 2(-2)+4 = 0$ | (–2, 0) | B(–2, 0) |
| 1 | $y = 2(1) + 4 = 6$ | (1, 6) | C(1, 6) |

आलेख कागदावर A, B आणि C हे बिंदु स्थापा आणि त्यांना जोडा. आलेखात दाखवलेल्या प्रमाणे एक रेषा BC मिळवा. $y - 2x = 4$.

(i) आलेख कागदावर (2, 8) बिंदु स्थापा. आलेखा वरुन (2, 8) हे बिंदु रेषेवरचे आहेत.

बैजिक पणे तपासणी : समीकरणात (2, 8) प्रतिक्षेपीत करुन


$LHS = y - 2x = 8 - 2x2 = 8 - 4 = 4 = RHS$, म्हणुन (2, 8) हे उकल आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com






(ii) आलेख कागदावर (4, 2) बिंदु स्थापा. तुम्हाला असे दिसेल की, (4, 2) हे बिंदु रेषेवर नाही. बैजिक पणे तपासणी : दिलेल्या समीकरणात (4, 2) प्रतिक्षेपीत करुन

LHS = y − 2x = 2 − 2×4 = 2 − 8 = −6 ≠ RHS, म्हणुन (4, 2) हे उकल नाही.

(iii) रेषेवरचा प्रत्येक बिंदु हा दिलेल्या समीकरणाचा उकल आहे. हे आपल्याला माहित आहे. म्हणुन दिलेल्या समीकरणाची उकल म्हणुन रेषेवरचे कोणतेजही तिन बिंदु आपण घेऊ या. उदा. (-4, -4). आणि आपल्याला हे सुध्दा माहित आहे की, रेषेवर नसलेले बिंदु हे दिलेल्या समीकरणाचे उकल होत नाही.म्हणुन आपण असे तिन बिंदुच्या जोड्या घेऊ जे y - 2x = 4 चे उकल नाही.

उदा. : (i) (1, 5); ........; .........

उदाहरण-11: $x - 2y = 3$ या समीकरणाचे आलेख काढा.

आलेखावरुन माहित करु (i) (x, y) चे उकल येथे $x = -5$

(ii) (x, y) चे उकल येथे $y = 0$

(iii) (x, y) चे उकल येथे $x = 0$



सोडवणुक: दिले आहे. $x - 2y = 3 \Rightarrow y = \frac{x-3}{2}$



Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com



### उकलचा तक्ता

| x | $y = \frac{x-3}{2}$ | (x, y) | बिंदु |
|---|---|---|---|
| 3 | $y = \frac{3-3}{2} = 0$ | (3, 0) | A |
| 1 | $y = \frac{1-3}{2} = -1$ | (1, –1) | B |
| –1 | $y = \frac{-1-3}{2} = -2$ | (–1, –2) | C |

आलेखा कागदावर A, B, C बिंदु स्थापा. आणि त्यांना जोडा. खालील आकृतीत दाखविल्या प्रमाणे आपल्याला एक रेषा मिळते. $x - 2y = 3$ या समीकरणाची अपेक्षीत आलेखाची रेषा आहे




(i) (x, y) चे उकल माहित करण्यासाठी येथे $x = -5$, आपल्याला असा बिंदु माहित करावा लागणार जो सरळ रेषेवर आहे आणि ज्याचे x-निर्देशांक '–5' आहे. असा बिंदु माहित करण्यासाठी $x = -5$ येथे y-अक्षाला समांतर असाणारी रेषा काढावी लागेल. (आलेखात ते डॉटेड ने दाखविले आहे) रेषा आलेखाला 'P' बिंदुत भेटते तेथून आपण X-अक्षा ला समांतर असणारी दुसरी रेषा काढा जी Y-अक्षाच्या $y = -4$ येथे भेटते.

P चे निर्देशांक = (–5, –4)

$x - 2y = 3$ रेषेवर P(–5, –4) आहेत. हे $x - 2y = 3$ चे सोडवणुक आहे.

(ii) आपल्याला (x, y) चे सोडवणुक माहित करायचे आहे येथे $y = 0$.

$y = 0$ पासुन (x, 0)हे बिंदु X-अक्षावर आहेत.X-अक्षावर आणि $x - 2y = 3$ च्या आलेखावर असलेले बिंदु आपल्याला माहित करायचे आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



आलेखावरुन (3,0) हे अपेक्षीत बिंदु आहेत हे स्पष्ट होते

म्हणुन (3,0) हे उकल आहे.

(iii) (x, y) सोडवुणक माहित करण्यासाठी येथे $x = 0$.

$x = 0$ हे बिंदु (0, y) Y- अक्षावर आहेत. म्हणुन Y-अक्षावर आणि $x - 2y = 3$ आलेखावर असणारे बिंदु माहित करु.

आलेखा वरुन $\left(0, \frac{-3}{2}\right)$ हे बिंदु आहेत म्हणुन स्पष्ट होते.

त्याची उकल $\left(0, \frac{-3}{2}\right)$.

उदाहरण-12: शाळेत एकुण 25% मुली आहे. आणि बाकीचे मुले आहेत. समीकरण तयार करा आणि यासाठी आलेख काढा. आलेखाचे निरिक्षण करुन खालील प्रश्नांचे उत्तर द्या.

(i) जर मुलींची संख्या 25 असेल तर मुलांची संख्या माहित करा.

(ii) जर मुलांची संख्या 45 असेल तर मुलींची संख्या माहित करा.

(iii) मुलांच्या संख्या साठी तिन वेगवेगळ्या किंमती घ्या. आणि मुलींची संख्या माहित करा. याच प्रमाणे मुलींच्या संख्येसाठी तिन वेगवेगळ्या किंमती घ्या आणि मुलांची संख्या माहित करा.



सोडवणुक: समजा मुलींची संख्या 'x' आणि मुलांची संख्या 'y' तर

शाळेतील एकुण विद्यार्थ्यांची संख्या $= x + y$

दिलेल्या माहिती नुसार

मुलींची संख्या = विद्यार्थ्यांच्या 25%

$x = 25\%$ चे $(x + y)$

$= \frac{25}{100}$ चे $(x + y) = \frac{1}{4}(x + y)$



SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



$$x = \frac{1}{4}(x + y)$$

$$4x = x + y$$


$$3x = y$$

अपेक्षीत समीकरण $3x = y$ किंवा $3x - y = 0$.

**उकलचा तक्ता**

| x | y = 3x | (x, y) | बिंदु |
|---|---|---|---|
| 10 | 30 | (10, 30) | A |
| 20 | 60 | (20, 60) | B |
| 30 | 90 | (30, 90) | C |

आलेखा वर A, B आणि C बिंदु स्थापा आणि त्यांना जोडा. आकृतीत दाखविल्याप्रमाणे आपल्याला एक रेषा मिळते.




**प्रमाण :**
X-अक्षावर : 1 से.मी. = 20 एकक
Y-अक्षावर : 1 से.मी. = 20 एकक

आलेखावरुन आपल्याला माहित होते.

(i) जर मुलींची संख्या 25 असेल तर मुलांची संख्या 75 असते.
(ii) जर मुलांची संख्या 45असेल तर मुलींची संख्या 15 असते.
(iii) मुलींसाठी तुम्ही एक संख्या निवडा आणि त्या संबंधीत मुलांची संख्या माहित करा.

याच प्रमाणे मुलांसाठी तुम्ही एक संख्या निवडा आणि त्यासंबंधीत मुलींची संख्या माहित करा. येथे तुम्ही समीकरण आणि आलेखाचे निरिक्षण केले का? जर समीकरण $y = mx$ च्या रुपात असेल तर रेषा आरंभबिंदुतुन जात आहे. येथे $m$ हे वास्तविक संख्या जे आरंभबिंदुतुन जात आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



उदाहरण-13: चार रेषीय समीकरण दिलेली आहेत. प्रत्येकाचे आलेख खाली दिलेले आहेत. दिलेला आलेख यापैकी कोणत्या समीकरणाला दर्शविते.


(i) समीकरण

A) $y = x$

B) $x + y = 0$

C) $y = 2x$

D) $2 + 3y = 7x$





(ii) समीकरण

A) $y = x + 2$

B) $y = x - 2$

C) $y = -x + 2$

D) $x + 2y = 6$




सोडवणुक:

(i) आलेखावरुन (1, −1) (0, 0) (−1, 1) हे सारख्याच रेषेवर आहेत. हे आपण पाहतो. म्हणुन अपेक्षीत समीकरणाचे हे सोडवणुक आहेत. म्हणजेच जर आपण या बिंदुना अपेक्षीत समीकरणात प्रतिक्षेपीत केले. तर समीकरण पुर्ण होते. म्हणुन या बिंदु जोडीने समाधान होणारे समीकरण आपल्याला माहित करायचे आहे. $y = x$ या पाहिल्या समीकरणात जर आपण(1,-1) प्रतिक्षेपीत केलो तर ते समाधान होत नाही म्हणुन $y = x$ हे अपेक्षीत समीकरण नाही आहे.

$x + y = 0$ मध्ये (1,-1) समीकरण समाधान होते हे आपल्याला माहित होते. दुसऱ्या समीकरणाला सर्व तीन बिंदु समाधान करत आहेत. म्हणुन $x + y = 0$ हे अपेक्षीत समीकरण

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



आता $y = 2x$ आणि $2 + 3y = 7x$ हे सुध्दा (1, –1) (0, 0) आणि(–1, 1) या बिंदुने समाधान होतात की, याची तपासणी करा. एका ही जोडीसोबत ते समाधान कारक नाहीत हे आपल्याला माहित होते. म्हणुन ते अपेक्षीत समीकरण नाही आहे.

(ii) रेषेवरील (2, 0), (0, 2) आणि (–1, 3)हे रेषेवरचे बिंदु आहेत. हे सर्व बिंदु पहिल्या आणि दुसऱ्या समीकरणाला समाधान करत नाही. तिसरे समीकरण $y = -x + 2$ घेऊ या. समीकरणात जर आपण तीन ही बिंदु प्रतिक्षेपीत केले तर ते सामाधान होते. म्हणुन $y = -x + 2$. हे अपेक्षीत समीकरण आहे. $x + 2y = 6$ या समीकरणाला या बिंदु समाधान करतात का? याची तपासणी करा.

## अभ्यास - 6.3



1. खालील प्रत्येक रेषीय समीकरणाचे आलेख काढा

   i) $2y = -x + 1$ ii) $-x + y = 6$ iii) $3x + 5y = 15$ iv) $\frac{x}{2} - \frac{y}{3} = 3$

2. खालील प्रत्येक रेषीय समीकरणाचे आलेख काढा आणि खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

   i) $y = x$ ii) $y = 2x$iii) $y = -2x$ iv) $y = 3x$ v) $y = -3x$

   i) सर्व समीकरण $y = mx$ च्या रुपात आहेत का?(येथे $m$हे वास्तव संख्या आहे)

   ii) सर्व आलेख आंरभबिंदुतन जातात का?

   iii) या आलेखावरुन तुम्ही काय निष्कर्ष काढु शकता?

3. $2x + 3y = 11$ या समीकरणाचे आलेख काढा. जेव्हा $x = 1$ असतांना $y$ ची किंमत आलेखावरुन माहित करा.

4. $y - x = 2$. समीकरणाचे आलेख काढा. आलेखावरुन माहित करा.

   i) जेव्हा $x = 4$ असेल तर $y$ ची किंमत काढा.

   ii) जेव्हा $y = -3$ असेत तर $x$ ची किंमत काढा

5. $2x+3y=12$ या समीकरणाचा आलेख माहित करा.

   i) y-निर्देशांक 3 असलेले

   ii) x-निर्देशांक -3 असलेले

6. खाली दिलेल्या प्रत्येक समीकरणाचे आलेख काढा.

   i) $6x - 3y = 12$ ii) $-x + 4y = 8$ iii) $3x + 2y + 6 = 0$

SCERT TELANGANA




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



7. नैसर्गिक आपत्तीमध्ये बळी पडलेल्यासाठी प्रधानमंत्री साह्य निधित 9 व्या वर्गातील रजिया आणि प्रिती या दोन्ही विद्यार्थिनीनी 1000 रुपये जमा केले. रेषीय समीकरण लिहुन आलेख काढा.
8. गोपय्या ने त्याच्या दोन्ही शेतात गहु आणि साळ ची पेरणी केली तर ते एकुण 5000 चौरस मिटर क्षेत्रफळाचे शेत आहे. ते दर्शविण्यासाठी रेषीय समीकरण लिहा आणि आलेख काढा.
9. 6 कि.ग्र. वस्तुमान असलेल्या वस्तु वर लावलेले बळ हे त्या वस्तु मध्ये उत्पन्न झालेल्या त्वरणेच्या सम प्रमाणात आहे. हे निरिक्षण स्पष्ट करण्यासाठी समीकरण लिहा आणि समीकरणाचे आलेख काढा.
10. शिखरावरुन एक दगड खाली पडत आहे. दगडाचे वेग $V = 9.8t$. दिलेले आहे. त्याचे आलेख काढा आणि सुरुवात झाल्यानंतर 4 सेंकदानी दगडाचे वेग माहित करा.
11. एका निवडणुकीत 60 मतदार त्यांचे मत टाकलेत. या माहितीसाठी समीकरण तयार करा आणि आलेख काढा. आलेखावरुन खालील माहित करा.




(i) जर 1200 मतदार त्यांचे मत टाकले असेल तर एकुण मतदाराची संख्या
(ii) जर एकुण मतदाराची संख्या 800 असेल तर मतदान टाकलेल्याची संख्या.
[ सुचना : जर मत टाकलेल्या मतदाराची संख्या 'x' आणि एकुण मतदाराची संख्या 'y' तर x = y चे60% ]
12. जेव्हा रुपाचा जन्म झाल तेव्हा तिच्या वडीलांचे वय 25 वर्ष होते. या माहितीसाठी समीकरण तयार करा आणि आलेख काढा. आलेखावरुन माहित करा.
(i) जेव्हा रुपाचे वय 25 वर्ष असेल तर वडीलांचे वय
(ii) जेव्हा तिच्या वडीलांचे वय 40 वर्ष असेल तर रुपाचे वय
13. पाहिल्या किलोमिटर साठी ॲटो चे भाडे 15 रुपये. आणि नंतरच्या प्रत्येक किलोमिटर साठी 8 रुपये 'x' किलोमिटर अंतरासाठी 'y' रु. चुकते केले.
ही माहिती दर्शविणारी रेषीय समीकरण लिहा आणि आलेख काढा. जर भाडे 55 रुपये चुकते केले तर आलेखाच्या मदतीने प्रवास केलेला अंतर माहित करा. 7 किलो.मीटर साठी किती रुपये चुकते करावे लागणार आहे?
14. ग्रंथालयात एक पुस्तकासाठी पहिल्या तिन दिवसाचे भाडे ठराविक असते. आणि नंतरच्या प्रत्येक दिवसाला अतिरिक्त भाडे द्यावे लागते. जॉन ने एक पुस्तक 7 दिवस ठेऊन घेतले आणि त्यासाठी त्याने 27 रुपये चुकते केले. जर ठराविक भाडे x रुपये आणि प्रत्येक दिवसाचे भाडे y रु. असेल तर या माहितीसाठी रेषीय समीकरण लिहा. आणि त्याचा आलेख काढा. आलेखावरुन जर ठराविके भाडे 7 रुपये असेल तर दररोजचे भाडे किती? आणि जर एक दिवसाचे भाडे 4 रुपये असेल तर ठराविक भाडे किती?



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



15. हैद्राबाद रेल्वे स्थानकावर पहिल्या दोन तासासाठी पार्कींग भाडे 50 रुपये आहे. आणि त्या नंतरच्या प्रत्येक तासाला 10 रुपये आहे. समीकरण लिहा आणि आलेख काढा. आलेखा वरुन खालील भाडे माहित करा.

   (i) तीन तासासाठी (ii) सहा तासासाठी

   (iii) रेखाने पॉर्कींग भाडे म्हणुन 80 रुपये दिले तर तिने तिची कार किती तास पार्क केली?

16. 60 कि.मी./तास या एकाच वेगाने समीरा कार चालवते. अंतर-वेळ चे आलेख काढा. आलेखावरुन समीराने खालील वेळा मध्ये प्रवास केलेले अंतर माहित करा.

   (i) $1\frac{1}{2}$ तास (ii) 2 तास (iii) $3\frac{1}{2}$ तास

17. पाण्यातील हायड्रोजन आणि ऑक्सीजनच्या अनुभार चे गुणोत्तर 1:8 आहे. हायड्रोजन आणि ऑक्सीजन मधील समीकरण लिहा आणि त्याचे आलेख काढा. आलेखावरुन जर ऑक्सीजन 12 ग्राम असेल तर हायड्रोजन चे परिमाण माहित करा. आणि जर हायड्रोजन $\frac{3}{2}$ ग्राम असेल तर ऑक्सीजन चे परिमाण किती?

   [सुचना: जर हायड्रोजन आणि ऑक्सीजन चे परिमाण अनुक्रमे 'x' आणि 'y' असेल तर $x : y = 1:8 \Rightarrow 8x = y$]

18. 28 लिटर च्या मिश्रणात दुध आणि पाण्याचे गुणोत्तर 5:2 आहे. मिश्रण आणि दुधाचे मधील समीकरण तयार करा. आलेखाच्या निरिक्षणवरुन मिश्रणातील दुधाचे परिमाण माहित करा.

   [सुचना: मिश्रण आणि दुधाचे गुणोत्तर $= 5 + 2 : 5 = 7 : 5$]

19. USA आणि कॅनडा सारख्या देशात तापमान फॅननाईट मध्ये मोजले जाते आणि भारत सारख्या देशात सेल्सीयस मध्ये मोजल्या जाते. फॅरनाईट मधुन सेल्सीयस मध्ये रुपांतरचे रेषीय समीकरण $F = \left(\frac{9}{5}\right)C + 32$

   (i) x-अक्षावर सेल्सीयस घ्या आणि Y-अक्षावर फॅरनाईट घेऊन वरील रेषीय समीकरणाचे आलेख काढा.

   (ii) जर तापमान 30°C असेल तर ते तापमान फॅरनाईट मध्ये किती असेल?

   (iii) जर तापमान 95°F तर ते तापमान सेल्सीयसमध्ये किती असेल?

   (iv) अशा एखाद्या सारख्या संख्या मध्ये तापमान आहे का जे फॅरनाईट आणि सेल्सीयसमध्ये असेल? असेल तर माहित करा.




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



## 6.5 X-अक्ष आणि Y-अक्षाला समांतर असणाऱ्या रेषेचे समीकरण

x = 3 समीकरण विचारात घेऊ या. जर हे एक चल राशीतील समीकरण असेल तर त्याचे अव्दितीय सोडवणुक x = 3 जे संख्या रेषेवरील बिंदु आहे.





जर ते दोन चल राशीतील समीकरण असेल आणि निर्देशांक प्रतलावर स्थापा त्याला x + 0.y – 3 = 0 म्हणुन व्यक्त करु शकतो.

याला अनंत उकल असतात. त्यापैकी काही माहित करु या. येथे y चे निर्देशाक शुन्य आहे. म्हणुन y च्या सर्व किमती साठी x हे 3 होते.

**उकलचा तक्ता**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| x | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | …… |
| y | 1 | 2 | 3 | –1 | –2 | –3 | ….. |
| (x, y) | (3, 1) | (3, 2) | (3, 3) | (3, –1) | (3, –2) | (3, –3) | ….. |
| बिंदु | A | B | C | D | E | F | ….. |




तक्तावरुन हे स्पष्ट होते की, (3, a) या रुपातील या समीकरणाला अनंत उकल आहेत येथे a हे वास्तविक संख्या आहे.

आता, वरील उकलीचा वापर करुन आलेख काढा. आलेख वरुन तुमच्या काय लक्षात आले?

हे सरळ रेषा आहे का? हे रेषा किंवा Y-अक्ष आहे का? काढलेली रेषा ही सरळ रेषा आहे आणि ती Y-अक्षावर समांतर आहे?

y-अक्षावरुन या रेषेचे अंतर किती आहे?

अशाप्रकारे x = 3 च्या आलेखाची रेषा y-अक्षाला त्याच्या उजव्या बाजुला 3 एकक अंतरावर समांतर आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com



## हे करा



1. i) खालील समीकरणाचे आलेख काढा.

   a) x = 2  b) x = –2  c) x = 4  d) x = –4

   ii) तिन्ही समीकरणाचे आलेख Y-अक्षाला समांतर आहे का?

   iii) प्रत्येक संदर्भात आलेख आणि Y-अक्षाचे अंतर माहित करा.

2. i) खालील समीकरणाचे आलेख काढा.

   a) y = 2  b) y = –2  c) y = 3  d) y = –3

   ii) हे सर्व X-अक्षाला समांतर आहेत का?

   iii) प्रत्येक संदर्भात X-अक्ष आणि आलेखामधील अंतर माहित करा.

**वरील निरिक्षणावरुन आपण खालील निष्कर्ष काढु शकतो.**

1. x = k च्या आलेखाची रेषा Y-अक्षाला k एकक अंतरावर समांतर आहे आणि (k, 0)या बिंदुतुन जात आहे.
2. y = k च्या आलेखाची रेषा X-अक्षाला k एकक अंतरावर समांतर आहे आणि (0, k)या बिंदुतुन जात आहे.

### 6.5.1 X-अक्ष आणि Y-अक्षाचे समीकरण

y = 0 हे समीकरण विचारात घेऊ या. याला 0.x + y = 0 लिहु शकतो. या समीकरणासाठी आलेख काढु या.

**उकलचा तक्ता**

| x | 1 | 2 | 3 | –1 | –2 | …… |
|---|---|---|---|---|---|---|
| y | 0 | 0 | 0 | 0 | 0 | ….. |
| (x, y) | (1, 0) | (2, 0) | (3, 0) | (–1, 0) | (–2, 0) | ….. |
| बिंदु | A | B | C | D | E | ….. |

आलेख कागदावर हे सर्व बिंदु स्थापल्याने, आपल्याला खालील आकृती मिळते. आलेखा वरुन आपल्याला काय लक्षात येते?


SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com






आपल्याला असे लक्षात येते की, सर्व बिंदु X-अक्षावर आहे. आणि या सर्वांचेy- निर्देशांक 0 आहे.

म्हणुन $y = 0$ समीकरण X-अक्षाला दर्शविते. दुसऱ्या शब्दातy = 0हे X-अक्षाचे समीकरण आहे.

## प्रयत्न करा.



y-अक्षाचे समीकरण माहीत करा.

## अभ्यास - 6.4



1. खालील समीकरणाचे आलेखणीय दर्शवणुक द्या.

   a) संख्यारेषे वर आणि b)कार्टेशियन प्रतलावर

   i) $x = 3$ ii) $y + 3 = 0$ iii) $y = 4$ iv) $2x - 9 = 0$

   v) $3x + 5 = 0$

2. $2x - 11 = 0$ चे आलेखनीय दर्शवणुक द्या.

   i) एक चल राशीत ii) दोन चल राशीत



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



3. $3x + 2 = 8x - 8$ या समीकरणाला सोडवा आणि उकलीला
   i) संख्या रेषेवर दर्शवा ii) कार्टेशियन प्रतल वर दर्शवा
4. X-अक्षाला समांतर असलेली आणि खालील बिंदुतुन जात असलेली रेषेची समीकरण लिहा
   i) (0, –3) ii) (0, 4) iii) (2, –5) iv) (3, 4)
5. Y-अक्षाला समांतर असलेली आणि खालील बिंदुतुन जात असलेली रेषेची समीकरण लिहा
   i) (–4, 0) ii) (2, 0) iii) (3, 5) iv) (–4, –3)
6. तिन रेषांचे समीकरण लिहा ते
   (i) X- अक्षाला समांतर असलेली (ii) Y-अक्षाला समांतर असलेली.

## आपण काय चर्चा केलो



1. दोन चल राशीत जर रेषीय समीकरण असेल तर त्याला दोन चल राशीतील रेषीय समीकरण म्हणतात.
2. ‘x’ आणि ‘y’ किंमतीची कोणतीही जोडी जे दोन चलराशीतील समीकरण समाधान करते त्यांना उकल म्हणतात.
3. दोन चल राशीतील रेषीय समीकरणाला बरेचशा उकली असतात.
4. दोन चल राशीतील प्रत्येक रेषीय समीकरणाचा आलेख सरळ रेषा असते.
5. $y = mx$ सारखे समीकरण रेषाला दर्शविते आणि आरंभबिंदुतुन जाते.
6. $x = k$ च्या आलेखाची रेषा Y -अक्षाला k एकक अंतरावर समांतर आहे आणि(k, 0) या बिंदुतनु जाते.
7. $y = k$ च्या आलेखाची रेषा X-अक्षाला k एकक अंतरावर समांतर आहे आणि(0, k) या बिंदुतुन जाते.
8. X-अक्षाचे समीकरण $y = 0$ आहे.
9. Y-अक्षाचे समीकरण $x = 0$ आहे.





Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# 07 त्रिकोण

SCERT TELANGANA

## 7.1 प्रस्तावना


आपण रेषांनी आणि वक्रांनी काही आकृत्या काढल्या आहेत. आणि त्यांच्या गुणधर्मांचा अभ्यास केला आहे. तुम्हाला माहित आहे का, दिलेल्या लांबीचा वापर करुन रेषाखंड कसे काढायचे? सर्व रेषाखंड आकारात सारखे नसतात. ते वेगवेगळ्या लांबीचे असतात. आपण वर्तुळ देखील काढु शकतो. तुम्हाला वर्तुळ काढण्यासाठी कशाची गरज भासली आणि काय माप घेतले? ते म्हणजे वर्तुळाचा व्यासार्ध आहे. आपण समान कोन दिलेल्या कोनाच्या समान काढु शकतो.

आपणास माहित आहे की, जर दोन रेषाखंडाची लांबी समान असेल तर ते एकरुप असतात.




$\overline{AB} \cong \overline{CD}$ (एकरुप) $\qquad$ $\overline{PQ} \ncong \overline{RS}$ (एकरुप नाही)

दोन त्रिकोण एकरुप असतात जर त्यांच्या कोणाचे माप समान असतील




$\angle AOB \cong \angle POQ$ (एकरुप) $\qquad$ $\angle XYZ \ncong \angle DEF$ (एकरुप नाही)

वरील उदाहरण वरुन आपण सांगु शकतो की, दिलेल्या आकृत्या काढण्यासाठी किंवा तपासणीसाठी की ते आकारात समान आहेत आपणास त्यांच्या आकृतीबद्दल मोजकी आणि महत्वाची माहितीची गरज असते.

चला आता एक चौरस गृहीत धरु: यासाठी कोणत्या कमीत कमी माहिती गरज आहे? दोन चौरस एकाच आकाराचे आहेत. की नाहीत.

सत्या म्हणला- " मला फक्त दिलेल्या चौरसाची बाजुचे माप गरज आहे. जर दिलेल्या चौरसाच्या बाजु समान असतील तर चौरस एकच मापाचे असतात".


Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



श्री म्हणाली " ते बरोबर आहे परंतु जर दोन चौरसाचे कर्ण समान असतील तर आपण म्हणु शकतो की, दिलेले चौरस एक सारखे आणि आकारात सारखे आहेत.".

तुम्ही विचार करता का ते दोन्ही बरोबर आहेत?





चौरसाच्या गुणधर्मांना पुन्हा आठवण करा. सारखे माप असलेल्या बाजुंना घेऊन तुम्ही दोन वेगवेगळे चौरस काढु शकत नाही. काढु शकता का? आणि चौरसाचे कर्ण समान असतात जेव्हा त्यांच्या बाजु समान असतात. दिलेली आकृती पहा.

ज्या आकृत्या आकारात आणि रुपात मध्ये सारख्या असतात. त्यांना एकरुप आकृत्या म्हणतात. (एकरुपता म्हणजे सर्व क्षेत्रात समान असते.) म्हणुन चौरस ज्यांना समान बाजु समान मापा बरोबर असलेल्या आकृतीला एकरुप म्हणतात आणि समान कर्ण असलेल्यांना देखील एकरुप म्हणतो.

**सुचना:** साधारण पणे, बाजु आकार निश्चित करतात आणि आकार कोन निश्चित करतात.


आपणास माहित आहे जर दोन चौरस एकरुप आहेत आणि त्यातील एकाला आपण कापुन कागदावर घेतले आणि त्याला दुसऱ्यावर ठेवले तर ते दुसऱ्याला एकदम व्यापुन घेते.

नंतर आपण सांगु शकतो बाजु, कर्ण, कोन, अनुक्रमे एका चौरसाचे दुसऱ्या चौरसाच्या बाजु, कोन आणि कर्ण या बरोबर असतात.



(i)

आता चला दोन त्रिकोणाची एकरुपता गृहीत धरा. आपणास माहित आहे की, जर दोन त्रिकोण एकरुप आहेत तर एका त्रिकोणाच्या बाजु आणि कोन दुसऱ्या चौरसाच्या संगत बाजु आणि कोनाच्या समान असतात. खालील दिलेल्या कोन त्रिकोण, ABC त्रिकोणाच्या एकरुप आहे.




जर आपण हे त्रिकोण आकृती.(ii) ते (v) पर्यंत काढुन घेतल्या जर आणि $\Delta ABC$ ला व्याप्त करण्याचा प्रयत्न करा. आपणास आढळुन येईल की, आकृती (ii), (iii) आणि (iv) हे एकरुप आहेत. तर $\Delta TSU$ आकृती (v) मध्ये $\Delta ABC$ बरोबर एकरुप नाही. जर $\Delta ABC$. हे बरोबर एकरुप नाही.

जर $\Delta PQR$ हे $\Delta ABC$ बरोबर एकरुप नाही तर आपण $\Delta PQR \cong \Delta ABC$ लिहितो.

निरिक्षण करा की,$\Delta PQR \cong \Delta ABC$ नंतर $\Delta PQR$ च्या बाजु $\Delta ABC$ च्या संगत बाजु व्याप्त करा आणि कोन करा.

म्हणजे $PQ$, $AB$ वर $QR$, $BC$ वर आणि $RP$, $CA$ वर $\angle P$, $\angle A$ ला $\angle Q$, $\angle B$ आणि $\angle R$, $\angle C$ ला झाकतो, देखील एकसंग संगती शिरोंबिंदु मध्ये आहेत. म्हणजे P हा A सी संगत Q, B शी R, C शी संगत असतो आणि खालील प्रमाणे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



$P \leftrightarrow A, Q \leftrightarrow B, R \leftrightarrow C$ असे दर्शवितो.

संगत क्रमावारच्या मध्ये नोंद करा, $\Delta PQR \cong \Delta ABC$ परंतु हे लिहिने बरोबर राहणार नाही. $\Delta QRP \cong \Delta ABC$ जसे आपणास येते $QR = AB$, $RP = BC$ आणि $QP = AC$ जे की, दिलेल्या आकृतीसाठी बरोबर नाही.

त्याच प्रमाणे आकृती (iii) साठी

$FD \leftrightarrow AB, DE \leftrightarrow BC$ आणि $EF \leftrightarrow CA$

आणि $F \leftrightarrow A, D \leftrightarrow B$ आणि $E \leftrightarrow C$

म्हणुन $\Delta FDE \cong \Delta ABC$ परंतु $\Delta DEF \cong \Delta ABC$ असे लिहने बरोबर नाही.

आता, तुम्ही आकृती (iv) मध्ये आणि $\Delta ABC$ मध्ये असलेल्या संबंध द्या.

म्हणुन हे गरजेच आहे की, त्रिकोणाच्या एकरुपतेसाठी शिरोबिंदुचे बरोबर लिहणे आणि त्याचा एकमेकांशी संगत लिहणे.

नोंद करा की, एकरुप त्रिकोणाचे संगत बाजु हे समान असतात. आणि त्याला संक्षिप्त मध्ये 'CPCT' असे लिहतात. हे त्रिकोणाच्या संगत भागाच्या एकरुपते साठी लिहतो.

## हे करा




1. खाली काही विधाने दिले आहेत ते बरोबर किंवा चुक आहेत ते लिहा.
   - i. दोन वर्तुळ नेहमी एकरुप असतात. ( )
   - ii. सारख्या लांबीचे दोन रेषाखंड नेहमी एकरुप असतात. ( )
   - iii. दोन काटकोन त्रिकोण काही वेळी एकरुप असतात. ( )
   - iv. सर्व बाजु समान असलेल्या समबाहु त्रिकोण नेहमी एकरुप असते. ( )
2. कोणते कमीत कमी माप तपासणी करण्यासाठी आवश्यक आहेत जर दिलेल्या आकृत्या एकरुप आहेत.
   - i. दोन आयत
   - ii. दोन समांतर चौकोन

## 7.2 त्रिकोणाच्या एकरुपते साठी

तुम्ही शिकला आहात की, मागील वर्गात त्रिकोणाची एकरुपता कशी असते.

तिनीही बाजु माहित होणे एकरुप बनविण्यासाठी हवे आहेत का?

एक बाजु 4 से.मी. घेऊन एक त्रिकोण काढा. तुम्ही एक बाजु 4 से.मी. घेऊन वेगवेगळे त्रिकोण काढु शकता का? तुम्ही तुमच्या वर्ग मित्रासोबत काढा. तुम्हाला सर्व त्रिकोण एकरुप काढता येते का? तुम्ही काढु शता की, वेगवेगळ्या प्रकारचे त्रिकोणाची बाजु जर एक बाजु त्रिकोणाला एकरुप बनवु शकतो का? जर दिलेली बाजु 4 से.मी. होतो.







SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




आता, 4 से.मी. आणि 5 से.मी बाजु घ्या आणि जेवढे त्रिकोण तुम्ही काढु शकता का?




तेवढे त्रिकोण तुम्ही काढा. तुम्हाला एकरुप त्रिकोण काढता येतात का?


आपणास याच दोन मापा सोबत वेगवेगळे त्रिकोण काढता येतात का? आता 4 से.मी. आणि 7 से.मी, 8 से.मी. बरोबर त्रिकोण काढा. तुम्ही दोन वेगवेगळ्या त्रिकोण काढु शकता का? आपण दिलल्या तिन मापाला वापरुन एकच प्रकारचा त्रिकोण काढु शकतो. जर तुम्ही याच मापांना वापरुन एक त्रिकोण काढला. तर तो एकाच त्रिकोणाशी एकरुप होईल.





आता, तुमच्या आवडीचे तिन त्रिकोण घ्या. बिलकुल कोनाची बेरीज $180^0$ झाली पाहिजे, तुमच्या कोनाच्या मापाने दोन त्रिकोण काढा.

तिन कोनाचे माप वापरुन महिमाने वेगवेगळ्या प्रकारचे त्रिकोण माहित करते.

$\angle A = 50°$, $\angle B = 70°$, $\angle C = 60°$




म्हणुन हे दिसुन पडते की, तिन कोन त्रिकोण काढण्यासाठी पुरे नाहीत.


शरीफ ने विचार केला जर दोन कोन दिले आहेत नंतर तो कोनाची एकुण बेरीज चा गुणधर्म वापरुन तिसरा कोन माहित करु शकतो म्हणुन एक त्रिकोन काढण्यासाठी दोन कोनांचीच गरज आहे परंतु ते एक सारखे नसले पाहिजे. म्हणुन 3 किंवा 2 कोन पुरेशी नाहीत. आपणास तिन स्वतंत्र मापणाची गरज आहे (घटक) एक एकच त्रिकोण काढण्यासाठी आहे.


आता, दोन भिन्न त्रिकोण काढण्याचा प्रमाण करा प्रत्येकी या तिन मापाचा वापर करुन माहित करा


i. $\Delta ABC$ जेथे $AB = 5$ से.मी., $BC = 8$ से.मी., $\angle C = 30°$

ii. $\Delta ABC$ जेथे $AB = 5$ से.मी., $BC = 8$ से.मी., $\angle B = 30°$

(i) तुम्ही विशिष्ट त्रिकोण काढण्यासाठी समर्थ आहात का? दिलेल्या मापाचा वापर करुन त्रिकोन काढा, तपासणी करा आणि तुमच्या मित्रा सोबत चर्चा करा.







Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



येथें आपण दोन वेगवेगळे त्रिकोण काढु शकतो. ∆ABC आणि ∆A′BC दिलेल्या मापाचा वापर करुन काढा. आता दिलेल्या माहितीचा वापर करुन दोन त्रिकोण काढा. (ii) तुम्हाला काय आढळुन येईल? ते एकरुप त्रिकोण आहेत का नाही?




दुसऱ्या शब्दात संदर्भ (ii) मधील दिलेल्या मापाचा वापर करुन तुम्ही विशिष्ट त्रिकोण काढु शकता. तुम्ही संदर्भ (i) आणि संदर्भ (ii) मधील क्रमाचा विचार करा. संदर्भ (1) मध्ये दोन बाजु आणि एक कोन दिलेले आहेत. ते सामविष्ठ कोन नाही परंतु संदर्भ (11) मध्ये समाविष्ठ कोनाबरोबर दोन बाजु दिलेल्या आहेत. अशा प्रकारे दिलेल्या दोन बाजु आणि एक कोन म्हणजे तिन स्वतंत्र माप हा एकच त्रिकोन काढण्याचा आधार आहे. परंतु दिलेल्या मापाचा क्रम त्रिकोणाची रचना करण्याकरीता देखील एक महत्वाची पात्र एकच त्रिकोण तयार करण्यासाठी आहे.

## 7.3 त्रिकोणाची एकरुपता.

त्रिकोनाची एकरुपतेची तपासणी करण्यासाठी वरील तात्पर्य वापरतो. जर आपणास दोन त्रिकोण आहेत. एका बाजु बरोबर समान किंवा दोन त्रिकोण तिन सर्व कोनासमान आपण ते त्रिकोन समाविष्ठ करु शकत नाही. आपणास या मापाव्दारे ठराविक एक त्रिकोण काढण्याची शक्यता असते. जर आपणास दोन बाजु आहेत आणि एक कोन आहे आपण म्हणु शकत नाही की त्रिकोण एकरुप नाहीत जोपर्यंत दोन बाजु मधील कोन दिलेले नाहीत. आपण असे सांगु शकतो की, (SAS बाजु कोन बाजु)एकरुपतेचा नियम लागु पडतो.परंतु SSA किंवा ASS ला नाही.


आपणास त्रिकोणाच्या एकरुपतेचा पहिला आधार समजतो आणि दुसरा आधार या व्दारे सिध्द करतो.

**स्वंय सिध्द (SAS एकरुपतेचा नियम):** दोन त्रिकोण एकरुप आहेत जर दोन बाजु आणि एक समाविष्ठ कोन दुसऱ्या त्रिकोणाच्या दोन बाजु आणि एक समाविष्ठ कोनाच्या बरोबर असतात.

उदाहरण1: दिलेल्या आकृतीत AB आणि CD या रेषा 'O'बिंदु जवळ छेदन करतात. OA = OB आणि OD = OC तर दाखवा

(i) ∆AOD ≅ ∆BOC आणि (ii) AD || BC.

सोडवणुक: (i)तुम्ही निरिक्षण करु शकता की, ∆AOD आणि ∆BOC,




OA = OB (दिले आहे)

OD = OC (दिले आहे)

देखील म्हणुन ∠AOD आणि ∠BOC विरुध्द लंब जोडीचे कोन तयार होतात आपणास माहित आहे की,

∠AOD = ∠BOC.

म्हणुन, ∆AOD ≅ ∆BOC ( SAS एकरुपतेच्या नियमाव्दारे)

(ii) AOD आणि BOC एकरुप त्रिकोणात दुसरे संगत भाग देखील समान असतात.

म्हणुन ∠OAD = ∠OBC आणि हे जोडीचे पर्यायी त्रिकोण रेषाखंड AD आणिBCसाठी तयार करतात.

म्हणुन AD || BC




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



उदाहरण 2: AB एक रेषाखंड आहे आणि $l$ ही त्याचा लंब दुभाजक आहे. जर बिंदु P हा रेषा $l$ वर आहे तर दाखवा की P हा A आणि B पासुन समअंतरावर आहे.

सोडवणुक: रेषा $l \perp AB$ आणि C मधुन जाते जे की AB चा मध्य बिंदु आहे.




आपणास दाखवयाचे आहे की, PA = PB.

गृहीत धरा $\Delta PCA$ आणि $\Delta PCB$.

आपणास AC = BC (C हा AB चा मध्य बिंदु आहे.)

$\angle PCA = \angle PCB = 90°$ (दिलेले आहे)

PC = PC (साधारण)


म्हणुन, $\Delta PCA \cong \Delta PCB$ (SAS नियम)

आणि, PA = PB, ते एकरुप त्रिकोणाच्या संगत बाजु आहेत.

## हे करा




1. खालील त्रिकोण एकरुप आहेत का नाही हे सांगा? तुमच्या उत्तराचे कारणे द्या.




2. दिलेल्या आकृतीत बिंदु P हा AB आणि DC ला दुभाजतो. सिध्द करा.

$\Delta APC \cong \Delta BPD$




### 7.3.1 एकरुपतेचे दुसरे नियम

दोन त्रिकोणाची रचना करण्याचा प्रयत्न करा ज्यामध्ये दोन कोन $50^0$ आणि $55^0$ आहेत आणि बाजु ज्यावर दोन्ही कोण पडतात. ती 5 से.मी. आहे.


या त्रिकोणांना कापा आणि एकावर दुसरे ठेवा. तुम्हाला काय आढळुन येईल? तुम्हाला माहित होईल की, दोन्ही त्रिकोण एकरुप आहेत. हा निकाल कोन- बाजु - कोन एकरुपतेचा आधार आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com






आणि त्याला ASA असे लिहले जाते. तुम्ही याला मागील वर्गात पाहिले असाल. आता चला सांगा आणि निकाल सिध्द करा. म्हणुन हा निकाल सिध्द करता येतो. याला एक प्रमेय म्हणतात. आणि याला सिध्द करा. आपण SAS स्वयंसिध्द चा नियम एकरुपतेचा वापर करण्यासाठी आहे.

**प्रमेय** 7.1 (ASA एकरुपतेचा नियम ) : दोन त्रिकोण एकरुप आहेत जर दोन कोन आणि एक समाविष्ठ बाजु आणि दुसऱ्या त्रिकोणाचे दोन कोन आणि समाविष्ठ बाजुच्या समान असतात.

दिले आहे $\Delta ABC$ आणि $\Delta DEF$ मध्ये

$\angle B = \angle E, \angle C = \angle F$ आणि $\overline{BC} = \overline{EF}$


सिध्दता: (RTP): $\Delta ABC \cong \Delta DEF$

सिध्द करा: तिन शक्यता आहेत. $\overline{AB}$ आणि $\overline{DE}$ मधील शक्यता आहे. $\overline{AB} > \overline{DE}$ किंवा $\overline{DE} > \overline{AB}$ किंवा $\overline{DE} = \overline{AB}$.

आपण सर्व संदर्भ गृहीत धरु या आणि $\Delta ABC$ आर्णि $\Delta DEF$ चा अर्थ काय आहे.

संदर्भ (i): समजा $\overline{AB} = \overline{DE}$ आता तुम्ही काय निरिक्षण करता?

गृहीत धरा $\Delta ABC$ आणि $\Delta DEF$




$\overline{AB} = \overline{DE}$ (समजले)

$\angle B = \angle E$ (दिले आहे)


$\overline{BC} = \overline{EF}$ (दिले आहे)

म्हणुन $\Delta ABC \cong \Delta DEF$ ( SAS एकरुपतेचा नियम )

संदर्भ (ii): दुसरी शक्यता $AB > DE$ आहे.

म्हणुन आपण बिंदु P हा AB वर छेदु शकतो. अशाप्रकारे की, $PB = DE$.

आता गृहीत धरा $\Delta PBC$ आणि $\Delta DEF$




$\overline{PB} = \overline{DE}$ (रचनेव्दारे)

$\angle B = \angle E$ (दिले आहे)

$\overline{BC} = \overline{EF}$ (दिले आहे)

म्हणुन $\Delta PBC \cong \Delta DEF$( SAS एकरुपतेचा नियमाव्दारे)

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



कारण त्रिकोण एकरुप आहेत म्हणुन त्यांचे संगत भाग समान आहेत.

म्हणुन $\angle PCB = \angle DFE$

परंतु $\angle ACB = \angle DFE$ (दिले आहे)

म्हणुन $\angle ACB = \angle PCB$ (वरील प्रमाणे)


हे शक्य आहे का?

हे शक्य आहे फक्त जर P ला A बरोबर तंतोतंत घेत असेल तर

(किंवा) $\overline{BA} = \overline{ED}$

म्हणुन $\Delta ABC \cong \Delta DEF$ ( SAS एकरुपतेच्या नियमाव्दारे )

(सुचना: आपण वरील दाखविले की, जर $\angle B = \angle E$ आणि $\angle C = \angle F$ आणि $\overline{BC} = \overline{EF}$ नंतर $\overline{AB} = \overline{DE}$ आणि दोन त्रिकोण एकरुप आहेत SAS नियमाव्दारे)




संदर्भ (iii): तिसरी शक्यता ही आहे की, $\overline{AB} < \overline{DE}$

आपण बिंदु M हा DE वर अशाप्रकारे निवडा की, ME = AB होते. आणि वादावरुन संदर्भ (ii) मध्ये दिल्याप्रमाणे वारंवार करा. आपण निष्कर्श काढु शकतो की, $\overline{AB} = \overline{DE}$ आणि म्हणुन, $\Delta ABC \cong \Delta DEF$. खालील आकृतीकडे पहा आणि स्वत:हा सिध्द करण्याचा प्रयत्न करा.

समजा, दोन त्रिकोणातील कोनांच्या जोड्या आणि एक समान बाजुंची जोडी समान असते. परंतु ती बाजु त्रिकोणाच्या समान संगत जोडीमध्ये नसते आता ते त्रिकोण एकरुप आहेत का? ते एकरुप आहेत असे तुम्हाला दिसुन येते. याच कारण सांगु शकता का?

तुम्हाला माहित आहे की, त्रिकोणाच्या तिन कोनांची बेरीज $180^0$ असते म्हणुन जर कोणतेही दोन जोडीचे /कोन आणि एक जोडीची बाजु समान असतात. त्यास को.को.बा. एकरुपतेचे नियम म्हणतो. चला काही उदाहरणे घेऊ या.

उदाहरण-3: दिलेल्या आकृतीत AB|| DC आणि AD|| BC

दाखवा की, $\Delta ABC \cong \Delta CDA$


सोडवणुक: गृहीत धरा की, $\Delta ABC$ आणि $\Delta CDA$

$\angle BAC = \angle DCA$ (पर्यायी अंतर ठेवा)

AC = CA (सामान्य बाजु)

$\angle BCA = \angle DAC$ (पर्यायी अंतर कोन)

$\Delta ABC \cong \Delta CDA$( ASA एकरुपतेचा नियमाव्दारे)







Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



उदाहरण-4: दिलेल्या आकृतीत $AL \parallel DC$ आहे.E हा BC चा मध्यबिंदु आहे.तर $\Delta EBL \cong \Delta ECD$ दाखवा.

सोडवणुक:गृहीत धरा की,$\Delta EBL$ आणि $\Delta ECD$





$\angle BEL = \angle CED$ (लंब विरुध्द कोन)

$BE = CE$ (म्हणुन E हा BC चा मध्य बिंदु आहे.)

$\angle EBL = \angle ECD$ (पर्यायी अंतर कोन)

$\Delta EBL \cong \Delta ECD$ (ASA एकरुपतेच्या नियमाव्दारे )

उदाहरण-5: बाजुला दिलेल्या आकृतीमधील माहिती वापरा आणि सिध्द करा.




(i) $\Delta DBC \cong \Delta EAC$


(ii) $DC = EC$.

सोडवणुक: समजा $\angle ACD = \angle BCE = x$

$\therefore \angle ACE = \angle DCE + \angle ACD = \angle DCE + x$ ...... (i)

$\therefore \angle BCD = \angle DCE + \angle BCE = \angle DCE + x$ ...... (ii)

(i) आणि (ii) पासुन, आपणास येते की, $\angle ACE = \angle BCD$





आता $\Delta DBC$ आणि $\Delta EAC$,

$\angle ACE = \angle BCD$ (वर सिध्द केले आहे)

$BC = AC$ (दिलेले आहे)

$\angle CBD = \angle EAC$ (दिलेले आहे)





$\Delta DBC \cong \Delta EAC$ [ A.S.Aवरुन]

म्हणुन $\Delta DBC \cong \Delta EAC$

$DC = EC$.( CPCT वरुन )

उदाहरण-6: रेषा खंड AB हे दुसऱ्या रेषाखंडाला CD ला समांतर आहे. O हा AD चा मध्य बिंदु आहे.




(i) $\Delta AOB \cong \Delta DOC$ (ii) O हा देखील BC चा मध्यबिंदु आहे.

सोडवणुक: (i) गृहीत धरा की, $\Delta AOB$ आणि $\Delta DOC$.

$\angle ABO = \angle DCO$ ( पर्यायी कोन जसे $AB \parallel CD$ आणि BC एक छेदीत रेषा)

$\angle AOB = \angle DOC$ (लंब विरुध्द बाजु)

$OA = OD$ (दिलेले आहे)



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



म्हणुन $\Delta AOB \cong \Delta DOC$ (AAS नियमाव्दारे )


(ii) $OB = OC$ (CPCT)

म्हणुन O हा BC चा मध्य बिंदु आहे.


## अभ्यास - 7.1




1. ACBD चौकोनात $AC = AD$ आणि $\angle A$ ला AB दुभाजते तर $\Delta ABC \cong \Delta ABD$ दाखवा.
तुम्ही BC आणि BD बद्दल काय सांगु शकता ?





2. ABCD एक चौकोण आहे ज्यामध्ये $AD = BC$ आणि $\angle DAB = \angle CBA$ सिध्द करा की,
   (i) $\Delta ABD \cong \Delta BAC$
   (ii) $BD = AC$
   (iii) $\angle ABD = \angle BAC$





3. AD आणि BC समान आहेत आणि AB रेषा खंडाला लंब आहे. तर CD , AB ला दुभाजते हे दाखवा.




4. $l$ आणि $m$ दोन समांतर रेषा आहेत अणि दुसऱ्या p आणि q जोडी समांतर रेषांनी छेदन करता तर दाखवा की,$\Delta ABC \cong \Delta CDA$




5. बाजुच्या आकृतीमध्ये $AC = AE, AB = AD$ आणि $\angle BAD = \angle EAC$ दाखवा की, $BC = DE$.




SCERT TELANGANA




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



6. काटकोन त्रिकोण ABC मध्ये काटकोण C बिंदु जवळ आहे. M हा कर्ण AB चा मध्य बिंदु आहे. C ला M बरोबर जोडा आणि D पर्यंत वाढवा. अशाप्रकारे की, DM = CM. D बिंदुला B बिंदु सोबत जोडले (आकृती पहा) तर दाखवा की,





(i) $\Delta AMC \cong \Delta BMD$

(ii) $\angle DBC$ काटकोण त्रिकोण आहे.

(iii) $\Delta DBC \cong \Delta ACB$


(iv) $CM = \frac{1}{2} AB$

7. बाजुच्या आकृतीमध्ये ABCD हा एक चौरस आहे आणि $\Delta APB$ एक समबाहु त्रिकोण आहे. तर सिध्द करा की, $\Delta APD \cong \Delta BPC$.





(सुचना : $\Delta APD$ मध्ये आणि $\Delta BPC$ $\overline{AD} = \overline{BC}$, $\overline{AP} = \overline{BP}$ आणि $\angle PAD = \angle PBC = 90^o - 60^o = 30^o$]

8. बाजुच्या आकृतीमध्ये $\Delta ABC$ एक समद्विभुज त्रिकोण आहे. ज्यामध्ये $\overline{AB} = \overline{AC}$, $\overline{BA}$ आणि $\overline{CA}$ ना वाढवुन Q आणि P पर्यंत अशाप्रकारे की, $\overline{AQ} = \overline{AP}$ दाखवा की, $\overline{PB} = \overline{QC}$




(सुचना : $\Delta APB$ आणि $\Delta ACQ$ ची तुलना करा)





9. बाजुच्या आकृतीमध्ये $\Delta ABC$, D हा BC चा मध्य बिंदु आहे. $DE \perp AB$, $DF \perp AC$ तर $DE = DF$ दाखवा $\Delta BED \cong \Delta CFD$.

10. त्रिकोणाच्या कोणाचा दुभाजक देखील विरुध्द बाजुला दुभागले तर सिध्द करा की, त्रिकोण हा समद्विभुज आहे.

11. दिलेल्या आकृतीमध्ये ABC हा काटकोण त्रिकोण आहे. आणि B जवळ काटकोण अशा प्रकारे आहे की $\angle BCA = 2\angle BAC$ तर दाखवा $AC = 2BC$.

(सुचना : CB ला D बिंदु पर्यंत अशाप्रकारे वाढवा की, $BC = BD$)




## 7.4 त्रिकोणाचे काही गुणधर्म

वरील विभागात तुम्ही दोन criteria शिकलो आहोत ते म्हणजे त्रिकोणाच्या एकरुपतेसाठी चला आता या निकालाला काही गुणधर्मांचा अभ्यास करण्यासाठी वापरु या जे की, दोन बाजु समान असलेल्या त्रिकोणाच्या समान आहेत.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com




## कृती




i. कंम्पासाचा वापर करुन एका त्रिकोणाची रचना करण्यासाठी कोणतेही माप घ्या आणि एक रेषाखंड AB काढा. आता पुरेसी अशी लांबी कंम्पास ला उघडुन घ्या आणि त्याला A आणि B वर ठेवा आणि एक चाप काढा. तुम्हाला कोणत्या प्रकारचा त्रिकोण येईल? हो हा समव्दिभुज त्रिकोण आहे. म्हणुन आकृतीमध्ये $\Delta ABC$ हा समव्दिभुज त्रिकोण आहे जेथे $AC = BC$ आता $\angle A$ आणि $\angle B$ चे माप करा तुम्हाला काय दिसुन येते?






ii. काही समव्दिभुज त्रिकोण मोडा.
आता त्रिकोणाला दुमडा अशा प्रकारे की, दोन एकरुप बाजु मजबुत एका बाजुवर दुसरी बाजु बसेल. तुम्ही $\angle A$ आणि $\angle B$ चे काय निरिक्षण करणार सांगा.
तूम्ही निरिक्षण करणार की, प्रत्येक त्रिकोणात समान बाजुच्या विरुध्दात असलेले कोण समान असतात हा खुप महत्वाचा निकाल आहे. आणि हा कोणत्याही समव्दिभुज त्रिकोणासाठी एकदम सत्य आहे. याला खाली दाखविल्याप्रमाणे सिध्द करता येते.

प्रमेय -7.2: समव्दिभुज त्रिकोणाच्या समान बाजुच्या विरुध्दात असलेले कोण समान असतात.
हा निकाल बरेचशा मार्गाने सिध्द करता येतो त्यातील एक सिध्दता खाली येथे दिली आहे.




दिलेले आहे: $\Delta ABC$ एक समव्दिभुज त्रिकोण आहे ज्यामध्ये $AB = AC$.
सिध्दता: $\angle B = \angle C$.

रचना: चला $\angle A$ चा दुभाजक काढा आणि दुभ्राजक $\angle A$ आणि BC चा छेदन बिंदु D आहे.

**सिध्द करणे:** $\Delta BAD$ मध्ये आणि $\Delta CAD$ मध्ये

| | |
|---|---|
| $AB = AC$ | (दिले आहे) |
| $\angle BAD = \angle CAD$ | (रचनेव्दारे) |
| $AD = AD$ | (सामान्य) |
| So, $\Delta BAD \cong \Delta CAD$ | (SAS एकरुपतेचा गुणधर्म) |
| So, $\angle ABD = \angle ACD$ | ( CPCT व्दारे ) |
| i.e., $\angle B = \angle C$ | (समान कोन) |



SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com




याचा व्यत्यास देखील बरोबर आहे का? ते आहे,जर एका त्रिकोणाचे दोन कोण समान असतील तर आपण एक निष्कर्ष काढु शकतो का त्यांच्या विरुध्दात बाजु देखील समान असतात

## कृती

1. एका कागदावर 6 से.मी. लांबी असलेली BC एक रेषा खंड काढा.
2. शिरोबिंदु B आणि C पासुन $60^0$ कोनाने प्रत्येकी A किरणे काढा. जेथे ते मिळतात. त्यांना नावे द्या.
3. कागदाला अशाप्रकारे दुमडा की, B आणि C एकमेकांवर मजबुत बसेल तुम्हाला काय आढळुन येईल? AB = AC आहे का?





कोण ∠B आणि ∠C च्या ऐवजी वेगवेगळ्या कोण घेऊन या कृतीला पुन्हा करा. प्रत्येक वेळी तुम्हाला आढळुन येईल की, समान कोणाच्या विरुध्द बाजुला असलेल्या बाजु समान असतात. म्हणुन आपणास खालील प्रमाणे आढळते.




प्रमेय-7.3: एका त्रिकोणाच्या समान कोणाच्या विरुध्दात असलेल्या बाजु समान असतात.

हे मागील प्रमेयाचा व्यत्यास आहे. विद्यार्थ्यांना उपदेश दिला आहे. की याला एएसए एकरुपतेचा नियम वापरुन सिध्द करा.

उदाहरण-7: ΔABC मध्ये A चा दुभाजक AD हा BC बाजुला लंब आहे. म्हणुन दाखवा की, AB = AC आणि ΔABC समव्दिभुज त्रिकोण




उदाहरण: ΔABD आणि ΔACD मध्ये

∠BAD = ∠CAD (दिले आहे)


AD = AD (समान बाजु)

∠ADB = ∠ADC = 90° (दिले आहे)

म्हणुन ΔABD ≅ ΔACD (ASA नियम)


म्हणुन AB = AC (CPCT)

किंवा ΔABC समव्दिभुज त्रिकोण आहे.




उदाहरण-8: बाजुच्या आकृतीमध्ये AB = BC आणि AC = CD. सिध्द करा की, ∠BAD : ∠ADB = 3 : 1.

सोडवणुक: समजा ∠ADB = x






Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com





$\Delta ACD$ मध्ये $AC = CD$

$\Rightarrow \angle CAD = \angle CDA = x$

आणि बाह्य $\angle ACB = \angle CAD + \angle CDA$

$= x + x = 2x$

$\Rightarrow \angle BAC = \angle ACB = 2x.$ ($\because$ In ABC, AB = BC)

$\therefore \angle BAD = \angle BAC + \angle CAD$

$= 2x + x = 3x$


आणि $\dfrac{\angle BAD}{\angle ADB} = \dfrac{3x}{x} = \dfrac{3}{1}$

म्हणजेच $\angle BAD : \angle ADB = 3 : 1.$

म्हणुन सिध्द झाले आहे.

उदाहरण-9: दिलेल्या आकृती मध्ये AD हे BC ला लंब आहे आणि EF || BC जर $\angle EAB = \angle FAC$ दाखवा की त्रिकोण ABD आणि ACD हे एकरुप त्रिकोण आहेत.

देखील x आणि y ची किंमत माहित करा जर $AB = 2x + 3$, $AC = 3y + 1$, $BD = x$ आणि $DC = y + 1$.




सोडवणुक: AD हे EF ला लंब आहे.

$\Rightarrow \angle EAD = \angle FAD = 90^0$

$\angle EAB = \angle FAC$ (दिले आहे)

$\Rightarrow \angle EAD - \angle EAB = \angle FAD - \angle FAC$

$\Rightarrow \angle BAD = \angle CAD$

$\Delta ABD$ आणि $\Delta ACD$ मध्ये

$\angle BAD = \angle CAD$ (वर सिध्द केले आहे)

$\angle ADB = \angle ADC = 90^0$ [दिले आहे की, AD हे BC वर लंब आहे.]

आणि $AD = AD$

$\therefore \Delta ABD \cong \Delta ACD$ [ASA व्दारे]

म्हणुन सिध्द झाले आहे.

$\angle ABD = \angle ACD \Rightarrow AB = AC$ आणि $BD = CD$ [C.P.C.T व्दारे]

$\Rightarrow 2x + 3 = 3y + 1$ आणि $x = y + 1$

$\Rightarrow 2x - 3y = -2$ आणि $x - y = 1$

मांडणी केल्याने $x = 1 + y$

$2(1+y) - 3y = -2$

$2 + 2y - 3y = -2$

$-y = -2 - 2$

$-y = -4$

मांडणी केल्याने $y = 4$ मध्ये $x = 1 + y$

$x = 1 + 4$

$x = 5$




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



उदाहरण-10: एका त्रिकोणाचे E आणि F हे क्रमवार समान असेलेल्या बाजु AB आणि AC चे मध्ये बिंदु $\Delta ABC$ (आकृती पहा)

दाखवा की, $BF = CE$




उदाहरण: $\Delta ABF$ आणि $\Delta ACE$ मध्ये

$AB = AC$ (दिले आहे)

$\angle A = \angle A$ (समान कोन)

$AF = AE$ (समान बाजुचे अर्धे भाग)

म्हणुन $\Delta ABF \cong \Delta ACE$ (SAS नियम )

म्हणुनच $BF = CE$ (CPCT)

उदाहरण-11: एका समव्दिभुज त्रिकोण ABC मध्ये $AB = AC$, D आणि E बिंदु BC वर अशाप्रकारे आहेत की, $BE = CD$ (आकृती पहा) दाखवा की, $AD = AE$,

उदाहरण: $\Delta ABD$ आणि $\Delta ACE$ मध्ये

$AB = AC$ (दिले आहे) ........... (1)

$\angle B = \angle C$ (समान बाजु विरुध्दात असलेले कोन) ........... (2)


देखील $BE = CD$

म्हणुन $BE - DE = CD - DE$

ते म्हणजे $BD = CE$ (3)

म्हणुन $\Delta ABD \cong \Delta ACE$

( (1), (2), (3) आणि SAS नियम यांना वापरुन)





हे देते $AD = AE$ (CPCT)

## अभ्यास - 7.2




1. समव्दिभुज त्रिकोण ABC, मध्ये $AB = AC$, $\angle B$ आणि $\angle C$ चे दुभाजक ऐकमेकांस O बिंदु जवळ छेदतात. A पासुन O पर्यंत जोडा.

   (i) $OB = OC$ (ii) $\angle A$ ला AO दुभाजते.




2. $\Delta ABC$,मध्ये AD हे BC चा लंब दुभाजक आहे. (बाजुच्या आकृती पहा) दाखवा की, $\Delta ABC$ हा समव्दिभुज त्रिकोण आहे. ज्यामध्ये $AB = AC$.







Downloaded from https:// www.studiestoday.com


SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com



3. ABC एक समव्दिभुज त्रिकोण आहे ज्यामध्ये BD आणि CE लंब समान असलेल्या बाजु AC आणि AB ला अनुक्रमे काढले आहेत. (आकृती पहा) दाखवा की हे लंब समान आहेत.








4. ABC एका त्रिकोण आहे. ज्यामध्ये BD आणि CE लंब AC आणि AB बाजुंना समान आहेत (आकृती पहा)

(i) $\Delta ABD \cong \Delta ACE$

(ii) AB = AC म्हणजेच ABC एक समव्दिभुज त्रिकोण आहे.

5. $\Delta ABC$ आणि $\Delta DBC$ हे दोन समव्दिभुज त्रिकोण समान पाया BC वर आहेत(आकृती पहा) दाखवा की, $\angle ABD = \angle ACD$.




## 7.5 त्रिकोणाच्या एकरुपतेचे अजुन काही निकष

**प्रमेय** 7.4 (SSS एकरुपतेचा नियम) : रचनेवरुन आपण पाहिले आहे. की, SSS नियम लागु होते. या प्रमेयाला एका योग्य रचनेव्दारे सिध्द करता येते.

दोन त्रिकोणात जर एक त्रिकोणाच्या तिन बाजु अनुक्रमे दुसऱ्या त्रिकोणाच्या तिन बाजु संगत बाजु समान असतात. म्हणुन दोन्ही त्रिकोण एकरुप आहेत.

- **SSS** एकरुपतेच्या नियमला सिध्द करणे.

दिले आहे: $\Delta PQR$ आणि $\Delta XYZ$ अशा प्रकारे आहेत की, PQ = XY, QR = YZ आणि PR = XZ

सिध्दता : $\Delta PQR \cong \Delta XYZ$

रचना: YW काढा अशाप्रकारे की, $\angle ZYW = \angle PQR$ आणि WY = PQ. XW आणि WZ ला जोडा


सिध्द करणे: $\Delta PQR$ आणि $\Delta WYZ$ मध्ये

QR = YZ (दिले आहे)

$\angle PQR = \angle ZYW$ (रचना)

PQ = YW (रचना)

$\therefore \Delta PQR \cong \Delta WYZ$ (SAS एकरुपतेचा गुणधर्म)






Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




$\Rightarrow \angle P = \angle W$ आणि $PR = WZ$ (CPCT)

$PQ = XY$ (दिले आहे)आणि $PQ = YW$ (रचना)

$\therefore XY = YW$

त्याच प्रमाणे $XZ = WZ$

$\Delta XYW$ मध्ये $XY = YW$




$\Rightarrow \angle YWX = \angle YXW$ (एका त्रिकोणात समान बाजुच्या विरुध्द बाजुला असलेले कोन समान असतात.)

त्याच प्रमाणे $\angle ZWX = \angle ZXW$

$\therefore \angle YWX + \angle ZWX = \angle YXW + \angle ZXW$

$\Rightarrow \angle W = \angle X$

आता $\angle W = \angle P$

$\therefore \angle P = \angle X$

$\Delta PQR$ मध्ये आणि $\Delta XYZ$

$PQ = XY$

$\angle P = \angle X$

$PR = XZ$

$\therefore \Delta PQR \cong \Delta XYZ$ (SAS एकरुपतेचा नियम )



त्याच्या वर आधारीत असलेले चला एक खालील उदाहरण पाहु या.

उदाहरण-12: ABCD चौकोणात $AB = CD$, $BC = AD$ आहे तर दाखवा की, $\Delta ABC \cong \Delta CDA$


गृहीत धरा $\Delta ABC$ आणि $\Delta CDA$

$AB = CD$ (दिले आहे)

$AD = BC$ (दिले आहे)


$AC = CA$ (समान बाजु)

$\Delta ABC \cong \Delta CDA$ ( SSS एकरुपतेचा नियम)




## हे करा

1. बाजुच्या आकृतीमध्ये $\Delta ABC$ आणि $\Delta DBC$ हे दोन त्रिकोण अशाप्रकारे आहेत की, $\overline{AB} = \overline{BD}$ आणि $\overline{AC} = \overline{CD}$ दाखवा की, $\Delta ABC \cong \Delta DBC$.






तुम्ही SAS एकरुपतेच्या नियम मध्ये अगोदरच पाहिले आहे की, समान जोडीचे कोण समान बाजु मधील कोणामध्ये मिळविले पाहिजे आणि जर नाहीतर दोन त्रिकोण एकरुप होऊ नाही शकत.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com





## कृती

एक काटकोण त्रिकोण 5 से.मी. कर्ण आणि 3 से.मी. बाजु किती वेगवेगळ्या त्रिकोणाची रचना करु शकतो? तुमच्या त्रिकोणांना तुमच्या वर्गातील दुसऱ्या मित्राच्या त्रिकोणाबरोबर तुलना करा. त्रिकोण एकरुप आहेत का? त्यांना काढुन घ्या आणि समान बाजु असलेल्या एका त्रिकोणावर दुसरा त्रिकोण ठेवा. जर गरज असेल तर त्रिकोणाला फिरवा तुम्हाला काय आढळुन येईल? तुम्हाला दिसुन येईल की, दोन्ही काटकोन त्रिकोण एकरुप आहेत. जर एका त्रिकोणाची एक बाजु आणि एक कर्ण अनुक्रमे दुसऱ्या त्रिकोणाच्या संगत बाजु आणि कर्णांच्या समान आहे.

याची नोंद घ्या की, काटकोण हा कोण या संदर्भात मिळविला नाही. म्हणुन आपण खालील एकरुपतेच्या नियमा जवळ पोंहचतो.

**प्रमेय 7.5 (RHS** एकरुपतेचा नियम **) :** जर दोन काटकोण त्रिकोणात कर्ण आणि एका त्रिकोणाची एक बाजु दुसऱ्या त्रिकोणाच्या कर्ण आणि बाजु बरोबर समान असतात तेव्हा दोन त्रिकोण एकरुप होतात.

नोंद करा की, RHS म्हणजे काटकोण - कर्ण - बाजु- दर्शविते.


चला सिध्द करु या.

दिले आहे: दोन काटकोण त्रिकोण $\Delta ABC$ आणि $\Delta DEF$

ज्यामध्ये $\angle B = 90^\circ$ आणि

$\angle E = 90^\circ$ $AC = DF$

आणि $BC = EF$.




**सिध्दता:** $\Delta ABC \cong \Delta DEF$

रचना: DE ला G पर्यंत वाढवा.

म्हणुन $EG = AB$. GF ला जोडा.

सिध्दता:

| **विधान** | **कारण** |
|---|---|
| $\Delta ABC$ मध्ये आणि $\Delta GEF$ आपणास आहे | |
| $AB = GE$ | (रचनेव्दारे) |
| $\angle B = \angle FEG$ | (प्रत्येंक कोण काटाकोन आहे $(90^0)$) |
| $BC = EF$ | (दिले आहे) |
| $\Delta ABC \cong \Delta GEF$ | ( SAS एकरुपतेचा नियमा व्दारे ) |
| म्हणुन $\angle A = \angle G \ldots (1)$ | (CPCT) |



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




| | |
|---|---|
| AC = GF … (2) | (CPCT) |
| नंतर AC=GF आणि AC=DF | ( (2) आणि दिलेल्या पासुन) |
| म्हणुन DF = GF | (वरील पासुन) |
| म्हणुन $\angle D = \angle G$ … (3) | (समान बाजुच्या विरुध्द बाजुचे कोण समान ) |
| आपणास येते $\angle A = \angle D$ … (4) | ((1) आणि (3)पासुन) |
| त्याच प्रमाणे $\Delta ABC$ मध्ये आणि $\Delta DEF$ $\angle A = \angle D$, ((4)पासुन) | |
| $\angle B = \angle E$ | (दिले आहे) |
| म्हणुन $\angle A + \angle B = \angle D + \angle E$ | (मिळविल्या नंतर) |
| परंतु $\angle A + \angle B + \angle C = 180^0$ and | (त्रिकोणाची कोणाची बेरीज नियम) |
| $\angle D + \angle E + \angle F = 180^0$ | |
| 180 - $\angle C$ = 180 - $\angle F$ | ($\angle A + \angle B = 180^0 - \angle C$ आणि $\angle D + \angle E = 180^0 - \angle F$) |
| म्हणुन $\angle C = \angle F$, … (5) | (खारीज करण्याचा नियम) |
| आता $\Delta ABC$ मध्ये आणि $\Delta DEF$, आपणास येते की, | |
| BC = EF | (दिले आहे) |
| $\angle C = \angle F$ | ((5)पासुन) |
| AC = DF | (दिले आहे) |
| $\Delta ABC \cong \Delta DEF$ | ( SAS एकरुपतेचा नियम) |

उदाहरण-13: AB एक रेषा खंड आहे.P आणि Q हे बिंदु AB रेषा खंडाच्या दोन्ही बाजुंना अशाप्रकारे आहेत की प्रत्येक रेषा खंड A आणि B पासुन समान अंतरावर आहेत.(आकृती पहा) दाखवा की, PQ हे AB चा दुभाजकाचा लंब आहे.

सोडवणुक: तुम्हाला दिले आहे की, PA = PB आणि QA = QB आणि तुम्हाला दाखवयाचे आहे की,Q हे AB वर लंब आहे. आणि AB ला दुभाजतो. समजा PQ हे AB ला C जवळ छेदन करते.

तुम्ही विचार करु शकता का या आकृती मध्ये दोन त्रिकोण एकरुप आहेत का ?




चला याला घ्या $\Delta PAQ$ आणि $\Delta PBQ$.

या त्रिकोणात

AP = BP (दिले आहे)

AQ = BQ (दिले आहे)

PQ = PQ (समान बाजु)

म्हणुन $\Delta PAQ \cong \Delta PBQ$ (SSS नियम)

म्हणुनच $\angle APQ = \angle BPQ$ (CPCT).

आता गृहीत धरु या की, $\Delta PAC$ आणि $\Delta PBC$.

तुम्हाला माहित आहे की, AP = BP (दिले आहे)



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



$\angle APC = \angle BPC$ ($\angle APQ = \angle BPQ$ (वर सिध्द केले आहे)

$PC = PC$ (समान बाजु)

म्हणुन $\Delta PAC \cong \Delta PBC$ (SAS नियम)

म्हणुनच $AC = BC$ (CPCT) ........... (1)

आणि $\angle ACP = \angle BCP$ (CPCT)

देखील $\angle ACP + \angle BCP = 180°$ (रेषीय जोडी)

म्हणुन $2\angle ACP = 180°$

किंवा $\angle ACP = 90°$ ........... (2)

(1) आणि (2) पासुन तुम्ही सोप्या रितीने एका निष्कर्शाला येता की, PQ हे AB च्या दुभाजकाचा लंब आहे.

[नोंद करा की, $\Delta PAQ$ आणि $\Delta PBQ$ ची एकरुपता न दाखविता तुम्हाला दाखविता येत नाही $\Delta PAC \cong \Delta PBC$ जरी $AP = BP$ (दिले आहे)

$PC = PC$ (समान बाजु)

आणि $\angle PAC = \angle PBC$ ($\Delta APB$ मध्ये समान बाजुच्या विरुध्दता असलेले कोण समान असतात)

याचे कारण की हे निकाल आपणास सांगते की, SSA नियम नेहमी लागु होत नाही. किंवा त्रिकोणाच्या एकरुपतेची सत्यता आहे. जसे दिलेल्या त्रिकोणात जोडीच्या समान बाजु मध्ये कोण मिळविला नाही.]

चला आणखी काही उदाहरणे घेऊ या.


उदाहरण-14: P हा एक बिंदु $l$ आणि $m$ पासुन समान अंतरावर आहे आणि A जवळ छेदन होत आहे.(आकृती पहा) दाखवा की, रेषा AP त्यातील कोनांणा दुभाजते.

**सोडवणुक:** A वर $l$ आणि $m$ छेदतात. हे दिले आहेत.

समजा PB हे रेषा $l$ वर लंब आहे आणि

$PC \perp m$. हे दिलेले आहे की, $PB = PC$.

तुम्हाला दाखवयाची गरज आहे $\angle PAB = \angle PAC$.




चला गृहीत धरु या की, $\Delta PAB$ आणि $\Delta PAC$ या दोन त्रिकोणात

$PB = PC$ (दिले आहे)

$\angle PBA = \angle PCA = 90°$ (दिले आहे)

$PA = PA$ (समान बाजु)

म्हणुन $\Delta PAB \cong \Delta PAC$ (RHS नियम)

म्हणुन $\angle PAB = \angle PAC$ (CPCT)



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




## अभ्यास - 7.3



1. AD हे एका समव्दीभुज त्रिकोण ABC ची लंब रेषा आहे ज्यामध्ये AB = AC. दाखवा की, (i) ADहे BC ला दुभाजने (ii) AD हे $\angle A$ दुभाजते.

2. एका त्रिकोण ABC च्या दोन बाजु AB, BC आणि मध्ये रेषा AM या अनुक्रमे दुसऱ्या त्रिकोण $\Delta PQR$ च्या दोन बाजु PQ आणि QR आणि मध्यरेषा PN समान आहेत(आकृती पहा) दाखवा की,





(i) $\Delta ABM \cong \Delta PQN$

(ii) $\Delta ABC \cong \Delta PQR$

3. BE आणि CF या दोन एका त्रिकोणाच्या लंब रेषा आहेत RHS एकरुपतेचा नियम वापरुन सिध्द करा की, $\Delta ABC$ हा समव्दिभुज त्रिकोण आहे.

4. $\Delta ABC$ हा समव्दिभुज त्रिकोण आहे ज्यामध्ये AB = AC. दाखवा की, $\angle B = \angle C$. (सुचना: $AP \perp BC$ काढा ) (RHS एकरुपतेचा नियम)

5. $\Delta ABC$ एक समव्दिभुज त्रिकोण आहे ज्यामध्ये AB = AC बाजु BA ला D पर्यंत अशा प्रकारे वाढविले आहे. की, AD = AB (आकृती पहा) दाखवा की, $\angle BCD$ एक काटकोण आहे.




6. ABC एक काटकोण त्रिकोण आहे ज्यामध्ये $\angle A = 90^0$ आणि AB = AC तर दाखवा की, $\angle B = \angle C$.

7. समभुज त्रिकोणाचे कोण प्रत्येकी $60^0$ आहेत हे दाखवा.

## 7.6 त्रिकोणातील असमानता:

आता पर्यंत तुम्ही त्रिकोणात किंवा त्रिकोणातील बाजुच्या आणि कोणाच्या समानते बाबत अभ्यास करीत होता. काही वेळा आपण असमान वस्तुची संपर्कात येतो. आणि त्यांची तुलना करण्याची गरज भासते. जसे उदाहरणार्थ रेषा खंड AB ही लांबी मध्ये रेषा खंड CD पेक्षा जास्त आहे आकृती (i) मध्ये आणि $\angle A$ हा $\angle B$ पेक्षा मोठा आहे. हे आकृती (ii) मध्ये पहा.


SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com






(i) (ii)

चला आता तपासणी करा की, त्रिकोणातील असमान बाजु आणि असमान कोणामध्ये काही संबंध आहे का? यासाठी खालील कृतीला सोडवुण पहा.


## कृती

1. एक त्रिकोण ABC काढा आणि A′ बिंदुला CA वर खुण करा जे वाढविला आहे म्हणुन A′C > AC (लांबीची तुलना करणे)

A′ला B सोबत जोडा आणि A′BC ला पुर्ण करा.

तुम्ही काय म्हणु शकता ∠A′BC आणि ∠ABC?

त्याची तुलना करा, तुम्हाला काय निरिक्षणास येईल?





स्पष्ट पणे ∠A'BC > ∠ABC

CA वर आणखी काही बिंदुची खुण करणे चालु ठेवा (वाढलेली) आणि बाजु BC सोबत कोण काढा आणि बिंदुची खुण करा. तुम्हाला दिसुन येईल की जसी बाजु AC ची लांबी वाढते ( Aचे वेगवेगळे स्थान घेऊन) त्याच्या विरुध्द बाजुला असलेले कोण ∠B देखील वाढते.

आता चला आणखी एक कृती तुम्ही करुन पहा.

2. विषम भुज त्रिकोण ABC काढा (तो त्रिकोण ज्यामध्ये सर्व बाजुंची लांबी वेगवेगळी असते) बाजुची लांबी मोजा.

आता, कोणाचे माप मोजा, तुम्हाला काय आढळुन येईल?







Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com







ΔABC आकृतीमध्ये BC ही सर्वात लांब बाजु आणि AC ही सर्वात लहान बाजु आहे.

देखील ∠A हा सर्वात मोठा आणि ∠B सर्वात लहान कोण आहे.

वरील प्रत्येक त्रिकोणातील बाजु आणि कोण मोजा. जेव्हा दुसऱ्या जोडी बरोबर तुलना केली असता एका त्रिकोणाच्या एक बाजु आणि त्याच्या विरुध्द कोण यातील संबंध काय आहे?

**प्रमेय-7.6 :** जर एका त्रिकोणाच्या दोन बाजु असमान आहेत, सर्वात लांब असलेल्या बाजुच्या विरुध्द असलेला कोण मोठा असतो.





तूम्ही या प्रमेयला BC वर C बिदुं घेऊन सिध्द करु शकता अशाप्रकारे की, CA = CP बाजुच्या आकृतीमध्ये दाखविले आहे.

आता, दुसरी कृती करु या.


## कृती



एक रेषाखंड AB काढा. A ला केंद्र बिंदु घेऊन काही व्यासाधनि एक चॉप काढा आणि वेगवेगळे बिंदु जसे P, Q, R, S, T त्याच्यावर खुण करा.




यातील प्रत्येक बिंदुंना A बरोबर आणि B बरोबर देखील जोडा(आकृती पहा) निरिक्षण करा कि जेव्हा आपण P पासुन T पर्यंत चलन करतो तेव्हा ∠A मोठा आणि मोठा बनत जातो. त्याच्या विरुध्द बाजुला असलेल्या बाजुस काय होत आहे? निरिक्षण करा की बाजुची लांबी देखील वाढत चालली आहे ते म्हणजे ∠TAB > ∠SAB > ∠RAB > ∠QAB > ∠PAB आणि TB > SB > RB > QB > PB.




आता असमान कोन घेऊन कोणताही एक त्रिकोण काढा. बाजुची लांबी मापा( आकृती पहा)

निरिक्षण करा की, सर्वात मोठा असलेल्या कोणाच्या विरुध्द असलेली बाजु सर्वात मोठी असते आकृतीमध्ये ∠B हा सर्वात मोठा कोण आहे आणि AC सर्वात मोठी बाजु आहे.

याच कृतीला आणखी काही त्रिकोणाना घेऊन पुन्हा पुन्हा करा आणि पहा की वरील प्रमेयाचा व्यत्यास देखील बरोबर आहे.




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



खालील दिलेल्या प्रत्येक त्रिकोणात कोन आणि बाजु मापा एका बाजुत आणि त्याच्या विरुध्द एक कोन असलेल्या प्रत्येक त्रिकोणात तुम्हाला कोणता संबंध दिसुन येईल.




अशा रितीने आपण खालील प्रमेयाजवळ पोहचलो.

**प्रमेय -7.7 :** कोणत्याही त्रिकोणात, सर्वांत मोठ्या कोनाची विरुध्द बाजु सर्वात लांब असते.

या प्रमेयाला नकारात्मक पध्दतीने सिध्द करता येते.

## हे करा.




आता त्रिकोण ABC काढा आणि त्याच्या बाजु मापा. त्याच्या बाजुची बेरीज AB + BC, BC + AC आणि AC + AB, करा. याची तुलना तिसऱ्या बाजु बरोबर करा.तुम्हाला काय दिसुन येईल?

तुम्हाला दिसुन येईल की, $AB + BC > AC$,

$BC + AC > AB$ आणि $AC + AB > BC$.

दुसऱ्या त्रिकोणाबरोबर या कृतीला पुन्हा पुन्हा करा आणि यासोबत तुम्ही खालील प्रमेयावर पोहचु शकता.


**प्रमेय-7.8 :** एका त्रिकोणाच्या कोणत्याही दोन बाजुची बेरीज तिसऱ्या बाजु पेक्षा अधिक असते.




बाजुच्या आकृतीत, निरिक्षण करा की, $\Delta ABC$ ची बाजु BA ला D बिंदु पर्यंत वाढविले आहे. अशाप्रकारे की, $AD = AC$ तुम्ही दाखवु शकता का? $\angle BCD > \angle BDC$ आणि $BA + AC > BC$ ? तुम्ही वरील प्रमेयाची सिध्दतेजवळ पोंहचला का?

चला आता काही उदाहरण या निकालावर आधारीत असलेले घेऊ या.

**उदाहरण-15:** एका $\Delta ABC$ च्या BCबाजुवर बिंदु D आहे. अशाप्रकारे की, $AD = AC$ (आकृती पहा) दाखवा की, $AB > AD$.




सोडवणुक: $\Delta DAC$ मध्ये

$AD = AC$ (दिले आहे)

म्हणुन $\angle ADC = \angle ACD$ (समान बाजुच्या विरुध्द बाजुचे कोन)

आता $\angle ADC$ हा बाह्य कोण $\Delta ABD$ साठी आहे.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



म्हणुन , $\angle ADC > \angle ABD$

किंवा, $\angle ACD > \angle ABD$

किंवा, $\angle ACB > \angle ABC$

म्हणुन, $AB > AC$ ( $\Delta ABC$ मध्ये मोठ्या कोनाच्या विरुध्द असलेली बाजु)


किंवा, $AB > AD$ $(AD = AC)$


## अभ्यास- 7.4



1. काटकोन त्रिकोणात दाखवा की, कर्ण ही सर्वात मोठी बाजु आहे.


2. बाजुच्या आकृती मध्ये $\Delta ABC$ च्या AB आणि AC बाजु P आणि Q बिंदु पर्यंत अनुक्रमे वाढविल्या आहेत. देखील $\angle PBC < \angle QCB$. दाखवा की, $AC > AB$.





3. बाजुच्या आकृतीमध्ये $\angle B < \angle A$ आणि $\angle C < \angle D$. दाखवा की, $AD < BC$.

4. AB आणि CD अनुक्रमे सर्वात लहान आणि सर्वांत मोठ्या ABCD चौकोणाच्या बाजु आहेत (बाजुची आकृती पहा) दाखवा की, $\angle A > \angle C$ आणि $\angle B > \angle D$.




5. बाजुच्या आकृतीमध्ये $PR > PQ$ आणि $\angle QPR$ ला PS दुभाजते सिध्द करा की, $\angle PSR > \angle PSQ$.

6. जर एका त्रिकोणाच्या दोन बाजु 4 से.मी. आणि 6 से.मी. आहेत. तर तिसऱ्या बाजुचे शक्यतो किती मापे येतात? (धन,पुर्णांक) किती भिन्न त्रिकोण तर तिसऱ्या बाजुचे येऊ शकतात?

7. 5 से.मी.,8 से.मी. आणि 1 से.मी. मापाचे एका त्रिकोणाची रचना करण्याचा प्रयत्न करा.ते शक्य आहे किंवा नाही? कारण काय? तुमचे समाधान कारक योग्य उत्तरे द्या.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



## आपण काय चर्चा केलो



- आकृत्या ज्या की, सारख्या आहेत ते म्हणजे सारख्या आकार आणि रुप असणाऱ्यांना एकरुप आकृती म्हणतात.
- तिन स्वंतत्र घटक मिळुन एक घटक तयार करतात.
- दोन त्रिकोण एकरुप आहेत जर एका त्रिकोणाच्या बाजु दुसऱ्या त्रिकोणाच्या बाजु बरोबर असतील आणि संगत कोन दोन्ही त्रिकोणात समान असतात.
- देखील, शिरोबिंदु मध्ये एक-एक चा संबंध असतो.
- एकरुप आकृतीत संगत भाग समान असतात. आणि आपण संक्षिप्त मध्ये 'CPCT' असे ते एकरुप त्रिकोणाच्या संगत भागासाठी लिहतो.
- ASA एकरुप नियम: दोन त्रिकोण एकरुप आहेत जर दोन कोन आणि एक समाविष्ठ बाजु एका त्रिकोणाची दुसऱ्या त्रिकोणाच्या दोन कोन आणि एक समाविष्ठ बाजुच्या समान असते.
- SAS एकरुप नियम: दोन त्रिकोण एकरुप असतात जर एका त्रिकोणाच्या दोन बाजु आणि समावेश कोन दुसऱ्या त्रिकोणाच्या दोन बाजु आणि समाविष्ठ कोनाच्या समान असतात.
- एक समव्दीभुज त्रिकोणाच्या समान बाजुच्या विरुध्द बाजुस असलेले कोन समान असतात.
- व्यात्यास एका त्रिकोणाच्या समान कोनाच्या विरुध्द बाजुस असलेल्या बाजु समान असतात
- RHS एकरुपतेचा नियम: जर दोन काटकोन त्रिकोणात कर्ण आणि एका त्रिकोणाची एक बाजु दुसऱ्या त्रिकोणाचा कर्ण आणि संगत बाजुसी समान असतील तर, दोन त्रिकोण एकरुप असतात.
- SSS एकरुप नियम: जर एक त्रिकोणाच्या तिन बाजु दुसऱ्या त्रिकोणाच्या तिन बाजुशी समान असतील तर ते दोन त्रिकोण एकरुप होतात.
- जर एका त्रिकोणाच्या दोन बाजु असमान असतील तर लांब बाजुच्या विरुध्द बाजुस असलेला कोन देखील अधिक असतो.
- कोणत्याही त्रिकोणात आधिक कोनाच्या विरुध्द बाजुस असलेली बाजु देखील मोठी असते.
- एका त्रिकोणाच्या कोणत्याही दोन बाजुची बेरीज तिसऱ्या बाजु पेक्षा अधिक असते.

SCERT TELANGANA




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com


# 08 चौकोन

## 8.1 प्रस्तावना

अगोदरच्या धड्यामध्ये तुम्ही त्रिकोणाचे बरेचश्या गुणधर्म आणि त्यांची सिध्दता विषयी शिकलात. तीन एकरेषीय नसलेल्या बिंदुना जोडण्याची बंदीस्त आकृती म्हणजे त्रिकोण होय हे तुम्हाला माहितच आहे. प्रतला वरील चार बिंदु पासुन कोणती आकृती मिळते तुम्हाला माहित आहे का? जर सर्व बिंदु एकरेषीय असेल तर आपल्याला रेषाखंड मिळते (आकृती (i))जर चार पैकी तिन बिंदु एकरेषीय असेल तर आपल्याला त्रिकोण मिळते (आकृती(ii)) आणि जर कोणतेही तीन बिंदु एकरेषीय नसेल तर आपल्याला चार बाजुंनी बंदीस्त असलेली आकृती मिळते (आकृती(iii), (iv)) अशा आकृतीना आपण चौकोन म्हणतो.





तुम्ही सहजरित्या बरेचसे चौकोन काढु शकता आणि तुमच्या सभोवती असलेल्या बरेचश्या चौकोना सारख्या आकारांना ओळखु शकता एका महत्वाच्या अंशाने आकृती iii) आणि (iv) मध्ये वेगवेगळ्या चौकोन तयार झाले. ते कसे वेगळे आहेत?




या धड्यात आपण चौकोनाच्या फक्त आकृती(iii) मध्ये दाखविलेल्याचा अभ्यास करणार आहोत. या बर्हीगल चौकोन आहेत.

चौकोन हा प्रतलातील चार रेषांनी बनेलेली साधी बंदीस्त आकृती होय.




चौकोन ABCD ला AB, BC, CD आणि DA या दोन बाजु आहेत A, B, C आणि D चार शिरोबिंदु आहेत. $\angle A$, $\angle B$, $\angle C$ आणि $\angle D$ हे शिरोबिंदु येथे तयार झालेले चार कोन आहेत.

जेव्हा आपण विरुध्द शिरोबिंदु (A, C) आणि(B, D) जोडतो चौकोन ABCD चे AC आणि BD हे दोन कर्ण आहेत.

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



## 8.2 चौकोनाचे गुणधर्म


चौकोनाच्या आत मध्ये चार कोन असतात. या चार कोनांची बेरीज आपण माहित करु शकतो का? त्रिकोणाच्या कोनाच्या बेरजेचा गुणधर्माची आठवण करु या. या गुणमर्धाचा वापर करुन आपण चौकोनाच्या चार अंतर कोनाची बेरीज माहित करु शकतो.

ABCD हा चौकोन आहे आणि AC हा कर्ण आहे (आकृती पहा)

$\Delta ABC$ च्या तिन कोनाची बेरीज आपल्याला माहित आहे.

$\angle CAB + \angle B + \angle BCA = 180^\circ$ ...(1) (त्रिकोणाच्या कोनाच्या बेरजेचा गुणधर्म)

याच प्रमाणे $\Delta ADC$ मध्ये




$$\angle CAD + \angle D + \angle DCA = 180^\circ \quad ...(2)$$

(1) आणि (2) ची बेरीज करुन

$$\angle CAB + \angle B + \angle BCA + \angle CAD + \angle D + \angle DCA = 180^\circ + 180^\circ$$


पहा $\angle CAB + \angle CAD = \angle A$ आणि $\angle BCA + \angle DCA = \angle C$

म्हणुन $\angle A + \angle B + \angle C + \angle D = 360^\circ$


म्हणजेच चौकोनाच्या चार कोनांची बेरीज $360^\circ$ असते किंवा 4 काटकोन असतात.

## 8.3 चौकोनाचे वेगवेगळे प्रकार


खाली काढलेल्या चौकोनाकडे पहा आपण या पैकी बरेचशे पाहिलेले आहे. यांना आपण लवकर विचारात घेऊ आणि त्यांच्या गुणधर्माच्या आधारावर त्यांच्या विशिष्ट नावाची आठवण करु.




(i)




(ii)




(iii)



(iv)



(v)



(vi)

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



आपण निरिक्षण केलो.

- आकृती (i) मध्ये चौकोनABCD च्या विरुध्द बाजुची एक जोडी AB आणि DC एकमेकांला समांतर आहे. अशा चौकोनांना समलंब चौकोन असे म्हणतात.
  जर समलंब चौकोनाची असमांतर बाजु समान असेल तर त्या समलंब चौकोनाचे समद्विभुज समलंब चौकोन असे म्हणतात
- आकृती (ii) मध्ये चौकोनाच्या विरुध्द बाजुच्या दोन्ही जोड्या समांतर आहेत. अशा चौकोनाला समांतरभुज चौकोन म्हणतात. आकृती(iii), (iv) आणि (v) सुध्दा समांतर भुज चौकोन आहेत.
- आकृती (iii) मध्ये, समांतर भुज चौकोन EFGH चे चारही कोन काटकोन आहेत. ते आयत आहे.
- आकृती (iv) मध्ये,समांतर भुज चौकोनाच्या लगतच्या बाजु समान आहेत आणि याला समभुज चौकोन म्हणतात.
- आकृती (v) मध्ये समांतर भुज चौकोनाच्या लगतच्या बाजु समान आहेत आणि त्याचा प्रत्येक कोन 90° आहे. याला चौरस म्हणतात.
- आकृती(vi) मध्ये चौकोन ABCD मध्ये लगतच्या बाजुच्या दोन जोड्या समान आहेत म्हणजेच AB = AD आणि BC = CD. याला पतंग म्हणतात.

**निशा काय म्हणता आहे, विचारात घेऊ**

समभुज चौकोन हे चौरस होऊ शकते पण सर्व चौरस हे समभुज चौकोन होत नाही.

**ललीता आणखी काही अंश त्यात मिळवली**

सर्व आयत समांतर भुज चौकोन असतात पण सर्व समांतर भुज चौकोन आयत होत नाहीत कोणत्या विधानाला तुम्ही मान्य करता?

तुमच्या उत्तरासाठी कारण द्या. चौकोनाच्या वेगवेगळ्या प्रकारा विषयी अशे इतर विधान लिहा.

**सोडविलेली उदाहरणे**

उदाहरण-1: ABCD हा समांतरभुज चौकोन आहे आणि $\angle A = 60^o$ तर इतर कोन माहित करा.

सोडवणुक: समांतरभुज चौकोनाचे विरुध्द कोन समान असतात.

म्हणुन ABCD समांतर भुज चौकोन आहे.


$\angle C = \angle A = 60^o$ आणि $\angle B = \angle D$

आणि समांतरभुज चौकोनाच्या एका पाठीमागुन एक येणाऱ्या कोनांची बेरीज $180^o$ म्हणुन $\angle A$ आणि $\angle B$ हे एका पाठीमागुन एक येणारे कोन आहेत.

$\angle D = \angle B = 180^o - \angle A$

$= 180^o - 60^o = 120^o$.

अशा प्रकारे इतर कोन $120^o$, $60^o$, $120^o$.







Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



उदाहरण-2: ABCD समांतरभुज चौकोनामध्ये, $\angle DAB = 40^o$ तर समांतरभुज चौकोनाचे इतर कोन माहित करा.

सोडवणुक:




ABCD हा समांतर भुज चौकोन

$\angle DAB = \angle BCD = 40°$ आणि AD || BC

एका पाठीमागुन एक येणाऱ्या कोनाची बेरीज


$\angle CBA + \angle DAB = 180°$

$\therefore \angle CBA = 180 - 40°$

$= 140°$

**प्रयत्न करा**






AB ला E पर्यंत वाढवा. $\angle CBE$ माहित करा. तुमच्या काय लक्षात आले? $\angle ABC$ आणि $\angle CBE$ हे कोणत्या प्रकारचे कोन आहे?

हे माहित झाल्यामुळे आपण माहित करु शकतो $\angle ADC = 140°$ आणि $\angle BCD = 40°$

उदाहरण3: समांतरभुज चौकोनाच्या दोन लगतच्या बाजु 4.5 से.मी. आणि 3 से.मी. आहेत. तर त्याची परिमीती माहित करा.


सोडवणुक: समांतर भुज चौकोनाची विरुध्द बाजु समान असते. इतर दोन बाजु 4.5 से.मी. आणि 3 से.मी. आहेत.

म्हुणन परिमीती $= 4.5 + 3 + 4.5 + 3 = 15$ से.मी.

उदाहरण-4: समांतर भुज चौकोनABCD मध्ये, एका पाठीमागुन एक येणारे कोन $\angle A$ आणि $\angle B$ चे कोनदुभाजक P येथे छेदतात. तर सिध्द करा. $\angle APB = 90^o$.

सोडवणुक: ABCD हा समांतरभुज चौकोन आहे. $\overrightarrow{AP}$ आणि $\overrightarrow{BP}$ हे एका पाठीमागुन एक येणाऱ्या $\angle A$ आणि $\angle B$ कोन दुभाजक आहेत.

समांतर भुज चौकोनाच्या एका पाठीमागुन एक येणाऱ्या कोनाची बेरीज पुरक असते.




$\angle A + \angle B = 180^o$

$\frac{1}{2}\angle A + \frac{1}{2}\angle B = \frac{180}{2}$

$\Rightarrow \angle PAB + \angle PBA = 90^o$

$\Delta APB$ मध्ये

$\angle PAB + \angle APB + \angle PBA = 180°$ (त्रिकोणाच्या कोनाच्या बेरजेच्या गुणधर्म)

$\angle APB = 180^0 - (\angle PAB + \angle PBA)$

$= 180^o - 90^o$

$= 90^o$

असे सिध्द होते.



Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com



## अभ्यास - 8.1



1. विधाने सत्य आहेत की असत्य ते सांगा.
   (i) प्रत्येंक समांतरभुज चौकोन हा समलंब चौकोन असतो. ( )
   (ii) सर्व समांतरभुज हे चौकोन असतात. ( )
   (iii) सर्व समलंब चौकोन हे समांतर भुज चौकोन असतात. ( )
   (iv) चौरस हा समभुज चौकोन आहे. ( )
   (v) प्रत्येक समभुज चौकोन हा चौरस आहे ( )
   (vi) सर्व समांतरभुज चौकोन आयत आहेत. ( )
2. जर त्या चौकानाला तो गुणधर्म लागु होत असेल तर (होय) आणि लागु होत नसेल तर (नाही) लिहत हा खालील तक्ता पुर्ण करा.

| गुणधर्म | समलंब चौ. | समांतरभुज चौ. | समभुज चौ. | आयत | चौरस |
|---|---|---|---|---|---|
| a. विरुध्द बाजुंची फक्त एक जोडी समांतर असते | होय | | | | |
| b. विरुध्द बाजुच्या दोन जोड्या समांतर असतात | | | | | |
| c. विरुध्द बाजु समान असतात. | | | | | |
| d. विरुध्द कोन समान असतात. | | | | | |
| e. एका पाठीमागुन एक येणारे कोन पुरक असतात. | | | | | |
| f. कर्ण एकमेकांचे दुभाजक असतात. | | | | | |
| g. कर्ण समान असतात | | | | | |
| h. सर्व बाजु समान असतात. | | | | | |
| i. प्रत्येक कोन काटकोन असते. | | | | | |
| j. कर्ण एकमेकांचे लंब असतात. | | | | | |

3. ABCD समलंब चौकोनामध्ये AB || CD आहे. जर AD = BC तर दखावा $\angle A = \angle B$ आणि $\angle C = \angle D$
4. चौकोनाचे चार कोन 1:2:3:4 या गुणोत्तरात आहेत. चौकोनाचा प्रत्येक कोन माहित करा.
5. आयत ABCD चे AC हा कर्ण आहे. $\Delta ACD$ चे कोन माहित करा. कारणे द्या.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



## 8.4 समांतरभुज चौकोन आणि त्याचे गुणधर्म

समांतरभुज हे चौकोन आहे हे आपण पाहिले अहोत. समांतर भुज चौकोनाचे गुणधर्म विचारात घेऊ.

### हे करा

समांतरभुज चौकोनाच्या आकाराचा एक कागद कापुन घ्या. पुन्हा त्याच्या कर्णाविरुन त्याला कापा. तुम्हाला कोणत्या प्रकाराच्या आकार मिळेल? या त्रिकोणाच्या बाबतीत तुम्ही काय म्हणुन शकाल?



एका त्रिकोण दुसऱ्या वर ठेवा. प्रत्येक बाजु दुसऱ्या वर अगदी बरोबर बसु शकेल का? जुळत्या बाजु कडे त्रिकोण फिरवण्याची गरज तुम्हाला आहे. आता, दोन्ही त्रिकोण अगदी बरोबर जुळालेत. ते एकमेकांचे एकरुप आहेत.


आणखी काही समांतरभुज चौकोनासाठी हे करा. कर्णाविरुन कापण्यासाठी तुम्ही कोणताही कर्ण निवडु शकता.

समांतरभुज चौकोनाला प्रत्येक कर्ण दोन एकरुप त्रिकोणात विभागतो. हे आपण पाहतो.

आता चला सिध्द करु या.

**प्रमेय-8.1 :** समांतरभुज चौकोनाचा कर्ण त्याला दोन एकरुप त्रिकोणात विभागतो.

सिध्दता: ABCD समांतरभुज चौकोन विचारात घेऊ




A आणि C जोडा.समांतरभुज चौकोनाचा AC हा कर्ण आहे.

AB || DC आणि AC हा छेदिका आहे.

$\angle DCA = \angle CAB$ (अंतर व्युक्रम कोन)

याच प्रमाणे DA || CB आणि AC हा छेदिका आहे. म्हणुन $\angle DAC = \angle BCA$.

$\Delta ACD$ आणि $\Delta CAB$ मध्ये

$\angle DCA = \angle CAB$ आणि $\angle DAC = \angle BCA$

AC = CA सुध्दा (सामाईक बाजु)

म्हणुन $\Delta ABC \cong \Delta CDA$.

याचा अर्थ, को.बा.को. नियमाने ( कोन, बाजु, कोन) दोन त्रिकोण एकरुप आहेत. याचा अर्थ, कर्ण AC समांतरभुज चौकोनाला दोन एकरुप त्रिकोणात विभागत आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



**प्रमेय-8.2 :** समांतरभुज चौकोनात विरुध्द बाजु समान असतात.

सिध्दता: समांतरभुज चौकोनाचा कर्ण त्याला दोन एकरुप त्रिकोणात विभागतो हे आपण अगोदरच सिध्द केलेले आहे.

या प्रकारे आकृती मध्ये $\Delta ACD \cong \Delta CAB$

म्हणुन $AB = DC$ आणि $\angle CBA = \angle ADC$

$AD = BC$ आणि $\angle DAC = \angle ACB$ सुध्दा

$\angle CAB = \angle DCA$


$\therefore \angle ACB + \angle DCA = \angle DAC + \angle CAB$

म्हणजेच $\angle DCB = \angle DAB$

या प्रकारे समांतरभुज चौकोनामध्ये

i. विरुध्द बाजु समान असतात.

ii. विरुध्द कोन समान असतात.






बर्हीगोल चौकोनाचे विरुध्द बाजु समांतर असले तरी आपण विरुध्द बाजु आणि विरुध्द कोन समान आहेत म्हणुन दाखवत आहे याची नोंद करा.

आता आपण सिध्दतेचा व्यत्यास दाखवण्याचा प्रयत्न करु म्हणुजेच चौकोनाच्या विरुध्द बाजु समान असेल तर तो चौकोन समांतरभुज चौकोन असतो.

**प्रमेय-8.3 :** चौकोनाच्या विरुध्द बाजुची प्रत्येक जोडी समान असेल तर ती समांतरभुज चौकोन असते.

सिध्दता: चौकोन ABCD विचारात घेऊ, $AB = DC$ आणि $BC = AD$.

कर्ण AC काढा

$\Delta ABC$ आणि $\Delta CDA$ विचारात घेऊ

$BC = AD$, $AB = DC$ आणि $AC = CA$ (सामाईक बाजु)


म्हणुन $\Delta ABC \cong \Delta CDA$ (का ?)

म्हणुन $\angle BCA = \angle DAC$ , AC हे छेदीका आहे.

किंवा $AB \parallel DC$ ...(1)

$\angle ACD = \angle CAB$ , CA हे छेदीका आहे.

$BC \parallel AD$ ...(2)




म्हणुन(1) अणि (2) वरुन ABCD हा समांतरभुज चौकोन आहे.

तुम्ही आताच पाहिले की समांतरभुज चौकोनाच्या विरुध्द बाजुच्या दोन्ही जोड्या समान असतात आणि व्यत्यास जर चौकोनाच्या विरुध्द बाजुंच्या दोन्ही जोड्या समान असेल तर ते चौकोन समांतरभुज भुज चौकोन असते. अशाच प्रकारे एका चौकानाच्या विरुध्द कोनांच्या जोड्या समान असेत तर ते समांतरभुज चौकोन होते म्हणुन तुम्ही सिध्द करु शकता का ?

SCERT TELANGANA




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



**प्रमेय-8.4 :** चौकोनामध्ये विरुध्द कोनांची प्रत्येक जोडी समान असेल तर ते समांतरभुज चौकोन असते.

सिध्दता: ABCD चौकोनामध्ये $\angle A = \angle C$ आणि $\angle B = \angle D$ तर सिध्द करा की, ABCD हा समांतरभुज चौकोन आहे.




आपल्याला माहित आहे. $\angle A + \angle B + \angle C + \angle D = 360°$

$$\angle A + \angle B = \angle C + \angle D = \frac{360°}{2}$$

म्हणजेच $\angle A + \angle B = 180°$

DC ला E पर्यंत वाढवा

$\angle C + \angle BCE = 180°$ म्हणुन $\angle BCE = \angle ADC$

जर $\angle BCE = \angle D$ जर $AD \parallel BC$ (का ?)


DC हा छेदीका आहे.

याप्रकारे आपण दाखवु शकतो की, $AB \parallel DC$ किंवा ABCD हा समांतरभुज चौकोन आहे.

## अभ्यास- 8.2



1. बाजुच्या आकृती मध्ये ABCD हा समांतरभुज चौकोन आहे.ABEF हा आयत आहे तर दाखवा $\Delta AFD \cong \Delta BEC$.
2. समभुज चौकोनाचा कर्ण त्याला चार एकरुप त्रिकोणात विभागतो. हे सिध्द करा.
3. ABCD चौकोनामध्ये $\angle C$ आणि $\angle D$ चे दुभाजक O येथे छेदतात. सिध्द करा $\angle COD = \frac{1}{2}(\angle A + \angle B)$





## 8.5 समांतरभुज चौकोनाचे कर्ण

**प्रमेय-8.5 :** समांतरभुज चौकोनाचे कर्ण एकमेकांला दुभागतात.

सिध्दता: समांतरभुज चौकोन ABCD काढा.

त्याचे AC आणि BD दोन्ही कर्ण काढा ते बिंदु 'O' येथे छेदतात.

$\Delta OAB$ आणि $\Delta OCD$ मध्ये




तयार झालेल्या कोनांना $\angle 1, \angle 2, \angle 3, \angle 4$ म्हणुन खुण करा.

$\angle 1 = \angle 3$ ($AB \parallel CD$ आणि AC ही छेदीका आहे.)

$\angle 2 = \angle 4$ (का) (अंतर व्युत्क्रम कोन)



Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com



आणि AB = CD (समांतरभुज चौकोनाचा गुणमर्ध)
को.बा.को. एकरुपतेच्या गुणधर्माने
$\Delta OCD \cong \Delta OAB$
CO= OA, DO = OB किंवा कर्ण एकमेकांना दुभागतात.

म्हणुन जर व्यत्यास सुध्दा खरे असेल याची आपण तपासणी करु. व्यत्यास जर चौकोनाचे कर्ण एकमेकांना दुभागत असेल तर ते समांतरभुज चौकोन असते.

**प्रमेय-8.6 :** चौकोनाचे कर्ण जर एकमेकांना दुभागत असेल तर ते समांतरभुज चौकोन असते.
सिध्दता: ABCD हा चौकोन आहे.
AC आणि BD कर्ण 'O' येथे छेदतात.
OA = OC आणि OB = OD
ABCD हा समांतरभुज चौकोन आहे.




(सुचना : $\Delta AOB$ आणि $\Delta COD$ विचारात घेऊ, या एकरुप आहेत का? होत असेल तर तुम्ही त्या वरुन काय सांगु शकाल?)

## 8.5.1 आणखी काही भुमीतीय विधाने

आता पर्यंत आपण सिध्द केलेले आणि उदारहणे एका आकृतीला ( समांतरभुज चौकोन) आधारावर काही विधान मिळविण्यात आले. याच्या मापाच्या आधारे प्रत्येक वेळेस सिध्द करण्याची गरज नाही आहे. ते शास्त्रीय दृष्टीने सिध्द झाले. सर्व संदर्भात सत्य विधान म्हणुन वापर होतात.

तर मुळ प्रमेय वरुन जेव्हांच्या तेव्हा नविन पुन्हा नविन आधार देऊन सिध्द करतो याला उपप्रमेय म्हणतात. एक सिध्द झालेल्या प्रमेयावरुन सत्य म्हणुन समजले की, विधानाला उपप्रमेय म्हणुन समजु शकतो.

**उपप्रमेय-1 :** आयताचा प्रत्येक कोन हा काटकोन असतो. हे सिध्द करा.
सोडवणुक: आयत हे समांतरभुज चौकोन आहे आणि एक कोन काटकोन आहे.


दिलेले: ABCD हा आयत आहे. समजा एक कोन $\angle A = 90^o$

आपल्याला सिध्द करायचे आहे $\angle B = \angle C = \angle D = 90^o$

सिध्दता: ज्या अर्थी ABCD हा समांतरभुज चौकोन आहे.

या प्रकारे AD || BC आणि AB ही छेदीका आहे.

म्हणुन $\angle A + \angle B = 180^o$ (छेदिकाच्या एका बाजुला असलेले आतील कोन)




म्हणुन $\angle A = 90^o$ (दिलेले आहे)

$\therefore \angle B = 180^o - \angle A$
$= 180^o - 90^o = 90^o$

आता $\angle C = \angle A$ आणि $\angle D = \angle B$ (समांतरभुज चौकोनाचे विरुध्द कोन)

म्हणुन $\angle C = 90^o$ आणि $\angle D = 90^o$ .

म्हणुन आयताचा प्रत्येक कोन काटकोन आहे.




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



**उपप्रमेय-2 :** समभुज चौकोंनाचे कर्ण एकमेकांला लंब असतात. हे सिध्द करा.
सिध्दता: समभुज चौकोन हा सर्व बाजु समान असलेला समांतरभुज चौकोन आहे.

ABCD हा समभुज चौकोन आहे,AC आणि BD कर्ण O येथे छेदतात.




AC हा BD वर लंब आहे हे आपल्याला दाखवयाचे आहे.

$\Delta AOB$ आणि $\Delta BOC$ विचारात घेऊ

$OA = OC$ (समांतरभुज चौकोनाचे कर्ण एकमेकाला दुभागतात)

$OB = OB$ ( $\Delta AOB$ आणि $\Delta BOC$ची सामाईक बाजु)

$AB = BC$ (समभुज चौकोनाचे बाजु)

म्हणुन $\Delta AOB \cong \Delta BOC$ (बा.बा.बा. चा नियम)

म्हणुन $\angle AOB = \angle BOC$

परंतु $\angle AOB + \angle BOC = 180^\circ$ (रेषीय जोडी)

म्हणुन $2\angle AOB = 180^\circ$

किंवा $\angle AOB = \frac{180^\circ}{2} = 90^\circ$

याच प्रमाणे $\angle BOC = \angle COD = \angle AOD = 90^\circ$ (सारखे कोन)

म्हणुन AC हा BD वर लंब आहे.

म्हणुन, समभुज चौकोनाचे कर्ण एकमेकांला लंब असतात.


**उपप्रमेय-3** : ABCD समांतरभुज चौकोना मध्ये, जर कर्ण AC कोन A ला दुभागत असेल तर ABCD हा समभुज चौकोन आहे.

सिध्दता: ABCD हा समांतरभुज चौकोन आहे.

म्हणुन AB || DC. $\angle A$ आणि $\angle C$ ला AC ही छेदिका छेदते.

म्हणुन $\angle BAC = \angle DCA$ (अंतर व्युत्क्रम कोन) ...(1)

$\angle BCA = \angle DAC$ ...(2)




पण AC हा $\angle A$ ला दुभागते म्हणुन दिलेले आहे.

म्हणुन $\angle BAC = \angle DAC$

$\therefore \angle DCA = \angle DAC$ ...(3)

या प्रकारे AC , $\angle C$ ला सुध्दा दुभागते.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



(1), (2) आणि (3) वरुन

$\angle BAC = \angle BCA$

$\Delta ABC$ मध्ये $\angle BAC = \angle BCA$ चा अर्थ $BC = AB$ (समव्दिभुज त्रिकोण)

परंतु $AB = DC$ आणि $BC = AD$ ( ABCD समांतरभुज चौकोनाचे विरुध्द बाजु)

$\therefore\ AB = BC = CD = DA$


म्हणुन ABCD हा समभुज चौकोन आहे.

**उपप्रमेय-4 :** आयताचे कर्ण समान लांबीचे असतात ते दाखवा.

**सिध्दता :** ABCD हा आयत आहे. AC आणि BD त्याचे कर्ण आहेत.

$AC = BD$ हे आपल्याला माहित करायचे आहे.

ABCD हा एक आयत आहे. म्हणजे चारही कोन काटकोन असलेला ABCD हा समांतरभुज चौकोन आहे.




$\Delta ABC$ आणि $\Delta BAD$ विचारात घेऊ.

$AB = BA$ (सामाईक)

$\angle B = \angle A = 90^o$ (आयताचा प्रत्येक कोन)

$BC = AD$ (आयताचे विरुध्द बाजु)


म्हुणन $\Delta ABC \cong \Delta BAD$ (बा.को.बा. नियम)

$AC = BD$

किंवा आयताचे कर्ण समान असतात.

**उपप्रमेय-5 :** समांतरभुज चौकोनाच्या कोन दुभाजका नी एक आयत बनतो. हे सिध्द करा.

सिध्दता: ABCD हा समांतरभुज चौकोन आहे. $\angle A$ , $\angle B$ , $\angle C$ आणि $\angle D$ चे कोनदुभाजक P, Q, R, S येथे छेदत आहे. तेथे एक चौकोन तयार होते (आकृती पहा)




ज्या अर्थी ABCD हा समांतरभुज चौकोन असल्यानेAD || BC जर AB ला छेदिका त्याना छेदत असेल तर $\angle A + \angle B = 180^o$( समांतरभुज चौकोनाचे एका पाठीमागुन एक येणारे कोन)

आपल्याला माहित आहे. $\angle BAP = \frac{1}{2}\angle A$ आणि $\angle ABP = \frac{1}{2}\angle B$ [ज्या अर्थी $\angle A$ आणि $\angle B$ चे कोन दुभाजक अनुक्रमे AP आणि BP आहेत]

$$\Rightarrow \frac{1}{2}\angle A + \frac{1}{2}\angle B = \frac{1}{2}\times 180^o$$

किंवा $\angle BAP + \angle ABP = 90^o$ ...(1)



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



परंतु $\Delta APB$ मध्ये

$\angle BAP + \angle APB + \angle ABP = 180^\circ$ (त्रिकोणाच्या कोनांच्या बेरजेच्या गुणधर्म)

म्हणुन $\angle APB = 180^\circ - (\angle BAP + \angle ABP)$

$\Rightarrow \angle APB = 180^\circ - 90^\circ$ ((1)वरुन)

$= 90^\circ$

आपण पाहु शकतो $\angle SPQ = \angle APB = 90^\circ$

या प्रमाणे आपण दाखवु शकतो की, $\angle CRD = \angle QRS = 90^\circ$ (सारखे कोन)

परंतु $\angle BQC = \angle PQR$ आणि $\angle DSA = \angle PSR$ (का ?)

$\therefore \angle PQR = \angle QRS = \angle PSR = \angle SPQ = 90^\circ$

म्हणुन PQRS चे सर्व कोन सारखे म्हणजेच $90^\circ$ आहेत.

त्यामुळे आपण PQRS ला आयत म्हणु शकतो.




### विचार करा, चर्चा करा आणि लिहा.



1. चौरसाचे कर्ण समान असतात आणि ते एकमेकांचे लंब दुभाजक असतात.
2. समभुज चौकोनाचे कर्ण त्याला चार एकरुप त्रिकोणात विभागतो.

**काही सोडवलेली उदारहणे**

उदाहरण-5: $\overleftrightarrow{AB}$ आणि $\overleftrightarrow{DC}$ हे दोन समांतर रेषा आहेत आणि $l$ ही छेदिका आहे. ही छेदिका $\overleftrightarrow{AB}$ ला P येथे आणि $\overleftrightarrow{DC}$ ला R येथे छेदते. आतील कोनांच्या कोनदुभाजकांनी एका आयत तयार होतो. हे सिध्द करा.




**सिध्दता :** $\overleftrightarrow{AB} \parallel \overleftrightarrow{DC}$ , $l$ ही छेदिका $\overleftrightarrow{AB}$ ला P येथे आणि $\overleftrightarrow{DC}$ ला R येथे छेदते.

समजा $\angle RPB$, $\angle CRP$, $\angle DRP$ आणि $\angle APR$ चे कोन दुभाजक अनुक्रमे $\overrightarrow{PQ}, \overrightarrow{RQ}, \overrightarrow{RS}$ आणि $\overrightarrow{PS}$ हे दुभाजक आहेत.

$\angle BPR = \angle DRP$ (अंतर व्युत्क्रम कोन) ...(1)

परंतु $\angle RPQ = \frac{1}{2}\angle BPR$ ($\because \overrightarrow{PQ}$ हा $\angle BPR$ चा दुभाजक आहे)

तसेच $\angle PRS = \frac{1}{2}\angle DRP$ ($\because \overrightarrow{RS}$ हा $\angle DPR$ हा दुभाजक आहे.) ...(2)



Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com



(1) आणि (2) वरुन

$\angle RPQ = \angle PRS$

$\overrightarrow{PQ}$ आणि $\overrightarrow{RS}$ मधील $\overline{PR}$ ने ह्या अंतरव्युत्क्रम कोन तयार होतात.

$\therefore \overrightarrow{PQ} \parallel \overrightarrow{RS}$

याच प्रमाणे

$\angle PRQ = \angle RPS$, म्हणुन $\overrightarrow{PS} \parallel \overrightarrow{RQ}$

म्हणुन PQRS हे समांतरभुज चौकोन आहे. ... (3)

आपणास $\angle BPR + \angle CRP = 180^\circ$ ($\overleftrightarrow{AB} \parallel \overleftrightarrow{DC}$ मधील $l$ ची छेदीकाच्या सारख्या बाजुवरील अंतरव्युत्क्रम कोन)

$\frac{1}{2}\angle BPR + \frac{1}{2}\angle CRP = 90^\circ$



$\Rightarrow \angle RPQ + \angle PRQ = 90^\circ$

पण $\Delta$ PQR मध्ये

$\angle RPQ + \angle PQR + \angle PRQ = 180^\circ$ (त्रिकोणाचे तीन कोन)

$\angle PQR = 180^\circ - (\angle RPQ + \angle PRQ)$


$= 180^\circ - 90^\circ = 90^\circ$ ... (4)

(3)आणि(4) वरुन

PQRS हा काटकोन असलेला समांतरभुज चौकोन आहे.

म्हणुन PQRS हा आयत आहे.

उदाहरण-6: त्रिकोण ABC मध्ये, बाजु BC वर AD मध्यगा ही E पर्यंत अशी वाढलेली आहे की, AD = ED ,ABEC हा समांतरभुज चौकोन आहे सिध्द करा.




**सिध्दता:** $\Delta$ ABC ची AD ही मध्यगा आहे.

AD = ED होईल असा AD ला E पर्यंत वाढवा.

BE आणि CE जोडा

आता $\Delta^s$ ABD आणि ECD मध्ये

| | |
|---|---|
| BD = DC | (D हा BC चा मध्य बिंदु आहे.) |
| $\angle ADB = \angle EDC$ | (विरुध्द शिरों कोन) |
| AD = ED | (दिलेले) |
| म्हणुन $\Delta ABD \cong \Delta ECD$ | (बा.को.बा.नियम) |
| म्हणुन AB = CE | (एकरुप त्रिकोणाचे संगत बाजु) |

तसेच $\angle ABD = \angle ECD$

$\overleftrightarrow{AB}$ आणि $\overleftrightarrow{CE}$ रेषाची छेदीका $\overline{BC}$ ने अंतर व्युत्क्रम कोन तयार होतो.

$\therefore \overleftrightarrow{AB} \parallel \overleftrightarrow{CE}$



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



SCERT TELANGANA

या प्रकारे ABEC चौकोना मध्ये


AB || CE आणि AB = CE


म्हणुन ABEC हा समांतरभुज चौकोन आहे.

## अभ्यास - 8.3




1. $(3x - 2)^o$ आणि $(x + 48)^o$ हे समांतरभुज चौकोनाचे विरुध्द कोन आहेत. तर समांतरभुज चौकोनाचा प्रत्येक कोन माहित करा.
2. जर समांतरभुज चौकोनाचा एक कोन त्याच्या सर्वात लहान कोनाच्या दुप्पटी पेक्षा $24^o$ ने कमी असेल तर त्या समांतरभुज चौकोनाचे सर्व कोन माहित करा.
3. बाजुच्या आकृतीत ABCD हा समांतरभुज चाकोन आहे आणि बाजु BC चा E हा मध्य बिंदु आहे. जर DE आणि AB वाढवलीं आणि ते F येथे भेटल्या. तर दाखवा AF = 2AB.





4. बाजुच्या आकृतीत ABCD हा समांतरभुज चौकोन आहे. बाजु AB आणि DC चे मध्यबिंदु अनुक्रमे P, Q आहेत. तर PBCQ हे सुध्दा समांतरभुज चौकोन आहे हे सिध्द करा.
5. आकृतीत दाखविल्या प्रमाणे AB = AC असलेले ABC हा समव्दिभुज त्रिकोण आहे. बर्हीकोन QAC ला AD हा दुभागत आहे आणि CD || BA सिध्द करा
   (i) ∠DAC = ∠BCA
   (ii) ABCD हा समांतरभुज चौकोन आहे.




6. ABCD हा समांतरभुज चौकोन आहे. कर्ण BD वर शिरोंबिंदु A आणि C मधुन काढलेले APआणि CQ हे लंब आहेत( आकृती पहा) सिध्द करा.
   (i) ΔAPB ≅ ΔCQD
   (ii) AP = C Q




7. $\Delta^s$ ABC आणि DEF मध्ये AB = DE; BC = EF आणि BC || EF शिरोबिदु A, B आणि C हे शिरोबिंदु



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




अनुक्रमे D, E आणि F शी जोडल्या गेले (आकृती पहा) सिध्द करा.

(i) ABED हा समांतरभुज चौकोन आहे.


(ii) BCFE हा समांतरभुज चौकोन आहे.

(iii) AC = DF

(iv) $\Delta ABC \cong \Delta DEF$




8. ABCD हा समांतरभुज चौकोन आहे. कर्ण AC आणि कर्ण BD, O येथे छेदत आहेत. कर्ण BD चे P आणि Q हे त्रिछेदन बिंदु आहेत. सिध्द करा. CQ || AP आणि तसेच AC हा PQ चा दुभाजक आहे. (आकृती पहा)




9. ABCD हा चौरस आहे.AB, BC, CD आणि DA चे मध्यबिंदु अनुक्रमे E, F, G आणि H हे असे आहेत की, AE = BF = CG = DH सिध्द करा EFGH हे चौरस आहे.

## 8.6 त्रिकोणाच्या मध्यबिंदुचा प्रमेय


आपण त्रिकोण आणि चौकोनाच्या गुणधर्माचा अभ्यास केलेला आहे. त्रिकोणाचे बाजुच्या मध्यबिंदु विचारात घेऊ आणि त्यापासुन काय निघते माहित करण्याचा आपण प्रयत्न करु या.

### प्रयत्न करा



त्रिकोण ABC काढा. त्रिकोणाच्या दोन बाजुच्या $\overline{AB}$ आणि $\overline{AC}$ अनुक्रमे E आणि F ची खुण करा. आकृतीत दाखविल्या प्रमाणे बिंदु E आणि F जोडा. त्रिकोणाची तिसरी बाजु EF आणि BC मोजा. तसेच

$\angle AEF$ आणि $\angle ABC$सुध्दा मोजा.




आपल्याला माहित होते $\angle AEF = \angle ABC$ आणि $\overline{EF} = \frac{1}{2}\overline{BC}$

EF आणि BC ची छेदीका AB ने तयार झालेले तो दोन संगत कोन असल्याने आपण म्हणुन शकतो EF || BC.

इतर काही त्रिकोण घेऊन ही कृती पुन्हा करा.

म्हणुन आपण खालील प्रमेया पर्यंत पोहचतो.

**प्रमेय-8.7 :** त्रिकोणाच्या दोन बाजुच्या मध्यबिंदु ला जोडलेला रेषाखंड हा त्रिकोणाच्या तिसऱ्या बाजुला समांतर असतो आणि त्याचे अर्धे असतो.

दिलेले : ABC हा त्रिकोण आहे. AB आणि AC चे मध्यबिंदु अनुक्रमे E आणि F आहेत.




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



आपल्याला हे सिध्द करायचे आहे (i) EF || BC (ii) $EF = \frac{1}{2}BC$




सिध्दता:- EF ला जोडा आणि त्याला D पर्यंत वाढवा. BA ला समांतर असणारी C मधुन रेषा काढा ती EF वाढलेली रेषा D बिंदुला मिळते.

$\Delta^s$ AEF आणि $\Delta$CDF मध्ये

AF = CF (F हा AC चा मध्यबिंदु आहे.)

$\angle AFE = \angle CFD$ (विरुध्द शिरो कोन)

आणि $\angle AEF = \angle CDF$ (CD || BA ची छेदीका ED वरचे अंतर व्यत्क्रम कोन)

को.बा.को.एकरुप नियमाने

$\therefore \Delta AEF \cong \Delta CDF$ को.बा.को.एकरुप नियम

याप्रकारे AE = CD आणि EF = DF (एकरुप त्रिकोणाचे संगत बाजु)



आपल्याला माहित आहे. AE = BE

म्हणुन BE = CD

च्या अर्थी BE || CD आणि BE = CD, BCDE समांतरभुज चौकोन आहे.

म्हणुन ED || BC

$\Rightarrow$ EF || BC

BCDE हा समांतरभुज चौकोन असल्याने ED = BC ( कसे ?) ($\because$ DF = EF)

आपल्याला FD = DF दाखवायचे आहे.

$\therefore$ 2EF = BC

म्हणुन $EF = \frac{1}{2}BC$

वरील विधानाचा व्यत्यास पण सत्य आहे. हे आपण दाखवु शकतो. त्याला लिहु या. आणि नंतर त्याला कसे सिध्द करता येईल ते पाहु या.

**प्रमेय-8.8 :** त्रिकोणाच्या एका बाजुच्या मध्यबिंदुतुन रेषा काढली आणि ती दुसऱ्या बाजुला समांतर असते आणि तिसऱ्या बाजुला दुभागते.

**सिध्दता:** $\Delta$ABC काढा. बाजु AB वर E हा मध्य बिंदु घ्या. E मधुन जाणारी आणि BC ला समांतर असणारी रेषा काढा. ती रेषा AC ला F वर छेदते.

CD || BA ची रचना करा.

आपल्याला AF = CF दाखवयाचे आहे.


SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com






$\Delta AEF$ आणि $\Delta CFD$ विचारात घेऊ

$\angle EAF = \angle DCF$ (BA || CD आणि AC हा छेदीका आहे?) (कसे?)

$\angle AEF = \angle D$ (BA || CD आणि ED हा छेदिका आहे) (कसे?)

त्रिकोणाची एकरुपता आपण सिध्द करु शकत नाही म्हणुन त्रिकोणामध्ये कोणत्याही बाजुची जोडी सारखी नाही असे दाखवत आहे.

हे करण्यासाठी EB || DC विचारात घेऊ

आणि ED || BC


या प्रकारे EDCB हे समांतरभुज $BE = DC$.

ज्या अर्थी $BE = AE$ , $AE = DC$.

म्हणुन $\Delta AEF \cong \Delta CFD$

$\therefore AF = CF$

## आणखी काही उदाहरणे




**उदाहरण-7:** $\Delta ABC$ मध्ये बाजु AB, BC आणि CA चे मध्यबिंदु अनुक्रमे D, E आणि F आहेत. जेव्हा तीनही मध्य बिंदु एकमेकाला जोडले असता सिध्द करा की, $\Delta ABC$ हा चार एकरुप त्रिकोणाने विभागते ($\Delta DEF$ ला मध्य त्रिकोण म्हणतात)

**सिध्दता:** त्रिकोण ABC मध्ये $\overline{AB}$ आणि $\overline{BC}$ चे मध्यबिंदु अनुक्रमे D, E आहेत.

म्हणुन मध्यबिंदु प्रमेया ने

DE || AC

या प्रमाणे DF || BC आणि EF || AB.

म्हणुन ADEF, BEFD, CFDE हे समांतरभुज चौकोन आहे.

ADEF समांतरभुज चौकोना मध्ये, DF हा कर्ण आहे.

म्हणुन $\Delta ADF \cong \Delta DEF$ (समांतरभुज चौकोनाचा कर्ण त्याला दोन एकरुप त्रिकोणाता विभागतं)

या प्रमाणे $\Delta BDE \cong \Delta DEF$


आणि $\Delta CEF \cong \Delta DEF$



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com






म्हणुन चार ही त्रिकोण एकरुप आहेत.

बाजुच्या मध्यबिंदु जोडल्याने त्रिकोण ABC एकरुप त्रिकोणात विभागते हे आपण सिध्द केले अहोत.

उदाहरण-8. $l$, $m$ आणि $n$ या तिन समांतर रेषाला p आणि q छेदीकाने A, B, C आणि D,E, F येथे छेदते. छेदीका p,AB आणि BC ला समान अंतरखंडात विभागते. तर छेदीक q ने DE आणि EF ला समान अंतरखंडात विभागलेले हे सुध्दा त्याच्या समान आहे. हे सिध्द करा.

सिध्दता: DE आणि EF च्या तुलनेत AB आणि BC समानतेत जोडण्याची आपल्याला गरज आहे. A आणि F ला आपण जोडु आणि '$m$' ला छेदलेल्या बिंदुला G हे नाव देऊ

$\Delta$ACF मध्ये AB = BC (दिलेले)

म्हणुन B हा AC चा मध्यबिंदु आहे.

आणि BG || CF (कसे ?)

म्हणुन G हाAF चा मध्यबिंदु आहे. (प्रमेया नुसार)

आता $\Delta$ AFD मध्ये, G हा AF चा मध्य बिंदु आहे आणि GE || AD,

DF चा मध्यबिंदु E आहे.

अशा प्रकारे DE = EF.

म्हणुन $l$, $m$ आणि $n$ हे q वर सुध्दा समान अंतराने छेदते.

उदाहरण=9: आकृतीमध्ये AD आणि BE हे $\Delta$ABC चे मध्यगा आहे आणि BE || DF तर सिध्द करा


$$CF = \frac{1}{4}AC.$$

सिध्दता: $\Delta$ ABC मध्ये D हा BC चा मध्यबिंदु आहे आणि BE || DF प्रमेयानुसार F हा CE चा मध्यबिंदु आहे.

$$\therefore CF = \frac{1}{2}CE$$

$$= \frac{1}{2}\left(\frac{1}{2}AC\right) \text{ (कसे ?)}$$

म्हणुन $CF = \frac{1}{4}AC$.




उदाहरण-10: ABC चा A, B, C मधुन BC, CA आणि AB ला समांतर असणारी रेषा काढल्या जे अनुक्रमे P, Q आणि R. येथे छेदतात. तर सिध्द करा की, $\Delta$PQR च्या परिमीती ही $\Delta$ABC च्या परिमीती पेक्षा दुप्पट असते.




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



**सिध्दता :** AB || QP आणि BC || RQ म्हणुन ABCQ हा समांतरभुज चौकोन आहे.




याच प्रमाणे BCAR, ABPC हे समांतरभुज चौकोन

$\therefore$ BC = AQ आणि BC = RA

$\Rightarrow$ A हा QR चा मध्य बिंदु आहे.

याच प्रमाणे PR आणि PQ चे मध्यबिंदु अनुक्रमे B आणि C आहेत.

$\therefore AB = \frac{1}{2}PQ$; $BC = \frac{1}{2}QR$ आणि $CA = \frac{1}{2}PR$ (कसे?) (संबंधीत प्रमेय सांगा)

आता $\Delta PQR$ ची परिमती $= PQ + QR + PR$

$= 2AB + 2BC + 2CA$


$= 2(AB + BC + CA)$

$= 2$ ( $\Delta ABC$ ची परिमीती)


## अभ्यास - 8.4



1. ABC हा एक त्रिकोण आहे. AB वर D हा असा बिंदु आहे की, $AD = \frac{1}{4}AB$ आणि E आणि AC वर असा आहे की, $AE = \frac{1}{4}AC$. जर DE = 2 से.मी. तर BC माहित करा.
2. ABCD हा चौकोन आहे. AB, BC, CD आणि DA चे मध्यबिंदु अनुक्रमे E, F, G आणि H आहेत. तर सिध्द करा EFGH हा समांतरभुज चौकोन आहे.
3. समभुज चौकोनाच्या बाजुच्या मध्यबिंदु जोडल्यानंतर जी आकृती तयार होते ती आयत आहे. हे सिध्द करा.
4. ABCD समांतरभुज चौकोनामध्ये AB आणि DC चे मध्यबिंदु अनुक्रमे E आणि F तर AF आणि EC रेषाखंड कर्ण BD ला तिन भागात विभागते हे सिध्द करा.




5. चौकोनाच्या विरुध्द बाजुंच्या मध्यबिंदुने जोडलेले रेषाखंड एकमेकांला दुभागतात हे सिध्द करा.
6. ABC हा C यथे काटकोन करणारा त्रिकोण आहे. कर्ण AB चा मध्यबिंदु M तुन जाणारी रेषा, BC ला समांतर असते आणि AC ला D येथे छेदते, तर सिध्द करा.
   (i) D हा AC चा मध्यबिंदु आहे.
   (ii) $MD \perp AC$
   (iii) $CM = MA = \frac{1}{2}AB$.






SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




## आपण काय चर्चा केलो

1. प्रतलातील चार बिंदुने तयार झालेली साधी बंदीस्त आकृती म्हणजे चौकोन
2. चौकोना मधील चार कोनांची बेरीज $360^0$ किंवा 4 काटकोन आहे.
3. समलंब चौकोन, समांतरभुज चौकोन, समभुज चौकोन, आयत,चौरस आणि पतंग हे चौकोनाचे विशेष प्रकार आहेत.
4. समांतरभुज चौकोन हा चौकोनाचा विशेष प्रकार आहे. ज्याला बरेचशे गुणधर्म आहेत. खालील प्रमेय आपण सिध्द केलेले आहेत.
   a) समांतरभुज चौकोनाचा कर्ण समांतरभुज चौकोनाला दोन एकरुप त्रिकोणात विभागलो
   b) समांतरभुज चौकोनाचे विरुध्द बाजु आणि विरुध्द कोन समान असतात.
   c) जर चौकोनाची विरुध्द बाजुंची प्रत्येक जोडी जर समान असेल तर ते समांतरभुज चौकोन असते
   d) विरुध्द बाजुंची जर प्रत्येंक जोडी समान असेल तर ते समांतरभुज चौकोन असते.
   e) समांतरभुज चौकोनाचे कर्ण एकमेकांला दुभागतात.
   f) चौकोनाचे कर्ण जर एकमेकांला दुभागत असेल तर ते चौकोन समांतरभुज चौकोन असते
5. त्रिकोणाच्या मध्यबिंदुचा प्रमेय आणि त्याचा व्यत्यास
   a) त्रिकोणाच्या दोन बाजुच्या मध्यबिंदुला जोडलेला रेषाखंड हा त्रिकोणाच्या तिसऱ्या बाजुला समांतर असतो आणि त्याचे अर्धे असते.
   b) त्रिकोणाच्या एका बाजुच्या मध्यबिंदुतुन रेषा काढली आणि ती दुसऱ्या बाजुला समांतर असते आणि तिसऱ्या बाजुला दुभागते.

### वर्तुळाचे नऊ बिंदु

कोणत्याही त्रिकोणामध्ये, बाजुचे मध्यबिंदु, शिरोलंबाचे बिंदु आणि शिरोबिंदु वर लंबसंपाती कडुन वर्तुळाखंडाचे मध्यबिंदु वर्तुळावर असतात. तर वर्तुळावर किती बिंदु आहेत? याला नऊ बिंदु वर्तुळ म्हणतात.



1765 मध्ये लिओनहार्ड थुलन ने नऊ बिंदुचे वर्तुळ माहित केले. पण पुन्हा जर्मन गणितज्ञ कार्ल फिओरनक यांनी 1822 मध्यें त्यांची पुन्हा शोध केली.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

09

# सांख्यिकी

## 9.1 प्रस्तावना

एक दिवस सोमु त्याच्या गणिताच्या शिक्षकाच्या घरी गेला शिक्षक त्यावेळेस जनगणेसाठी त्यांनी गोळा केलेली माहिती जमा करण्यात व्यस्त होते.



सोमु : नमस्कार! सर मला वाटते तुम्ही खुप व्यस्त आहात. मी तुमच्या कामात मदत करु शकतो का सर?

शिक्षक : सोमु मी जनगणनेसाठी कुंटुंबाची माहिती गोळा केली आहे. ती कुंटुंबातील व्यक्तीची संख्या त्यांचे वयोगट, कुंटुंबाचे उत्पन्न ते राहत असलेल्या घराचा प्रकार आणि इतर माहिती.

सोमु : सर या माहितीचा काय उपयोग आहे?

शिक्षक : या माहितीचा उपयोग करुन सरकारला विकासाची योजना करण्यासाठी स्त्रोताची नेमणुक करण्यासाठी होतो.

सोमु : ही मोठी माहिती सरकार कशा रितीने उपयोग करते?

शिक्षक : सरकारी अधिकारी माहितीचा उपयोग करुन याचे विश्लेषण करते. त्याच्या वरुन नविन अंदाज्याने तयार करतात. तु सुध्दा मागील वर्गात मुलभुत सांख्यीकीचा अभ्यास केल नाही का?

सोमु प्रमाणे आपण सुध्दा संख्येच्या रुपात टेबल्स आलेख इत्यादीच्या रुपात असलेली माहिती पाहातो. यावरुन संबंधीत भाजीपाल्याची किंमत शहराचे तापमान क्रिकेटच्या गणना मतदानाचा निकाल आणि अशाप्रकारे ही वस्तु स्थिती किंवा आकृत्या ज्या सांख्यिकी किंवा इतर हेतुसाठी एका निदीष्ट उद्देशासाठी जमा करतो. यालाच सामग्री म्हणतात. घेतलेली माहिती अर्थपुर्ण बनविण्याऱ्या गणिताच्या शाखेला सांख्यिकी म्हणतात.

मागील वर्गात शिकलेल्या संख्या शास्त्राची (माहिती हाताळणे) उजळणी करु या.

## 9.2 सामग्री गोळा करणे

संख्या शास्त्रात एका उद्देशाने सामग्री गोळा करणे पहिला पायरी आहे. हे समजण्यासाठी खालील कृती करुन सामग्री गोळा करण्याचा अभ्यास करु

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



### कृती



तुमच्या वर्गातील विद्यार्थ्यांना चार गटात विभागणी करा. प्रत्येक गटास खालील पैकी एक प्रकारची माहिती गोळा करण्याचे काम नेमुन द्या.

i. तुमच्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांचे वजन

ii. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या भावांची किंवा बहिणीनी संख्या

iii. मागील महिण्याची दिवसवारी तूमच्या वर्गातील गैरहजरी

iv. तुमच्या वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या शाळेपासुन घरापर्यंतचे अंतर

या विद्यार्थ्यांनी अत्यावश्यक माहिती कशी गोळा केली पाहु या.

1. माहिती गोळा करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांची चौकशी केली किंवा. स्वत:त्याच्या घरी जाऊन माहिती गोळी केली का?

2. शाळेतील रिकार्डमधील किंवा इतर कोणत्याही नोंदणी करुन माहिती गोळा केली का?

पहिल्या संदर्भात जेव्हा खचित उद्देशाने शोधकर्ता ने (विद्यार्थी) माहिती गोळा केल्यास त्यास प्राथमिक सामग्री असे म्हणतात. ( (i), (ii), (iv) मध्ये आहे.).

वरील (iii) मध्ये मागच्या महिण्याची गैरहाजरी फक्त शाळेतील हजेरीच्या रजिस्टर वरुनच माहित होते. इथे आपण वर्ग शिक्षकाव्दारे आधीच गोळा केलेल्या माहितीचा उपयोग करत आहो. स्त्रोताव्दारे गोळा केलेली माहिती जी आधीच रजिस्टर मधुन नोंदलेली असते त्यास दुय्यम सामग्री म्हणतात.(**secondary data**)

### हे करा



खालील पैकी कोणती प्राथमीक सामग्री आणि दुय्यम सामग्री आहे?

i. 2010-2011 या कालावधीत तुमच्या शाळेत विद्यार्थ्यांची नोंदणी झालेल्या सामग्री गोळा केलेली आहे.

ii. तुमच्या शारिरिक शिक्षकाने तुमच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या उंचीची केलेली नोंद

## 9.3 सामग्रीस दाखविणे

एकदा सामग्री गोळा केल्यानंतर विश्लेषकास या सामग्रीस अर्थपुर्ण समझण्यास सोपे आणि एकाच क्षणी त्याची वैशिष्टे दाखविल्याचे एक नविन उपाय शोधला पाहिजे. विविध प्रसंगात जेथे सामग्रीची दर्शवणुक आवश्यक होते. ते घेऊत.

समाज 15 विद्यार्थ्यांनी गणिताच्या चाचणीत (50 पैकी) मिळविलेले गुण

25, 34, 42, 20, 39, 50, 28, 30, 50, 11, 20, 42, 45, 40, 7 आहेत.



SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



या रुपात असलेल्या सामग्रीला कच्ची सामग्री असे म्हणतात

वरील सामग्रीवरुन तुम्ही किमान आणि कमाल गुण सुलभतेने ओळखु शकता. लक्षात ठेवा की, किमान आणि कमाल गुणातील फरकास दिलेल्या माहितीची व्याप्ती म्हणतात.

येथे किमान आणि कमाल गुण 7 आणि 50 आहेत.

म्हणुन व्याप्ती = 50 – 7 = 43,

वरील वरुन आपण म्हणु शकतो की, सामग्री 7 आणि 50 मध्ये स्थित आहे. आता वरील सामग्री वरुन खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

i. दिलेल्या सामग्रीची मधली किंमत माहित करा.

ii. गणिताच्या चाचणीत किती मुलांनी 60% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविले.

**चर्चा**

(i) इक्रम म्हणाला माहितीची (सामग्री) मधली किंमत 25 आहे. कारण परिक्षा 50 गुणासाठी घेतली आहे. तुमचा काय विचार आहे?

मेरी म्हणाली कि, ती सामग्री मधली किंमत नाही. या संदर्भात 15 विद्यार्थ्यांच्या गुण कच्ची सामग्री आहे. म्हणुन सामग्रीस चढत्या क्रमाणे मांडल्यास

7, 11, 20, 20, 25, 28, 30, 34, 39, 40, 42, 42, 45, 50, 50

आपण म्हणु शकतो की, 8 वे पद मधली किंमत आहे. ती 34 आहे.

(ii) 50 चे 60% कसे काढतात. हे तुम्हाला आधीच माहित आहे. ( म्हणजेच $\frac{60}{100} \times 50 = 30$ ).

तुम्हाला दिसुन यते की, 9 विद्यार्थ्यांनी 60% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळाले( म्हणजे 30 किंवा जास्त)

जेव्हा सामग्रीतील अवलोकन खुप जास्त असतात. सामग्रीस चढत्या किंवा उत्तरत्या क्रमाणे मांडुन दर्शवणुक करण्यासाठी जास्त वेळ लागतो. म्हणुन आपण पर्यायी पध्दतीचा विचार केला पाहिजे.

खालील उदाहरण पहा.

उदाहरण-1: गणिताच्या चाचणित 50 विद्यार्थ्यांनी मिळविलेले गुण खालील प्रमाणे आहेत.

5, 8, 6, 4, 2, 5, 4, 9, 10, 2, 1, 1, 3, 4, 5,
8, 6, 7, 10, 2, 1, 1, 3, 4,4, 5, 8, 6, 7,
10, 2,8, 6, 4, 2, 5, 4, 9, 10,
2, 1, 1, 3, 4, 5, 8, 6,4, 5, 8

| गुण | ताळ्याची खुण | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| 1 | IIII I | 6 |
| 2 | IIII I | 6 |
| 3 | III | 3 |
| 4 | IIII IIII | 9 |
| 5 | IIII II | 7 |
| 6 | IIII | 5 |
| 7 | II | 2 |
| 8 | IIII I | 6 |
| 9 | II | 2 |
| 10 | IIII | 4 |
| | एकुण | 50 |



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



सामग्रीस तक्त्यात दाखविल्याप्रमाणे ताळ्याच्या खुणेवरुन तक्ता बनविता येतो.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या एका निश्चित गुणांच्या संख्येला त्या गुणांची वारंवारता असे म्हणतात. उदाहणार्थ 9 विद्यार्थ्यांनी प्रत्येकी 4 गुण मिळाले. म्हणुन 4 गुणांची वारंवारता 9 आहे.

येथे तक्त्यात ताळयाची खुण कच्च्या सामग्रीचा तक्ता बनविण्यासाठी उपयोगी पडतो.

तक्त्यातील वारंवारतेची एकुण बेरीज सामग्रीतील अवलोकानाची एकुण संख्या होते.

सामग्रीचे वास्तविक अवलोकन त्याच्या वारंवारते सांबत तक्त्यात दाखविले आहे. या तक्त्यास असंग्रहीत वारंवारता वितरण सारणी किंवा अवलोकनाच्या वजनाच्या तक्ता म्हणतात (**'Ungrouped Frequency Distribution Table'** किंवा **'Table of Weighted Observations'**)

## कृती



तुमच्या वर्गमित्राच्या आडनावाच्या पहिल्या अक्षराची वारंवारता वितरण सारणी तयार करा आणि खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

(i) तुमच्या वर्गमित्रा पैकी सुरुवातीचे जास्त वेळ येणार अक्षर कोणते?

(ii) 'I' मुळाक्षरावरुन येणाऱ्या नावाचे विद्यार्थ्यां किती आहेत?

(iii) तुमच्या वर्गमित्रामध्ये कोणते सुरुवातीचे अक्षर सर्वात कमी आहेत?

समजा काही विशेष कारणासाठी सामग्रीला आपण तिन विभागात दर्शविले पाहिजे. (i) किती विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्गाची आवश्यकता पडते. (ii) किती विद्यार्थ्यां साधारण आहेत. (iii) परिक्षेत चांगली प्रगती दाखविणारे विद्यार्थी आहे. आपण आवश्यक्ते नुसार गट पाडुन संग्रहीत वारंवारता सारणी बनवितो.

| वर्ग अवकाश(गुण) | प्रकार | ताळ्याची खुण | एकुण विद्यार्थी |
|---|---|---|---|
| 1 - 3 | (प्रत्येक वर्गाची गरज) | 卌 卌 卌 | 15 |
| 4 - 5 | (सरासरी) | 卌 卌 卌 \| | 16 |
| 6 - 10 | (चांगले) | 卌 卌 卌 \|\|\|\| | 19 |

सामग्रीतील राशींची संख्या जास्त असल्यास माहितीसाठी सुध्दा या प्रकारची वारंवारता तेचे विभागणी खुप उपयोगी पडते. एक उदाहरण घेऊ ज्यामध्ये गट आणि वारंवारता सामग्रीला समझण्यासाठी सोईस्कर होते.

उदाहरण-2: एका बॉस्केटमधील 50 संत्र्याची वजन (ग्राममध्ये) खाली दिले आहे.

35, 45, 55, 50, 30, 110, 95, 40, 70, 100, 60, 80, 85, 60, 52, 95, 98, 35, 47, 45, 105, 90, 30, 50, 75, 95, 85, 80, 35, 45, 40, 50, 60, 65, 55, 45, 30, 90, 115, 65, 60, 40, 100, 55, 75, 110, 85, 95, 55, 50



Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com



अशा प्रकारची मोठी सामग्री दर्शविते आणि समझण्यासाठी आपणास त्याचे गट पाडावे लागते जसे 30-39,40-49,50-59,.......100,109,110,119 (आपली माहिती 30 ते 115 आहे) या गटात वर्ग किंवा वर्ग अवकाश म्हणतात. त्याच्या आकाराला वर्गाची लांबी किंवा वर्गाची रुंदी म्हणतात. ये वर्गांतर 10 आहे. प्रत्येक वर्गातील लहान संख्येला खालची मर्यादा आणि मोठ्या संख्येला वरची मर्यादा म्हणतात. उदा. 30-39 यावर्गात खालची वर्ग मर्यादा 30 आणि वरची मर्यादा 39 आहे.

| (संत्र्याचे वजन) वर्ग अवकाश | ताळ्यांची खुण | एकुण संत्रे वारंवारता |
|---|---|---|
| 30 - 39 | 𝍸 \| | 6 |
| 40 - 49 | 𝍸 \|\|\| | 8 |
| 50 - 59 | 𝍸 \|\|\|\| | 9 |
| 60 - 69 | 𝍸 \| | 6 |
| 70 - 79 | \|\|\| | 3 |
| 80 - 89 | 𝍸 | 5 |
| 90 - 99 | 𝍸 \|\| | 7 |
| 100-109 | \|\|\| | 3 |
| 110 - 119 | \|\|\| | 3 |
| | एकुण | 50 |

या रुपात सामग्री दर्शवुन संक्षिप्त करणे आणि सामग्रीस संक्षेप करुन पाहता क्षणी काही निश्चित वैशिष्टये निरिक्षणा करण्याची आपणास शक्ती देते यास संग्रहीत वारंवारता वितरण सारणी असे म्हणतात.( **grouped frequency distribution table**)

आपणास दिसुन यते की, वरील सारणीतील वर्ग एकमेकावर आलेले नाहीत. म्हणजे 30-39, 40-49 ... दोन वर्गविकाशात कोणतीही संख्या वारंवारता येत नाही. अशा वर्गांना असलग वर्ग म्हणतात. लक्षात घ्या की, लहान आकाराचे जास्त वर्ग किंवा मोठ्या आकाराचे कमी वर्ग बनविले आहेत. नेहमी कच्ची माहिती दिली असता व्याप्ती शोधता येते( व्याप्ती = कमाल किंमत- किमान किंमत) व्याप्तीवरुन वर्ग अवकाश वर्गाची संख्या अनुकुल ते ने तयार करता येते. उदा. वर्ग अवकाश 30-35, 36-40 अशा प्रकारे.

| वर्ग | वर्ग सिमा |
|---|---|
| 20 - 29 | 19.5 - 29.5 |
| 30 - 39 | 29.5 - 39.5 |
| 40 - 49 | 39.5 - 49.5 |
| 50 - 59 | 49.5 - 59.5 |
| 60 - 69 | 59.5 - 69.5 |
| 70 - 79 | 69.5 - 79.5 |
| 80 - 89 | 79.5 - 89.5 |
| 90 - 99 | 89.5 - 99.5 |
| 100 - 109 | 99.5-109.5 |
| 110 - 119 | 109.5-119.5 |
| 120 - 129 | 119.5-129.5 |

समजा संत्र्याचे वजन 39.5 ग्रा असल्यास विचार करा की, ते कोणत्या वर्गात येते? 39.5 ला आपण 30-39 किंवा 40-49 मध्ये घेता येत नाही. अशा संदर्भात आपण खऱ्या सिमा प्रत्येक वर्गासाठी तयार करतो.

वर्गाची वरची मर्यादी आणि दुसऱ्या वर्गाची खालची वर्ग मर्यादा याची सरासरी त्या वर्गाची वरची सिमा होते आणि हिच दुसऱ्या वर्गाची खालची सीमा होते.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



अशारीतीने सर्व वर्गाच्या सिमा माहित करता येते. पहिल्या वर्गाच्या अगोदरचा वर्ग अवकाश नंतरच्या समोरील वर्ग अवकाश गृहीत धरुन पहिल्या वर्गाची खालची सिमा आणि नंतरच्या वर्गाची वरची सिमा काढता येते.

39.5 यास कोणत्या वर्गात घ्यायची समस्या पुन्हा उद्भवते. तो 29.5 -39.5 किंवा 39.5-49.5 ? आपल्या अनुकुलते नुसार जर एखादे अवलोकन एका विशिष्ट वर्गाच्या वरच्या सिमेला समतुल्य असल्यास त्या विशिष्ट अवलोकानास त्याच्या नंतरच्या वर्गात घेता येते. परंतु त्या वर्गात घेता येत नाही.

म्हणुन 39.5 हे 39.5-49.5 वर्गात येते.

30-40,40-50,50-60 ...... वर्गास सलग वर्ग म्हणतात.

जर आपण असलग वर्गाच्या सिमाचे निरिक्षण केल्या ते सलग वर्गाच्या रुपात असतात. एका विशिष्ट वर्गाच्या वरच्या सिमा आणि खालच्या सिमेमधील फरकावरुन वर्गाची लांबी येते. वर्ग अवकाश 90,99 ची लांबी (99.5-89.5=10)10 आहे.

उदाहरण-3: एका निश्चित शहराची सप्टेंबर महिण्याच्या 30 दिवसाची सापेक्ष आद्रता खालील प्रमाणे आहे.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 98.1 | 98.6 | 99.2 | 90.3 | 86.5 | 95.3 | 92.9 | 96.3 | 94.2 | 95.1 |
| 89.2 | 92.3 | 97.1 | 93.5 | 92.7 | 95.1 | 97.2 | 93.3 | 95.2 | 97.3 |
| 96.0 | 92.1 | 84.9 | 90.0 | 95.7 | 98.3 | 97.3 | 96.1 | 92.1 | 89 |

(i) 84-86, 86,-88 इत्यादी वर्ग घेऊन संग्रहीत वारंवारता वितरणाची सारणी बनवा?

(ii) सामग्रीचा व्याप्ती किती आहे?

सोडवणुक: (i) संग्रहीत वारंवारता वितरणाची सारणी खाली आहेत.

| सापेक्ष आद्रता | ताळ्याच्याखुण | दिवसांची संख्या |
|---|---|---|
| 84-86 | I | 1 |
| 86-88 | I | 1 |
| 88-90 | II | 2 |
| 90-92 | II | 2 |
| 92-94 | 卌 II | 7 |
| 94-96 | 卌 I | 6 |
| 96-98 | 卌 II | 7 |
| 98-100 | IIII | 4 |

(सुचना: 90 हे 90-92 वर्गात येते असेच 96 हे 96-98 वर्गात येते.)



(ii) व्याप्ती 99.2 - 84.9 = 14.3 (वेगवेगळ्या जागी बदलते)



SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



## अभ्यास - 9.1



1. खालील वारंवारता वितरणसारणी वरुन गुणवारी वारंवारता लिहा.

| गुण | 5 पर्यंत | 6 पर्यंत | 7 पर्यंत | 8 पर्यंत | 9 पर्यंत | 10 पर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी संख्या | 5 | 11 | 19 | 31 | 40 | 45 |

2. 9 व्या वर्गाच्या 36 विद्यार्थ्यांचा रक्तगटाची खालील प्रमाणे नोंदणी केली आहे.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A | O | A | O | A | B | O | A | B | A | B | O |
| B | O | B | O | O | A | B | O | B | AB | O | A |
| O | O | O | A | AB | O | A | B | O | A | O | B |

सामग्रीला वारंवारता वितरण सारणीच्या रुपात दर्शवा कोणता रक्तगट सामान्य आहे आणि कोणता दुर्लभ रक्तगट मुलांमध्ये आढळतो ?

3. तिन नाण्यांना एकाच वेळी वर फेकले असता. प्रत्येक वेळी चित (हेड) पडलेल्या एकुण नाण्यांना नोंदणी खालील प्रकारे केली आहे.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 2 | 3 | 1 | 1 | 1 | 0 | 3 | 2 | 1 |
| 2 | 2 | 1 | 1 | 2 | 3 | 2 | 0 | 3 | 0 | 1 | 2 |
| 3 | 2 | 2 | 3 | 1 | 1 | | | | | | |

वरील दिलेल्या सामग्रीसाठी वारंवारता वितरण सारणी तयार करा.

4. एका TV वाहिणीने धुम्रपाण निषेधावर संक्षिप्त संदेश मतदानाचे (SMS ) आयोजन केले. त्यांनी काही पर्यय दिले जसे A – पुर्ण निषेध B – फक्त सावर्जनिक ठिकाणी निषेध C – जरुरी नाही, एका तासातील ( SMS ) चा निकाल खाली आहे. A B A BC B

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A | B | B | A | C | C | B | B | A | B |
| B | A | B | C | B | A | B | C | B | A |
| B | B | A | B | B | C | B | A | B | A |
| B | C | B | B | A | B | C | B | B | A |
| B | B | A | B | B | A | B | C | B | A |
| B | B | A | B | C | A | B | B | A | |

वरील सामग्रीवरुन संग्रहीत वारंवारता वितरणाची सारणी तयार करा. किती अचुक उत्तरे स्विकारलीत ? जास्त लोकांचे मत काय होते ?

SCERT TELANGANA





Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



5. बाजुच्या स्तंभालेखावरुन वारंवारता वितरण सारणी बनवा




6. बाजुच्या आलेखात अक्षावर वापरलेल्या प्रमाणास ओळखा त्यावरुन वारंवारता वितरण सारणी लिहा.

7. एका चाचणीत 30 विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेले गुण ( 75 पैकी) खाली दिलेले आहेत.
42, 21, 50, 37, 42, 37, 38, 42, 49, 52, 38, 53, 57, 47, 29
59, 61, 33, 17, 17, 39, 44, 42, 39, 14, 7, 27, 19, 54, 51.
सामान वर्ग अवकाश घेऊन वारंवारता सारणी तयार करा. (सुचना: त्यापैकी एक 0-10)

8. एका निवासस्थानी असलेल्या 25 घरांचे विद्युत बिल (रुपयांत) खाली दिलेले आहे. वर्गाच्या आकार 75 घेऊन संग्रहीत वारंवारता वितरण सारणीची रचना करा.
170, 212, 252, 225, 310, 712, 412, 425, 322, 325, 192, 198, 230, 320, 412,
530, 602, 724, 370, 402, 317, 403, 405, 372, 413

9. एका कंपणीने विशिष्ट प्रकारच्या कारच्या बॅटरी तयार केल्या 40 बॅटरीचा जिवन काल (वर्षात) खाली नोंदणी केली आहे.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2.6 | 3.0 | 3.7 | 3.2 | 2.2 | 4.1 | 3.5 | 4.5 |
| 3.5 | 2.3 | 3.2 | 3.4 | 3.8 | 3.2 | 4.6 | 3.7 |
| 2.5 | 4.4 | 3.4 | 3.3 | 2.9 | 3.0 | 4.3 | 2.8 |
| 3.5 | 3.2 | 3.9 | 3.2 | 3.2 | 3.1 | 3.7 | 3.4 |
| 4.6 | 3.8 | 3.2 | 2.6 | 3.5 | 4.2 | 2.9 | 3.6 |

या सामग्रीसाठी सलगवर्ग घेऊन संग्रहीत वारंवारता वितरण सारणीची रचना 0.5 वर्गांतर 2-2.5 पासुन सुरुवात करा.



SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



## 9.4 केंद्रीय प्रवृत्तीची परिमाणे:

खालील संदर्भ पहा.

संदर्भ-1: एका वस्तीगृहात 50 विद्यार्थी न्याहारी मध्ये 200 इडली खातात जर त्या वस्तीगृहात अजुन 20 विद्यार्थी मिसळल्यास किती इडलीची गरज पडते.

संदर्भ-2 : एका फक्टरीमधील कर्मचाऱ्याचे महिण्याचा पगार खालील तक्त्यात दिलेला आहे. कोणती पगाराची संख्या पुर्ण कर्मचाऱ्यांची दर्शवणुक करते.

| कर्मचारी | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पगार (हजार) | 12 | 14 | 15 | 15 | 15 | 16 | 17 | 18 | 90 | 95 |

संदर्भ-3: एका शहरातील वाहतुकीचे विविध रुप खाली दिलेले आहे. कोणते प्रसिध्द वाहतुकीचे साधन आहे?



1. कार 15%
2. रेल्वे 12%
3. बस 60%
4. दुचाकी 13%

पहिल्या संदर्भात आपण साधारणता सरासरी( मध्य) वापरतो. आणि त्याचा वापर प्रश्न सोडविण्यासाठी होतो. परंतु जर आपण दुसऱ्या संदर्भात सरासरी पगार घेतल्यास तर ते 30.7 हजार होते. कसातरी सामग्री वरुन सुचित करते की, ही मध्य किंमत ही चांगली पध्दत नाही. कर्मचाऱ्याच्या पगाराच्या किंमतीचा जवळ नाही. अजुन जास्त लोकांचा पगार 12 ते 18 हजारच्या मध्ये आहे. म्हणुन या सामग्रीचे मध्य अचुक उत्तर होते. तिसऱ्या संदर्भात बहुलक हे योग्य उत्तर आहे. म्हणुन माहितीचा स्वभाव आणि आकृतीच्या उद्देशानुसार सरासरी किंवा मध्यक किंवा बहुलकास मोजण्यासाठी घेऊत.

### विचार करा आणि चर्चा करा आणि लिहा.



1. तिन संदर्भ दया जेथे मध्य, मध्यक, आणि बहुलक यांचा अलग अलग उपयोग करुन लिहा. एका संदर्भात जेथे दोन क्रिकेटर रघु आणि गौतम म्हणाले की, त्यांची गणना इतरापेक्षा चांगला आहे. गेल्या 5 सामन्याचा आधारावरुन त्यांची तुलना केली.

| सामने | | $1^{st}$ | $2^{nd}$ | $3^{rd}$ | $4^{th}$ | $5^{th}$ |
|---|---|---|---|---|---|---|
| धावा | रघु | 50 | 50 | 76 | 31 | 100 |
| मेड | गौतम | 65 | 23 | 100 | 100 | 10 |



SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



दोन्ही खेळाडुचा शौकीनांनी धावाच्या सरासरीत खालील प्रकारे लिहिले

रघुची सरासरी $= \frac{307}{5} = 61.4$

गौतमची सरासरी $= \frac{298}{5} = 59.6$

रघुची सरासरी गौतमच्या सरासरी पेक्षा जास्त आहे. म्हणुन रघु गौतम पेक्षा चांगला आहे. परंतु गौतमच्या शौकीनांना सहमत नव्हते. गौतमच्या शौकीनांनी त्यांच्या गणनेस उतरत्या क्रमाने मांडले आणि मधली गणना खाली प्रमाणे आली आहे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| रघु | 100 | 76 | 50 | 50 | 31 |
| गौतम | 100 | 100 | 65 | 23 | 10 |

गौतमच्या शौकीनांनी सांगीतले की, मधली गणना 65 आहे जी रघुच्या मध्यल्या किंमतीपेक्षा जास्त आहे. म्हणजे 50 मधुन त्यांची कृती चांगली आहे.

परंतु आपण म्हणु शकतो की, गौतमने 5 सामन्यामध्ये दोन शतके मारलीत म्हणुन तो उत्कृष्ठ ठरला.

आता, हे भांडण मिटविण्यासाठी रघु आणि गौतमच्या शौकीनांनी तिन उपाय योजले.

त्यांनी सरासरी गणनेस मध्य म्हणुन वापरुन वादातील मधली गणना मध्यक आणि बहुलक सुध्दा त्याची कुशलताची तुलना करण्यासाठी गणनेची वारंवार येणारी किंमत घेतली. रघुला बहुलक 50 आहे. गौतमचा बहुलक 100 आहे या तिन्ही उपाया वरुन यात कोण श्रेष्ठ ठरते ?

आता मध्याची माहिती घेऊ

**9.4.1** अंकगणितीय मध्य (सरासरी)

मध्य हा सामग्रीच्या अवलोकानाच्या बेरजेला एकुण अवलोकनाचे भागल्यास येतो. कच्चा सामाग्रीचा अंकगणिता मध्य काढणे आपण या बद्दल अगोदरच चर्चा केली.

$$\text{मध्य } \bar{x} = \frac{\text{अवलोकनाची बेरीज}}{\text{अवलोकनाची संख्या}} \text{ or } \bar{x} = \frac{\Sigma x_i}{n}$$

9.4.1.1 कच्च्या सामग्रीचा मध्य (सरासरी)

उदाहरण-4:एका आठवड्यात एका जागी पडलेला पाऊस 4 से.मी., 5 से.मी.12 से.मी. 3 से.मी., 6 से.मी. 8 से.मी. 0.5 से.मी. आहे. प्रत्येक दिवसाचा सरासरी पाऊस किती पडला ते काढा.

सोडवणुक: दिवसाचा सरासरी पाऊस हा वरील अवलोकानाचा अंक गणितीय मध्य आहे. एका आठवड्यात पडलेला पाऊस 4 से.मी., 5 से.मी.12 से.मी. 3 से.मी., 6 से.मी. 8 से.मी.0.5 से.मी. आहेत.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



एकुण अवलोकन (n) = 7

मध्य $\bar{x} = \frac{\sum x_i}{n} = \frac{x_1 + x_2 + x_3 + .....x_n}{n}$ जेथे $x_1, x_2 ..... x_n$ हे $n$ अवलोकन आहे.

आणि $\bar{x}$ त्यांचा मध्य आहे $= \frac{4+5+12+3+6+8+0.5}{7} = \frac{38.5}{7} = 5.5$ से.मी.

उदाहरण-5. जर 10, 12, 18, 13, P आणि 17 चा मध्य 15 आहे तर P ची किंमत काढा.

सोडवणुक: आपणास माहित आहे. $\bar{x} = \frac{\sum x_i}{n}$

$$15 = \frac{10+12+18+13+P+17}{6}$$

$$90 = 70 + P$$

$$P = 20.$$



### 9.4.1.2 असंग्रहीत वारंवारता वितरणाचा मध्य

एका वर्गातील 40 विद्यार्थ्यांचे वजन खालील वारंवारता वितरण सारणीत दिले आहे.

| वजन कि.ग्र.मध्ये $(x)$ | 30 | 32 | 33 | 35 | 37 | 41 |
|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थ्यांची संख्या $(f)$ | 5 | 9 | 15 | 6 | 3 | 2 |

40 विद्यार्थ्यांचे सरासरी (मध्य) वजन काढा.

वरील सारणीवरुन 5 विद्यार्थ्यांचे वजन प्रत्येकी 30 कि.ग्र. आहे. त्यांच्या वजनांची बेरीज $5 \times 30 = 150$ कि.ग्र. आहे. अशारीतीने आपण वजनाची बेरीज प्रत्येक वारंवारते सोबत आणि त्यांचा एकुण संख्या माहित करु शकतो. वारंवारतेच्या बेरजेवरुन सामग्रीतील अवलोकनांची संख्या मिळते.

$$\text{मध्य } (\bar{x}) = \frac{\text{सर्व अवलोकनाची बेरीज}}{\text{एकुण अवलोकनाची संख्या}}$$

$$\text{म्हणुन मध्य } = \frac{5\times30+9\times30+15\times33+6\times35+3\times37+2\times41}{5+9+15+6+3+2} = \frac{1336}{40} = 33.340$$

जर $x_1, x_2, x_3, x_4, x_5, x_6$ अवलोकन आणि त्यासमान वारंवारता $f_1, f_2, f_3, f_4, f_5, f_6$ आहेत तर वरील पदावलीस आपण अशाप्रकारे लिहु शकतो.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



मध्य $\bar{x} = \dfrac{f_1x_1 + f_2x_2 + f_3x_3 + f_4x_4 + f_5x_5 + f_6x_6}{f_1 + f_2 + f_3 + f_4 + f_5 + f_{66}} = \dfrac{\sum f_i x_i}{\sum f_i}$

$\therefore \bar{x} = \dfrac{\sum f_i x_i}{\sum f_i}$

उदाहरण-6: खालील सामग्रीचा मध्य काढा

| $x$ | 5 | 10 | 15 | 20 | 25 |
|---|---|---|---|---|---|
| $f$ | 3 | 10 | 25 | 7 | 5 |

सोडवणुक:

**पायरी-1** : प्रत्येक रांगेचा $f_i \times x_i$ माहित करा

**पायरी-2** : वारंवातेची बेरीज $(\Sigma f_i)$

आणि $f_i \times x_i$ $(\Sigma f_i x_i)$ ची बेरीज काढा.

**पायरी-3** : $\bar{x} = \dfrac{\Sigma f_i x_i}{\Sigma f_i} = \dfrac{755}{50} = 15.1$ माहित करा

| $x_i$ | $f_i$ | $f_i x_i$ |
|---|---|---|
| 5 | 3 | 15 |
| 10 | 10 | 100 |
| 15 | 25 | 375 |
| 20 | 7 | 140 |
| 25 | 5 | 125 |
| | $\Sigma f_i = 50$ | $\Sigma f_i x_i = 755$ |

उदाहरण-7: जर खालील सामग्रीचा मध्य 7.5 आहे तर 'A' ची किंमत काढा.

| गुण | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थीची संख्या | 3 | 10 | 17 | A | 8 | 4 |

सोडवणुक:

वारंवारतेची बेरीज $(\Sigma f_i) = 42 + A$

$f_i \times x_i$ $(\Sigma f_i x_i)$ ची बेरीज= 306 + 8A

मध्य $\bar{x} = \dfrac{\Sigma f_i xi}{\Sigma f_i}$

दिलेला अंकगणितीय मध्य = 7.5

म्हणुन $7.5 = \dfrac{306 + 8A}{42 + A}$

$306 + 8A = 315 + 7.5 A$

| गुण $(x_i)$ | विद्यार्थी संख्या $(f_i)$ | $f_i x_i$ |
|---|---|---|
| 5 | 3 | 15 |
| 6 | 10 | 60 |
| 7 | 17 | 119 |
| 8 | A | 8A |
| 9 | 8 | 72 |
| 10 | 4 | 40 |
| | 42+A | 306+8A |



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



$$8A - 7.5A = 315 - 306$$

$$0.5A = 9$$

$$A = 18$$

9.4.1.3 विचलन पध्दतीव्दारे संग्रहीत वारंवारता वितरणाचा मध्य

उदाहरण-8: खालील सामग्रीचा अंकगणितीय $x$ मध्य काढा.

| $x$ | 10 | 12 | 14 | 16 | 18 | 20 | 22 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| $f$ | 4 | 5 | 8 | 10 | 7 | 4 | 2 |

उदाहरण:

**(i) साधारण पध्दती:**

असंग्रहीत वारंवारता वितरणात तुम्ही या सुत्राचा वापर करु शकता.

| $x_i$ | $f_i$ | $f_i x_i$ |
|---|---|---|
| 10 | 4 | 40 |
| 12 | 5 | 60 |
| 14 | 8 | 112 |
| 16 | 10 | 160 |
| 18 | 7 | 126 |
| 20 | 4 | 80 |
| 22 | 2 | 44 |
| | $\sum_{i=1}^{7} f_i = 40$ | $\sum_{i=1}^{7} f_i x_i = 622$ |

$$\bar{x} = \frac{\sum_{i=1}^{7} f_i x_i}{\sum_{i=1}^{7} f_i} = \frac{622}{40} = 15.55$$

**(ii) विचलन पध्दती**

या पध्दतीत आपणास एका अवलोकनास अनुकुल गृहीत मध्य घ्यावा लागतो. आपण गृहीत मध्य 16 घेतला. A = 16 गृहीत मध्यपासुन दुसऱ्या अवलोकनाचे विचलन सारणीत दिले आहे.

| $x_i$ | $f_i$ | $d_i = x_i - A$ | $f_i d_i$ |
|---|---|---|---|
| 10 | 4 | −6 | −24 |
| 12 | 5 | −4 | −20 |
| 14 | 8 | −2 | −16 |
| 16 A | 10 | 0 | 0 |
| 18 | 7 | +2 | +14 |
| 20 | 4 | +4 | +16 |
| 22 | 2 | +6 | +12 |
| | 40 | | −60+42=−18 |

वारंवारतेची बेरीज = 40

$f_i \times d_i$ च्या गुणाकाराची बेरीज= − 60 + 42

$$\Sigma f_i d_i = -18$$

मध्य $\bar{x} = A + \frac{\Sigma f_i d_i}{\Sigma f_i} = 16 + \frac{-18}{40}$

$= 16 - 0.45$

$= 15.55$



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



### 9.4.2 मध्यक (Median)

कच्च्या सामग्रीला चढत्या क्रमाणे लिहुन त्यातील मधले अवलोकन म्हणजेच मध्यक होय, मध्यक हा सामग्रीला दोन समान भागात विभागणी करते. एका भागातील किंमती मध्यकापेक्षा मोठ्या आणि दुसऱ्या भागाकडील किंमती मध्यका पेक्षा लहान असतात.

मागील वर्गात शिकल्याप्रमाणे कच्च्या माहितीचे मध्यक खालील प्रमाणे माहित करता येते.

क्रमात मांडलेल्या सामग्रीच्या अवलोकनाची संख्या 'n' आणि 'n' विषम संख्या असल्यास मध्यक $\left(\frac{n+1}{2}\right)^{th}$ अवलोकन होते.

n सम संख्या असल्यास मध्यक $\left(\frac{n}{2}\right)^{th}$ आणि $\left(\frac{n}{2}+1\right)^{th}$ अवलोकन होते.

**प्रयत्न करा.**



1. 75, 21, 56, 36, 81, 05, 42 चा मध्यक काढा.
2. 7, 10, 15, x, y, 27, 30 चढत्या क्रमात असलेल्या सामग्रीचा मध्यक 17 आहे आणि अजुन एक अवलोकन 50 त्यात मिळविले. असता मध्यक 18 होते. तर x तर y च्या किंमती काढा.

### 9.4.2.1 वारंवारता वितरणाचा मध्यक

वजनाच्या राशीचे अवलोकन मध्यक काढण्याच्या पध्दतीचे उदाहरण घेऊन चर्चा करु. एका कंपनीतील 100 कर्मचाऱ्यांचे महिण्याचे वेतन घेऊ या.

| महिण्याचे वेतन(रु.) | 7500 | 8000 | 8500 | 9000 | 9500 | 10000 | 11000 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कर्मचारी संख्या | 4 | 18 | 30 | 20 | 15 | 8 | 5 |

दिलेल्या सामग्रीचा मध्यक कसे माहित करता ? पहिले दिलेल्या सामग्रीस चढत्या किंवा उतरत्या क्रमात मांडणी करा नंतर त्या समान वारंवारतेला सारणीत लिहुन संचित वारंवारता पेक्षा कमी माहित करा. एका विशिष्ट अवलोकना पर्यंतची संचित वारंवारता ही एका विशिष्ट अवलोकना पर्यंतच्या पुढची संचित वारंवारता आहे.

| वेतन ($x$) | कमर्चाऱ्यांची संख्या ($f$) | संचित वारंवारता ($cf$) |
|---|---|---|
| 7500 | 4 | 4 |
| 8000 | 18 | 22 |
| 8500 | 30 | 52 |
| 9000 | 20 | 72 |
| 9500 | 15 | 87 |
| 10000 | 8 | 95 |
| 11000 | 5 | 100 |
| | 100 | |



Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com



$\frac{N}{2}$ माहित करा आणि मध्यक वर्ग ओळखा ज्याची संचित वारंवारता फक्त $\frac{N}{2}$,वाढविली आहे. जेथें N ही वारंवारतेची बेरीज आहे.

जेथे N= 100 सम म्हणुन $\left(\frac{N}{2}\right)^{th}$ आणि $\left(\frac{N}{2}+1\right)^{th}$ अवलोकनास माहित करा जे अनुक्रमे 50 आणि 51 आहे.

सारणीवरुन 50 व्या आणि 51 व्या अवलोकानाची किंमत सारखी आहे ती 8500 मध्ये यते म्हणुन या वितरणाचा मध्यक वर्ग 8500 आहे.



**प्रयत्न करा.**

1. सामग्रीतील गुणांचा मध्यक काढा.

| गुण | 15 | 20 | 10 | 25 | 5 |
|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी संख्या | 10 | 8 | 6 | 4 | 1 |

2. मध्यक काढण्यासाठी दिलेली माहिती क्रमात लिहिली पाहिजे का?

### 9.4.3 बहुलक

बहुलक हा अवलोकनाची वांरवारता येणारी किंमत आहे. म्हणजेच अवलोकनातील कमाल वांरवारतेला बहुलक असे म्हणतात.

उदाहरण-9: एका दुकानात विशिष्ठ दिवशी विकलेल्या बुटांच्या आकाराची संख्या खाली दिलेली आहे. त्याचा बहुलक काढा.

6, 7, 8, 9, 10, 6, 7, 10, 7, 6, 7, 9, 7, 6.

सोडवणुक: पहिले आपण अवलोकनास क्रमात लिहिल्यास 6, 6, 6, 6, 7, 7, 7, 7, 7, 8, 9, 9, 10, 10 वितरण सारणी तयार होते.

| आकार | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|
| विकलेल्या बुटांची संख्या | 4 | 5 | 1 | 2 | 1 |

येथे 7 संख्या वारंवार आली आहे म्हणजे 5 वेळा

∴ दिलेल्या सामग्रीचा बहुलक(बुटांचा आकार) 7 आहे. यावरुन निर्देशास येते की, 7 नंबरचे बुटांची विक्री जास्त आहे.



**विचार करा आणि चर्चा करा**

1. तुमच्या वर्गमित्राचे त्यांच्या उंची वरुन वर्गीक़रण करा आणि त्यांचा बहुलक काढा.
2. दुकानदारास बुटांचा मागणी करायची असल्यास तो कोणत्या नंबरचे बुट जास्त मागवितो?



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



उदाहरण-10: 100 गुणांच्या परिक्षेत वर्गातील 20 विद्यार्थ्यांचे गुण खालील प्रमाणे आहेत.

93, 84, 97, 98, 100, 78, 86, 100, 85, 92, 55, 91, 90, 75, 94, 83, 60, 81, 95

(a) वर्ग अवकाश 91-100, 81-90, .....घेऊन वांरवारता सारणी तयार करा.

(b) बहुलक वर्ग काढा. ( बहुलक वर्ग म्हणजे वर्गातील सर्वात मोठी वांरवारता असलेला वर्ग

(c) मध्यक असलेला वर्ग अवकाश काढा.

सोडवणुक:

(a)

| गुण | वांरवारता | संचित वांरवारता पेक्षा जास्त |
|---|---|---|
| 91-100 | 9 | 20 |
| 81-90 | 6 | 11 |
| 71-80 | 3 | 5 |
| 61-70 | 0 | 2 |
| 51-60 | 2 | 2 |
| एकुण | **20** | |

(b) 91-100 हा बहुलक वर्ग आहे. या वर्गात कमाल वारंवारता आहे.

(c) 20 ची मधली किंमत 10 आहे. जर आपण वरुन मोजल्यास 10 ही 81-90 चा वर्गात येते. जर मी खालुन मोजणी करत वर गेल्यास 10 हे 81-90 या वर्गात येते. मध्यक असलेला वर्ग 81-90 आहे.

## 9.5 केंद्रीय प्रवृत्तीच्या किंमतीतील विचलन:

जर आपण सारख्या किंमती सर्व सामग्रीत मिळविल्यास किंवा प्रत्येक सामग्रीच्या किंमतीला सारख्या किंमतीने गुणाकार केल्यास केंद्रीय प्रवृत्तीच्या परिमाणास काय घडते.
खालील सारणीचे निरिक्षण करु

| विवरण | सामग्री | मध्य | बहुलक | मध्यक |
|---|---|---|---|---|
| मुळ सामग्रीचा संच | 6, 7, 8, 10, 12, 14, 14, 15, 16,20 | 12.2 | 14 | 13 |
| प्रत्येक सामग्रीला 3 मिळविल्यास | 9, 10, 11, 13, 15, 17, 17, 18, 19, 23 | 15.2 | 17 | 16 |
| प्रत्येक सामग्रीला 2 वेळा गुणल्यास | 12, 14, 16, 20, 24, 28, 28, 30, 32, 40 | 24.4 | 28 | 26 |



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



सारणीचे निरिक्षण केल्यानंतर आपणास दिसुन येते की,

बेरीज केली तेव्हा: सामग्रीतील सर्व राशी एक स्थिर राशीला मिळविल्यास त्या सामग्रीचे केंद्रीय परिमाण सुध्दा तेवढेच बदलते. म्हणजे सर्व सामग्रीच्या किंमतीत 3 मिळविल्यास मध्य, बहुलक आणि मध्यक सुध्दा 3 ने वाढतो.

गुणाकार केला तेव्हा: सामग्रीतील सर्व किंमतीला एका स्थिर राशीने गुणाकार केल्यास सामग्रीच्या केंद्रीय प्रवृत्तीच्या परिमानात त्याचा प्रभाव पडुन गुणाकार होतो. म्हणजे सर्व किंमतीला 2 नी गुणल्यास सामग्रीचा मध्य, बहुलक आणि मध्यक सुध्दा 2 पट होते.

## अभ्यास - 9.2



1. ट्रान्सपोर्ट कार्यालयातील पार्सल चे वजन खाली दिलेले आहे.

| वजन(कि.ग्र.) | 50 | 65 | 75 | 90 | 110 | 120 |
|---|---|---|---|---|---|---|
| पार्सलची संख्या | 25 | 34 | 38 | 40 | 47 | 16 |

पार्सलचा वजनाचा मध्य काढा.

2. एका गावातील कुंटुंबामधील मुलांची संख्या खाली दिलेली आहे. प्रत्येक कुंटुंबीतील मुलांची सरासरी संख्या काढा.

| मुलांची संख्या | 0 | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
|---|---|---|---|---|---|---|
| कुंटुंबांची संख्या | 11 | 25 | 32 | 10 | 5 | 1 |

प्रत्येक कुटुंबातील आणि मुलांची संख्या काढा.

3. खालील वारंवारता वितरणाचा मध्य 7.2 आहे 'K' ची किंमत काढा.

| $x$ | 2 | 4 | 6 | 8 | 10 | 12 |
|---|---|---|---|---|---|---|
| $f$ | 4 | 7 | 10 | 16 | K | 3 |

4. भारताच्या जणगनणा 2011 प्रकारे गावांची जनसंख्या खाली दिलेली आहे.

| जनसंख्या(हजारात) | 12 | 5 | 30 | 20 | 15 | 8 |
|---|---|---|---|---|---|---|
| गावांची संख्या | 20 | 15 | 32 | 35 | 36 | 7 |

प्रत्येक गावाची सरासरी जनसंख्या काढा.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



5. AFLATOUN नावाची सामाजिक आणि आर्थिक विद्याविषयक संस्था हैद्राबाद जिल्ह्यातील हायस्कुलच्या विद्यार्थ्यांना व्दारे बचत कार्यक्रम सुरु केला. मंडळवारी महिण्याची बचत खालील दिलेली आहे.

| मंडळ | शाळेची संख्या | एकुण बचत रक्कम (रुपयात) |
|---|---|---|
| अंबरपेट | 6 | 2154 |
| तिरुमलगीरी | 6 | 2478 |
| सैदाबाद | 5 | 975 |
| खैरताबाद | 4 | 912 |
| सिकंदराबाद | 3 | 600 |
| बहादुरपुरा | 9 | 7533 |

प्रत्येक मंडळातील शाळावारी अंकगणितीय मध्य काढा. सर्व शाळेच्या बचतिचा अंकगणितीय मध्य काढा.

6. शाळेच्या 9 व्या वर्गाच्या मुला आणि मुलींची उंची खाली दिलेली आहे.

| उंची (से.मी.) | 135 | 140 | 147 | 152 | 155 | 160 |
|---|---|---|---|---|---|---|
| मुले | 2 | 5 | 12 | 10 | 7 | 1 |
| मुली | 1 | 2 | 10 | 5 | 6 | 5 |

मुलांची आणि मुलींची उंचीचा तुलना करा.

( सुचना : मुले आणि मुलींच्या उंचीचा मध्यक काढा)

7. जगातील क्रिकेटपटुंनी काढलेली शतके खालील दिली आहे.

| शतकाची संख्या | 5 | 10 | 15 | 20 | 25 |
|---|---|---|---|---|---|
| क्रिकेटपंटुची संख्या | 56 | 23 | 39 | 13 | 8 |

दिलेल्या सामग्रीचा मध्य, मध्यक, आणि बहुलक काढा.

8. नविन वर्षाच्या संदर्भात मिठाईच्या दुकानदाराने दुकानात मिठाईचे पॅर्केट तयार केले. मिठाईच्या पॉकेटची संख्या आणि त्यांची किंमत खाली दिलेली आहे.

| पॅकेटची किंमत(रुपयात) | 25रु | 50रु | 75रु | 100रु | 125रु | 150रु |
|---|---|---|---|---|---|---|
| पॅकेटची संख्या | 20 | 36 | 32 | 29 | 22 | 11 |

सामग्रीचा मध्य, मध्यक आणि बहुलक काढा.

9. तिन विद्यार्थ्यांचे सरासरी वजन 40 कि.ग्र. आहे. त्यापैकी रंगा नावाचे विद्यार्थीचे वजन 46 कि.ग्र. आहे. इतर दोन विद्यार्थी रहीम आणि रेशमाचे वजन समान आहे. तर रहिमचे वजन काढा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



10. एका माध्यमिक शाळेच्या विविध वर्गाच्या विद्यार्थ्यांनी एका अनाथालयाने दिलेली देणगी खालील सारणीत आहे.

| वर्ग | प्रत्येक विद्यार्थ्यांची देणगी (रुपयात) | देणगी देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| VI | 5 | 15 |
| VII | 7 | 15 |
| VIII | 10 | 20 |
| IX | 15 | 16 |
| X | 20 | 14 |

सामग्रीचा वापर करुन मध्य, मध्यक आणि बहुलक काढा.

11. चार अनोळखी संख्या आहेत. पहिल्या दोन संख्येचा मध्य 4 आहे. आणि पहिल्या तिन संख्यांचा मध्य 9 आहे. सर्वचारही संख्येचा मध्य 15 आहे. जर त्या चार संख्येपैकी एक संख्या 2 आहे. तर इतर संख्या काढा.

## आपण काय चर्चा केली?



- सामग्रीचे वास्तविक अवलोकन त्याच्या वारंवारता सोबत तक्त्यात दाखविले आहे. या तक्त्यास असंग्रहीत वारंवारता वितरण सारणी किंवा अवलोकांनाच्या वजनाच्या तक्ता म्हणतात.
- जास्त अवलोकन असलेली सामग्री वारंवारता सारणीत दाखविल्यामुळे सामग्रीचे बेरीज एकाच वेळी पाहु शकते. सामग्रीच्या व्याप्तीला ओळखणे, कोणते अवलोकन वारंवारता येत आहे ओळखणे आणि सामग्रीचे विश्लेषण करुन सुलभतेने व्याख्या करणे.
- केंद्रीय प्रवृत्तीची परिमाणाचे प्रकार: मध्य, मध्यक आणि बहुलक
- केंद्रीय प्रवृत्तीची परिमाणे ही सामग्रीची विचित्र किंमत आहे जी इतर अवलोकनास एकत्र करते.
- मध्य हा सामग्रीच्या अवलोकानाच्या बेरजेला एकुण अवलोकनाने भागल्यास येतो.

$$\text{मध्य} = \frac{\text{अवलोकनाची बेरीज}}{\text{अवलोकनांची संख्या}} \quad \text{or} \quad \bar{x} = \frac{\Sigma x_i}{n}$$

- असंग्रहीत वारंवारता वितरणाचा अंकगणितीय मध्य $\bar{x} = \dfrac{\Sigma f_i x_i}{\Sigma f_i}$.



SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



- मध्य विचलन पध्दतीव्दारे अंकगणितीय A= $+\frac{\Sigma fd}{\Sigma f}$ , A गृहीत मध्य, $\Sigma f$ वारंवारतेची बेरीज, $\Sigma f\ d$ विचलनाची आणि वारंवारतेचा गुणाकार होय.
- मध्यक हे सामग्रीचे मधले अवलोकन आहे जेव्हा त्यास क्रमात मांडणी (चढत्या किंवा उतरत्या) करतो.
- जेव्हा एकुण अवलोकानाची संख्या 'n' ही विषम असणे मध्यक $\left(\frac{n+1}{2}\right)^{th}$ अवलोकन होते.
- जेव्हा एकुण अवलोकानाची संख्या 'n' सम असते मध्यक हे $\left(\frac{n}{2}\right)^{th}$ आणि $\left(\frac{n}{2}+1\right)^{th}$ अवलोकानाची सरासरी असते.
- मध्यक सामग्रीला दोन समान भागात विभागणे एकभागाच्या सर्व किंमती मध्यकाच्या मोठ्या आणि दुसऱ्या भागाच्या सर्व किंमती मध्यकापेक्षा लहान असतात.
- बहुलक ही अवलोनकाच्या किंमतीची वारंवारता येणारी संख्या आहे म्हणजे अवलोकानाच्या कमाल वारंवारतेला बहुलक असे म्हणतात.

मेंदुची गंमत

विद्यार्थ्यांच्या रांगेत गोपी हा डावीकडुन 7 वा मुलगा आहे.आणि शंकर उजवी कडुन 5 वा मुलगा आहे. जर त्यांनी त्याची जागा बदलुन गोपी उजवीकडुन 8 वा मुलगा आहे. तर त्या रांगेत किती विद्यार्थी आहेत?

चैतन्याने झाडाच्या सालीवर 1.5 मी उंचीवर तीचे नाव कोरले. झाडास जमीनीवरुन 6.75 मी. उंची प्राप्त झाली असता आता जमीनीवरुन उंचीवर चैतन्याचे नाव निश्चित करता येते.

तुमच्या उत्तरासाठी कारण सांगा.



SCERT TELANGANA




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# 10 पृष्ठभागाचे क्षेत्रफळ आणि घनफळ

## 10.1 प्रस्तावना

खालील आकृत्यांचे निरिक्षण करा.





गट (a) आणि (b) मधील आकृत्या मध्ये काही भिन्नता तुमच्या लक्षात आली आहे का?

गट (a) मधील आकृत्या सहजरित्या तुमच्या वहीवर तुम्ही काढु शकता. या आकृत्यांना फक्त लांबी आणि रुंदी आहे यांना व्दिमीतीय आकृत्या किंवा 2-D च्या वस्तु म्हणतात. गट (b) मधील आकृत्यांना लांबी रुंदी आणि उंची आहे. यांना त्रिमीतीय आकृत्या किंवा 3-D या वस्तु म्हणतात. यांना भरीव आकृत्या म्हणतात. आपल्या सभोवतील आपण सतत भरीव आकृत्या पाहत असतो. दंडगोल, शंकु आणि गोल सारख्या 3-D वस्तुंच्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ आणि घनफळ कसे माहित करावे या विषयी आपण आता शिकणार आहेत.

## 10.2 आयतज(CUBOID) च्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ

आयतज चे निरिक्षण करा आणि माहित करा त्याला किती बाजु आहेत?त्याला कोपरा आणि किती कडा आहेत? बाजुची कोणती जोडी आकारात सारखी असते? आयतजच्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ कसे माहित करावे? या बाबत तुम्हाला काही माहित आहे का?




आता, आयतजच्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ माहित करु या.


वरील आकृती मध्ये $(l) = 5$ से.मी. रुंदी$(b) = 3$ सें.मी. उंची $(h) = 2$ से.मी.

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



दिलेल्या आयतज ला CD, ADHE आणि BCGF वरुन कापुन उघडले तर आपल्याला ती आकृती खालील प्रमाणे दिसते.




असे दिसत आहे की, तीन सारख्या आयताच्या जोड्याच्या सहा आयता पासुन आयतज चे पृष्ठभागाचे क्षेत्र बनलेले आहे. आयतज चे एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ माहित करण्यासाठी आपल्याला या सहा आयताच्या बाजुच्या क्षेत्रफळाची बेरीज करावी लागणार आहे. या क्षेत्रफळांची बेरीज म्हणजे आयताज चे एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ होय.

EFGH आयता चे क्षेत्रफळ $= l \times h = lh$ .....(1)

HGCD आयता चे क्षेत्रफळ $= l \times b = lb$ .....(2)

AEHD आयता चे क्षेत्रफळ $= b \times h = bh$ .....(3)

FBCG आयता चे क्षेत्रफळ $= b \times h = bh$ .....(4)

ABFE आयता चे क्षेत्रफळ $= l \times b = lb$ .....(5)

DCBA आयता चे क्षेत्रफळ $= l \times h = lh$ .....(6)

वरील क्षेत्रफळ मिळविल्या नंतर आपल्याला आयतज च्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ मिळते.

आयतजच्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ $= (1) + (2) + (3) + (4) + (5) + (6)$ चे क्षेत्रफळ

$= lh + lb + bh + bh + lb + lh$

$= 2\,lb + 2lh + 2bh$

$= 2(lb + bh + lh)$

(1), (3), (4), (6) हे आयतज चे पार्श्व पृष्ठभाग आहेत.

आयतजच्या पार्श्वपृष्ठभागाचे क्षेत्रफळ $= (1) + (3) + (4) + (6)$ चे क्षेत्रफळ

$= lh + bh + bh + lh$

$= 2lh + 2bh$

$= 2h\,(l + b)$

वरील आकृती साठी आता, आयतजच्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ माहित करु या. अशा प्रकारे एकुण पृष्ठभागाचा क्षेत्रफळ 62 से.मी..$^2$ आणि पार्श्वपृष्ठभागाचे क्षेत्रफळ 32 से.मी..$^2$ आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




### प्रयत्न करा.

'*l*' से.मी. कडा असलेल्या एक घन घ्या. आणि याच्या अगोदर केलेल्या कृती प्रमाणे त्याला कापा आणि घनाचे एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ आणि पार्श्वपृष्ठाभागाचे क्षेत्रफळ माहित करा.

### हे करा


1. 4 से.मी. बाजु असलेल्या घनाचे एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ आणि पार्श्व पृष्ठभागाचे क्षेत्रफळ माहित करा.
2. घनाचा प्रत्येक कडा 50% ने वाढ होत होय. पृष्ठभागाच्या क्षेत्रफळामध्ये वाढणारे दशांश माहित करा.




### 10.2.1घनफळ (Volume)

To recall the concept of volume, खालील कृती करु या.

एक काचेचे बिकर घ्या. आणि ते एका पात्रात ठेवा. काचेच्या बिकर मध्ये काठा पर्यंत पाणी भरा. त्यात एक भरीव वस्तु (दगड) हळुने सोडा. बिकर मधील काही पाणी पात्रात सांडेल. सांडलेले पाणी एका मेजरींग जार मध्ये घ्या. या वरुन भरीव वस्तुने व्यापलेले जागाला घनफळ असे म्हणतात.



प्रत्येक वस्तु काही जागा व्यापते, वस्तु ने व्यापलेल्या जागेला त्याचे घनफळ म्हणतात. घनफळ हे घन एककात मोजले जाते.

### 10.2.2 पात्राची क्षमताः

जर वस्तु पोकळ असेल तर आत रिकामे असते. आणि त्याला हवेने किंवा कोणत्याही इतर द्रवाने भरु शकतो. असे भरल्याने त्याला एक रुप येते. आत मध्ये भरु शकणाऱ्या वस्तुंच्या घनफळाला पात्राची क्षमता म्हणतात.


आयतज चे घनफळ : सारख्या परिमाणाच्या कार्ड बोर्ड वरुन काही आयतज कापुन घ्या. आणि एका वर एक त्याची मांडणी करा. तयार झालेल्या रुपा विषयी तुम्ही काय म्हणता?



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com






हे आयतज चे रुप आहे.

आता आयतज चे घनफळ माहित करु या.

आयताच्या लांबी च्या समान याची लांबी असते. आणि रुंदी हे आयताच्या रुंदी समान असते.

आयताच्या ढिगाची उंची ही आयतजची उंची '$h$' होय.


आयतज ने व्यापलेली जागा = आयताने व्यापलेले प्रतलिय क्षेत्राचे क्षेत्रफळ × उंची

आयतज चे घनफळ $= l\,b \times h = l\,bh$

$\therefore$ आयतजचे घनफळ $= l\,bh$

येथे $l, b, h$ हे आयतज चे लांबी, रुंदी आणि उंची होय.

## प्रयत्न करा






(a) '$a$' एकक कडा असलेल्या घना चे घनफळ माहित करा

(b)1000 से.मी.3 घनफळ असलेल्या घनाचे कडा माहित करा.

आयतज आणि घन हे भरीव आहेत असे विचारात घेऊ. त्याला आपण उभी चिती म्हणु शकतो का? आयतज आणि घनाच्या पार्श्वबाजु आयत आहेत आणि पाया ला ते लंब असल्याने आयतज आणि घनाला सुध्दा उभी चिती म्हणतात. हे तुम्ही निरिक्षण केले.

आयतज च्या पायाचे क्षेत्रफळ आणि त्याच्या उंचीचा गुणाकार म्हणजे त्या आयतज चा घनफळ हे आपल्याला माहित आहे.

आयतज चे घनफळ = पाया चे क्षेत्रफळ × उंची

(इष्टीका चिती) $= lb \times h$

$= lbh$

घनामध्ये $= l = b = h = s$ (सर्व मापे समान असतात)

घनाचे क्षेत्रफळ $= s^2 \times s$

$= s^3$

आयतजच्या घनफळा साठी सुत्राचा अंदाज लावणे स्वभाविक आहे. हे सर्व उभ्या चितीसाठी लागु होते.

म्हणुन उभ्या चितीचे घनफळ = पायाचे क्षेत्रफळ × उंची

उभ्या चितीचा पाया जर समभुज त्रिकोण असेल तर त्याचे घनफळ $\frac{\sqrt{3}}{4}a^2 \times h$ घन एकक.

येथे '$a$' हा पायाच्या प्रत्येक बाजुची लांबी आहे. आणि '$h$' ही चितीची उंची आहे.




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



## हे करा

1. जर $l = 12$ सें.मी., $b = 10$ से.मी. आणि $h = 8$ से.मी. असेल तर आयतज चे घऩफळ माहित करा.
2. घनाचे घनफळ माहित करा जर त्याची कडा 10 से.मी असेल.
3. आकृती 1 मधील समद्विभुज काटकोन त्रिकोणाकृती चितीचे घनफळ माहित करा.



(आ.1)

चिती सारखे पिरॅमीड सुध्दा त्रिमीतीय भरीव आकृती होय. प्राचीन काळापासुन मानवांना ही आकृती आकर्षीत करत आहे. इजिप्त च्या पिरॅमीड विषयी तुम्ही वाचलेच असाल. हे जगाच्या सात आश्चर्या पैकी एक आहे. चौरसाच्या आधारावरचे अचुक उदाहरण आहे. ते कसे बनविले ? या भरीव बांधणी कसे बांधण्यात आले हे कोणालाच माहित नाही.


तुम्ही पिरॅमीड चा रुप काढु शकता का?

चिती आणि पिरॅमीड मध्ये कोणता फरक तुमच्या लक्षात आला?

चौरसाच्या पायाचा पिरॅमीड म्हणुन आपण का म्हणतो?

येथे OABCD हा चौरस पिरॅमीड आहे ज्याची बाजु 'S' एकक आणि उंची '$h$' एकक आहे.


जर पाया आणि उंची सारखी असेल तर घनाच्या घनफळा मध्ये चौरस पिरॅमीडच्या घनफळाचा तुम्ही अंदाज करु शकता का?




## कृती

एक चौरस पिरॅमीड घ्या. आणि सारखी पाया आणि सारखी उंची असलेले घन पात्र घ्या.

द्रवाने पिरॅमीड पुर्णपणे भरा आणि ते घनामध्ये ओता. घन भरण्यासाठी किती वेळा टाकावे लागणार आहे? या वरुन तुम्ही काय अनुमान काढला?




याप्रकारे पिरॅमीड चे घनफळ

$= $ उभ्या चितीच्या घनफळाच्या $\frac{1}{3}$

$= \frac{1}{3} \times$ पाया चा क्षेत्रफळ $\times$ उंची

सुचना : उभ्या चितीचा पाया, पार्श्व कडेला लंब असते आणि सर्व पार्श्वबाजु आयत असतात.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



## हे करा




1. चौरस पाया 10 से.मी. आणि उंची 8 से.मी. असलेल्या पिरॉमीडचे घनफळ माहित करा.
2. घनाचे घनफळ 1200 घन से.मी. आहे. सारखी उंची असलेल्या चौरस पिरॉमीड चे घनफळ माहित करा.

## अभ्यास - 10.1




1. खालील उभ्या चितीचे पार्श्व पृष्ठभागाचे क्षेत्रफळ आणि एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ माहित करा.

(i)




(ii)




2. घनाचे एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ 1350 चौ.मी. आहे. त्याचे क्षेत्रफळ माहित करा.

3. चार भिंतीचया एका खोलीचे क्षेत्रफळ माहित करा. (त्याला खिडकी दरवाजे नाही आहे समजा) जर त्याची लांबी 12 मीटर रुंदी 10 मीटर आणि उंची 7.5 मिटर

4. आयतज चे घनफळ 1200 से.मी.$^3$ लांबी 15 से.मी. आणि रुंदी 10 से.मी. आहे. त्याची उंची माहित करा.

5. एका पेटीच्या एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ किती जर

(i) प्रत्येक परिमाण दुप्पट असेल तर? (ii) प्रत्येक परिमाण तिप्पट असेल तर?

तुमच्या शब्दात व्यक्त करा. जर प्रत्येक परिमाण $n$ वेळेत वाढत असेत तर तुम्ही पेटीच्या एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ माहित करु शकता काय?

6. चितीला पाया 3 से.मी., 4 से.मी. आणि 5 से.मी. ने त्रिकोणीय रुपात आहे. जर चितीची उंची 10 से.मी. असेल तर चितीचे घनफळ माहित करा.

7. नियमीत चौरस पिरॉमीडची उंची 3 मी. आणि त्याची परिमीती 16 मी. आहे. पिरॉमीड चे घनफळ माहित करा.

8. 50 मी.लाब आणि 25मी. रुंदी ने आयतज च्या रुपात ऑलीपीक स्वीमींग पुल आहे. जर सगळी कडे त्याची खोली 3 मी. असेल. तर त्यात किती लिटर पाणी मावते?

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




### कृती



एक आयताकार कागद कापुन घ्या. आकृतीत दाखवल्याप्रमाणे त्या कागदावर एक जाड तार चिपकवा नंतर तार च्या दोन्ही बाजुना हाताने पकडुन त्याला वेगाने फिरवा.


आयत फिरतांना जे आकार तयार झाले त्याला तुम्ही ओळखले का?

ते दंडगोलाच्या रुपात आहे हे तुम्हाला आठवते का?




## 10.3 उर्ध्व - वृत्ताकार - दंडगोल (Right Circular Cylinder)

खालील दंडगोलाचे निरिक्षण करा.




(i) आकृती (i), (ii) (iii) मध्ये कोणती समानता तुम्ही निरिक्षण केलात?

(ii) आकृती (i), (ii) (iii) मध्ये कोणती भिन्नता तुम्ही निरिक्षण केलात?

(iii) कोणत्या आकृतीत रेषाखंड हा पाया ला लंब आहे?

एक वक्र पृष्ठभाग आणि दोन्ही टोका वरचे एकरुप वर्तुळाकार बाजुची प्रत्येक दंडगोल बनते जर वर्तुळाकार बाजुचे केंद्र रेषाखंडानी जोडले तर ती पाया वर लंब असते. अशा दंडगोलाला उर्ध्व वृत्ताकार दंडगोल म्हणतात.

वरील आकृतीमध्ये कोणते उर्ध्व वृत्ताकार दंडगोलाकर आहे. ते माहित करा? कोणते नाही ? कारणे द्या?

दंडगोल बनवणारे कृती करु या.

### 10.3.1 दंडगोलाचे वक्रपृष्ठभाग क्षेत्रफळ (Curvded Surface Area of A Cylinder)

कार्ड बोर्ड ने तयार झालेली उर्ध्व - वृत्ताकार - दंडगोल घ्या. वक्र पृष्ठभागाला कापा आणि घडी काढा. जेव्हा दंडगोलाचे घडी उघडे करत असतांना निरिक्षण करा कि त्याची उंची आणि वर्तुळाकार पाया कसा बदलत आहे. घडी काढल्यानंतर दंडगोल तुम्हाला कोणत्या रुपात दिसते?



SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




तुम्हाला हे आयताकार रुपात दिसते. दंडगोलाच्या वक्र पृष्ठभागाचे क्षेत्रफळ हे आयताच्या क्षेत्रफळा एवढा असतो. त्याची उंची आयताच्या रुंदी एवढी असते. पायाचा परिघ आयताच्या लांबी एवढा असतो.

दंडगोलाची उंची = आयताची रुंदी ($h = b$)

दंडगोलाच्या पायाचा '$r$' त्रिजेचे परिघ = आयताची लांबी ($2\pi r = l$)

दंडगोलाच्या वक्रपृष्ठभागाचे क्षेत्रफळ. = आयताचे क्षेत्रफळ




= लांबी × रुंदी

$= 2\pi r \times h$

$= 2\pi rh$

**दंडगोलाचे वक्रपृष्ठभागाचे क्षेत्रफळ = $2\pi rh$**

## हे करा





खालील दंड गोलाचे प्रत्येकाचे वक्र पृष्ठभागाचे क्षेत्रफळ माहित करा.

(i) $r = x$ से.मी., $h = y$ से.मी.

(ii) $d = 7$ से.मी., $h = 10$ से.मी.

(iii) $r = 3$ से.मी., $h = 14$ से.मी.




### 10.3.2 दंड गोलाचे एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ (Total Surface area of a Cylinder)

बाजुच्या आकृतीचे निरिक्षण करा.

हे उर्ध्व वृत्ताकार दंडगोल आहे. हे तुम्ही माहित केले का? त्याचे एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळ मिळविण्यासाठी तुम्ही कोणत्या बाजु मिळवाल? ते वक्र पृष्ठभाग क्षेत्रफळ आणि दोन वर्तुळाकर बाजुचे क्षेत्रफळ होय.

आता, दंडगोलाचे एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ


= वक्र पृष्ठभाग क्षेत्रफळ + वरच्या भागाचे क्षेत्रफळ + पायाचे क्षेत्रफळ

$= 2\pi rh + \pi r^2 + \pi r^2$

$= 2\pi rh + 2\pi r^2$

$= 2\pi r\,(h + r)$

$= 2\pi r\,(r + h)$



$\therefore$ दंडगोलाचे एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ $= 2\pi r\,(r + h)$

येथे 'r' हे दंडगोलाचे त्रिज्या आणि 'h' ही त्याची उंची आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




## हे करा




खालील प्रत्येंक दंडगोलाचे एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ माहित करा.

(i)




(ii)




### 10.3.3 दंडगोलाचे घनफळ (Volume of a Cylinder)


सारख्या त्रिज्यांचे वर्तुळ घ्या आणि एकावर एका त्याची मांडणी करा.
हे कृती करा आणि तयार झालेल्या दंडगोल आहे का नाही? ते माहित करा.

आकृती मध्ये '**r**' हे वर्तुळाची त्रिज़्या आहे आणि वर्तुळाच्या ढिगाच्या '**h**' उंची आहे

दंडगोलाचे घनफळ $= \pi r^2 \times$ उंची

$= \pi r^2 \times h$

$= \pi r^2 h$




**म्हणुन दंडगोलाचे घनफळ = $\pi r^2 h$**

येथे 'r' हा दंडगोलाचा त्रिज्या आहे आणि 'h' ही उंची आहे.


उदाहरण -1: 14 से.मी. जाडीच्या आयताकार कागदाला गुंडाळले तर 20 से.मी. त्रिजेचे दंडगोल तयार होते. दंडगोलाचे घनफळ माहित करा (आकृती 1) ? $\left(\text{घ्या } \pi = \frac{22}{7}\right)$

सोडवणुक: आयताच्या जाडी ने गुंडाळले तर दंडगोल तयार होते. म्हणुन कागदाची जाडी, दंडगोलाची उंची बनते आणि दंडगोलाची त्रिज्या 20 से.मी. आहे.

दंडगोलाची उंची = h = 14 से.मी.

त्रिज्या (r) = 20 से.मी.

दंडगोलाचे घनफळ $V = \pi r^2 h$




(आ.1)



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



$$= \frac{22}{7} \times 20 \times 20 \times 14$$

$$= 17600 \text{ से.मी.}^3$$

म्हणुन दंडगोलाचे घनफळ $17600$ से.मी.$^3$


उदाहरण-2: 11 से.मी. × 4 से.मी.चा आयताकार कागद परस्परांना न व्यापता घडी केल्याने 4 से.मी. उंचीचा दंडगोल तयार होते. दंडगोलाचे घनफळ माहित करा.

सोडवणुक : कागदाची लांबी ही दंडगोलाच्या पायाचा परिघ बनतो आणि कागदाची जाडी दंडगोलाची उंची होती.

दंडगोलाची त्रिज्या $= r$ आणि उंची $= h$

दंडगोलाचा पायाची परिघ $= 2\pi r = 11$ से.मी.

$$2 \times \frac{22}{7} \times r = 11$$




$\therefore \quad r = \frac{7}{4}$ से.मी.

$h = 4$ से.मी.

दंडगोलाचे घनफळ $(V) = \pi r^2 h$

$$= \frac{22}{7} \times \frac{7}{4} \times \frac{7}{4} \times 4 \text{ cm}^3$$

$$= 38.5 \text{ से.मी.}^3.$$

उदाहरण-3: 44 से.मी. × 18 से.मी. चा आयताकार कागद लांबी वरुन गुंडाळल्याने दंडगोल तयार होतो. समजा दंडगोल भरीव (पुर्ण भरलेले) असेल तर त्याची त्रिज्या आणि एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ माहित करा.



सोडवणुक: दंडगोलाची उंची $= 18$ से.मी.

दंडगोलाचा पायाचा परिघ $= 44$ से.मी.

$2\pi r = 44$ से.मी.

$$r = \frac{44}{2 \times \pi} = \frac{44 \times 7}{2 \times 22} = 7\text{cm.}$$

एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ $= 2\pi r(r + h)$



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



$$= 2 \times \frac{22}{7} \times 7(7+18)cm^2$$

$= 1100$ से.मी.$^2$.

उदाहरण-4: 5 मी.मी. जाडीची वर्तुळाकार चकत्या एकावर एक ठेवले असता 462 से.मी.$^2$ वक्र पृष्ठभागाचे क्षेत्रफळ असलेले दंडगोल तयार होते. जर त्रिज्या 3.5 से.मी. असेल तर चकत्याची संख्या माहित करा.



सोडवणुक: चकतीची जाडी $= 5$ मी.मी. $= \frac{5}{10} cm = 0.5 cm$

चकती ची त्रिज्या $= 3.5$ से.मी.

दंडगोलाचा वक्र पृष्ठभाग क्षेत्रफळ $= 462$ से.मी.$^2$.

$\therefore\ 2\pi rh = 462$ ..... (i)

समजा चकत्यांची संख्या $x$

$\therefore$ दंडगोलाची उंची $= h =$ चकतीची जाडी $\times$ चकत्यांची संख्या

$= 0.5\,x$

$$\therefore\ 2\,\pi rh = 2 \times \frac{22}{7} \times 3.5 \times 0.5x \quad ..... (ii)$$

(i) आणि (ii) वरुन

$$2 \times \frac{22}{7} \times 3.5 \times 0.5x = 462$$

$$\therefore\ x = \frac{462 \times 7}{2 \times 22 \times 3.5 \times 0.5} = 42 \text{ discs}$$


उदाहरण-5: उंची 10 से.मी. आणि बाह्य त्रिज्या 8 से.मी. असलेल्या पोकळ दंडगोलाचे एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळ 338 $\pi$ से.मी.$^2$. धातुच्या पोकळ दंडगोलाची जाडी माहित करा.

सोडवणुक : बाह्य त्रिज्या $= R = 8$ से.मी.

आतिल त्रिज्या $= r$

उंची $= 10$ से.मी.

एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ $= 338\pi$ से.मी.$^2$.




पण एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ = बाह्य दंडगोलाचे क्षेत्रफळ

+ आतील दंडगोलाचे क्षेत्रफळ

+ पायाच्या क्षेत्रफळाच्या दुप्पट



Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com





$= 2\pi Rh + 2\pi rh + 2\pi (R^2 - r^2)$

$= 2\pi (Rh + rh + R^2 - r^2)$

$\therefore\ 2\pi (Rh + rh + R^2 - r^2) = 338\pi$

$Rh + rh + R^2 - r^2 = 169$

$\Rightarrow (10 \times 8) + (r \times 10) + 8^2 - r^2 = 169$

$\Rightarrow r^2 - 10r + 25 = 0$

$\Rightarrow (r - 5)^2 = 0$

$\therefore\ r = 5$

$\therefore$ धातुची जाडी $= R - r = (8 - 5)$ से.मी. $= 3$ से.मी.

## प्रयत्न करा.




1. दंडगोलाची पार्श्व पृष्ठभाग क्षेत्रफळ तेच ठेऊन जर दंडगोलाची त्रिज्या दुप्पट केली तर त्याची उंची किती असेल?
2. गीझर (पाणी गरम करण्याचे यंत्र) च्या पाईप ची लांबी 14 मी. आणि व्यास 5 से.मी. आहे. तर पाण्याला गरम कारण्याच्या या गीझरच्या एकुण विकीर्ण पृष्ठभाग माहित करा.

## अभ्यास 10.2



1. धातुच्या जाडपट्टी ने बनलेली बंद दंडगोल हौदची उंची 1.4 सें.मी.आणि पायाची त्रिज्याची 56 से.मी. आहे. तर हे बनविण्यासाठी किती धातुच्या पट्टीची आवश्यकता आहे?( चौरस मीटर व्यक्त करा)
2. दंडगोलाकाराचे घनफळ 308 से.मी.$^3$. आहे. त्याची उंची 8 से.मी. आहे. तर त्याचे एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळ आणि पार्श्व पृष्ठभाग क्षेत्रफळ माहित करा.
3. धातुच्या आयतजची माप 22 से.मी. × 15 से.मी. × 7.5 से.मी. आहे. याला वितळवुन 14 से.मी. उंचीचे दंडगोल बनविले. त्याची त्रिज्या किती आहे?
4. एक पाण्याची हौद दंडगोलाच्या रुपात आहे. त्याची क्षमता 61.6 qbic मीटर आहे. हौदाचा व्यास 5.6 मी. आहे. तर हौदाची उंची माहित करा?
5. एक धातुचा पाईप 77 से.मी. लांबीची आहे. आतील व्यास 4 से.मी. आणि बाहेरील व्यास 4.4 से.मी. आहे( आकृती पहा) तर माहित करा त्याचे
   (i) आतील वक्र पृष्ठभागाचे क्षेत्रफळ
   (ii) बाहेरील वक्र पृष्ठभागाचे क्षेत्रफळ
   (iii) एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ






Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



6. एक दंडगोलीय पिल्लराचा व्यास 56 से.मी. आणि उंची 35 मी. आहे. भवनाला 16 पिल्लर आहेत. जर रंग लावण्याचा दर प्रति 1 मी$^2$ ला 5.50 रुपये आहे तर सर्व पिल्लरच्या वक्र पृष्ठभागाला रंग लावण्याचा खर्च माहित करा.
7. एका रोलरचा व्यास 84 से.मी. आणि त्याची लांबी 120 से.मी. आहे. ते खेळायच्या मैदानाला लेवल करण्यासाठी एका वेळी 500 पुर्ण फेऱ्या होते. तर खेळायच्या मैदानाचे क्षेत्रफळ मी$^2$ मध्ये माहित करा.
8. वर्तुळाकार विहिरीचा आतिल व्यास 3.5 मी. आहे. त्याची खोली 10मी. आहे तर माहित करा
   (i) त्याचा आतील वक्र पृष्ठभाग क्षेत्रफळ
   (ii) 40 रुपये प्रति मी$^2$ दराने या वक्र पृष्ठभागाला प्लॅस्टरींग करण्याचा खर्च
9. माहित करा.
   (i) 4.2 मी. व्यास आणि 4.5 मी. उंची असलेल्या पेट्रोल साठवणाऱ्या बंद हौदाचे एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळ
   (ii) जर हौद बनवतांना $\frac{1}{12}$ लोखंड वाया गेला तर किती लोखंडाचा वापर करण्यात आला
10. एका बाजुने उघडी असलेली दंडगोलाय ड्रमची आतील त्रिज्या 28 से.मी. आणि उंची 2.1 मी. आहे. तुम्ही त्या ड्रम मध्ये किती पाणी साठवु शकता? (1 लिटर = 1000 cc.)
11. दंडगोलाचा वक्र पृष्ठभाग क्षेत्रफळ 1760 से.मी.$^2$ आहे. आणि त्याचा घनफळ 12320 से.मी.$^3$ त्याची उंची माहित करा


## 10.4 उध्र्व वर्तुळाकार शंकु (Right Circular Cone)



वरील आकृत्याचे निरिक्षण करा आणि ते कोणत्या भरीव रुपा सारखे आहेत?

हे शंकु च्या रुपात आहेत.

खालील शंकुचे निरिक्षण करा.




(i) (ii) (iii)

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



(i) या कोनामध्ये कोणते सामाईक गुणधर्मा आहेत हे तुम्ही माहित केले?
(ii) त्यामधील कोणते भिन्नता तुमच्या लक्षात आली ?

आकृती (1) मध्ये पार्श्व पृष्ठभाग हे वक्र आहे आणि पाया हा वर्तुळ आहे. शंकुचा शिरोबिदु आणि वर्तुळाकर पायाचा केद्रबिंदु याना जोडणारा रेषाखंड हा त्या पायाच्या त्रिज्येला लंब असतो. या प्रकारच्या शंकुला लंब वर्तुळाकार शंकु म्हणतात.

आकृती (2) मध्ये त्याला वर्तुळाकार पाया आहे. पण त्याची उभी उंची शंकुच्या त्रिज्येजा लंब नाही आहे. अशा प्रकारचे शंकु लंब वर्तूळाकार शंकु नसतात.

आकृती (3) मध्ये उभी उंची पायाला लंब आहे. पण पाया हा लंब आहे. पण पाया हा वर्तुळाकार नाही आहे.


म्हणुन हा शंकु लंब वर्तुळाकार शंकु नाही आहे.

### 10.4.1 **शंकुची तिरपी उंची**

बाजुच्या आकृतीत (शंकु) $\overline{AO}$ हे $\overline{OB}$ ला लंब आहे.

$\Delta AOB$ हा काटकोन त्रिकोण आहे.

$\overline{AO}$ हा शंकुची उंची आहे. आणि $\overline{OB}$ हे शंकुच्या त्रिजेचे समान आहे.




$\Delta AOB$ वरुन

$AB^2 = AO^2 + OB^2$

$AB^2 = h^2 + r^2$ (AB ही तिरपी उंची = $l$)

$l^2 = h^2 + r^2$

$l = \sqrt{h^2 + r^2}$



## कृती


वर्तुळखंडा वरुन शंकु तयार करणे

खालील सुचना पाळा आणि आकृतीत दाखवल्या प्रमाणे करा.


(i) जाड कागदावर वर्तुळ काढा. आकृती (a)

(ii) त्यातुन AOB वर्तुळखंड कापा आकृती (b).

(iii) A आणि B टोकाला हळुन एकमेकांच्या जवळ न्या. आणि AB ला जोडा. A आणि B एक वर एक येऊ नये याची आठवण ठेवा. A, B ला जोडल्या नंतर त्याला सेलो टेप ने चिपकवा.(आकृती c).



(a)



(b)

(c)



Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com




(iv) तुम्ही कोणत्या प्रकाराच्या रुप मिळविले?

हे लंब शंकु आहे का?

शंकु बनवत असतांना कडा 'OA' आणि 'OB' चे काय झाले तसेच वर्तुळखंड च्या कंस AB च्या लांबीचे काय झाले? तुम्ही निरिक्षण केले का?

### 10.4.2 शंकुचे वक्र पृष्ठभाग क्षेत्रफळ




(i) (ii) (iii)

कृती मध्ये चर्चा केलेली आणि आपण कागदाने बनविलेल्या लंब वृत्ताकार शंकु च्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ माहित करु या.

जेव्हा वर्तुळखंडाला शंकु मध्ये घडी करताना तुमच्या लक्षात आले असेल, वर्तुळखंडाचे OA, OB जुळतात. आणि ते शंकुची तिरपी उंची बनते. आणि लांबी $\overset{\frown}{AB}$ हे शंकुच्या पायाचे परिघ बनते.

आता शंकुची घडी काढुन टाका आकृतीत दाखवल्याप्रमाणे जेवढे शक्य होईल तेवढे वर्तुळ खंड काढा.( वर्तुळ खंड AOB कापा) नंतर तुम्हाला असे दिसेल की, प्रत्येक कापलेला भाग जवळ पास त्रिकोणासारखे आहे. त्याचा पाया $b_1, b_2, b_3$ ..... इत्यादी, उंची '$l$' म्हणजेच शंकुच्या तिरप्या उंचीच्या समान.

या त्रिकोणाचे जर आपण क्षेत्रफळ माहित केलो आणि त्यांना मिळविलो तर ते वर्तुळखंडाचे क्षेत्रफळ होते. आपल्याला माहित आहे, वर्तुळखंडाचे शंकु बनते. म्हणुन वर्तुळखंडाचा क्षेत्रफळ, हा त्यानी बनलेल्या शंकच्या पृष्ठभाग क्षेत्रफळच्या समान असतो.


शंकुचे क्षेत्रफळ = त्रिकोणांच्या क्षेत्रफळाची बेरीज

$$= \frac{1}{2}b_1 l + \frac{1}{2}b_2 l + \frac{1}{2}b_3 l + \frac{1}{2}b_4 l + .....$$

$$= \frac{1}{2}l(b_1 + b_2 + b_3 + b_4 + .....)$$

**प्रयत्न करा**

'$r$' त्रिज्या आणि उंची '$l$' असलेल्या वर्तुळखंडाच्या कागदाला त्याच्या वर्तुळाकार भागावरुन कापा. शंकु म्हणुन घडी करा. त्याच्या वक्र= पृष्ठभागाचे क्षेत्रफळ $A = \pi rl$ हे सुत्र तुम्ही कसे काढता?




$$= \frac{1}{2}l \text{ ( A पासुन B पर्यंच्या वक्र भागाची लांबी किंवा शंकुच्या पायाचे परिघ)}$$

$$= \frac{1}{2}l(2\pi r) \quad (\because b_1 + b_2 + b_3 + ..... = 2\pi r, \text{येथे शंकुची त्रिज्या 'r' आहे.})$$

म्हणुन $\overset{\frown}{AB}$ ने वर्तुळ बनते.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



अशा प्रकारे पार्श्व पृष्ठभागाचे क्षेत्रफळ किंवा शंकुचे पृष्टभाग क्षेत्रफळ = $\pi rl$


येथे '$l$' हा शंकुची तिरपी उंची आणि 'r' ही त्याची त्रिज्या आहे.

### 10.4.3 शंकुचे एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळ

शंकुच्या पायाला जर अच्छादन करायचे असेल तर आपल्याला शंकुच्या त्रिज्या इतके असलेल्या त्रिजेच्या वर्तुळाची गरज आहे.

शंकुचे एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळ कसे मिळवावे? एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळ मिळविण्यासाठी किती पृष्ठभागाची बेरीज तुम्हाला करावी लागेल?

वर्तुळाचे क्षेत्रफळ $= \pi r^2$



शंकुचा एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळ=पार्श्व पृष्टभाग क्षेत्रफळ+ त्याचा पायाचे क्षेत्रफळ

$= \pi rl + \pi r^2$

$= \pi r (l + r)$

**शंकुचे एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळ.** $= \pi r (l + r)$

येथे 'r' हे शंकुची त्रिज्या आहे आणि '$l$' ही त्याची तिरपी उंची आहे.

**हे करा**

1. एक काटकोन त्रिकोण कापा, लंब बाजुने तार चिपकवा, आकृती (1) मध्ये दाखवल्याप्रमाणे तारेचे दोन्ही टोक तुमच्या हातात पकडुन त्याला एका स्थिर गतीने फिरवा
   तुम्हाला काय निरिक्षणास आले?






fig. (i)

2. खालील प्रत्येक लंब वर्तुळाकार शंकुचे वक्र पृष्ठभाग क्षेत्रफळ आणि एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळ माहित करा





OP = 2cm.; OB = 3.5cm.




OP = 3.5cm.; AB = 10cm.

### 10.4.4 लंब वर्तुळाकार शंकुचे घनफळ






Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



सारख्या त्रिजेचे आणि सारख्या उंचीचे पोकळ दंडगोल आणि पोकळ शंकु तयार करा. आणि खालील प्रयोग करा. हे आपल्याला शंकुचे घनफळ काढण्यासाठी मदत करते.




i. शंकुच्या काढा पर्यंत पाणी भरा आणि त्याला पोकळ दंडगोलात ओता. ह्याने दंडगोलाचा फक्त काही भाग भरला जाईल.

ii. पुन्हा शंकुच्या काठा पर्यंत पाणी भरा आणि त्याला दंडगोलात ओता. आपल्याला असे दिसेल की दंडगोल अजुन पुर्ण भरलेले नाही.

iii. जेव्हा तिसऱ्या वेळेस शंकु पुर्ण भरुन दंडगोलात रिकामा करतो तेव्हा दंडगोल पुर्णपणे भरले की नाही याचे निरिक्षण करा.

वरील प्रयोगा वरुन शंकुच्या घनफळ आणि दंडगोलाच्या घनफळ या दोघां मध्ये काही संबंध दिसला का?

शंकुच्या तिप्पट घनफळाने दंडगोलाचे घनफळ असते. असे आपण म्हणु शकतो. येथे शंकुला आणि दंडगोलाला सारखी पाया सारखी उंची असणे आवश्यक आहे.

म्हणुन दंडगोलाच्या घनफळाच्या एक तितृयांश शंकुचे घनफळ असते.

$\therefore$ शंकुचे घनफळ $= \frac{1}{3}\pi r^2 h$

येथे शकुची 'r' ही त्रिज्या आहे आणि 'h' हि उंची आहे.

उदाहरण-6: एका मक्कयाचे कणीस शंकुच्या रुपाने आहे. (आकृती पहा) त्याच्या फुगवट्या टोकाची त्रिज्या 1.4 से.मी. आणि लांबी (उंची) 12 से.मी. आहे. कणसाच्या पृष्ठभागाच्या प्रत्येक 1 से.मी.$^2$ पृष्ठभागात सरासरी 4 दाने आहेत.तर तुम्हाला पुर्ण कणसा वर अंदाजे किती दोन दिसेल?



सोडवणुक: येथे $l = \sqrt{r^2 + h^2} = \sqrt{(1.4)^2 + (12)^2}\,cm.$

$= \sqrt{145.96} = 12.08$ से.मी. (अंदाजे)

म्हणुन मक्याच्या कणसाच्या वक्र पृष्ठभाग क्षेत्रफळ $= \pi r l$



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



$= \frac{22}{7} \times 1.4 \times 12.08\ cm^2$

$= 53.15$ से.मी.$^2$

$= 53.2$ से.मी.$^2$

मक्याच्या कणसाच्या 1 से.मी.$^2$ पृष्ठभागावर दाण्यांची संख्या = 4.

म्हणुन कणसाच्या पुर्ण वक्र पृष्ठभागावर दाण्यांची संख्या

$= 53.2 \times 4 = 212.8 = 213$ (अंदाजे)

म्हणुन मक्क्याच्या कणसावर सुमारे 213 दाणे आहेत.

उदाहरण-7: 5.6 से.मी. त्रिज्या असलेल्या शंकुच्या वक्र पृष्ठभागाचे क्षेत्रफळ 158.4 से.मी.$^2$ आहे. तर त्याची तिरपी उंची आणि उभी उंची माहित करा.

सोडवणुक: त्रिज्या = 5.6 से.मी., उभी उंची = h, तिरपी उंची = $l$

शंकुचे वक्र पृष्ठभागाचे क्षेत्रफळ $= \pi r l = 158.4$ से.मी.$^2$



$\Rightarrow \frac{22}{7} \times 5.6 \times l = 158.4$

$\Rightarrow l = \frac{158.4 \times 7}{22 \times 5.6} = \frac{18}{2} = 9\text{cm}$

आपल्याला माहित आहे. $l^2 = r^2 + h^2$

$h^2 = l^2 - r^2 = 9^2 - (5.6)^2$

$= 81 - 31.36$

$= 49.64$

$h = \sqrt{49.64}$

$h = 7.05$ से.मी. (अंदाजे)

उदाहरण-8: एक तंबु दंडगोल आकाराचे आहे त्यावर शंकु आकार आहे. शंकुच्या पायाचा व्यास 24 से.मी. आहे. दंडगोलाची उंची 11 मी.आहे. दंडगोलाच्या वर पासुन शंकुच्या शिरोबिदु पर्यंतचे अंतर 5 मी. आहे. जर कॅनवास 10 रुपये प्रति मी$^2$ असेल तर पुर्ण तंबु बनविण्यासाठी किती खर्च येईल?

सोडवणुक : दंडगोलाच्या पायाचा व्यास = शंकुचा व्यास = 24 मी.

$\therefore$ पायाची त्रिज्या = 12 मी.

दंडगोलाची उंची = 11 मी. = $h_1$

शंकुची उंची = 5 मी. = $h_2$

समजा शंकुची तिरपी उंची $l$ आहे.




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



$l$ = GD = $\sqrt{r^2+h^2} = \sqrt{12^2+5^2} = 13$m

आवश्यक कॅनवस चे क्षे. = दंडगोलाचे वक्रपृष्ठभागाचे क्षे.+ शं.व.पृ.क्षे.




$= 2\pi rh_1 + \pi rl$

$= \pi r\,(2h_1 + l)$

$= \frac{22}{7} \times 12(2\times 11+13)m^2$

$= \frac{22\times 12}{7} \times 35m^2$

= 22 × 60 मी.$^2$

= 1320 मी.$^2$

कॅनवास चे दर = 10 रु प्रति मी$^2$

∴ कॅनवास ची किंमत = दर × कॅनवास चे क्षेत्रफळ

= 10 × 1320

= 13,200.

उदाहरण:9- एका कॅम्प वर सेन्याचे शंकीय तंबु उभा केला त्याची उंची 3मी आणि पाया चे व्यास 8 मी आहे. तर माहित करा .


(i) जर कॅनवास ची किंमत 70 रु. प्रति 1 चौ.मी. असेल तर तंबु बनविण्यासाठी किती कॅनवासची आवश्यकता आहे?

(ii) जर प्रत्येक व्यक्तीला 3.5 मी$^3$ च्या हवेची आवश्यकता असेल तर त्या तंबुत किती व्यक्ती बसु शकेल?

सोडवणुक : तंबुचा व्यास = 8 मी.

r = $\frac{d}{2} = \frac{8}{2}$ = 4 मी.

उंची = 3 मी.




तिरपी उंची ($l$) = $\sqrt{h^2+r^2}$

$= \sqrt{3^2+4^2}$

$= \sqrt{25} = 5$ m.

∴ तंबुची वक्र पृष्ठभाग क्षेत्रफळ = $\pi rl$

$= \frac{22}{7} \times 4 \times 5 = \frac{440}{7}$ मी$^2$



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com





शंकुचे घनफळ $= \frac{1}{3}\pi r^2 h$

$= \frac{1}{3} \times \frac{22}{7} \times 4 \times 4 \times 3$

$= \frac{352}{7}$ मी$^3$

(i) तंबुसाठी आवश्यक कॅनवास ची किंमत

= वक्र पृष्ठभागाचे क्षेत्रफळ × एकक किंमत

$= \frac{440}{7} \times 70$

= 4400 रुपये

(ii) तंबुमध्ये बसु शकणाऱ्या व्यक्तीची संख्या

$= \frac{\text{शंकु आकार तंबुचे घनफळ}}{\text{प्रत्येकासाठी आवश्यक हवा}}$

$= \frac{352}{7} \div 3.5$

$= \frac{352}{7} \times \frac{1}{3.5} = 14.36$

= 14 माणसे (अंदाजे)

## अभ्यास 10.3



1. शंकुच्या पायाचे क्षेत्रफळ 38.5 से.मी.$^2$ त्याचे घनफळ 77 से.मी.$^3$ त्याची उंची माहित करा.
2. शंकुचे घनफळ 462 मी$^3$ त्याच्या पायाची त्रिज्या 7मी आहे त्याची उंची माहित करा.
3. शंकुच्या वक्र पृष्ठभागाचे क्षेत्रफळ 308से.मी.$^2$ आहे. आणि त्याची तिरपी उंची 14 से.मी. आहे माहित करा

   (i) पायाची त्रिज्या (ii) शंकुच्या एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ
4. शंकुच्या एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळला रंग लावण्याचा खर्च 25 पैसे प्रति से.मी.$^2$ ने 176 रु.होते. तर शंकुचे घनफळ माहित करा जर त्याची तिरपी उंची 25 से.मी. असेल.
5. 15 से.मी.त्रिज्या असलेल्या वर्तुळाला $216^0$ असलेल्या वर्तुळखंडाला कापले त्याच्या कडा म्हणजे त्रिज्या ना वाकवुन शंकुच्या रुपात आणले तर त्याचे घनफळ माहित करा.
6. तंबुची उंची 9 मी. आहे. त्याच्या पायाचा व्यास 24 मी. आहे. तर त्याची तिरपी उंची किती आहे? जर प्रति चौ.मी. 14 रु.त्या कपड्याची किंमत असेल तर तंबु साठी लागणाऱ्या कपड्याची किंमत किती?




Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com




7. शंकुची वक्र पृष्ठभागाचे क्षेत्रफळ $1159\frac{5}{7}$ से.मी.$^2$आहे. त्याच्या पायाचा क्षेत्रफळ $254\frac{4}{7}$ से.मी.$^2$ तर त्याचे घनफळ माहित करा.
8. 4.8 मी.उंची असलेला तंबु दंडगोलीय आहे आणि त्यावर शंकु आकार आहे. पायाची त्रिज्या 4.5 मी. आहे. आणि तंबुची एकुण उंची 10.8 मी.आहे. तंबुसाठी लागणारा कॅनवास चौ.मी. मध्ये माहित करा.
9. उंची 8मी. आणि पायाची त्रिज्या 6मी. असलेला कोनीय तंबु उभारण्यासाठी 3मी. रुंद असलेल्या किती लांब ताडपत्रीची आवश्यकता आहे? मार्जीन शिवण्यासाठी आणि कापतांना काही कापड वाया जातो. या हेतुने सुमारे 20 से.मी. अतिरिक्त लांबीचा अंदाज करा. ( $\pi = 3.14$ वापरा )
10. उंची 27 से.मी. आणि पाया ची त्रिज्या 7 से.मी. असलेल्या लंब वर्तुळाकार शंकुच्या आकारात एक जोकर ची टोपी आहे. तर अशा 10 टोप्या बनविण्यासाठी किती क्षेत्रफळाची ठावची आवश्यकता आहे?
11. बाजुच्या आकृतीत दिसत असल्याप्रमाणे 5.2 मी. व्यास आणि 6.8 मि. तिरपी उंची असलेल्या शंकुच्या आकाराच्या भांड्यात पाणी भरण्याचा दर प्रति मिनीटाला 1.8 मी3 आहे. तर ते पुर्ण भांडे भरण्यासाठी किती वेळ लागेल?




12. दोन समान शंकुचे घनफळ $12\pi$ घनएकक आणि $96\pi$ घन एकक आहे. जर लहान शंकुचे वक्र पृष्ठभाग क्षेत्रफळ $15\pi$ चौ.एकक असेल तर मोठ्या शंकुचे वक्र पृष्ठभाग क्षेत्रफळ माहित करा?

## 10.5 गोल (Sphere)


(i)


(ii)


(iii)

वरील सर्व आकृत्यांना तुम्ही ओळखता. त्यामधील भिन्नतेला तुम्ही ओळखु शकता का?

आकृती (1) हे वर्तुळ आहे. तुम्ही हे कागदावर सहज काढु शकता. कारण हे प्रतलीय आकृती आहे. केंद्र बिंदु पासुन सारख्या अंतरावर (त्रिज्या) असणाऱ्या बिंदुने तयार झालेली बंदीस्त आकृती म्हणजे वर्तुळ होय.

उरलेले वरील सर्व आकृती भरीव आहेत. हे भरीव वर्तुळाकार रुपात आहे त्याला गोल असे म्हणतात.

गोल हे त्रिमीतीय आकृती आहे. जागेतील सर्व बिंदुनी हा तयार झालेला आहे. हे एका बिंदु पासुन सारख्या अंतरावर आहेत. त्या बिंदुला गोलचा केंद्र बिंदु पासुन गोलच्या पृष्ठभागाच्या बिंदुपर्यंतच्या अंतराला त्याची त्रिज़्या असे म्हणतात.



Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com






**कृती**

जाड कागदावर एक वर्तुळ काढा आणि त्याला कापा त्याच्या व्यासाने एक तार चिपकवा. हाताने त्या तारेच्या दोन्ही टोकाला धरा आणि त्याला स्थीर गतीने फिरवा आणि निरिक्षण करा कोणती आकृती तयार होते.



### 10.5.1 गोलचा पृष्ठभागाचे क्षेत्रफळ



खालील कृतीने आकृतीची पृष्ठभाग क्षेत्रफळ माहित करु या.

आकृतीत दाखविल्या प्रमाणे एक टेनीस बाल घ्या आणि त्याला दोरीने गुडांळा. दोरी जागेवर राहण्यासाठी पिनचा वापर करा. दोरीच्या सुरुवातीच्या टोकाला आणि शेवट्या टोकाला खुण करा. गोलाच्या पृष्ठभागापासुन हळुने दोरी काढा.





गोलाची त्रिज्या माहित करा. आणि आकृतीत दाखविल्याप्रमाणे बॉलच्या त्रिज़्ये च्या समान त्रिज्येच्या चार वर्तुळ काढा. बॉल ला गुंडाळलेल्या दोरीने एक नंतर एक वर्तुळ भरायला सुरुवात करा.

**तुमच्या निरिक्षणास काय आले ?**

गोल (बॉल) च्या पृष्ठभाग क्षेत्रफळाला पुर्णपणे अच्छादेलेली दोरीचा वापरल्याने चार वर्तुळाचा क्षेत्रफळ पुर्णपणे भरल्या गेले. ते सर्व त्रिज़्या सारखे होते. गोलच्या त्रिज्या एवढे.

या वरुन आपल्याला असे समजते की, गोलच्या पृष्ठभागाची त्रिज्या (r) ही वर्तुळाच्या क्षेत्रफळाच्या त्रिज्याच्या चौपट असते (r).

$\therefore$ गोलच्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ $= 4 \times$ वर्तुळाचा क्षेत्रफळ

$= 4\ \pi r^2$

**गोलाचा पृष्ठभागाचे क्षेत्रफळ $= 4\ \pi r^2$**

येथे 'r' ही गोलाची त्रिज्या आहे.



**प्रयत्न करा**

गोलाचे पृष्ठभाग क्षेत्रफळ तुम्ही कोणत्यातरी दुसऱ्या पध्दतीने माहित करु शकता का ?

### 10.5.2 अर्धगोल


एक भरीव गोल घ्या. गोल केंद्रबिंदु मध्यातुन प्रतल जावे असे त्याला कापा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com





आकृतीत दाखविल्याप्रमाणे नंतर ते दोन सारख्या भागात विभागल्या जातात.


प्रत्येक समान भागाला अर्धे गोल असे म्हणतात

गोलाला फक्त एकच वक्र बाजु असते. जर त्याला दोन समान भागात विभागले तर त्याची वक्र बाजु सुध्दा दोन समान वक्र बाजु मध्ये विभागल्या जाते.

अर्धगोलाच्या पृष्ठभाग क्षेत्रफळाविषयी तुम्ही काय विचार केले? निश्चित पणे,

अर्धगोलाचे वक्र पृष्ठभाग क्षेत्रफळ हे गोलाच्या पृष्ठभाग क्षेत्रफळाच्या अर्धे असते.

म्हणुन अर्धे गोलाचे पृष्ठभाग क्षेत्रफळ $= \frac{1}{2}$ गोलाचे पृष्ठभाग क्षेत्रफळ



$$= \frac{1}{2} \times 4\pi r^2$$

$$= 2\,\pi r^2$$

∴ **अर्ध गोलाचे पृष्ठभाग क्षेत्रफळ** $= 2\,\pi r^2$

अर्ध गोलाचा पाया वर्तुळाकार क्षेत्राचे असते.

त्याचा क्षेत्रफळ हा $\pi r^2$ च्या समान असते.

वक्र पृष्ठभाग क्षेत्रफळ आणि पायाचा क्षेत्रफळ दोन्ही मिळवु या. आपल्याला अर्ध गोलाचे एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळ मिळते.

अर्ध गोलाचे पृष्ठभाग क्षेत्रफळ= त्याचे वक्र पृष्ठभाग क्षेत्रफळ+ त्याचा पायाचे क्षेत्रफळ

$$= 2\,\pi r^2 + \pi r^2$$


$$= 3\,\pi r^2.$$

**अर्ध गोलाचे एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळ** = $3\pi r^2$.

## हे करा



1. एका लंब वर्तुळाकार दंडगोलात r त्रिज्येचे गोल बसवण्यात आले. (आ.पहा) तर माहित करा
   (i) गोलाचे पृष्ठभाग क्षेत्रफळ
   (ii) दंडगोलाचे वक्र पृष्ठभागाचे क्षेत्रफळ
   (iii) (i) आणि (ii) मध्ये मिळालेल्या क्षेत्रफळाचे गुणोत्तर







Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




2. खालील प्रत्येक आकृतीचे पृष्ठभाग क्षेत्रफळ माहित करा.

(i) 


(ii) 


### 10.5.3 गोलाचे घनफळ

गोलाचे घनफळ माहित करण्यासाठी कल्पना करा की, एकरुप पिरॅमीडच्या मोठ्या संख्येने गोल बनवण्यात आला. त्याचे सर्व शिरोंबिंदु गोलच्या केंद्रावर जोडल्या गेले आहे. हे आ. दिसते




खालील पायऱ्या पाळा.

1. आकृती (1) प्रमाणे समजा भरीव गोलाची त्रिज्या 'r' आहे.
2. आकृती (11) मध्ये दाखविल्याप्रमाणे, सारख्या आकाराच्या पिरॅमीडच्या 'n' संख्येने गोल बनलेले आहे असे ग्रहीत धरा. गोलाची त्रिज्या 'r' आहे.
3. त्यातील एक भाग( पिरॅमीड) विचारात घेऊ. प्रत्येक पिरॅमीड ला पाया आहे आणि त्या पिरॅमीडच्या पायाचा क्षेत्रफळ समजा $A_1, A_2, A_3$.....

   पिरॅमीडची उंची ही गोलच्या त्रिज्या एवढी आहे, तर

   एका पिरॅमीड चे घनफळ $= \frac{1}{3} \times$ पायाचा क्षेत्रफळ $\times$ उंची

   $= \frac{1}{3} A_1 r$

4. पिरॅमीडची संख्या 'n' असल्याने

   'n' पिरॅमीडचे घनफळ $= \frac{1}{3} A_1 r + \frac{1}{3} A_2 r + \frac{1}{3} A_3 r + \ldots\ldots$ n वेळा

   $= \frac{1}{3} r [A_1 + A_2 + A_3 + \ldots\ldots$ n वेळा$]$



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



$$= \frac{1}{3} \times A\,r$$

$A = A_1 + A_2 + A_3 + .....$ n वेळा
$=$ 'n' पिरॅमीड चे पृष्ठभाग क्षेत्रफळ

5. यासर्व पिरॅमीडच्या घनफळाची बेरीज ही गोलाच्या घनफळा एवढी असते. आणि सर्व पिरॅमीडच्या पायाच्या क्षेत्रफळाची बेरीज ही गोलाच्या पृष्ठभागाच्या क्षेत्रफळाच्या जवळ जवळ असते (म्हणजेच $4\pi r^2$).

म्हणुन गोलाचे क्षेत्रफळ $= \frac{1}{3}(4\pi r^2)\,r$

$= \frac{4}{3}\pi r^3$ घन एकक

**गोलाचे घनफळ** $= \frac{4}{3}\pi r^3$

येथे 'r' हा गोलाची त्रिज्या आहे.
अर्ध गोलाचे घनफळ तुम्ही कसे माहित करु शकाल? गोलाच्या घनफळाचे ते अर्ध आहे.

$\therefore$ अर्ध गोलाचे घनफळ $=$ गोलाच्या घनफळाचे $\frac{1}{2}$

$$= \frac{1}{2} \times \frac{4}{3}\pi r^3$$


$$= \frac{2}{3}\pi r^3$$

(सुचना : टरबुज किंवा या सारख्या इतरचा वापर करुन हे सुत्र काढण्याचा प्रयत्न करु शकता.)

## हे करा



1. बाजुच्या आकृतीत दिलेल्या गोलाचे घनफळ माहित करा.
2. 6.3 से.मी. त्रिज़्याच्या गोलाचे घनफळ माहित करा.




$r = 3$cm. $d = 5.4$cm.

उदाहरण-10: गोलाचा पृष्ठभाग क्षेत्रफळ जर 154 से.मी.$^2$ असेल तर त्यांची त्रिज्या माहित करा.

सोडवणुक: गोलाचा पृष्ठभागाचे क्षेत्रफळ $= 4\pi r^2$

$$4\pi r^2 = 154 \Rightarrow 4 \times \frac{22}{7} \times r^2 = 154$$

$$\Rightarrow r^2 = \frac{154 \times 7}{4 \times 22} = \frac{7^2}{2^2}$$

$$\Rightarrow r = \frac{7}{2} = 3.5\,\text{cm}$$





Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com



उदाहरण-11: दगडानी बनलेली अर्ध गोल प्याला ची जाडी 5 से.मी. आहे. जर आतील त्रिज्या 35 से.मी. आहे तर त्या प्याल्याचे एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळ माहित करा.


सोडवणुक: समजा बाहेरीज त्रिज्या R आणि आतिल त्रिज्या 'r'आणि रिंगची जाडी= 5 से.मी.

$\therefore$ R = (r + 5) से.मी. = (35 + 5) से.मी. = 40 से.मी.

एकुण पृष्ठभाग क्षेत्र.= अर्ध गोलाचे बाहेरील वक्र पृष्ठभाग क्षे.+आतील अ.गो.व.पृ.क्षे+रि.क्षे.

$= 2\pi R^2 + 2\pi r^2 + \pi(R^2 - r^2)$

$= \pi(2R^2 + 2r^2 + R^2 - r^2)$




$= \frac{22}{7}(3R^2 + r^2) = \frac{22}{7}(3\times 40^2 + 35^2)\,cm^2$

$= \frac{6025\times 22}{7}\,cm^2$

= 18935.71 से.मी.$^2$ (अंदाजे)

उदाहरण-12: भवनाच्या अर्ध गोला कळसाला रंग लावण्याची गरज आहे. (आ.1 पहा) कळसाच्या पायाचा परिघ जर 17.6 मी. असेल तर प्रति 100 से.मी.$^2$ ला 5 रु. दराने रंग लावण्याचा खर्च माहित करा?

सोडवणुक: ज्या अर्थी कळसाला फक्त गोलाकार पृष्ठभागाला रंग लावायचे ओह. रंग लावण्याचा विस्तार माहित करण्यासाठी आपल्याला अर्धगोलाचे वक्र पृष्ठभाग क्षेत्रफळ माहित करणे गरजेचे आहे आता, कळसाच्या पायाचा परिघ = 17.6 मी. 17.6 = $2\pi r$


म्हणुन कळसचा त्रिज्या $= 17.6 \times \frac{7}{2\times 22}$ m

= 2.8 मी.

कळसाचा वक्र पृष्ठभाग क्षेत्रफळ $= 2\pi r^2$

$= 2\times\frac{22}{7}\times 2.8\times 2.8\,m^2$

= 49.28 मी.$^2$.


आकृती-1

आता, रंग लावण्याचा दर 5 रु. प्रति 100 से.मी.$^2$

म्हणुन रंग लावण्याचा खर्च 1मी$^2$ = 500 रुपये

म्हणुन पुर्ण कळसाला रंग लावण्याचा खर्च

= 500 रुपये × 49.28

= 24640 रुपये





Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



**उदाहरण-13:** सर्कस मध्ये मोटर साइकल चालक जिथे आपले कर्तब दाखवतो. त्या पोक़ळ गोलाचे व्यास 7 मी. आहे. तर त्या मोटार साइकल चालकाला फेरफटका मारण्यासाठी किती क्षेत्र उपलब्ध आहे ते माहित करा?

**सोडवणुक :** गोलाचा व्यास = 7 मी. आणि त्रिज्या 3.5 मी.आहे. म्हणुन मोटर साइकल चालकाला फेरफटका मारण्यासाठी उपलब्ध जागा ही गोलाची पृष्ठभाग क्षेत्रफळ आहे.

$$4\pi r^2 = 4\times\frac{22}{7}\times 3.5\times 3.5 m^2$$

$= 154$ मी.$^2$.

**उदाहरण-14:** 4.9 से.मी. धातुचे गोल हे शॉटपुट आहे. धातुची घनता 7.8 ग्राम प्रति से.मी.$^3$ आहे. तर शॉटपुट चे वस्तुमान माहित करा.

**सोडवणुक:** ज्या अर्थी धातुने बनलेली शॉटपुट भरीव गोल आहे. आणि त्याचा वस्तुमान हा त्याच्या घनफळ आणि घनता च्या गुणाकारा एवढा असतो. आपल्याला गोलाचे घनफळ माहित करणे आवश्यक आहे.

आता, गोलाचे घनफळ $= \frac{4}{3}\pi r^3$

$$= \frac{4}{3}\times\frac{22}{7}\times 4.9\times 4.9\times 4.9 \text{ cm}^3$$

$= 493$ से.मी.$^3$ (जवळ जवळ)

पुन्हा, धातुच्या 1से.मी.$^3$ चे वस्तुमान 7.8 ग्राम आहे.

म्हणुन, शॉटपुटचे वस्तुमान $= 7.8\times 493$ ग्राम

$= 3845.44g = 3.85$ कि.ग्रा.(जवळ जवळ)

**उदाहरण-15:** एक अर्ध गोल प्याल्याची त्रिज्या 3.5 से.मी. आहे. तर त्यामध्ये किती पाण्याचे घनफळ मावेल?

**सोडवणुक:** प्याल्यात मावणारे पाण्याचे घनफळ= अर्ध गोलाचे घनफळ



$$= \frac{2}{3}\pi r^3$$

$$= \frac{2}{3}\times\frac{22}{7}\times 3.5\times 3.5\times 3.5 \text{ cm}^3$$

$= 89.8$ से.मी.$^3$ (सुमारे)



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



## अभ्यास - 10.4



1. गोलाची त्रिज्या 3.5 से.मी. आहे तर त्याचे पृष्ठभाग क्षेत्रफळ आणि घनफळ माहित करा.
2. गोलाचा पृष्ठभाग क्षेत्रफळ $1018\frac{2}{7}$ चौ.से.मी. आहे तर त्याचा घनफळ माहित करा?
3. ग्लोबच्या विषववृत्तीची लांबी 44 से.मी. आहे तर त्याचे पृष्ठभाग क्षेत्रफळ माहित करा?
4. गोलीय बॉलचे व्यास 21 से.मी. आहे. अशा 5 बॉल तयार करण्यासाठी किती कातडीची आवश्यकता आहे?
5. दोन गोलाच्या त्रिज्याचे गुणोत्तर 2:3 आहे. तर त्याच्या एकुण पृष्ठभाग आणि घनफळाचा गुणोत्तर माहित करा?
6. 10 से.मी.त्रिज्या असलेल्या अर्धगोलाचे एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळा काढा. (वापरा $\pi = 3.14$)
7. 14 से.मी. त्रिज़्या असलेल्या गोलीय फुग्यात हवा भरल्याने त्याची त्रिज्या 28 से.मी. होते. दोन्ही संदर्भामध्ये फुग्याच्या पृष्ठभाग क्षेत्रफळाचा गुणोत्तर माहित करा.
8. ब्रॉसने बनलेल्या अर्धगोल प्यालाची जाडी 0.25 से.मी. आहे. प्यालाची आतील त्रिज्या 5 से.मी. आहे. बाहेरील पृष्ठभाग क्षेत्रफळ ते आतिल पृष्ठभाग क्षेत्रफळाचे गुणोत्तर काढा.
9. एका शिस्याच्या ( lead ) बॉलचा व्यास2.1 से.मी. आहे. वापरलेल्या शिस्याची घनता $11.34\ g/c^3$ तर बॉलचे वजन किती आहे?
10. धातुच्या दंडगोलाचा व्यास 5 से.मी. आहे आणि उंची $3\frac{1}{3}$ से.मी. आहे. याला वितळवुन एक गोल बनविले. तर त्याचा व्यास किती?
11. 10.5 से.मी. व्यास असलेल्या अर्धगोल प्याल्यात किती लिटर दुध मावेल?
12. अर्धगोल प्यालाचा व्यास 9 से.मी. आहे. 3 से.मी. व्यास आणि 3 से.मी. उंची असलेल्या दंडगोलीय बॉटल मध्ये द्रव ओतले तर द्रवाने पुर्ण भरलेल्या प्यालातील द्रव बॉटलमध्ये भरत गेले तर किती बॉटलची आवश्यकता आहे?

## आपण काय चर्चा केलो?



1. आयतज आणि घन हे नियमित चिती आहे. त्याला सहा बाजु आहेत आणि त्यापैकी चार पार्श्वबाजु आणि पाया आणि वरचा भाग
2. जर आयतजची लांबी $l$, रुंदी '$b$' आणि उंची '$h$' असेल तर

   आयतजचे एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळ $= 2\,(lb + bh + lh)$

   आयतजचे पार्श्वपृष्ठभाग क्षेत्रफळ $= 2\,h\,(l + b)$

   आयतजचे घनफळ $= lbh$

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



3. जर घनाच्या कडाची लांबी '$l$' एकक असेल तर

   घनाचे एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळ $= 6l^2$

   घनाचे पार्श्व पृष्ठभाग क्षेत्रफळ $= 4l^2$

   घनाचे घनफळ $= l^3$

4. पिरॅमीडची घनफळ हे नियमीत चितीच्या घनफळाच्या $\frac{1}{3}$ आहे. जर त्यांची सारखी पाया आणि सारखी उंची असेल तर.

5. दंडगोला हे भरीवच आहे. त्याला एक वक्र पृष्ठभाग क्षेत्र आणि दोन वर्तुळाकार टोक आहेत. जर पाया आणि वरच्या भागाच्या केंद्राला एक रेषाखंडाने जोडला तर तो पाया लंब असतो. याला लंब वर्तुळाकार दंडगोल असे म्हणतात.

6. लंब वर्तुळाकार दंडगोलाची त्रिज्या जर 'r' आणि उंची 'h' असेल तर

   - दंडगोलाच्या वक्रपृष्ठभागाचे क्षेत्रफळ $= 2\pi rh$
   - दंडगोलाचे एकुण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ $= 2\pi r (r + h)$
   - दंडगोलाचे घनफळ $= \pi r^2 h$

7. शंकु हा भुमीती आकाराचा वस्तु आहे ज्याचा पाया वर्तुळ आणि टोक हे शिरोंबिंदुने आहे. जर शिरोंबिंदु आणि पायाच्या केंद्राला एक रेषाखंडाने जोडले तर ते पायाला लंब असते. याला लंब वर्तुळाकार शंकु असे म्हणतात.

8. शंकुच्या शिरोबिंदु पासुन वर्तुळाकार पायाच्या कोणत्याही बिंदुला जोडणाऱ्या रेषाखंडाला तिरपी उंची ($l$) असे म्हणतात.

   $l^2 = h^2 + r^2$

9. शंकुचे जर 'r' ही त्रिज्या 'h'ही उंची आणि '$l$' ही तिरपी उंची असेल तर

   - शंकुचे वक्र पृष्ठभाग क्षेत्रफळ $= \pi rl$
   - शंकुचे एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळ $= \pi r (r + l)$

10. सारखा पाया आणि सारखी उंची असलेल्या शंकुचे घनफळ हा दंडगोलाच्या घनफळाच्या $\frac{1}{3}$ असतो. म्हणजेच शंकुचे घनफळ $= \frac{1}{3} \pi r^2 h$.

11. जागेमधील एका ठराविक बिंदु पासुन समान अंतरावर असलेल्या बिंदुचा संच हा गोल आहे. गोल हा भुमीतीय वस्तु आहे. त्या ठराविक बिंदुला गोलाचा केंद्र आणि ठराविक अंतराला गोलाची त्रिज्या असे म्हणतात.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



12. गोलाची त्रिज्या जर 'r' आहे तर
   - गोलाचा पृष्ठभाग क्षेत्रफळ $= 4\pi r^2$
   - गोलाचा घनफळ $= \frac{4}{3}\pi r^3$
13. गोलाच्या केंद्राच्या मधुन जाणारे प्रतल गोलाला दोन समान भागामध्ये विभागते. प्रत्येक भागाला अर्ध गोल असे म्हणतात.
   - अर्ध गोलाचे वक्र पृष्ठभाग क्षेत्रफळ $= 2\pi r^2$
   - अर्ध गोलाचे एकुण पृष्ठभाग क्षेत्रफळ $= 3\pi r^2$
   - अर्ध गोलाचे घनफळ $= \frac{2}{3}\pi r^3$

## तुम्हाला माहित आहे काय?

### 8 × 8 चा जादुचा चौरस तयार करणे

चौरस जाळीत क्रमाने 1ते64 संख्या ठेवा. डाव्या बाजुला सचित्रात दाखविल्या प्रमाणे. कर्ण अपसारण चिन्हाणे स्थुलमानाने दर्शवित आहे. जादुचा चौरस मिळविण्यासाठी अपरसण चिन्हावरील रेषा कोणत्याही संख्योच्या ठिकाणी त्या अपसरण चिन्ह रेषा वरील दुसरी संख्या प्रशंसा ने ठेवणे ( दोन लहान आणि मोठ्या संख्याची अदलाबदल केल्यानी त्याची बेरीज सारखी येते त्या दोन संख्यांना प्रंशसा संख्या म्हणायचे)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | 32 |
| 33 | 34 | 35 | 36 | 37 | 38 | 39 | 40 |
| 41 | 42 | 43 | 44 | 45 | 46 | 47 | 48 |
| 49 | 50 | 51 | 52 | 53 | 54 | 55 | 56 |
| 57 | 58 | 59 | 60 | 61 | 62 | 63 | 64 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 64 | 2 | 3 | 61 | 60 | 6 | 7 | 57 |
| 9 | 55 | 54 | 12 | 13 | 51 | 50 | 16 |
| 17 | 47 | 46 | 20 | 21 | 43 | 42 | 24 |
| 40 | 26 | 27 | 37 | 36 | 30 | 31 | 33 |
| 32 | 34 | 35 | 29 | 28 | 38 | 39 | 25 |
| 41 | 23 | 22 | 44 | 45 | 19 | 18 | 48 |
| 49 | 15 | 14 | 52 | 53 | 11 | 10 | 56 |
| 8 | 58 | 59 | 5 | 4 | 62 | 63 | 1 |

* कोणत्याही ओळी आणि स्तंभातील संख्याची बेरीज समान येत असलेल्या चौरस रुपातील संख्याचा मांडणीच्या रचनेला जादुचा चौरस म्हणतात. अशा जादुच्या चौरसा साठी तुम्ही प्रयत्न करा.





Downloaded from https:// www.studiestoday.com


SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

# 11 क्षेत्रफळ

## 11.1 प्रस्तावना

तुमच्या गावाच्या किंवा शहराच्या सभोवताली असलेल्या शेतास पाहिले असाल? त्या जागेस (शेतास) विविध शेतकऱ्यांमध्ये वाटल्यागेल्या आहेत. आणि त्यांचे बरेचशे शेत बनले आहेत. ते सर्व शेत एकाच रुपाचे आणि आकाराचे आहेत का? त्याचे क्षेत्रफळ सारखे आहेत का? शेतास अजुन काही व्यक्तीत विभागणी केली असता. हे कशा प्रकारे विभागणी करतात. त्यांना समान क्षेत्रफळाचे शेत हवे असल्यास ते काय करतात?



शेतात किती खत वापरायचे किती बियाण्याची गरज आहे. यांचा अंदाज शेतकरी कसा लावतात?

भुमीतीच्या अध्यायनात, क्षेत्राच्या सिमेत सुव्यवस्था आणि आवश्यक विभागांना वाटणी करणाऱ्या पध्दतीत जमीनीला मोजणे त्याविकासाचे कारण बनले. इतिहासात इजिप्त मधील नाईल नदीच्या पुरांची चर्चा तुम्ही ऐकले असाल. त्यानतर जमीनच्या खुणा करणे, त्यापैकी काही शेत मुलभुत आकारात निर्माण करणे, जसे चौरसाकार, आयताकार, समलंब चौकोन आकार, समांतर चर्तुभुजाकार इत्यादी. काही अनियमीत आकारात असतात. यामुलभुत आकारासाठी आपण काही नियम तयार केले. काही लांबी आणि परिमाणाच्या उपयोग केल्याने त्याचे क्षेत्रफळ मिळते. या पैकी काही आपण या धड्यात अध्यायन करणार आहोत. आपण त्रिकोणाचे, चौरसाचे, आयताचे आणि चौकोनाचे क्षेत्रफळ काही सुत्राचा वापर करुन कसे माहित करतात. हे या धड्यात शिकणार आहोत. आपण काही मुलभुत सुत्राचा सुध्दा शोध घेणार आहेत. ते कसे येतात त्याची चर्चा करु क्षेत्रफळ म्हणजे काय?

## 11.2 समतल क्षेत्राचे क्षेत्रफळ


एका सरळ संवृत्त आकृतीने व्यापलेल्या प्रतलाच्या भागास प्रतलीय क्षेत्र म्हणतात. या संवृत्त क्षेत्राच्या परिमाणास किंवा मापास त्यांचे क्षेत्रफळ असे म्हणतात.

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com






त्रिकोण आकार क्षेत्र | चौकोनाकार क्षेत्र | वर्तुळाकार क्षेत्र | आयताकार क्षेत्र | चौरसाकार क्षेत्र

समतल क्षेत्रात सिमा (Boundaries)आणि आंतरक्षेत्र असते. त्याचे क्षेत्रफळ आपण कसे माहित करतो? याक्षेत्राच्या परिमाणास (क्षेत्रफळ) नेहमी धन वास्तविक संख्येने (क्षेत्रफळाच्या काही एककात) जसे 10 से.मी$^2$ 215मी$^2$ 2 की.मी.$^2$, 3हेक्टर इत्यादीने दर्शवितो.म्हुणन एका आकृतीचे क्षेत्रफळ ( क्षेत्रफळाच्या काही एककात) हे कोणत्याही एका समतल संवृत्त भागाने गुंतलेले असते.

एकक क्षेत्रफळ हे एक एकक लांबीची बाजु असलेल्या चौरसाचे क्षेत्रफळ आहे. म्हणुन चौ.मी. (किंवा 1 से.मी.$^2$) हा एक 1 से.मी. ची लांबीची बाजु घेऊन काढलेल्या चौरसाचे क्षेत्रफळ आहे.





चौरस मीटर (1मी$^2$) चौरस किलो मिटर (1कि.मी.$^2$), चौरस मिली मिटर (1मी.मी.$^2$) ही पदे सारख्या शब्दात समजुन घेतली पाहिजे. मागील वर्गात आपल्याला एकरुप आकृत्यांच्या कल्पनेचा परिचय झाला. दोन आकृत्या एकरुप असतात. जेव्हा त्या एकाच रुपात आणि आकारात असतात.

## कृती



आकृती (I) आणि (II) चे निरिक्षण करा आणि दोन्हीचे क्षेत्रफळ काढा. या आकृत्या एका कागदाच्या शिटवर काढा आणि कापा. आकृती (I) ला आकृती (II)वर झाका. ते एकमेकांवर पुर्णपणे झाकल्या जातात का? त्या एकरुप आहेत का?




(i)




Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com



आकृती III आणि IV पहा. दोन्हीचे क्षेत्रफळ काढा. तुम्हाला काय दिसुन येते?.





आता या आकृती एका पातळ कागदाच्या शिटवर काढा. त्यास कापा आणि आकृती III ला आकृती IV वर झाका. त्याचा पाया(सारख्या बाजुची लांबी)




आकृती V मध्ये दाखविल्याप्रमाणे पुर्णपणे झाकतात का?

आपण निश्कर्ष काढतो की, आकृती I आणि II या एकरुप आणि समान क्षेत्रफळाच्या आहेत. परंतु आकृती III आणि IV समान क्षेत्रफळाच्या आहेत. परंतु एकरुप नाहीत.

**खाली दिलेल्या आकृत्या पहा.**




तुम्हाला दिसुन येते की, X, Y, Z या आकृतीचे समतल क्षेत्र हे दोन किंवा जास्त समतल क्षेत्रांनी बनलेली आहे. आपण सुलभतेने पाहु शकतो.

X आकृतीचे क्षेत्रफळ= P आकृतीचे क्षेत्रफळ + Q आकृतीचे क्षेत्रफळ

अशा रितीने (Y) चे क्षेत्रफळ = (A)चे क्षेत्रफळ + (B)चे क्षेत्रफळ +(C) चे क्षेत्रफळ

(Z)चे क्षेत्रफळ = (E)चे क्षेत्रफळ + (F)चे क्षेत्रफळ

अशारीतीने एका आकृतीचे क्षेत्रफळ ही एक संख्या (काही एककात) ती आकृतीतील प्रत्येक भागाशी संबंधीत आहे. यावरुन खालील गुणधर्म सांगु शकतो.

(**सुचना :** (X) आकृतीच्या क्षेत्रफळास क्षे. (X) असे लिहितो.)

(i) दोन एकरुप आकृतीचे क्षेत्रफळ समान असते जर A आणि B दोन एकरुप आकृत्या असल्यास क्षेत्रफळ(A) = क्षेत्रफळ (B)

(ii) आकृतीचे क्षेत्रफळ हे त्या आकृतीमधील एकुण भागाच्या क्षेत्रफळाच्या बेरजेला समान असते. जर एक समतल क्षेत्र आकृतीमधील X ने बनलेले हे दोन एकमेकांवर न झाकणाऱ्या समतल आकृत्याP आणि Q ने तयार होतात म्हणुन क्षे.(X) = क्षे.(P) + क्षे.(Q).



SCERT TELANGANA


Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



## 11.3 आयताचे क्षेत्रफळ


एका आयताचे लांबीला सबंधीत एककाच्या संख्येने उंचीशी संबंधीत असलेल्या एककाच्या संख्येने गुणले असता येणारा गुणाकार त्या आयताच्या क्षेत्रफळाच्या चौरस एककास समान असतो.




ABCD आयतात लांबी $\overline{AB}$ 5 एकक आहे. आणि रुंदी $\overline{BC}$ 4 एकक आहे.

$\overline{AB}$ 5 समान भागात आणि $\overline{BC}$ ला 4 समान भागात विभागणी करुन लांबी, रुंदीला समांतर रेषा काढली असता प्रत्येक विभाग एक चौरस एकक होतो. का?

$\therefore$ आयतात(5 एकक $\times$ 4 एकक). एकक म्हणजे 20 चौरस एकक असतात.




अशारितीने जर लांबी 'a' एकक आणि रुंदी 'b' एकक असल्यास आयताचे क्षेत्रफळ 'ab' चौरस एकक होते. म्हणजे लांबी $\times$ रुंदी चौरस एकक आयताचे क्षेत्रफळ येते.

### विचार करा आणि चर्चा करा आणि लिहा.




1. जर 1 से.मी. हे 5 मीटर दर्शविल्यास 6 चौरस से.मी. क्षेत्रफळ काय दर्शविते?
2. 1 चौ.मी $= 100^2$ चौ.से.मी. रजनी म्हणाली. तुम्ही सहमत आहेत का? स्पष्ट करा

### अभ्यास - 11.1



1. $\Delta ABC$ मध्ये $\angle ABC = 90^{\circ}$, AD = DC, AB = 12 से.मी. आणि BC = 6.5 से.मी. $\Delta ADB$ चे क्षेत्रफळ काढा.







Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com




2. PQRS चौकोनाचे क्षेत्रफळ काढा ज्यात ∠QPS = ∠SQR = 90°, PQ = 12 से.मी. PS = 9 से.मी., QR = 8 से.मी. अणि SR = 17 से.मी. (सुचना: PQRS ला दोन भाग असतात.खख)




3. ABCD समलंब चौकोनाचे आकृतीत दिल्याप्रमाणे क्षेत्रफळ काढा. ज्यात ADCE हा आयत आहे. (सुचना: ABCD ला दोन भाग असमान)





4. ABCD हा समांतर भुज चौकोन आहे. कर्ण AC आणि BD कर्ण एकमेकांस 'O'बिंदुवर छेदतात. सिंध्द करा की क्षे.(ΔAOD) = क्षे.(ΔBOC). (सुचना: एकरुप आकृत्यास समान क्षेत्रफळ असते)




## 11.4 एकच पाया आणि एकासमांतर रेषे मधील आकृत्या

एकच पाया आणि एकाच समांतर रेषे मधील काही भुमीतीय आकृत्यांच्या क्षेत्रफळामधील संबंधाचा आता आपण अभ्यास करु. हा अभ्यास आपणास एकरुप त्रिकोणाच्या गुणधर्म माहित करण्यासाठी उपयोगी पडते.

खालील आकृत्यांचे निरिक्षण करा.




(i) (ii) (iii) (iv)




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



आकृती (i) मध्ये ABCD समलंब चौकोन आणि EFCD हा समांतर भुज चौकोन आहे. त्या दोनीची सामाईक बाजु CD आहे. आपण म्हणु शकतो की, ABCD समलंब चौकोन EFCD समांतरभुज चौकोन एकाच पाया CD वर आहेत. अशा प्रकारे आकृती (ii) मध्ये PQRS समातंर भुज चौकोनाचा पाया TURS समांतर भुज चौकोनाचा पाया सारखा आहे. आकृती (iii) त्रिकोण ABC आणि त्रिकोण DBC चा पाया BC समान आहे. आकृती (iv) मध्ये ABCD समांतर भुज चौकोन आणि PCD त्रिकोण एकाच पाया DCवर आहे. म्हणुन या सर्व आकृत्या भुमितीय आकाराच्या आकृत्या असुन त्या एकाच पाया वर आहे. परंतु त्या एकाच समांतर रेषेमध्ये नाही. कारण AB , EF आणि PQ , TU एकमेकांवर येत नाही. A, B, E, F हे एकरेषीय बिंदु नसुन आणि P, Q, T, U. सुध्दा एकरेषीय नाहीत. आकृती (iii) आणि आकृती (iv) बद्दल काय म्हणु शकता ?

खालील आकृतीचे निरिक्षण करा.




या आकृत्यामध्ये तुम्हाल काय फरक आढळुन येतो ? आकृती (v), मध्ये $A_1B_1C_1D_1$ समलंब चौकोन आणि $E_1F_1C_1D_1$ समांतर भुज चौकोन एकाच पायावर आणि एकाच समांतर रेषेमध्ये $A_1F_1$ आणि $D_1C_1$ आहे. $A_1$, $B_1$, $E_1$, $F_1$ बिंदु एकरेषीय आणि $A_1F_1 \parallel D_1C_1$ आहे. अशा रितीने आकृती (vi) मध्ये $P_1Q_1R_1S_1$ आणि $T_1U_1R_1S_1$ एकाच सारख्या पाया $S_1R_1$ एकाच समांतर रेषेमध्ये $P_1U_1$ आणि $S_1R_1$.मध्ये आहे. आकृती (vii) आणि आकृती (viii).मध्ये एकाच पाया आणि एकाच समांतर रेषेमध्ये असलेल्या आकृतीची नावे द्या.


दोन आकृत्या एकाच पाया आणि एकाच समांतर रेषेमध्ये असतात, जर त्यास एकाच पाया (बाजु) आणि सामाईक पायांच्या विरुध्द असलेला शिरोबिंदु हा प्रत्येक आकृतीमध्ये पायाला समांतर असलेल्या रेषेवर असला पाहिजे.

## विचार करा आणि चर्चा करा आणि लिहा.



खालील पैकी कोणत्या आकृत्या एकाच पायावर आणि एकाच समांतर रेषेमध्ये वसलेल्या (स्थित)

अशा संदर्भात सामाईक पाया आणि दोन समांतर रेषा लिहा.






Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




## 11.5 एकाच पाया आणि एकाच समांतर रेषेमधील समांतर भुज चौकोन

एकाच पाया आणि एकाच समांतर रेषेमधील समांतर रेषेमधील समांतर भुज चौकोनात काही संबंध आहे का? असेल तर त्यास माहित करण्यासाठी अगोदर काही कृती करुन पाहु या.

### कृती


एका आलेखाच्या कागदावर आकृतीत दाखविल्याप्रमाणे दोन समांतरभुज चौकोन ABCD आणि PQCD काढा.




समातंरभुज चौकोन एकाच पाया DC वर आणि सारख्या समांतर PB आणि DC रेषे मध्ये आहे. स्पष्ट पणे DCQA हा भाग दोन समांतर भुज चौकोनात सामाईक आहे. म्हणुन जर आपण त्रिकोण ΔDAP आणि ΔCBQ सारखे क्षेत्रफळ असते. हे दाखविल्या नंतर आपण म्हणुन शकतो की, (PQCD)क्षे. = (ABCD)क्षेत्रफळ.

**प्रमेय-11.1 :** एकाच पाया आणि एकाच समांतर रेंषेमधील समातंर चर्तुभुज समान क्षेत्रफळाचे असतात

सिध्दता: समजा एकाच पाया DC वर असलेले दोन समांतर चर्तुभुज ABCD आणि PQCD हे एकाच DC आणि PB समांतर रेषेमध्ये आहेत.




ΔDAP आणि ΔCBQ मध्ये

PD || CQ आणि PB छेदीका आहे. $\angle DPA = \angle CQB$


आणि AD || CB आणि PB छेदीका आहे. $\angle DAP = \angle CBQ$

असेच PQCD समांतरभुज चौकोन असल्यामुळे PD = QCहोते.

ΔDAP आणि ΔCBQ एकरुप त्रिकोण आहेत. त्यांचे क्षेत्रफळ समान आहेत.

म्हणुन (PQCD)क्षे. = (AQCD)क्षे. + (DAP)क्षे.

= (AQCD)क्षे. + (CBQ)क्षे. = (ABCD)क्षे.




तुम्ही समांतरचर्तुभुज चौकोनामधील चौरसांची संख्या मोजुन पडताळा करु शकता. आलेखावरील पुर्ण चौरस अध्यपिक्षा कमी असलेले चौरस अध्यपिक्षा जास्त असलेले चौरस कशे मोजता. दोन समांतरभुज चौकोनाचे क्षेत्रफळ समान राहण्यासाठी ते एकाच समांतर रेषेमध्ये आणि एकाच पायावर असणे आवश्यक नाही. अशी रेशमा म्हणाली. त्यास समान पाया असणे पुरेसे होते. अशी ती म्हणाली. तीच्या विधानास समजण्यासाठी बाजुची आकृती पाहु या.

जर $AB = A_1B_1$ जेव्हा आपण $A_1B_1C_1D_1$समांतर चर्तुभुज कापुन त्यास ABCDसमांतर चर्तुभुजावर ठेवतो. तेव्हा A हा $A_1$ शी B आणि $B_1$शी आणि $\overline{C_1D_1}$ हा CDशी तंतोतंत जुळतो. अशारितीने



Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com



त्याचे क्षेत्रफळ समान असते. म्हणुन समांतरचर्तुभुज सारख्या पायावर आहे. आणि ते एकाच पायावर आहे हे समजल्या जाते. हे भुमितीय गुणधर्माचा अभ्यास करण्यासाठी उपयोगी पडते.

आता आपण वरील सिध्दतांच्या आधारास स्पष्ट करणारी काही उदाहरणे घेऊ.

उदाहरण-1:ABCD हा समांतरभुज चौकोण आणि ABEF हा आयत असुन DG हा AB.वर लंब आहे. तर सिध्द करा




(i) (ABCD)क्षे. = (ABEF)क्षे.

(ii) (ABCD)क्षे. = AB × DG

सोडवणुक: (i) आयत हा समांतरभुज चौकोन सुध्दा आहे

$\therefore$ (ABCD)क्षे. = (ABEF)क्षे. ..... (1)

(एकाच पाया आणि एकाच समांतर रेषेमध्ये असलेले समांतरचर्तुभुज)



(ii) (ABCD)क्षे. = (ABEF)क्षे ($\because$ (1)वरुन)

= AB × BE ($\because$ ABEF आयत आहे.)

= AB × DG ($\because$ DG $\perp$ AB आणि DG = BE )


म्हणुन (ABCD)क्षे. = AB × DG

वरील परिणामावरुन आपण म्हणुन शकतो की, समांतरचर्तुभुजाचे क्षेत्रफळ हे त्याची कोणती एक बाजु आणि त्या समान काढलेल्या लंबाच्या गुणाकारा एवढे असते.

उदाहरण-2: ABC त्रिकोण आणि ABEF समांतर चर्तुभुज हे एकाच पायावर ( AB ) आणि एकाच समांतर रेषा AB आणि EF मध्ये असल्यास सिध्द करा की,($\Delta$ABC)क्षे. = $\frac{1}{2}$ (ABEF समांतरचर्तुभुज)क्षे.

सोडवणुक: B वरुन BH $\parallel$ AC काढा ते वाढवलेल्या FE ला H वर मिळते.

$\therefore$ ABHC समांतरभुज चौकोन होते.




BC कर्ण दोन एकरुप त्रिकोणात विभागणी करते.

$\therefore$ ($\Delta$ABC)क्षे. = ($\Delta$BCH) क्षे.

= $\frac{1}{2}$ (ABHC समांतरचर्तुभुज)क्षे.

परंतु ABHC समांतर चर्तुभुज आणि ABEF समांतरचर्तुभुज एकाच पाया AB वर आणि एकाच समांतर रेषा AB आणि EF मध्ये आहेत.

$\therefore$ (ABHCसमांतर चर्तुभुज)क्षे. = ( ABEFसमांतर चर्तुभुज)क्षे.

म्हणुन ($\Delta$ABC)क्षे = $\frac{1}{2}$ (ABEF समांतरचर्तुभुज)क्षे.

वरील परिणामावरुन त्रिकोणाचे क्षेत्रफळ हे समांतर भुज चौकोनाच्या क्षेत्रफळाच्या अर्धे असते. सारख्या पाया आणि सारख्या समांतर रेषेमध्ये असते.

उदाहरण-3:एका समांतरभुज चौकोनाचे कर्ण 12 से.मी. आणि 16 से.मी. त्याच्या संल्गन बाजुच्या मध्यबिंदुना जोड्ल्यास तयार होणाऱ्या आकृतीचे क्षेत्रफळ माहित करा.

सोडवणुक: ABCD समचर्तुभुजाच्या बाजु AB, BC, CD, DA यांच्या मध्य बिंदु अनुक्रमे M, N, O आणि P आहेत. यास मिळविल्यास MNOP आकृती येते.

अशा प्रकारे तयार झालेल्या MNOP चा आकार कसा आहे? कारणे द्या?



Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com



रेषा PN ला जोडा, नंतर PN || AB आणि PN || DC (कसे?)

आपणास माहित आहे की, एकाच पाया आणि एकाच समांतर रेषेमधील त्रिकोण आणि समांतर चर्तुभुज, त्रिकोणाचे क्षेत्रफळ हे समांतर भुज चौकोनाच्या क्षेत्रफळाच्या अर्धे असते.

वरील परिणामावरुन ABNP समांतर चर्तुभुज आणि त्रिकोण MNP एकाच पाया PN एकाच समांतर रेषा PN आणि AB आहे.




$\therefore$ $\Delta$MNPक्षे. $= \frac{1}{2}$ ABPNक्षे. .....(i)

अशारितीने $\Delta$PONक्षे $= \frac{1}{2}$ PNCD क्षे. .....(ii)

आणि समचुर्तुभुजाचे क्षे. $= \frac{1}{2} \times d_1 d_2$

(1), (ii) आणि (iii) वरुन

(MNOP)क्षे. = ($\Delta$MNP)क्षे. + ($\Delta$PON)क्षे.

$= \frac{1}{2}$ (ABNP)क्षे. + $\frac{1}{2}$ (ABCD)क्षे.

$= \frac{1}{2}$ (ABCDसमचर्तुभुज) क्षे.


$= \frac{1}{2}\left(\frac{1}{2} \times 12 \times 16\right) = 48$ से.मी.$^2$




## अभ्यास- 11.2




1. ABCD समांतर चर्तुभुजाचे क्षेत्रफळ 36 से.मी.$^2$. आहे.जर AB = 4.2 से.मी. तर ABEF समांतर चर्तुभुजाची उंची माहित करा.




2. ABCD समांतर चर्तुभुज आहे. AE हा DC सी वर लंब आहे. आणि CF हाAD वर लंब आहे.जर AB = 10 से.मी. AE = 8 से.मी. आणि CF = 12 से.मी. तर AD काढा.

3. ABCD समांतर चर्तुभुजाच्या बाजु AB, BC, CDआणि AD चे मध्यबिंदु अनुक्रमे E, F G आणि H तर सिध्द करा.(EFGH)क्षे. $= \frac{1}{2}$ar(ABCD) क्षे.




4. जर तुम्ही उदाहरण (3) मधील $\Delta$APM, $\Delta$DPO, $\Delta$OCN आणि $\Delta$MNB जोडल्यास तुम्हाला चौकोन आकृती येते का?




SCERT TELANGANA


Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com






5. ABCD समांतरचर्तुभुजाच्या दोन बाजु DC आणि AD वर बिंदु अनुक्रमे P आणि Q आहेत तर सिध्द करा ($\Delta$APB)क्षे. = $\Delta$(BQC)क्षे.





6. ABCD समांतर भुजचौकोनाच्या आतील बिंदु P तर सिध्द करा.

(i) ($\Delta$APB)क्षे. + ($\Delta$PCD)क्षे. $= \frac{1}{2}$ ar(ABCD)

(ii) ($\Delta$APD)क्षे. + ($\Delta$PBC)क्षे. = ($\Delta$APB)क्षे. + ($\Delta$PCD)क्षे.

(सुचना: Pबिंदुवरुन ABरेषेला दुसरी समांतर रेषा काढा )


7. समलंब चौकोनाचे क्षेत्रफळ त्याच्या समांतर बाजुच्या बेरजेला त्यामधील अंतराने गुणल्यास येणाऱ्या गुणाकाराच्या अर्धे असते हे सिध्द करा.




8. PQRS आणि ABRS हे दोन समांतर चर्तुभुज आहेत. BR वर X हा बिंदु आहे. तर दाखवा की, (i) (PQRS)क्षे = (ABRS)क्षे

(ii) क्षे($\Delta$AXS) $= \frac{1}{2}$ ar(PQRS) क्षे.


9. एका शेतकऱ्याचे शेत आकृतीत दाखविल्याप्रमाणे PQRS समांतर चर्तुभुजाच्या आकारात आहेत. त्यांनी Aचा मध्य बिंदु RS वर घेऊन आणि त्याला P आणि Q शी जोडले. त्या शेताचे किती भाग पाडले? या भागाचा आकार कसा आहे? शेतकऱ्यास भुईमुग पेरण्याचे आहे. तो दाळ आणि धानाच्या बेरजेच्या बरोबर आहे. तर तो पेरणी कसा करतो? कारण सांगा?




10. सिध्द करा की, समलंब चौकोनाचे क्षेत्रफळ हे त्याच्या कर्णाच्या गुणाकाराच्या अर्धे आहे.

## 11.6 एकाच पाया एकाच समांतर रेषेमधील त्रिकोण

आपण एकाच पाया एकाच समांतर रेषेमधील आकृत्यांना पाहतो. समजा दोन त्रिकोण ABC आणि DBC हे एकाच पाया BC आणि एकाच समांतर रेषा AD आणि BC मध्ये आहे.




अशा त्रिकोणाच्या क्षेत्रफळाविषयी आपण काय म्हणु शकतो?

एकाच पाया, एका समांतर रेषेमध्ये अनेक त्रिकोणाच्या जोड्या अनेक प्रकारे काढु शकतो.



Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com




चला एक कृती करु या.

## कृती



एका आलेखाच्या कागदावर आकृतीत दाखविल्याप्रमाणे एकाच पाया किंवा (समान पाया) एका समांतर रेषेमध्ये असलेले दोन त्रिकोण काढा.

समजा $\Delta ABC$ आणि $\Delta DBC$ हे दोन एकाच पाया BC एकाच समांतर रेषा BC आणि AD. AD ला दोन्ही बाजुस वाढविल्यास आणि $CE \parallel AB$ आणि $BF \parallel CD$ काढा.AECB आणि FDCB समांतर भुज चौकोन एकाच पाया BC आणि एकाच समांतररेषा BC आणि EF मध्ये आहे.






अशा रितीने (AECB)क्षे = (FDCB)क्षे. (कसे ?)

यावरुन $(\Delta ABC)$क्षे = $\frac{1}{2}$ ( AECBसमांतरचर्तुभुज)क्षे ...(i)

आणि $(\Delta DBC)$क्षे = $\frac{1}{2}$ ( FDCBसमांतर चर्तुभुज)क्षे.... (ii)

(i) आणि (ii)वरुन $(\Delta ABC)$क्षे = $(\Delta DBC)$ क्षे

$\Delta ABC$ आणि $\Delta DBC$ चे क्षेत्रफळ आलेखातील चौरसाची संख्या मोजुण मागील कृती प्रमाणे काढु शकतो आणि ते सारखे आहे किंवा नाही तपासणी करु शकतो.






## विचार करा आणि चर्चा करा आणि लिहा.



ABC आणि DBC हे दोन त्रिकोण आकृतीत दाखविल्या प्रमाणे एकाच पाया आणि एकाच समांतर रेषेमध्ये आहेत. P हा AC आणि BDछेदन बिंदु आहे. $CE \parallel BA$ आणि $BF \parallel CD$ असे काढा की, E आणि F AD. वर आले पाहिजे.





$(\Delta PAB)$क्षे = $(\Delta PDC)$क्षे. दाखवु शकता का ?

सुचना: हे त्रिकोण एकरुप नाही परंतु त्याचे क्षेत्रफळ समान आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com




**उपप्रमेय-1 :** त्रिकोणाचा क्षेत्रफळ त्याचा पाया (किंवा कोणतीही बाजु) आणि त्यावर काढलेला लंबाच्या (उंची) गुणाकाराच्या अर्धे असते. सिध्द करा.

सिध्दता: समजा ABC हा त्रिकोण आहे.AD || BC असे काढा की, CD =BA.

झाले पाहिजे. आता ABCD समांतर चर्तुभुज त्याचा कर्ण AC आहे.

आपणास माहित आहे $\Delta ABC \cong \Delta ACD$

म्हणुन $\Delta ABC$क्षे = $\Delta ACD$क्षे ( एकरुप त्रिकोणाचे क्षेत्रफळ समान असते)




म्हणुन $ar\Delta ABC = \frac{1}{2} ar(ABCD)$ क्षे.


AE ⊥ BC काढा

आपणास माहित आहे (ABCD)क्षे = BC × AE

आपणास माहित आहे $(\Delta ABC)$क्षे $= \frac{1}{2}(ABCD)$क्षे $= \frac{1}{2} \times BC \times AE$

यावरुन $\Delta ABC$क्षे $= \frac{1}{2} \times$ पाया BC × पायावरील लंब AE.

**प्रमेय-11.2 :** सारखा पाया आणि सारखे क्षेत्रफळ असणारे दोन त्रिकोण एकाच समांतर रेषेमध्ये असतात.




आकृती पहा. सारखा पाया BC वर असणाऱ्या त्रिकोणास नाव द्या. $\Delta ABC$ आणि $\Delta DBC$ ची उंची काय आहे?

जर दोन त्रिकोणास समान क्षेत्रफळ आणि समान पाया असल्यास त्यांची उंची काय असते? A आणि D हे एकरेषीय आहेत का?


वरील परिणामाच्या उपयोगाचे स्पष्टीकरण करण्यासाठी काही उदाहरणे घेऊत.

उदाहरण-4: सिध्द करा की त्रिकोणाची मध्यगा त्रिकोणास समान क्षेत्रफळाच्या दोन त्रिकोणात विभागते.

सोडवणुक: समजा ABC हा त्रिकोण आहे. आणि AD ही त्याची एक मध्यगा आहे.

$\Delta ABD$ आणि $\Delta ADC$ मध्ये शिरोबिंदु सामाईक असतो आणि त्याचा पाया BD आणि DC समान असतो.

AE ⊥ BC. काढा




आता $(\Delta ABD) = \frac{1}{2} \times$ पाया BD × $\Delta ADB$ ची उंची

$= \frac{1}{2} \times BD \times AE$

$= \frac{1}{2} \times DC \times AE \quad (\because BD = DC)$

$= \frac{1}{2} \times$ पाया DC × $\Delta ACD$ ची उंची

= क्षे $\Delta ACD$

आता $(\Delta ABD) =$ क्षे $(\Delta ACD)$




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



उदाहरण-5: आकृतीमध्ये ABCD हा समांतरचर्तुभुज आहे.AC हा कर्ण आहे आणि DE || AC आणि DE हा BC ला वाढविल्यास E वर मिळते तर दाखवा की, (ABCD)क्षे = (ΔABE)क्षे.




सोडवणुक: (ABCD)क्षे = (ΔABC)क्षे + (ΔDAC)क्षे

ΔDAC आणि ΔEAC सारखा पाया $\overline{AC}$ वर आहे आणि DE || AC मध्ये आहे.


(ΔDAC)क्षे = (ΔEAC)क्षे (का?)

सारख्या आकृतीच्या क्षेत्रफळाला दोन्ही बाजुला मिळविल्यास

(ΔDAC)क्षे + (ΔABC)क्षे = (ΔEAC)क्षे + (ΔABC)क्षे

म्हणुन (ABCD)क्षे = (ΔABE)क्षे

उदाहरण-6: आकृतीत AP || BQ || CRआहेत सिध्द करा की,(ΔAQC)क्षे = (ΔPBR)क्षे




सोडवणुक: ΔABQ आणि Δ PBQ एकाच पाया BQ.आणि एकाच समांतर AP || BQ.मध्ये आहे.

(ΔABQ)क्षे = (ΔPBQ)क्षे ...(1)

अशारितीने

(ΔCQB)क्षे = (ΔRQB)क्षे (सारखा पाया BQ आणि BQ || CR) ...(2)

(1) आणि (2) मिळविल्यास

(ΔABQ)क्षे + (ΔCQB)क्षे = (ΔPBQ)क्षे + (ΔRQB)क्षे

म्हणुन ΔAQCक्षे = ΔPBRक्षे




## अभ्यास- 11.3



1. त्रिकोण ABC मध्ये (आकृती पहा) E हा मध्यगा ADचा मध्यबिंदु आहे दाखवा

   (i) ΔABEक्षे = ΔACEक्षे

   (ii) $\text{ar}\Delta ABE = \frac{1}{4}\text{ar}(\Delta ABC)$




2. समांतरचर्तुभुजाचा कर्ण हा त्यास समान क्षेत्रफळ असलेल्या चार त्रिकोणात विभागतो.



SCERT TELANGANA


Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com



3. आकृतीत $\Delta ABC$ आणि $\Delta ABD$ हे एकच पाया AB असलेले दोन त्रिकोण आहेत. रेषाखंड CD हा $\overline{AB}$ ला O वर समव्दिखंडन केल्यास दाखवा की,

(ΔABC)क्षे = (ΔABD)क्षे





4. आकृतीत $\Delta ABC$ मध्ये D, E, F हे अनुक्रमे BC, CA आणि AB बाजुचे मध्यबिंदु आहेत तर दाखवा


(i) BDEF हा समांतरचतुर्भुज आहे.

(ii) $ar(\Delta DEF) = \frac{1}{4} ar(\Delta ABC)$


(iii) $ar(BDEF) = \frac{1}{2} ar(\Delta ABC)$

5. आकृतीत दाखविल्याप्रमाणे (ΔABC)मध्ये D आणि E बिंदु अनुक्रमे AB आणि AC बाजुवरील बिंदु आहेत. ΔDBCक्षे = (ΔEBC)क्षे तर सिध्द करा. DE || BC.




6. आकृतीत BC ला समांतर असलेली A पासुन काढलेली रेषा XY आहे. जर BE || CA आणि CF || BA काढल्यास E आहे F वर XY ला मिळतात दाखवा की, (ΔABE)क्षे = (ΔACF)क्षे




7. आकृतीत ABCD समलंब चौकोनात AB || DC कर्ण AC आणि BD O वर एकमेकांस छेदतात. तर सिध्द करा की, (ΔAOD)क्षे = (Δ BOC)क्षे.




SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com







8. आकृतीत ABCDE ही पंचभुजी आहे. B मधुन AC ला समांतर असलेली रेषा वाढवलेल्या DC ला F वर मिळते. तर दाखवा की,

(i) $(\Delta ACB)$क्षे = $(\Delta ACF)$क्षे

(ii) (AEDF)क्षे = (ABCDE)क्षे




9. बाजुच्या आकृतीत जर $\Delta RAS$क्षे = $\Delta RBS$ क्षे आणि $(\Delta QRB)$क्षे = $(\Delta PAS)$क्षे तर सिध्द करा की, PQSR आणि RSBA दोन्ही समलंब चौकोन आहेत.

10. एका गावात रामय्याला चौकोनाकार खाली जागा आहे. त्या गावच्या ग्रामपंचायतीने त्या जागेचा काही भाग एका कोपऱ्याकडुन शाळेची इमारत बांधण्यासाठी घेण्याचा निर्णय केला. रामय्याने वरील एक जागा अटी नुसार मान्य करुन तो सहमत झाला. त्याच्या ऐवजी तेवढ्याच क्षेत्रफळाच्या आकारात घेतल्यास कोणत्या प्रकारे ती त्रिकोणाकार जागा मिळते. स्पष्टीकरण द्या. ( त्या जागेचे अंदाजे चित्र रेखाटा)

## विचार करा अणि चर्चा करा आणि लिहा.



काटकोन आणि त्रिकोण ABC मध्ये A हा काटकोन आहे. BC, CA आणि AB बाजुवर अनुक्रमे BCED, ACFG आणि ABMN चौरस काढले आहे. रेषाखंड $AX \perp DE$ BC ला Y वर आणि DE ला X वर छेदतो. AD, AE जोडा आणि BF आणि CM सुध्दा जोडा.( आकृती पहा) तर सिध्द करा की,

(i) $\Delta MBC \cong \Delta ABD$

(ii) (BYXD)क्षे = 2$(\Delta MBC)$क्षे


(iii) (BYXD)क्षे = (ABMN) क्षे

(iv) $\Delta FCB \cong \Delta ACE$

(v) (CYXE)क्षे = 2(FCB) क्षे

(vi) (CYXE)क्षे = (ACFG)क्षे

(vii) (BCED)क्षे = (ABMN)क्षे + (ACFG)क्षे




(vii) वा उत्तर तुमच्या शब्दात लिहु शकता का? ही प्रसिध्द पायथागोरसचा सिध्दांत आहे. या सिध्दांताची सिध्दता तुम्ही 10 व्या वर्गात शिकणार आहात.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



## आपण काय चर्चा केली?



या धड्यात आपण खालील चर्चा केली.


1. एका आकृतीचे क्षेत्रफळ हे (क्षेत्रफळाच्या काही एककात) कोणत्याही एका संवृत्त भागाने गुंतलेली असते.
2. दोन एकरुप आकृतीला सारखे क्षेत्रफळ असते परंतु याचे उलटखरे नाही.
3. जर X एक समतल आकृतीचे क्षेत्र हे P आणि Q च्या दोन न झाकलेले सतत समतल तयार झाले असता.(X) = (P)क्षे + (Q)क्षे
4. दोन आकृती एकाच पाया आणि एकाच समांतर रेषेमध्ये आहे म्हणतात. जर त्याचा पाया एकच असुन प्रत्येक आकृतीच्या सामान्य बाजुच्या विरुध्द असलेले शिरोबिंदु त्या पायाच्या समांतर रेषेवर असतात.
5. एकाच पाया आणि एकाच समांतर रेषेमधील समांतरचर्तुभुजाचे क्षेत्रफळ समान असते.
6. समांतरचर्तुभुजाचे क्षेत्रफळ हे त्याच्या पाया आणि त्या समोरील उंचीचा गुणाकार आहे.
7. एकाच पाया ( किवा समान पाया) वर असणारे समांतरभुजाचे समान क्षेत्रफळाचे एकास समांतर रेषेमध्ये असते.
8. एकाच पाया आणि एकाच समांतर रेषेमधील त्रिकोण आणि समांतर चर्तुभुज असल्यास त्रिकोणाचे क्षेत्रफळ समांतर चर्तुभुजाच्या अर्धे असते.
9. एकाच पाया (समान पाया) आणि एकाच समांतर रेषे मधील त्रिकोणाचे क्षेत्रफळ समातन असते.
10. एकाच पाया (समान पाया) आणि समान क्षेत्रफळ असणारे त्रिकोण एकाच समांतर रेषेमध्ये असतात.

## तुम्हाला माहित आहे का?

### गंमत( क्षेत्रफळ)

जर्मनच्या गणितशास्त्रज्ञ डेविड हिलबर्ट ( 1862- 1943) ने सिध्द केले की कोणताही बहुभुजाला तुकडे करुन त्यास समान क्षेत्रफळ असलेल्या इतर बहुभुजीत बदलता येते.

हेनरी अरनेस्ट ड्युडेनसी ( 1847-1930) ने समभुज त्रिकोणाला चार तुकड्यात कापुन त्याचे चौरसात कसे रुपांतर केले पाहु.




चौरसाने कसे रुपांतर केले पाहु या.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# 12 वर्तुळ

## 12.1 प्रस्तावना



आपण आपल्या सभोवतालच्या परिसरात नाणे बांगड्या, घड्याळ चाक, बटन, इत्यादी गोल आकाराच्या वस्तु बघतो. या सर्व वस्तु वर्तुळाकारात आहेत. तुम्ही या नाण्याचे कडे वरुन, बांगड्या, बटनाच्या कडे वरुन लहानपणी रेषा काढली असाल जी वर्तुळ बनते.



म्हुणन या वस्तुंच्या साहाय्याने काढलेल्या वर्तुळाकार आकारात आणि वर्तुळात काय फरक आहे. तुम्ही सांगु शकता?

वर निरिक्षण केलेल्या सर्व वर्तुळाकार वस्तुंना जाडी असुन त्या त्रिमीतीय आकारामानत आहे. परंतु वर्तुळात व्दिमीतीय आकार असते त्यास जाडी नसते.

वर्तुळाचे दुसरे उदाहरण घेऊ या तुम्ही तेल काढण्याची चक्की पाहिलेच असाल. आकृतीत दाखविल्याप्रमाणे एक तरफेच्या टेकुस घट्ट बांधलेला बैल एका आकाराच्या दिशेत चालन आहे. तुम्ही तो मार्ग (रस्ता) ओळखतात का? तो रस्ता वर्तुळाकर आहे.



त्या बैलांनी सिमेवर केलेले रेषा वर्तुळाकार आहे. तेलांची घाना जमीनीवर एका बिंदुवर घट्ट बसविलेला आहे. जो त्या वर्तुळाच्या केंद्रबिंदु आहे. त्या एकतरफेच्या टेकुची लांबी जो त्या वर्तुळाची त्रिज्या सुचित करते. तुमच्या जिवनातील वर्तुळा विषयी काही उदाहरणाचा विचार करा.

या धड्यात आपण वर्तुळाबद्दल शिकणार आहोत. वर्तुळासंबंधी पदे आणि त्यांचे गुणधर्माचा अभ्यास करणार आहोत. या अगोदर वर्तुळेखणीच्या साहाय्याने वर्तुळ कसे काढतात. ते तुम्हाला माहित पाहिजे.


चला हे करु या.

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com






एका पेन्सीलला वृत्तलेखणीच्या चिमट्यात ठेऊन स्क्रुला घट्ट करा (आवळा) कागदावर 0 बिंदुची खुण करा. वृत्तलेखणीची तिक्ष्ण बाजु 0 बिंदुवर ठेऊन त्या पेन्सीलला वर्तुळ काढण्यासाठी आकृती दाखविल्याप्रमाणे गोल आकारात फिरवा.


जर आपणास दिलेल्या त्रिजेचे वर्तुळ काढावयाचे असलेल्या मोजपट्टी चा वापर करुन अशाप्रकारे आपण काढु शकतो. दिलेल्या त्रिजेच्या लांबीवरुन वृत्तलेखणीच्या तिक्ष्ण टोकास आणि त्या पेन्सीलीच्या टोकास सरळ करा, 0 बिंदुची खुण करा आणि वर सांगीतल्याप्रमाणे वर्तुळ काढा.




A, B, C, D आणि E हे कोणते ही 5 बिंदु वर्तुळावर काढा. तुम्हाला दिसुन यते की, प्रत्येक रेषाखंड OA, OB, OC, OD, OE आणि OF ची लांबी 5 से.मी. आहे. ती दिलेल्या त्रिजेच्या समान आहे. अजुन काही बिंदु खुण वर्तुळावर करा आणि 0 बिंदु पासुन त्याचे अंतर मोजा. तुम्हाला काय दिसुन यते? आपण म्हणुन शकतो का वर्तुळ हे एका प्रतलातील एका स्थिर बिंदुपासुन स्थिर अंतरावर असलेल्या बिंदुचा संच आहे.

स्थिर बिंदु 0 ला वर्तुळाचा केंद्रबिंदु म्हणतात. आणि स्थिर अंतर OA ला वर्तुळाची त्रिज्या म्हणतात.





नरसिम्हा एका बिंदुवरुन बगीच्याच्या भोवती चलणे सुरु केले आणि एक फेरी पुर्ण केली. नरसिम्हाने कापलेल्या अंतरास तुम्ही काय म्हणता? ती वृत्ताकार बगीच्याच्या सिमेची एकुण लांबी आहे. आणि त्यास वर्तुळाचा परिघ म्हणतात. म्हणुन वर्तुळाच्या एकुण लांबीला वर्तुळाचा परिघ म्हणतात.

## कृती



खालील कृती करु या, एका कागदाच्या शिखर बिंदुची खुण यास केंद्रबिंदु घेऊन कोणत्याही त्रिज्येचे एक वर्तुळ काढा. आता त्रिज्या वाढवुन किंवा कमी करुन अजुन काही वर्तुळे काढा. या कृतीत येणाऱ्या वर्तुळांना तुम्ही काय म्हणता?



एकच केंद्र बिंदु असलेल्या पण वेगवेगळ्या त्रिज्या असणाऱ्या वर्तुळांना एक समकेंद्री वर्तुळं म्हणतात.




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




## हे करा






1. आकृतीत दिलेल्या वर्तुळात कोणते वर्तुळ Aला एकरुप आहे.




2. वर्तुळाची कोणती मापे त्यास एकरुप करते?

एका प्रतलातील वर्तुळ त्या प्रतलास तिन भागात विभागतो. ते (i) अंतरवर्तुळ याला वर्तुळाच्या आंतरभाग सुध्दा म्हणतात. (ii) वर्तुळावर याला परिघ सुध्दा म्हणतात. (iii) वर्तुळाच्या बाहेर याला बाहेरील भाग सुध्दा म्हणतात. वरील आकृतीवरुन आत असलेले आणि वर्तुळावर असलेले बिंदु काढा. वर्तुळ आणि त्याचा आतिल भाग मिळुन वर्तुळाकर प्रांत (क्षेत्र) बनते.




## कृती

एक जाड वर्तुळकाकर शिट(ठाव) घेऊन त्यास अर्धी घडी करुन उघडा आणि पुन्हा त्यास कोणत्याही अर्ध्या वरुन घडी करा आणि उघडा. हिच क्रिया काही वेळा करा. शेवटी जेव्हा तुम्ही उघडता तुम्हाला काय दिसुन येते.


तुम्हाला दिसुन येते की, सर्व घड्या एका बिंदुवर छेदतात. या बिंदुना आपण काय म्हणतो तुम्हाला आठवते का? हे वर्तुळाचे केंद्रबिंदु आहे.

प्रत्येक घडीची केंद्रबिंदुपासुन मोजणी करा तुमच्या लक्षात काय येते? ते सर्व समान असुन प्रत्येक घडी वर्तुळास दोन अर्ध्या भागात वाटणी करते. त्या घडीला वर्तुळाचा व्यास म्हणतात. वर्तुळाचा व्यास त्रिजेच्या दुप्पट असतो. केंद्रबिंदुतुन जाणाऱ्या आणि वर्तुळावर कोणत्याही रितीने केल्यास अर्धाच नाही तर ती घडी दोन्ही बिंदुना वर्तुळावर जोडते. अशा घडयांना वर्तुळाची जिवा म्हणतात.




म्हणुन वर्तुळावर कोणत्याही दोन बिंदुना जोडणाऱ्या रेषाखंडास जिवा असे म्हणतात.

सर्वात मोठ्या जिवेला काय म्हणतात? ती केंद्रबिंदुतुन जाते का?



(i)

आकृतीत पहा.CD, AB आणि PQ या वर्तुळाच्या जिवा आहेत.

आकृती.(i)मध्येA आणि B दोन बिंदु वर्तुळावर आहेत आणि ते वर्तुळाच्या परिघास $\widehat{AB}$ भागात विभागले आहे. वर्तुळावरील दोन बिंदुमधील भागास




Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA


Downloaded from https:// www.studiestoday.com



कंस असे म्हणतात. आकृती (i) मध्ये AB कंस आहे. आणि त्यास ने दर्शवितात. ACB ाचे अंत्य बिंदु व्यासाचे अंत्य बिंदु झाल्यास अशा कंसाला अंधवर्तुळ कंस किंवा अर्धवर्तुळ म्हणतात. आकृती.(ii) मध्ये हा अर्धवर्तुळापेक्षा लहान अस $\widehat{ACB}$ त्या कंसाला लघु कं $\widehat{ADB}$ णे कंस





(ii)




(iii)

अर्धवतुळापक्षा मोठा असल्यास त्या कसाला मोठा कंस म्हणतात. आकृती (iii) मध्ये हा लहान कंस आणि हा विशाल कंस आहे. जर आपण कंसाच्या अंत्यबिंदुना जिवाने जोडल्यास ती जिवा वर्तुळाला दोन भागात विभागणी करते. जिवा आणि लहान कंसामधील क्षेत्राला लघु वर्तुळ खंड म्हणतात. आणि जिवा आणि मोठ्या कंसा मधील क्षेत्राला विशाल वर्तुळ खंड असे म्हणतात. जर जिवा ही व्यास झाल्यास व्यास वर्तुळाला दोन समान खंडात विभागतो.




दोन त्रिजेना आणि कंसाच्या शेवटच्या बिंदुना केंद्रबिंदुवर जोडणाऱ्या आणि कंसाच्या क्षेत्रफळानी मिळुन बनलेल्या भागास व्दैत्रिज्याखंड म्हणतात. एक लहान व्दैत्रिज्याखंड आणि एक मोठा व्दैत्रिज्या खंड( बाजुची आकृती पहा)




## अभ्यास-12.1

1. बाजुच्या आकृतीत दाखविलेल्या 0 वर्तुळाचा केंद्रबिंदु असलेल्या खालील भागांना नावे द्या.

(i) $\overline{AO}$ (ii) $\overline{DCB}$ (iii) $\widehat{ACB}$ / $\widehat{BC}$

(iv) $\overline{AC}$ (v) (vi)

(vii) $\overline{AD}$ (viii) रंगीत भाग




2. सत्य किंवा असत्य सांगा.
   i. प्रतलात असलेले वर्तुळ त्या प्रतलात तिन भागात विभागते. ( )
   ii. लहान कंस आणि जिवाने मिळुन बनलेल्या क्षेत्रास लहान वर्तुळखंड म्हणतात. ( )
   iii. मोठा कंस आणि जिवाने मिळुन बनलेल्या क्षेत्राचा मोठा वर्तुळ खंड म्हणतात. ( )
   iv. व्यास हा वर्तुळास दोन समान भागात विभागतो. ( )
   v. व्दैत्रिज्या खंड हा दोनत्रिजेनी आणि जिवांनी बनलेले क्षेत्रफळ आहे. ( )
   vi. वर्तुळाच्या सर्वात मोठ्या जिवेला व्यास म्हणतात. ( )




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




vii. वर्तुळाच्या कोणत्याही व्यासाच्या मध्यबिंदुला केंद्रबिंदु म्हणतात. ( )

## 12.2 वर्तुळाच्या एका बिंदुवर जिवाने बनवलेला कोन





समजा A, B हे 'O'.केंद्रबिंदुवर काढलेले वर्तुळावरील दोन बिंदु आहेत. AO आणि BOजोडा. $\overline{AO}$ आणि $\overline{BO}$ नी केंद्राशी केलेला कोन म्हणजे $\angle AOB$ ला $\overline{AB}$ जिवाने'O' केंद्राशी केलेला कोन म्हणतात.

आकृतीमधील $\angle POQ$, $\angle PSQ$ आणि $\angle PRQ$ कोनांना तुम्ही काय म्हणता?




i. $\angle POQ$ हा PQ जिवाने 'O' केंद्राशी केलेला कोन आहे.

ii. $\angle PSQ$ आणि $\angle PRQ$ हे अनुक्रमे PQ जिवाने S आणि R लघु अणि विशाल कंसावरील केलेले कोन आहेत.




आकृती मध्ये O हे वर्तुळाचा केद्रबिंदु आणि AB, CD, EF आणि GH या वर्तुळाची जिवा आहेत.


वरील आकृतीवरुन GH > EF > CD > AB.

आता या जिवेने केंद्राशी केलेल्या कोनाबद्दल काय म्हणु शकतो?

आकृत्या पाहुन तुम्ही काय निरिक्षण केले. कोनाचे निरिक्षण केल्यास तुम्हाला दिसुन यते की जिवेने वर्तुळाचा केंद्राशी केलेला कोन जिवेची लांबी वाढवते.

आता आपण दोन वर्तुळाच्या जिवा घेतल्या असता वर्तुळाच्या केंद्राशी केलेल्या कोनांचे काय होते?

'O' केंद्रबिंदु घेऊन वर्तुळाची रचना करा आणि ABआणि CD समान जिवा वृत्तलेखणीच्या साहाय्याने आणि मोजपट्टीने काढा.




केंद्रबिंदु 'O' ला A, B आणि C, D शी जोडा आता$\angle AOB$ आणि $\angle COD$ मोजा. ते एकमेकास समान आहे का? वर्तुळावर दोन किंवा त्यापेक्षा जास्त समान जिवा काढा. त्यांनी केंद्राशी केलेले कोन मोजुन पहा.

तुम्हास दिसुन येते की, त्यांनी केंद्राशी केलेले कोन समान असतात.

याची सिध्दता करण्याचा प्रयत्न करु.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




**प्रमेय-12.1 :** वर्तुळाच्या समान जिवा. वर्तुळ केद्रांशी समान कोन असतात.

सिध्दता: समजा 'O' हा वर्तुळाचा केंद्रबिंदु आहे. $\overline{AB}$ आणि $\overline{CD}$ या दोन समान जिवा आणि वर्तुळाच्या केंद्रबिंदुशी त्या जिवानी केलेले कोन $\angle AOB$ आणि $\angle COD$ आहेत.

**सिध्दता :** $\angle AOB \cong \angle COD$

**रचना** : वर्तुळाच्या केंद्राला जिवेच्या अंत्य बिंदुना मिळविले तेव्हा $\Delta AOB$ आणि $\Delta COD$ तयार होतात.

**सिध्दः** AOB आणि COD मध्ये




AB = CD ( दिले आहे)

OA = OC (सारख्या वर्तुळाची त्रिज्या)

OB = OD (सारख्या वर्तुळाची त्रिज्या)


म्हणुन $\Delta AOB \cong \Delta COD$ (बा.बा.बा.नियम)

अशारीतीने $\angle AOB \cong \angle COD$ (एकरुप त्रिकोणाचे संगत भाग)

वरील प्रमेयावरुन एका वर्तुळातील दोन जिवाने केंद्राशी केलेले कोन समान असते. त्या जिवांबद्दल तुम्ही काय म्हणु शकता? या विषयाची तपासणी खालील कृतीने करु या.

## कृती

एक वर्तुळाकार कागद घ्या. कोणत्याही व्यासावरुन त्याची अशी घडी करा की, त्याच्या कडा एकमेकांस तंतोतंत मिळल्या पाहिजेत. आता त्या घडीला उघडे करा आणि दुसऱ्या व्यास घेऊन पुन्हा त्याची घडी करा. उघडल्यानंतर माहित पडते. की दोन्ही व्यास केंद्रबिंदु 0 वर मिळतात. तेथे उभ्या विरुध्द कोनाच्या समान जोड्या तयार होतात. व्यासाच्या अंतिम बिंदुस A, B, C आणि D नावे द्या.




$\overline{AC}$, $\overline{BC}$, $\overline{BD}$ आणि $\overline{AD}$ जिवा.

काढा आता चार वृत्तखंड1, 2, 3 आणि 4 कातरा जर तुम्ही या वृत्तखंडाच्या जोंडीस एकमेकांवर ठेवल्यास (1,3) आणि(2,4) जोडीच्या कडा एकमेकांवर तंतोतंत मिळतात.

$\overline{AD} = \overline{BC}$ आणि $\overline{AC} = \overline{BD}$ आहे का?

एका प्रत्येक संदर्भात वरील गुणधर्माचे निरिक्षण केले यास विषयास वेगवेगळी मापे असलेल्या कोनाला घेऊन जिवा समान होतात हे दाखविल्यास खालील सिध्दतांव्दारे पाहु शकता.




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



तुम्ही (12.1) या सिध्दतांचा व्यत्यास सांगु शकता का?

**प्रमेय-12.2 :** एका वर्तुळातील जिवा केंद्रावर करणारे कोन समान असल्यास त्या जिवा समान असतात.




हा वरील सिंध्दातास व्यत्यास आहे.

12.1 सिध्दांत $\angle PQR = \angle MQN$, तर


$\Delta PQR \cong \Delta MQN$ (का?)


$PR = MN$ होते का? (पडताळ करा)

## अभ्यास - 12.2




1. आकृती जर $AB = CD$ आणि $\angle AOB = 90^0$ तर $\angle COD$ काढा.




2. आकृती मध्ये, $PQ = RS$ आणि $\angle ORS = 48^0$.


तर $\angle OPQ$ आणि $\angle ROS$ काढा.




3. आकृतीत PR आणि QS हे दोन व्यास आहेत $PQ = RS$ आहे का?

## 12.3 वर्तुळाच्या केंद्रावरुन जिवेवर काढलेला लंब

- O केंद्रबिंदुवरन एक वर्तुळ काढा. $\overline{AB}$ जिवा काढा अणि केंद्रबिंदु 0 वरुन $\overline{AB}$ जिवे वर एक लंब काढा.
- $\overline{AB}$ जिवा आणि लंब यांचा छेदन बिंदु P.समजा.
- PA आणि PB मोजल्यानंतर आपणास $PA = PB$ येते.




**प्रमेय-12.3 :** वर्तुळाच्या केंद्रावरुन जिवावर काढलेले लंब

O ला A आणि B बिंदुशी जोडण्याव्दारे सिध्दता लिहिण्यासाठी प्रयत्न करा. आणि $\Delta OPA \cong \Delta OPB$ हे सिध्द करा.

12.3 या प्रमेयाचा व्यत्यास काय आहे?

" जर वर्तुळाच्या केंद्रावरुन काढलेली रेषा जिवास दुभागल्यास ती जिवास लंब राहते."




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



**कृती**


एक वर्तुळाकार कागद घेऊन त्यावर 'O' केंद्रबिंदुची खुण करा.




त्या कागदास दोन असमान भागात घडी करा. आणि उघडा पडलेली घडी AB जिवा दर्शविते आणि 'A' हा B शी तंतोतंत जुळला पाहिजे. या दोन्ही घडीच्या छेदन बिंदुस D नाव द्या. AD = DBआहे काय? $\angle ODA$ = ? $\angle ODB$ = ? त्या घडीतील कोनांचे मापन करा. ते काटकोन आहेत. म्हणुन आपण अनुमान काढु शकतो की, वर्तुळाच्या केंद्रबिंदुवरुन काढलेली रेषा वर्तुळाच्या जीवेला दुभागते. आणि ती जिवेस लंब राहते.


**प्रयत्न करा**

वर्तुळात 'O'हा केंद्रबिंदु $\overline{AB}$ हा जिवा आणि 'M' हा त्याचा मध्यबिंदु आहे. आता सिध्द करा कि $\overline{OM}$ हा AB ला लंब आहे. (**सुचना** : OA आणि OB ला जोडुन OAM आणि OBM ची तुलना करा)





### 12.3.1 तीन बिंदुवरुन वर्तुळाचे वर्णन करणे


समजा 'O'हा प्रतलातील एक बिंदु आहे. 0 केंद्रबिंदुंवरुन आपण किती वर्तुळ काढु शकतो. आपण पाहिजे तेवढी वर्तुळ काढु शकतो. आपण आधीच शिकलो की या वर्तुळांना समकेंद्रीय वर्तुळ म्हणतात. जर 'P'हा वर्तुळावरील केंद्राखेरीज दुसरा बिंदु असल्यास त्या P बिंदुवरुन सुध्दा आपण अनेक वर्तुळे काढता येतात.




समजा P आणि Q हे दोन विभीन्न बिंदु आहेत. या दोन बिंदुतुन जाणारी किती वर्तुळ काढता येतात? आपणास दिसुन येते की, **P** आणि **Q** बिंदुवरुन अनेक वर्तुळ काढता येतात.




P,आणि Q जोडा PQ वर लंबदुभाजक काढा. लंब दुभाजकावर कोणतेही तिन बिंदु R, $R_1$ आणि $R_2$ काढा आणि R, $R_1$आणि केंद्रंबिदुवरुन RP, $R_1$P आणि $R_2$P त्रिज्येची वर्तुळ काढा. ही वर्तुळे Q बिंदुपासुन सुध्दा जातात का? (का?)





जर तीन नैकरेषीय बिंदु दिले असता. त्यापासुन किती वर्तुळे काढता येतात? यांचे निरिक्षण करु. कोणतेही तीन नैकरेषीय बिंदु A, B, C घ्या आणि AB आणि BC जोडा,



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com







$\overline{AB}$ आणि $\overline{BC}$ चे लंब दुभाजक अनुक्रमे $\overleftrightarrow{PQ}$ आणि $\overleftrightarrow{RS}$ काढा. दोन्ही एका ठिकाणी 'O' बिंदुत छेदतात. (कारण कोणत्याही दोन रेषांना एक पेक्षा जास्त सामाईक बिंदु नसतो.)

O बिंदु $\overline{AB}$ च्या लंब दुभाजकावर आहे. म्हणुन OA = OB. .....(i)

$\overleftrightarrow{PQ}$ वरील प्रत्येक बिंदु A आणि B पासुन समान अंतरावर आहे.




म्हणुन 'O'हा $\overline{BC}$ च्या लंबदुभाजकावर आहे.

म्हणुन OB = OC ..... (ii)

समीकरण (i) आणि (ii) वरुन

आपण म्हणु शकतो की, OA = OB = OC (संक्रामक गुणधर्म)

म्हणुन A, B आणि C पासुन समान अंतररावर असलेला फक्त एकच बिंदु 0 आहे. म्हणुन जर OA त्रिजेचा 0 केंद्रबिंदुवरुन काढलेला वर्तुळ B आणि C बिंदुतुन सुध्दा जातो. म्हणजे A, B आणि C मधुन जाणारे वर्तुळ फक्त एकच आहे.

वरील निरिक्षणाच्या अनुमानावरुन तिन नैकरेषीय जाणारे वर्तुळ फक्त एकच आहे.


सुचना: जर AC, जोडल्यासABC तयार होतो. त्याचे सर्व शिरोबिंदु वर्तुळावर असतात. यावर्तुळास त्रिकोणाचे परिवर्तुळ म्हणतात. आणि केंद्रबिंदु 0 ला परिवर्तुळ केंद्र म्हणतात. आणि त्रिज्या OA किंवा OB किंवा OC ला परिवर्तुळ त्रिज्या म्हणतात.

**प्रयत्न करा.**



जर तिन बिंदु एकरेषीय आहेत. तर या तिन बिंदुतुन जाणारे किती वर्तुळ काढता येतात? या तीन बिंदुतुन जाणाऱ्या वर्तुळास काढण्याचा प्रयत्न करु.

उदाहरण-1: AB = 5 से.मी. $\angle B = 75^0$ आणि BC = 7 से.मी. ABC चे परिवर्तुळ काढा.




सोडवणुक: AB= 5 से.मी.लांबीचा एक रेषाखंड काढा.BX ला B बिंदुवर $\angle B = 75^0$ येतील असे काढा. B केंद्रवरुन 7 से.मी. त्रिजेचा एक चाप काढा. तो $\overrightarrow{BX}$ ला C बिंदुतुन छेदतो. CA ला जोडल्यास $\Delta ABC$ तयार होतो. $\overline{AB}$ आणि $\overline{BC}$ चे लंब दुभाजक अनुक्रमे $\overleftrightarrow{PQ}$ आणि $\overleftrightarrow{RS}$ काढा. $\overleftrightarrow{PQ}$, $\overleftrightarrow{RS}$ 'O'बिंदुवर छेदतात. 'O' केंद्रावरुन OA त्रिजेचे एक वर्तुळ काढा. हे वर्तुळ B आणि C मधुन सुध्दा जाते. आणि येणारे परिवर्तुळ हेच आहे.

### 12.3.2 वर्तुळाच्या केंद्रबिंदुपासुन जिवा मधील अंतर

वर्तुळास अनेक जिवा असतात. आपण वर्तुळात एकाच लांबीच्या अनेक जिवा काढल्यास केंद्रापासुन समान लांबीने काढलेल्या जिवा मधील अंतर काय आहे. याची तपासणी करा.



SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com



## कृती



एका कागदावर मोठे वर्तुळ काढुन त्यास कातरा. त्याच्या केंद्रबिंदुस 0 नाव द्या.त्यास अर्ध्यातुन घडी करा. आता अर्धवर्तुळाजवळ दुसरी घडी करा. आता घडी उघडा आपणास दोन एकरुप जिवाच्या घड्या येतात. त्यास AB त्यास CD अशी नावे द्या. त्यासाठी 'O' केंद्रावरुन जाणारी लंब घडी करा. डिवायडरच्या साहाय्याने केंद्रबिंदुपासुन या जिवामधील अंतराची तुलना करा.





हीच कृती एकरुप जिवांना घडी करुन पुन्हा करा. तुमच्या निरिक्षणाचा अनुमान सांगा. वर्तुळातील एकरुप जिवा वर्तुळाच्या केंद्रबिदुंपासुन समान अंतरावर असतात.

## प्रयत्न करा




आकृतीमध्ये O हा वर्तुळाचे केंद्रबिंदु आहे आणि AB = CD. OM हा $\overline{AB}$ वर लंब आहे आणि $\overline{ON}$ हा $\overline{CD}$ वर लंब आहे. तर सिध्द करा. OM = ON.




वरील अनुमानास तार्कीकपणे दाखविल्यास समान लांबीच्या जिवा वर्तुळाच्या केंद्रबिदुवरुन समान अंतरावर असतात. हे प्रमेय होते.

उदाहरण-2: आकृतीत O हा वर्तुळाचा केंद्रबिंदु आहे. जर AB = 5 से.मी. असल्यास CD ची लांबी माहित करा.




सोडवणुक: $\Delta$ AOB आणि $\Delta$ COD मध्ये

OA = OC (का ?)

OB = OD (का ?)


$\angle$AOB = $\angle$COD

$\therefore$ $\Delta$ AOB $\cong$ $\Delta$ COD

$\because$ AB = CD ( एकरुप त्रिकोणाचे एकरुप भाग)

$\therefore$ AB = 5 से.मी. तर CD = 5 से.मी.

उदाहरण-3: बाजुच्या आकृतीत 'O'केंद्रबिंदु असलेली दोन समकेंद्रीय वर्तुळे आहेत. मोठ्या वर्तुळातील AD जिवा लहान वर्तुळातील B आणि C बिंदुवर छेदते. दाखवा की, AB = CD.




दिलेली माहिती:केंद्रबिंदु 'O'असलेल्या समकेंद्रीय वर्तुळात $\overline{AD}$ ही मोठ्या वर्तुळातील जिवा आहे. $\overline{AD}$ जिवा लहान वर्तुळातील B आणि C वर छेदते.



Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com



सिध्दतेसाठी आवश्यक :. : AB = CD

रचना: $\overline{AD}$ ला लंब $\overline{OE}$ काढा.

सिध्दता : 0 केंद्रबिंदु असलेल्या मोठ्या वर्तुळाची AD जिवा आहे आणि $\overline{OE}$ हा $\overline{AD}$ ला लंब आहे

$\because$ $\overline{OE}$ हा $\overline{AD}$ ला दुभागते( केंद्रापासुन जिवा वर काढलेला लंब जिवाला दुभागते)

$\therefore$ AE = ED ..... (i)

0 केंद्रबिंदु असलेल्या लहान वर्तुळाची जिवा $\overline{BC}$ आहे आणि $\overline{OE}$ हाAD ला लंब आहे

$\because$ $\overline{OE}$ हा $\overline{BC}$ ला दुभागते (वरील प्रमेयावरुन)



$\therefore$ BE = CE ..... (ii)

समीकरण (ii) मधुन (i)वजा केल्यास


AE - BE = ED - EC

AB = CD


## अभ्यास - 12.3



1. खालील त्रिकोण काढुन त्यासाठी परिवर्तुळाची रचना करा.
   (i) $\Delta$ ABC मध्ये AB = 6से.मी., BC = 7से.मी.आणि $\angle A = 60^\circ$
   (ii) $\Delta$ PQR मध्ये PQ = 5से.मी., QR = 6से.मी.आणि RP = 8.2से.मी.
   (iii) $\Delta$ XYZ मध्ये XY = 4.8से.मी. $\angle X = 60^\circ$ आणि $\angle Y = 70^\circ$
2. AB = 5.4 से.मी. काढुन A, B मधुन जाणारे दोन वर्तुळ काढा.
3. जर दोन वर्तुळ दोन बिंदुवर छेंदत असल्यास सिध्द करा की, त्याचा केंद्रबिंदु सामाईक जिवाच्या लंबदुभाजकावर असतो.




4. एका वर्तुळात छेदणाऱ्या दोन जिवा त्याच्या छेदन बिंदु व्दारे जाणाऱ्या व्यासा सोबत समान कोन केले असता त्या जिवाची लांबी समान असते हे सिध्द करा.
5. बाजुच्या आकृतीत 0 केंद्रबिंदु असणाऱ्या वर्तुळाची AB जिवा आहे. CD हा व्यास ABला लंब आहे. तर AD = BD दाखवा.







Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




## 12.4 वर्तुळ कंसाने बनविलेला कोन



(i)

आकृती(i) मध्ये $\overline{AB}$ ही जिवा आहे आणि $\overset{\frown}{AB}$ वर्तुळ कंस आहे लघु कंस जिवा आणि वर्तुळकंसाचे अंत्यबिंदु सारखे आहे. ते A आणि B आहेत.

म्हणुन जिवाने केंद्रबिंदु 0 शी केलेला कोन वर्तुळ कंसाने 0 केंद्राशी केलेला कोन सारखा आहे.



(ii)


आकृती (ii) मध्ये केंद्रबिंदु 0 असलेल्या वर्तुळाचे $\overline{AB}$ आणि $\overline{CD}$ दोन जिवा आहेत. जर AB = CD तर $\angle AOB = \angle COD$ म्हणुन आपण म्हणु शकतो की, वर्तुळकंस $\overset{\frown}{AD}$ ने केलेला कोन हा जिवाने केंद्रबिंदु 'O'शी केलेल्या कोना समान आहे.
( $\Delta \overset{\frown}{CD}B \cong \Delta DOC$ सिध्द झाले )

वरील निरिक्षणावरुन समान लांबीच्या वर्तुळ कंसानी केंद्राशी केलेले कोन समान असतात.


### 12.4.1 एका वर्तुळ कंसाने वर्तुळाच्या उरलेल्या भागावरील बिंदुवर केलेला कोन

'O' केंद्रबिंदु असलेला वर्तुळ घ्या.

आकृती (1) मध्ये समजा $\overset{\frown}{PQ}$ हा लघुकंस, आकृती (ii) मध्ये अर्धवर्तुळ आणि आकृती (iii) मोठा कंस आहेत. परिघावर R हा कोणताही बिंदु घ्या. R ला P आणि Q शी जोडा.




(i)



(ii)

वर्तुळावर R बिंदुशी PQ कंसाने केलेला कोन $\angle PRQ$आहे. जो केंद्राशी केलेला कोन $\angle POQ$ आहे.

दिलेल्या आकृतीवरुन खालील तक्तापुर्ण करा.



(iii)

| कोन | आ. (i) | आ. (ii) | आ. (iii) |
|---|---|---|---|
| $\angle PRQ$ | | | |
| $\angle POQ$ | | | |

अशा रितीने वर्तुळाच्या वर्तुळ कंसाने त्याच्या परिघावर आणि केंद्रबिंदुशी केलेले कोन आणि काही वर्तुळे काढा. तुम्हाला काय दिसुन येते? वर्तुळावर एका बिंदुवर आणि केंद्राबिंदुशी वर्तुळ कंसाने केलेल्या कोनाचा तुम्ही काय अनुमान लावता?

**प्रमेय :** केंद्र बिंदु 0 शी कसांने केलेला कोन हा त्या वर्तुळाच्या कंसाने उरलेल्या भागावर केलेल्या कोनाच्या दुप्पट असतो. म्हणुन वरील निरिक्षणावरुन आपण म्हणु शकतो की केंद्रबिंदु 0 शी कंसाने केलेला कोन हा त्या वर्तुळाच्या कंसाने उरलेल्या भागावर केलेल्या कोनाच्या दुप्पट असते.




SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



या अनुमानाला तार्किकतेने सिध्द करा.




दिलेली माहिती: वर्तुळाचे केंद्र 0 आहे.

$\widehat{PQ}$ कंसाने केंद्राशी केलेला कोन $\angle POQ$ आहे.

समजा R हा बिंदु वर्तुळाच्या उरलेल्या भागावर आहे. ( $\widehat{PQ}$ वर नाही)

सिध्दता: येथे आपणास (i) $\widehat{PQ}$ हा लघुकंस (ii) $\widehat{PQ}$ हे अर्धवर्तुळ आणि (iii) $\widehat{PQ}$ हा विशाला कंस असे तिन संदर्भ आहेत.

R बिंदुला केंद्रबिंदु 'O' शी मिळवुन त्यास S पर्यंत वाढवा. (सर्व संदर्भात)

सर्व संदर्भात $\Delta$ ROP मध्ये

RO = OP (सारखा त्रिज्येची वर्तुळ)

म्हणुन $\angle ORP = \angle OPR$ (समव्दिभुज त्रिकोणाच्या समान बाजुचे विरुध्द कोन समान असतात.)

$\angle POS$ हा $\Delta$ ROP चा बाहेरील कोन आहे (रचना)

$\angle POS = \angle ORP + \angle OPR$ or 2 $\angle ORP$ ..... (1)

($\because$ बाह्यकोन= आतिल कोनांची बेरीज)

अशारितीने $\Delta$ROQसाठी

$\angle SOQ = \angle ORQ + \angle OQR$ किंवा 2 $\angle ORQ$...(2)

($\because$ बाहेरील कोन हा आतिल विरुध्द कोनाच्या बेरजेला समान असते.)

(1) आणि (2) वरुन

$\angle POS + \angle SOQ = 2 (\angle ORP + \angle ORQ)$

यासारखेच $\angle POQ = 2 \angle QRP$ ..... (3)

> सुलभतेसाठी
> समजा $\angle ORP = \angle OPR = x$
> $\angle POS = \angle 1$
> $\angle 1 = x + x = 2x$
> समजा $\angle ORQ = \angle OQR = y$
> $\angle SOQ = \angle 2$
> $\angle 2 = y + y = 2y$
> आता $\angle POQ = \angle 1 + \angle 2 = 2x + 2y$
> $= 2 (x+y) = 2 (\angle PRO + \angle ORQ)$
> म्हणजेच $\angle POQ = 2 \angle PRQ$



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




म्हणुन एका कंसाने वर्तुळाच्या केंद्राशी केलेला कोन उरलेल्या वर्तुळाच्या कोणत्याही बिंदुवर त्या कंसाने केलेल्या कोनाच्या दुप्पट असते. हे प्रमेय येते

उदाहरण-4: समजा'O'हा वर्तुळाचा केंद्र आहे. PQ हा व्यास आहे तर सिध्द करा $\angle PRQ = 90^o$

किंवा

सिध्द करा अर्धवर्तुळातील कोन काटकोन असतो




सोडवणुक: 0 केंद्रबिंदु असलेल्या वर्तुळाचा व्यास PQ आहे


$\therefore\ \angle POQ = 180^o$ [सरळ रेषेवरील कोन]

आणि $\angle POQ = 2\ \angle PRQ$

[कंसाने केंद्राशी केलेली कोन हा वर्तुळाच्या कोणत्याही बिंदुवर केलेल्या कोनाच्या दुप्पट असते]

$\therefore \angle PRQ = \dfrac{180^o}{2} = 90^o$

उदाहरण-5: बाजुच्या आकृतीत $x^\circ$ ची किंमत काढा.




सोडवणुक: दिले आहे. $\angle ACB = 40^\circ$

$\angle AOB = 2\ \angle ACB = 2 \times 40^\circ = 80^\circ$


$\because\ x^\circ + \angle AOB = 360^\circ$

म्हणुन $x^\circ = 360^\circ - 80^\circ = 280^\circ$

### 12.4.2 एकाच वर्तुळ खंडातील कोन

आपण एकाच कंसाने एकाच वृत्तखंडात केलेल्या कोनाचे मापाबद्दल चर्चा करु.

'O' केंद्रबिंदु असलेला वर्तुळ आणि लघुकंस AB घ्या (आकृती पहा) समजा P, Q, R आणि S हे AB विशाल कंसावरील बिंदु आहेत. म्हणजे वर्तुळाच्या उरलेल्या भागावरील बिंदु आहेत. आता AB कंसाच्या अंत्य बिंदुना P, Q, R आणि S शी जोडल्यास $\angle APB, \angle AQB, \angle ARB$ आणि $\angle ASB$ तयार होतात.




$\because\ \angle AOB = 2\angle APB$ (का?)

$\angle AOB = 2\angle AQB$ (का?)

$\angle AOB = 2\angle ARB$ (का?)

$\angle AOB = 2\angle ASB$ (का?)

म्हणुन $\angle APB = \angle AQB = \angle ARB = \angle ASB$

कंसाने एकाच वर्तुळ खंडात केलेला कोन समान आहेत याचे निरिक्षण करा



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



सुचना: वरील चर्चेवरुन आपणास दिसुन येते की, P, Q, R, S आणि A, B बिंदु एकाच वर्तुळात असतात. त्यास तुम्ही काय म्हणता? एकाच वर्तुळात असलेल्या बिंदुना चक्रीय बिंदु म्हणतात.

वरील प्रमेयाचा व्यत्यास खालील प्रमाणे सांगु शकतो.

प्रमेय:12.4: दोन बिंदुना जोडणारा रेषाखंड कोणतेही दोन इतर बिंदुवर केलेल्या कोन रेषेच्या एकाच बाजुवर असतात. तर हे चार बिंदु वर्तुळावर असतात.( ते चक्रीय बिंदु )

याची सत्यता खाली पाहु शकता.


दिलेली माहिती: $\angle ACB$ आणि $\angle ADB$ हे दोन कोन A आणि B बिंदुला जोडणारा रेषाखंड $\overline{AB}$ च्या एकाच बाजुवर असतात आणि ते समान असतात.

सिध्दता: A, B, C आणि D हे चक्रीय बिंदु एकाच वर्तुळावर असतात.

रचना: A, B आणि C या नैकरेषीय बिंदुतुन जाणारे वर्तुळ काढा.

समजा 'D' बिंदु वर्तुळावर नाही.

इतर बिंदु 'E' आहे जो AD ( AD ला वाढविल्यास )




जर A, B, C आणि E बिंदु वर्तुळावर असल्यास

$\angle ACB = \angle AEB$ (का?)

परंतु माहिती नुसार $\angle ACB = \angle ADB$.

म्हणुन $\angle AEB = \angle ADB$


E हा D शी तंतोतंत जुळल्याशिवाय हे शक्य नाही (का?)


## अभ्यास- 12.4



1. आकृतीत 'O' हा वर्तुळाचा केंद्रबिंदु आहे.

$\angle AOB = 100^\circ$ तर $\angle ADB$ काढा.




2. आकृतीमध्ये $\angle BAD = 40^\circ$ तर $\angle BCD$ काढा.




Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com



3. आकृतीत O हा वर्तुळाचा केंद्रबिंदु आहे आणि $\angle POR = 120^\circ$. $\angle PQR$ आणि $\angle PSR$ काढा.






4. जर समांतरभुज चौकोन चक्रीय असेल तर तो आयत होतो. सिध्द करा




5. आकृतीमध्ये 'O' हा वर्तुळाचा केंद्रबिंदु आहे. . OM = 3से.मी. आणि AB = 8 से.मी. वर्तुळाची त्रिज्या काढा.

6. आकृतीत 'O'हा वर्तुळाचा केंद्रबिंदु आहे आणि OM, ON केंद्रापासुन जिवा PQ आणि RS.वर कढलेले लंब आहेत जर OM = ON आणि PQ = 6 से.मी. तरRS काढा.






7. A हा वर्तुळाचा केंद्रबिंदु आहे आणि ABCD चौरस आहे जर BD = 4 से.मी.तर वर्तुळाची त्रिज्या माहित करा.

8. कोणतीही त्रिज्या घेऊन वर्तुळ काढा आणि त्याच्या केंद्रबिंदुपासुन समान अंतरावर दोन जिवा काढा.

9. दिलेल्या आकृतीत 'O' हा वर्तुळाचा केंद्रबिंदु आहे आणि AB, CD या दोन समान जिवा आहेत जर $\angle AOB = 70^\circ$ तर $\Delta OCD$चे कोन माहित करा.




## 12.5 चक्रीय चर्तुभुज





दिलेल्या आकृतीत A, B, C आणि D एकाच वर्तुळावर आहे. अशा प्रकारच्या चर्तुभुज ABCD हा चक्रीय चर्तुभुज म्हणतात.

### कृती



एक वर्तुळाकार कागद घ्या. ज्या वर्तुळाकार कागदावार A, B, C आणि D या चार बिंदुच्या खुणा करा. चक्रीय चर्तुभुज ABCD काढा आणि त्यांचे कोन मोजुन तक्त्यात त्याची नोंद करा.ही कृती तीन किंवा जास्त वेळा करा.






SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com



| क्र.स. | ∠A | ∠B | ∠C | ∠D | ∠A+∠C | ∠B+∠D |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | |
| 2 | | | | | | |
| 3 | | | | | | |
| 4 | | | | | | |

या तक्त्यावरुन तुम्ही काय अनुमान काढता ?

**प्रमेय-12.5 :** " चक्रीय चर्तुभुजाच्या विरुध्द कोनाच्या जोड्या संपुरक असतात.".




दिलेली माहिती: ABCD सक्रीय चर्तुभुज आहे.

सिध्दतेसाठी : $\angle A + \angle C = 180°$

$\angle B + \angle D = 180°$

पध्दती : $\angle D = \frac{1}{2} \angle y$ (का ?) ..... (i)

$\angle B = \frac{1}{2} \angle x$ (का ?) ..... (ii)

(i) आणि (ii) ची बेरीज केल्यास



$\angle D + \angle B = \frac{1}{2} \angle y + \frac{1}{2} \angle x$


$\angle D + \angle B = \frac{1}{2} (\angle y + \angle x)$

$\angle B + \angle D = \frac{1}{2} \times 360°$

$\angle B + \angle D = 180°$

अशारितीने $\angle A + \angle C = 180°$

उदाहरण-6: आकृतीत $\angle A = 120^{\circ}$ तर $\angle C$ काढा ?




सोडवणुक: ABCD हा सक्रीय चक्रीय चर्तुभुज आहे.

म्हणुन $\angle A + \angle C = 180^{\circ}$

$120^{0} + \angle C = 180^{\circ}$

म्हणुन $\angle C = 180^{\circ} - 120^{\circ} = 60^{\circ}$



Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com




वरील प्रमेयाचा व्यत्यास काय आहे?

“जर चक्रीय चर्तुभुज विरुध्द कोनांच्या जोडीची बेरीज $180^0$ असल्यास तर तो चक्रीय होतो.”.

याचा व्यत्यास सुध्दा खरा आहे.

**प्रमेय-12.6 :** जर चक्रीय चर्तुभुजात त्याच्या व कोणत्याही विरुध्द कोनांच्या जोडीची बेरीज 1800 असेल तर तो चक्रीय होतो.




दिले आहे: समजा ABCD हा चक्रीय चर्तुभुजात

$\angle ABC + \angle ADC = 180^o$

$\angle DAB + \angle BCD = 180^o$

सिध्दता : ABCD हा चक्रीय चर्तुभुज आहे.

रचना: A, B, आणि C या तिन नैकरेषीय बिंदुतुन एक वर्तुळ काढा जर ते D बिंदुमधुन गेल्यास प्रमेय सिध्द होते. कारण A, B, C आणि D हे चक्रीय बिंदु आहेत. जर वर्तुळ D बिंदुतुन जात नसल्यास ते $\overline{CD}$ ला (आकृती(i)) किंवा वाढविलेल्या $\overline{CD}$ ला [आकृती (ii)] E वर छेदतात. $\overline{AE}$ काढा.

**सिध्दता** : ABCE हा चक्रीय चर्तुभुज आहे (रचना)

$\angle AEC + \angle ABC = 180^o$ [चक्रीय चर्तुभुजाच्या विरुध्द कोनांची बेरीज]

But $\angle ABC + \angle ADC = 180^o$ दिले आहे

$\therefore \angle AEC + \angle ABC = \angle ABC + \angle ADC \Rightarrow \angle AEC = \angle ADC$

यापैकी एक $\Delta ADE$ चा बाह्य कोन आहे आणि इतर आतिल विरुध्द कोन आहे.

त्रिकोणाचे बाहेरील कोन आतिल इतर विरुध्द कोनापेक्षा नेहमी मोठे असते.

$\therefore \angle AEC = \angle ADC$ ही विरुध्द आहे.

म्हणजे A, B आणि C बिंदुतुन जाणारे वर्तुळ D बिंदुतुन जात नाही. ही आपली कल्पना चुकीची ठरते

$\therefore$ A, B, C बिंदुतुन जाणारे वर्तुळ D बिंदुतुन सुध्दा जाते.

$\therefore$ A, B, C आणि D चक्रीय बिंदु आहेत आणि म्हणुन ABCD हा चक्रीय चर्तुभुज होतो.

उदाहरण-7: आकृतीत $\overline{AB}$ हा वर्तुळाचा व्यास आहे. $\overline{CD}$ ही जिवा आहे ती वर्तुळाच्या त्रिजेला समान आहे. $\overline{AC}$ आणि $\overline{BD}$ ला वाढविल्यास E वर छेदतात तर सिध्द करा $\angle AEB = 60°$.

सोडवणुक: OC, OD आणि BC जोडा


त्रिकोण ODC हा समभुज त्रिकोण आहे (का?)



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com






म्हणुन $\angle COD = 60°$

आता $\angle CBD = \frac{1}{2} \angle COD$ (का ?)

दिले आहे $\angle CBD = 30°$

पुन्हा $\angle ACB = 90°$ (का ?)


म्हणुन $\angle BCE = 180° - \angle ACB = 90°$

यावरून $\angle CEB = 90° - 30° = 60°$, i.e. $\angle AEB = 60°$

## अभ्यास- 12.5



1. खालील दिलेल्या आकृती वरुन x आणि y ची किंमत काढा.




2. ABCD चर्तुभुजाचे शिरोबिंदु A, B, C हे वर्तुळावर आहेत.

   $\angle A + \angle C = 180°$ तर D शिरोबिंदु सुध्दा वर्तुळावर याच वर्तुळावर असते हे सिध्द करा.

3. सिध्द करा चक्रीय समलंब चौकोन हा चौरस आहे.

4. खालील प्रत्येकासाठी वर्तुळ काढुन दिलेल्या आकृत्या त्याच्या आंतरभागात घ्या. अशा प्रकारच्या बहुभुजीला आंतर भागात घेणे संभव नाही.

   (a) आयत

   (b) समलंब चौकोन

   (c) विशाल कोन त्रिकोण

   (d) आयत नसणारा समांतर चर्तुभुज

   (e) लघुकोन समव्दिभुज त्रिकोण

   (f) $\overline{PR}$ व्यास असलेला PQRS चर्तुभुज



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



## आपण काय चर्चा केली?



- एका प्रतलातील स्थिर बिंदुपासुन स्थिर अंतरावर असलेल्या बिंदुच्या संचाला वर्तुळ असे म्हणतात. त्या स्थिर बिंदुला केंद्रबिंदु अणि स्थिर अंतरास वर्तुळाची त्रिज्या असे म्हणतात.
- कोणत्याही दोन बिंदुना वर्तुळात जोडणाऱ्या रेषाखंडाला जिवा म्हणतात.
- केंद्रबिंदुतुन जाणाऱ्या सर्वात मोठ्या जिवेला वर्तुळाचा व्यास म्हणतात.
- एकाच त्रिजेच्या वर्तुळास एकरुप वर्तुळ असे म्हणतात.
- भिन्न त्रिज्या आणि सारखी सारखे केंद्रबिंदु असलेल्या वर्तुळास एक केंद्रीय वर्तुळे म्हणतात
- वर्तुळाचा व्यास त्यास दोन अर्धवर्तुळात विभागतो.
- वर्तुळाच्या कोणत्याही दोन बिंदुमधील भागास वर्तुळकंस म्हणतात.
- जिवा आणि वर्तुळकंसाच्या आतिल क्षेत्रफळास वर्तुळ खंड म्हणतात. जर कंस लघु कंस असल्यास त्यास विशाल वर्तुळखंड असे म्हणतात.
- कंसाच्या आतिल क्षेत्रफळ आणि दोन त्रिजेच्या कंसाच्या अंत्य बिंदुना केंद्राशी जोडणाऱ्या क्षेत्र म्हणतात.
- वर्तुळाच्या समान जिवा वर्तुळाच्या केंद्राशी समान कोन करतात.
- सारख्या वर्तुळ खंडात असलेले कोन समान असतात.
- अर्धवर्तुळातील कोन काटकोन असतो.
- वर्तुळाच्या दोन जिवांनी बनलेला कोन समान असल्यास त्या जिवा एकरुप असतात.
- वर्तुळाच्या केंद्राशी दोन जिवेला काढलेले लंब जिवेस दुभागातात याचा व्यत्यास सुध्दा सत्य आहे.
- तिन नैकरेषीय बिंदुतुन फक्त एकच वर्तुळ जाते.
- त्रिकोणाच्या शिरोबिंदुतन जाणाऱ्या वर्तुळास परिवर्तुळ असे म्हणतात.
- वर्तुळाच्यासमान जिवा त्याच्या केंद्रबिंदुपासुन सारख्याच अंतरावर असतात. या उलट वर्तुळाच्या केंद्रापासुन समान अंतरावर असलेल्या जिवा समान लांबीच्या असतात.
- वर्तुळ कंसाने वर्तुळाच्या केंद्रबिंदुशी केलेले कोन, हा वर्तुळाच्या कोणत्याही इतर बिंदुवर केलेल्या कोनाचे दुप्पट असतात.
- जर वर्तुळकंसाने वर्तुळाच्या उरलेल्या भागावर बनविलेला क्षेत्र $90^0$ असल्यास तर तो कंस अर्धवर्तुळ होते.
- दोन बिंदुना जोडणाऱ्या रेषाखंड त्याच रेषाखंड असलेल्या इतर दोन बिंदुवर सारखा कोन बनवितो. ते चार बिंदु वर्तुळाकार असतात.
- चक्रीय चौकोनाच्या विरुध्द कोनांची जोडी संपुरक असते.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# 13 भुमितीय रचना

## 13.1 प्रस्तावना

रेषाखंड, कोन, त्रिकोण, चौकोण इत्यादींची भुमीतीय रचना करण्यासाठी भुमीतीय उपकरणाची आवश्यकता आहे. तुम्हाला भुमीतीय पेटी पाहिजे ज्यात मोजपट्टी, गुण्याची जोडी, वृत्तलेखणी डिवायडर, कोनमापक.

साधारणता: ही सर्व उपकरणे आकृत्या काढण्यासाठी आवश्यक आहे. भुमितीय रचना ही मोजपट्टी आणि वृत्तलेखणी या दोन उपकरणाच्या साहाय्याने भुमीतीय आकृत्या काढण्यासाठी प्रणाली आहे. मागील वर्गात आपण नेहमी त्रिकोणाची आणि चौकोनाची रचना करण्याची अंकीत मोजपट्टी आणि वृत्तलेखणीचा उपयोग केला. रचनेत अजुन काही उपकरणाची सुध्दा गरज आहे. तुम्ही अंकीत मोजपट्टी आणि कोन मापकाचा सुध्दा उपयोग करता. काही रचना आपण सरळ काढु शकत नाही. उदाहरणार्थ जेव्हा त्रिकोणाची 3 मापे दिली असता त्याचा वापर सरळ करु शकत नाही. आपणास गरज असलेल्या मापांचे विश्लेषणा व्दारे कोणत्या प्रकारे रचना पुर्ण करु शकतो. या धड्यात शिकु या.


## 13.2 मुलभुत रचना

तुम्ही (i) रेषाखंडाचे लंबदुभाजक काढणे (ii) $30^\circ, 45^\circ, 60^\circ, 90^\circ$ आणि $120^\circ$ चे कोन दुभाजक काढणे किंवा दिलेल्या कोनाचे कोनदुभाजक काढणे. मागील वर्गात शिकलेत. या रचनेच्या कारणांची मात्र चर्चा केली नाही. या सर्व रचनांना तर्किक सिध्दता देणे या धड्यांची उद्दीष्टे आहेत.

### 13.2.1 दिलेल्या रेषेच्या लंबदुभाजकाची रचना करणे

उदाहरण-1. दिलेल्या रेषाखंड AB चे लंबदुभाजक काढा आणि उत्तराच्या पुरावा द्या.

सोडवणुक : रचनेच्या पायऱ्या




पायरी 1: AB रेषाखंड काढा.

पायदी2: A केंद्रबिंदु घेऊन $\frac{1}{2}\overline{AB}$, पेक्षा जास्त त्रिज्या घेऊन AB रेषाखंडाच्या दोन्हि बाजुला चाप काढा.

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



पायरी 3 : 'B' केंद्रबिंदु घेऊन वरील प्रमाणे सारखी त्रिज्या घेऊन अगोदरच्या चापास छेदणारा दुसरा चाप काढा.

पायरी 4 : या छेदन बिंदुस P आणि Q नाव द्या. P आणि Q जोडा

पायरी 5 : समजा PQ हा $\overline{AB}$ ला O बिंदुवर छेदतो.


अशारीतीने रेषा POQ हे येणारा AB चे लंबदुभाजक आहे.

वरील रचना तुम्ही कशी सिध्द कराल? म्हणजे तर्कानुसार "PQ हा AB" चा लंबदुभाजक आहे.

रचनेची आकृती काढा. आणि A ला P आणि Q; शी जोडा B ला P आणि Q जोडा

त्रिकोणाच्या एकरुपतेच्या गुणधर्मावरुन आपण त्यास सिध्द करु शकतो.

सिध्दता




| **पायऱ्या** | **कारण** |
|---|---|
| $\Delta^s$ PAQ आणि $\Delta$PBQ मध्ये | घेतलेले त्रिकोण |
| AP = BP ; AQ = BQ | समान त्रिज्या |
| PQ = PQ | सामाईक कोन |
| $\therefore \Delta PAQ \cong \Delta PBQ$ | बा.बा.बा. नियम |
| म्हणुन $\angle APO = \angle BPO$ | CPCT (एकरुप त्रिकोणाचे संगत भाग) |
| आता $\Delta^s$ APO आणि BPO | घेतलेले त्रिकोण |
| AP = BP | समान त्रिज्या |
| $\angle APO = \angle BPO$ | सिध्द केले |
| OP = OP | सामान्य |
| $\therefore \Delta APO \cong \Delta BPO$ | बा.को.बा. नियम |
| म्हणुन OA = OB आणि $\angle APO = \angle BPO$ | CPCT |
| सारखे $\angle AOP + \angle BOP = 180^\circ$ | रेषीय जोडी |



आपणास येते $\angle AOP = \angle BOP = \frac{180^\circ}{2} = 90^\circ$ वरील उत्तरावरुन

अशारीतीने PO, म्हणजेच POQ हा AB चा लंब दुभाजक आहे. सिध्दतेची गरज आहे.

SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




### 13.2.2 दिलेल्या कोनाचे कोनदुभाजकाची रचना करणे.


उदाहरण-1: दिलेला कोन ABC च्या कोन दुभाजकाची रचना करा.

सोडवणुक: रचनेच्या पायऱ्या


पायरी 1 : दिलेला कोन ABC काढा.




पायरी 2 : कोणताही त्रिज्या घेऊन B केंद्रापासुन आकृतीत दाखविल्याप्रमाणे $\overrightarrow{BA}$ आणि $\overrightarrow{BC}$ किरणाला D आणि E बिंदुवर चाप काढा.




पायरी 3 : समान त्रिजेच्या E आणि D केंद्रावरुन आकृतीत दाखविल्याप्रमाणे एकमेकांस F वर छेदणारे दोन चाप काढा.





पायरी 4 : किरण BF काढा. हे ∠ABC चे कोन दुभाजक आहे.

वरील रचनेची तर्कीक सिध्दता पाहु या.

D, F आणि E, F जोडा. याला सिध्द करण्यासाठी त्रिकोणाच्या एकरुपतेचा उपयोग करतो

सिध्दता:

| पायरी | कारण |
|---|---|
| $\Delta^s$ BDF मध्ये ΔBEF मध्ये | घेतलेले त्रिकोण |
| BD = BE | सारख्या चापाचे त्रिज्या |
| DF = EF | समान त्रिजेचे चाप |
| BF = BF | सामन्य |
| ∴ ΔBDF ≅ ΔBEF | बा.बा.बा. नियम |
| म्हणुन ∠DBF = ∠EBF | एकरुप त्रिकोणाचे संगत भाग |
| अशारितीने BF हा | सिध्द करण्याची गरज आहे. |
| ∠ABC चा कोन दुभाजक आहे. | |








Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




### प्रयत्न करा.




BEFD चौकोनाच्या बाजु, कोन, आणि, कर्णाचे निरिक्षण करा. खालील दिलेल्या आकृत्याची नांवे द्या. आणि त्यांचे गुणधर्म लिहा.

1.




2.






### 13.2.3 दिलेल्या किरणाच्या आरंभबिंदुजवळ $60^0$ च्या कोनाची रचना करणे

उदाहरण-3: A आरंभबिंदुवरुन AB किरण काढा. आणि AC किरणाची रचना अशी करा की, $\angle BAC = 60°$.

सोडवणुक: रचनेच्या पायऱ्या


**पायरी 1 :** काही त्रिज्या घेऊन A केंद्रबिंदुवरुन AB किरण काढा AB, D बिंदुवर छेदणारा एक चाप AB काढा




**पायरी 2 :** काही त्रिज्या घेऊन D केंद्रवरुन आगोदर च्या चापास E बिंदुवर छेदणारा दुसरा चाप काढा.

**पायरी 3 :** E बिंदुमधुन जाणारे AC किरण काढा $\angle BAC$ हा आवश्यक $60^\circ$ चा कोन येतो.




आपण काढलेल्या रचनेला सिध्द करण्यासाठी आकृती पुन्हा काढुन DE ला जोडा त्यास खालील प्रमाणे करु शकतो.

| पायऱ्या | कारण |
|---|---|
| $\Delta$ ADE मध्ये | घेतलेले त्रिकोण |
| AE = AD | सारख्या चापाची त्रिज्या |
| AD = DE | समान त्रिजेचे चाप |
| Then AE = AD = DE | सारख्या त्रिजेचे सारखे चाप |
| $\therefore$ $\Delta$ ADE हा समभुज त्रिकोणआहे. | सर्व बाजु समान असतात. |
| $\angle EAD = 60°$ | समभुज त्रिकोणाचा प्रत्येक कोन |
| $\angle BAC$ हा $\angle EAD$ ला समान आहे. | $\angle EAD$ हा $\angle BAC$ चा भाग आहे |
| $\angle BAC = 60^o$. | सिध्दतेची गरज आहे. |



SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



**प्रयत्न करा**



वर्तुळ काढा. त्याच्यावरील बिंदु ओळखा. त्रिजेच्या लांबीवरुन चापास वर्तुळावर कापा. वर्तुळाचे किती भाग पडतात? कारणे सांगा?

**अभ्यास - 13.1**




1. दिलेल्या किरणाच्या आरंभबिंदुपासुन खालील कोनांची रचना करा आणि रचनेची सिध्दता करा.
   (a) $90^o$ (b) $45^o$
2. वृत्तलेखणीच्या आणि मेजपट्टीच्या साहाय्याने खालील कोणाची रचना करा. कोनमापकांच्या साहाय्याने पडताळा करुन पाहा.
   (a) $30^o$ (b) $22\frac{1}{2}^o$ (c) $15^o$
   (d) $75^o$ (e) $105^o$ f) $135^o$
3. 4.5 से.मी. बाजु दिलेल्या समभुज त्रिकोणाची रचना करा आणि रचनेचे स्पष्टीकरण करा.
4. पाया आणि आधार कोन दिला असता समद्वीभुज त्रिकोणाची रचना करा आणि रचनेची स्पष्टीकरण करा.
   (सुचना: कोणत्याही मापाची बाजु आणि कोन घेऊ शकता)

## 13.3 त्रिकोणाची रचना( विशेष संदर्भात)

आता पर्यत आपण काही मुलभुत रचना करुन त्यांची सिध्दता करुन दाखविली. आता काही विशेष प्रकारचा मापावरुन त्रिकोणाची रचना करुत. त्रिकोणाची एकरुपता बा.को.बा., बा.बा.बा., को. बा. को., आणि उजव्या बाजुचे नियम इत्यादीची आठवण करा. वरील नियमानुसार त्रिकोणाची रचना कशी करतात. तुम्ही अधीच 7 व्या वर्गात शिकलात.

त्रिकोणाच्या रचनेसाठी तिन मापांची गरज असते. कोणतीही तीन मापे मिळुन सर्व संदर्भात त्रिकोणाची रचना करता येत नाही. उदा. दोन बाजु एक कोन( लागुन नसलेले) दिला असता, त्रिकोण काढणे शक्य नाही. अशा रचनेसाठी आपणास काही स्पष्टीकरण द्यावे. लागते. अशा संदर्भात आपण दिलेल्या मापांसोबत बा.को. बा. बा.बा.बा. , को.बा. को. आणि उजवी बाजु या नियमाचा वापर करतो. उदा.

### 13.3.1 रचना: पाया,आधार कोन आणि इतर कोन दोन बाजुची बेरीज दिली असता त्रिकोणाची रचना करणे




उदाहरण-4: $BC = 5$ से.मी.., $AB + AC = 8$ से.मी.आणि $\angle ABC = 60^o$ दिले असता.$\Delta ABC$ ची रचना करा.

सोडवणुक: रचनेमधील पायऱ्या




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



**पायरी 1 :** $\Delta ABC$ चे अंदाजे चित्र रेखाटा आणि नेहमी प्रमाणे दिलेल्या मापाची खुण करा. ($AB + AC = 8$ से.मी. खुण कशी करता?)

(रचनेत तिसरा शिरोबिंदु A चा स्थान कसे निश्चित करतो?)





विश्लेषण: $AB + AC = 8$ से.मी. BA ला D पर्यंत असे वाढवा की, $BD = 8$ से.मी.

$\therefore\ BD = BA + AD = 8$ से.मी.

परंतु $AB + AC = 8$ से.मी.(दिले आहे)

$\because\ AD = AC$





A ला BD वर दर्शविण्या साठी काय कराल?


A हा C आणि D पासुन समान अंतरावर आहे.

A ला दर्शविण्यासाठी $\overline{CD}$ चा लंबदुभाजक BD वर काढा.

$AB + AC = BD$ कसे सिध्द करता?





**पायरी 2 :** $\overline{BC} = 5$ से.मी. चा पाया काढा आणि $\angle CBX = 60^\circ$ चा B वर कोन काढा




**पायरी 3:** 8 से.मी. ($AB + AC = 8$से.मी.) त्रिजेच्या B केंद्रबिंदुरुन D बिंदुवर छेदणारा $\overrightarrow{BX}$ चाप काढा.

**पायरी 4 :** CD ला जोडा आणि A बिंदुवर मिळणारा CD चा लंबदुभाजक BD काढा.




**पायरी 5:** आवश्यक असणारे कोन ABC येण्यासाठी AC ला जोडा आता आपण रचनेशी सहमत आहो.

**सिध्दता :** A हा $\overline{CD}$ च्या लंबदुभाजकावर आहे.

$\because\ AC = AD$

$AB + AC = AB + AD$

$= BD$

$= 8$ से.मी.

म्हणुन $\Delta ABC$ हा अपेक्षीत त्रिकोण आहे.



SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



**विचार करा आणि चर्चा करा आणि लिहा.**



BC = 6 से.मी. $\angle B = 60^\circ$ आणि AB + AC = 5से.मी. मापानी त्रिकाणे ABC काढु शकता का? जर नाही तर कारणे द्या.

### 13.3.2 रचना, पाया, आधारकोन, आणि इतर दोन बाजुमधील फरक दिला असता त्रिकोणाची रचना करणे.


ABC त्रिकोणात BC पाया आहे. $\angle B$ हा आधार कोन आहे. आणि दोन बाजु मधील फरक AB – AC या संदर्भात AB>AC किंवा AC-AB, या संदर्भात AB<AC घ्या आणि त्रिकोण ABC ची रचना करा अशारीतीने आपण रचनेच्या दोन संदर्भाची चर्चा खालील उदाहरणातकरु.

संदर्भ (i) समजा AB > AC

उदाहरण-5: BC = 4.2 से.मी. $\angle B = 30^\circ$ आणि AB – AC = 1.6 से.मी. दिले असता $\Delta ABC$ त्रिकोणाची रचना करा.


सोडवणूक: रचनेच्या पायाऱ्या

**पायरी 1:** $\Delta ABC$ ची अंदाजे चित्र रेखाटा आणि दिलेल्या मापाच्या खुणा करा.





( AB – AC = 1.6 से.मी.ची खुण कशी कराल?)


**विश्लेषण :** AB – AC = 1.6 से.मी. आणि AB > AC,AB वर D ची अशी खुण करा की AD = AC आता BD = AB – AC = 1.6 से.मी.CD ला जोडा आणि शिरोबिंदु A माहित करण्यासाठी वाढविलेल्या BD वर CD चे लंबदुभाजक काढा.$\Delta ABC$ त्रिकोण येण्यासाठी AC ला जोडा




**पायरी 2:** BC = 4.2 से.मी. $\angle B = 30^0$ आणि BD = 1.6 से.मी. (म्हणजेच AB - AC) बा.को.बा. नियमाचा उपयोग करुन $\Delta BCD$ काढा.




**पायरी 3 :** CD चे लंबदुभाजक काढा.समजा ते किरण BDX ला A बिंदुवर मिळते.







SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



**पायरी 4:**ABC त्रिकोण येण्यासाठी AC ला जोडा.




**विचार करा, चर्चा करा आणि लिहा**


त्रिकोण ABC ची रचना सारख्या मापांनी दिली आणि आधारकोन ∠B च्या ऐवजी ∠C दिला असता करु शकता का? अंदाजे चित्र काढुन रचना करा.

**संदर्भ (ii)** समजा AB < AC

उदाहरण-6: ΔABC ची रचना करा BC = 5से.मी. ∠B = 45° से.मी. AC – AB = 1.8 से.मी.

सोडवणुक: रचनेच्या पायऱ्या

**पायरी 1:** ΔABC चे अंदाजे चित्र रेखाटुन दिलेल्या मापाचे खुण करा AC – AB = 1.8 से.मी. ची खुण कशी कराल याचे विश्लेषण करा.




**विश्लेषण :** आता AC – AB = 1.8 से.मी. म्हणजेच AB < AC वाढवुन त्यावर AB ला वाढवा आणि त्यावर D बिंदु शोधा. AD = AC
आता BD = AC – AB = 1.8 से.मी.म्हणजेच (∵ BD = AD – AB आणि AD = AC)
DC च्या लंबदुभाजावर A माहित करण्यासाठी CD ला जोडा.

**पायरी 2 :**BC = 5 से.मी. काढुन ∠CBX = 45°
ची रचना करा. 1.8 से.मी. (BD = AC – AB) त्रिज्या घेऊन B केंद्रबिंदुपासुन वाढविलेलो बिंदु D.वर XB रेषेला छेदणारा एक चाप काढा.

**पायरी 3 :** DC चे लंबभुजाक काढुन DC. जोडा.

**पायरी 4 :**समजा ती $\overrightarrow{BX}$ ला A बिंदुवर मिळतो आणि AC जोडा.
ΔABC हा त्रिकोण आहे.

आता तुम्ही रचनेची सिध्दता देऊ शकते का?

**सिध्दता:** ΔABC, मध्ये A बिंदु हा DC च्या लंबदुभाजकावर स्थित आहे.


∴ AD = AC

AB + BD = AC

म्हणुन BD = AC – AB

= 1.8 से.मी.

म्हणुन ΔABC हा येणारा त्रिकोण आहे.






Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




### 13.3.3 रचना: परिमीती आणि दोन आधारकोन दिले असता त्रिकोणाची रचना करणे.

दिलेले आधार कोन $\angle B$ आणि $\angle C$ आणि परीमीती $AB + BC + CA$, यावरु त्रिकोण ABC ची रचना करणे


उदाहरण-7: त्रिकोण ABC ची रचना करा ज्यामध्ये $\angle B = 60^o$, $\angle C = 45^o$ आणि $AB + BC + CA = 11$ से.मी. आहे

सोडवणुक: रचनेच्या पायऱ्या




**पायरी 1 :** त्रिकोण ABC ची अंदाजे आकृती काढा. आणि दिलेल्या मापेची खुण करा.
( तुम्ही त्रिकोणाच्या परिमीतीची खुण करु शकता का ?)


विश्लेषण: $\Delta ABC$ च्या परिमीतीशी समान म्हणजे $AB + BC + CA$ असलेले XY रेषाखंड काढा कोन $\angle YXL$ ला समान असलेले $\angle B$ आणि $\angle XYM$ ला समान $\angle C$ ला समान असलेला काढा आणि त्यास दुभागा समजा ते दुभाजक A बिंदुवर छेदतात.
XY ला B बिंदुवर छेदणारा AX चा दुभाजक काढा. आणि AY चा C बिंदुवर छेदणारा लंब दुभाजक काढा नंतर AB आणि AC ला जोडल्यास आपणास अपेक्षीत त्रिकोण ABC येते.




**पायरी 2:** $XY = 11$ से.मी. चा रेषाखंड काढा.
$(XY = AB + BC + CA$ सारखा)




**पायरी 3 :** $\angle YXL = 60^o$ आणि $\angle XYM = 45^o$ ची रचना करा आणि या कोनांचे कोनदुभाजक काढा.





**पायरी 4 :** समजा या कोनांचे दुभाजक A बिंदुवर छेदतात आणि AX किंवा AY जोडा

**पायरी5 :** AX आणि AY चे लंबदुभाजक काढा.जे $\overrightarrow{XY}$ ला अनुक्रमे B आणि C बिंदुत छेदते.

AB आणि AC जोडा

ABC हा येणारा त्रिकोण आहे.






SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



तुम्हाला रचनेची सिध्दता खालिल प्रमाणे करता येईल.

**सिध्दता:** AX चा लंबदुभाजक PQ वर B बिंदु आहे.

$\therefore$ XB = AB आणि याच प्रमाणे CY = AC

यावरुन AB + BC + CA = XB + BC + CY

= XY

पुन्हा $\angle BAX = \angle AXB$ ($\because$ XB = AB in $\Delta AXB$) आणि

$\angle ABC = \angle BAX + \angle AXB$

($\Delta ABC$चे बाहेरील कोन).

$= 2\angle AXB$

$= \angle YXL$

$= 60^{o}$.

अशारितीनते $\angle ACB = \angle XYM = 45^{o}$

$\therefore$ $\angle B = 60^{\circ}$ आणि $\angle C = 45^{\circ}$ रचना केली.

**प्रयत्न करा**



सारख्या मापाने दुसऱ्या पध्दतीत त्रिकोणाची रचना करु शकता का?

**(सुचना** $\angle YXL = \frac{60^{\circ}}{2} = 30^{\circ}$


आणि $\angle XYM = \frac{45^{\circ}}{2} = 22\frac{1}{2}^{\circ}$ ) घ्या.


## 13.3.4 रचना: वर्तुळाची जिवा आणि त्रिकोण दिला असता वर्तुळखंडाची रचना करणे.

उदाहरण-8: 7 से.मी. लांबीच्या वर्तुळजिवावर 60° चा कोन असणारा वर्तुळखंडाची रचना करणे.

सोडवणुक: रचनेच्या पायऱ्या

पायरी-1: 600 चा कोन असणारी वर्तुळखंडाची अंदाजी आकृती काढा. (मोठा वर्तुळखंड काढा. का?) केंद्रबिंदुशिवाय तुम्ही वर्तुळ काढु शकता का?




विश्लेषण: समजा वर्तुळाचा केंद्रबिंदु 'O' आहे. समजा AB हा दिलेला जिवा आहे आणि ACB हा C = 60° कोन असलेला अपेक्षीत वर्तुळखंड आहे.समजा $\widehat{AXB}$ हा C अंतरीक कोनवरील चाप आहे. कारण

$\angle ACB = 60^{\circ}$, $\angle AOB = 60^{\circ} \times 2 = 120^{\circ}$

$\Delta OAB$ मध्ये OA=OB (समान्य वर्तुळाची त्रिज्या)

$\therefore \angle OAB = \angle OBA = \frac{180^{\circ} - 120^{\circ}}{2} = \frac{60^{\circ}}{2} = 30^{\circ}$

म्हणुन आपण $\Delta OAB$ काढुन अंतर OA किंवा OB ला समान असलेल्या त्रिजेचे वर्तुळ काढु शकतो.



Downloaded from https:// www.studiestoday.com

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com





**पायरी-2** : AB = 7से.मी. लांबीचा रेषाखंड काढा.




**पायरी-3** : $\angle BAX = 30°$ आणि $\angle YBA = 30°$येतील असे $\overrightarrow{AX}$ $\overrightarrow{BY}$ किरण काढा जे 0 बिंदुवर छेदते.


[सुचना: $60^0$ ची दुभागणी करुन $30^0$ चा कोन काढा.]




**पायरी-4 :** OA किंवा OB त्रिज्या आणि 0 केंद्रबिंदु घेऊन वर्तुळ काढा.

**पायरी-5** :'C' बिंदुची ची खुण वर्तुळाच्या चापावर करा AC आणि BC जोडा आपणास $\angle ACB = 60°$ येते.




अशारितीने ACB हा येणारा वर्तुळखंड आहे. या रचनेची सिध्दता करु या.

सिध्दता: OA = OB (वर्तुळाची त्रिज्या)

$\therefore \quad \angle OAB + \angle OBA = 30° + 30° = 60°$

$\therefore \quad \angle AOB = 180° - 60° = 120°$

$\overset{\frown}{AXB}$ चापाच्या वर्तुळाकेंद्रावर केलेला अंतरिक कोन 120° आहे.



$$\therefore \quad \angle ACB = \frac{120°}{2} = 60°$$

$\therefore$ ACB हा येणारा वर्तुळखंड आहे.

## प्रयत्न करा.



वर्तुळ खंडातील कोन काटकोन असल्यास काय घडते? कोणत्या प्रकारचा वर्तुळ खंड तुम्हास मिळतो? आकृती काढा आणि त्याची कारणे द्या?

## अभ्यास - 13.2



1. BC = 7 से.मी. $\angle B = 75^{\circ}$ आणि AB + AC = 12 से.मी. असलेला $\Delta ABC$ ची रचना करा.
2. QR = 8 से.मी. $\angle Q = 60°$ आणि PQ – PR = 3.5 से.मी. त्रिकोण $\Delta PQR$ रचना करा.
3. त्रिकोण$\Delta$ XYZ मध्ये $\angle Y = 30^{\circ}$, $\angle Z = 60^{\circ}$ आणि XY + YZ + ZX = 10 से.मी.$\Delta$ XYZ रचना करा.



SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



4. 7.5से.मी. पाया असलेला आणि त्याच्या कर्ण आणि इतर बाजुची बेरीज 15 से.मी. असेल तर काटकोन त्रिकोणाची रचना करा.
5. खालील कोनाच्या मापावरुन त्यांची जिवा 5 से.मी. असता त्यावर वर्तुळ खंडाची रचना करा. i. $90^{\circ}$  ii. $45^{\circ}$  iii. $120^{\circ}$

## आपण काय चर्चा केली ?




1. भुमितीय रचना ही मोजपट्टी आणि वृत्तेलखणी या दोन उपकरणाच्या साहाय्याने भुमीतीय आकृत्या काढण्याची प्रणाली आहे.
2. खालील भुमितीय आकृत्याची रचना त्याच्या सिध्दतेवरुन करा.
   (तर्कीक सिध्दता)
   - दिलेल्या रेषाखंडाचा लंबदुभाजक
   - दिलेल्या कोनाचा दुभाजक
   - दिलेल्या किरणाच्या आरंभबिंदुवर $60^{\circ}$ कोन काढणे.
3. पाया, आधारकोन आणि इतर दोन बाजुंची बेरीज दिली असता त्रिकोणाची रचना करणे.
4. पाया, आधारकोन, दुसऱ्या दोन बाजुमधील फरक दिला असता त्रिकोणाची रचना करणे.
5. परिमीती आणि इतर दोन आधार कोन दिले असता त्रिकोणाची रचना करणे.
6. जिवा आणि कोन दिला असता वर्तुळखंड काढणे.

**मेंदुचा खेळ**

आकृतीत किती त्रिकोण आहेत ?

(गणितशास्त्रज्ञ 'Cevian' च्या स्मृतिसाठी केवीन सुत्र लिहिले आहे.)



(सुचना: समजा प्रत्येक शिरोबिंदुवरुन त्याच्या विरुध्द बाजुस काढलेला रेषेची संख्या 'n' आहे)



SCERT TELANGANA



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# 14 संभाव्यता

***सामान्य ज्ञानाला गणना मध्ये रुपांतर करणे म्हणजेच संभाव्यता सिध्दांत होय***

*- Pierre-Simon Laplace*

## 14.1 प्रस्तावना

सिध्दु आणि विवेक वर्ग मित्र आहेत. एका दिवशी दुपारचे जेवण करतांना ते एकमेकांशी बोलले.



सिद्धु : विवेक,तु आज सायंकाळी काय करत आहे?

विवेक : संभवत: मी आज भारत विरुध्द आस्ट्रलियाचा किक्रेट सामना पाहिले.

सिद्धु : नाणेफेक कोण जिकंले असे तुला वाटत आहे?

विवेक : दोन्ही संघांना नाणेफेक जिकण्यांची समान संधी आहे. तु घरी किक्रेटचा सामना पाहतोस का?

सिद्धु : माझ्या घरी मला किक्रेट पाहण्याची संधी नाही आहे कारण माझा T.V. नादुरुस्त झालेला आहे.

विवेक : ओह, तर माझ्या घरी ये आपण दोघे मिळुन सामना पाहु

सिद्धु : माझा गृहपाठ पुर्ण केल्यानंतर मी येईन

विवेक : उद्या 2 ऑक्टोबर आहे. गांधीजीच्या जन्म दिवसाच्या निमीत्ताने आपल्याला सुट्टी राहणार आहे. म्हणुन तु तुझ गृहपाठ उद्या का करत नाहीस?

सिद्धु : नाही, पहिले मी माझे गृहपाठ पुर्ण करीन नंतर तुझ्या घरी येईन

विवेक : ठिक आहे.

वरील संभाषणावरुन खालील विधाने विचारात घेऊ.

संभवता: मी आज भारत विरुध्द आस्ट्रीलीयाचा किक्रेट सामना पाहिल.

माझ्या घरी मला किक्रेट पाहण्याची संधी नाही आहे.

दोन्ही संघाना नाणेफेक जिकंण्याची समान संधी आहे.

येथे विवेक आणि सिद्धु विशिष्ट वृत्तांताचा संधी विषयी मत ठरवत आहेत.

SCERT TELANGANA

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



बरेचशा संदर्भात आपण असे विधान बोलतो आणि अनुभवाचा वापर करतो. आणि तर्क व्दारे निर्णय घेतो. उदाहरणार्थ आज अल्हादायक आणि प्रकाशित दिवस आहे. मी आज छत्रि न घेता बाहेर जातो.

तथापी, घेतलेला निर्णय सदा आपल्या अनुकुल नसते. एक संदर्भ विचारात घेऊ, पावसाळ्यात मेरी नियमीत पणे शाळेत रेनकोट घेऊन जाते. ती बरेच दिवस शाळेत रेनकोट नेली. पण ती शाळेत येतांना आणि जातांना कधी पाऊस पडला नाही. तथापी, एकेदिवशी ती रेनकोट न्यायाला विसरली आणि त्या दिवशी भरपुर पाऊस पडला.

साधारणपणे उन्हाळ्याची सुरुवात मार्च महिण्यापासुन होते, पण त्या महिण्यात एके दिवशी सायंकाळी भरपुर पाऊस पडला. मेरी सुदैवी ठरली कारण ती दररोजच्या प्रमाणे त्या दिवशी पण छत्री नेली होती आणि ती भिजली नाही.

अशा प्रकारे भविष्यात घडणाऱ्या अंदाजाचा निर्णय आपण घेत असतो. म्हणजेच, घटना घडणार की नाही. वरील दोन्ही संदर्भात, त्यादिवशी पाऊस पडते की नाही याचा अंदाज मेरी करत होती. आपले निर्णय कधी कधी बरोबर असतात आणि कधी कधी नसतात. (का ?)

